REFBK-0014255

३६६५३
बुधवार.
३१/७/५८.
ग्रं. शा.
333

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६६५३ दि: बुधवार
क्रमांक ........ नों दि: ३१/७/५८

REFBK-0014255
REFBK-0014255

# तांबडी माती हिरवे माड

श्री. म. द. जोशी

मनोहर
ग्रंथमाला
प्रकाशन
— १२७ —

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २.

सर्वाधिकार लेखकाचे स्वाधीन

मुखपृष्ठ :
वसंत सहस्त्रबुद्धे

१ मे १९६४.

चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
‘ शिव-पार्वती ’
४६१।१० सदाशिव, पुणे २

किंमत पांच रुपये

आदरपूर्वक समर्पित

माझे श्वशुर

तीर्थरूप जयवंतराव यशवंतरात्र नाईक,

प्रतापराव सरदेसाई

यांना

श्रीपाद जोशी

# आभार

'तांबडी माती हिरवे माड' हें स्वातंत्र्योत्तर काळांतील गोमंतकविषयक पहिलेंच मराठी पुस्तक वाचकांच्या हातीं देतांना मला विशेष आनंद होत आहे. याचें स्वरूप दुहेरी आहे. वर्णनात्मक व विवेचनात्मक. हें केवळ प्रवासवर्णन नव्हे. ज्या गोमंतकाचें राजकीय दृष्ट्या महाराष्ट्रांत स्वागत करण्यास आपण आतुर आहोंत, त्याचें एकूण स्वरूप काय आहे, हें आपल्याला समजावें, हा जसा हें पुस्तक लिहिण्यांत एक हेतु आहे तसाच त्या प्रदेशाच्या विशिष्ट अशा कोणत्या समस्या आहेत व त्या कशा सुटूं शकतील, हेंहि आपल्याला कळावें, हा दुसराहि हेतु त्यांत आहे. या बाबतींत मला कितपत यश मिळालें आहे तें वाचकांनींच ठरवावयाचें आहें.

हें पुस्तक लिहीत असतां ज्या मित्रांनीं अत्यंत निरपेक्ष भावनेनें मला मदत केली त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. मडगांवचे श्री माधव पंडित यांनीं गोमंतकविषयक पुस्तकें व चित्रें पाठवून सहकार्य दिल्यामुळें या पुस्तकांतील माहितीला अचूकपणा येऊं शकला. 'समस्याभूमि गोमंतक' या भागांतील लेख वाचून त्यांतील गुणदोषांची सविस्तर चर्चा करणारे, दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ अॅप्लाइड एकॉनॉमिक रिसर्चचे श्री रा० के० पाटील, यांचा मी विशेष ऋणी आहें. गोवा कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम काकोडकर यांनीं आमचे मतभेद असतांहि पत्ररूपानें व प्रत्यक्ष चर्चेंत दिलेली माहिती मला मिळाली नसती तर या पुस्तकांत मोठेंच वैगुण्य राहून गेलें असतें. भारतीय कीर्तीचे छायाचित्रकार व मराठी-कोंकणीचे लोकप्रिय कवि श्री र० वि० पंडित यांनीं केवळ मैत्रीखातर गोव्याचीं उत्कृष्ट छायाचित्रें मिळवून पाठविलीं, यामुळें

या पुस्तकाची शोभा वाढूं शकली. डॉ० ना. व्यं. प्रभु भेंब्रे व त्यांचे बंधु श्री. के० व्यं० प्रभु भेंब्रे, श्री रा० द० सहकारी, श्री रामदास नाईक वगैरे अपरिचित मित्रांनीं पत्रद्वारें जी माहिती पुरविली, तिचा मला चांगला उपयोग झाला. गोव्याच्या मुक्कामांत वयोवृद्ध व तपोवृद्ध गोमंतकीय नेते श्री ज० वि० कामत, श्री काशीनाथ दामोदर नायक, श्री केशव नायक वगैरे मंडळींनीं प्रत्यक्ष चर्चेच्या द्वारें जी माहिती दिली तिचाहि मला चांगला उपयोग झाला. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं या सर्वांच्या संयुक्त सहकार्यांतूनच हें छोटेखानी पुस्तक तयार झालेलें आहे. म्हणून या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

यांतील कांहीं लेख 'हंस,' 'संपदा' व 'वाङ्मयशोभा' या मासिकांतून आणि गोव्याच्या 'गोमंतक' दैनिकांतून प्रसिद्ध झाल्यामुळें त्यांतील विवेचनावर पुष्कळच उलट-सुलट चर्चा होऊं शकली. म्हणून या नियतकालिकांचाहि मी आभारी आहें.

मनोहर ग्रंथमालेचे मालक श्री मनोहरपंत केळकर यांची माझी मैत्री पुष्कळ जुनी असली तरी आमचे व्यावसायिक संबंध प्रथमच या पुस्तकाच्या रूपानें येत आहेत. त्यांनीं या पुस्तकाची सजावट अत्यंत आत्मीयतेनें करवून घेतली व तें इतक्या उत्कृष्ट स्वरूपांत प्रसिद्ध केलें याबद्दल मी त्यांचाहि अत्यंत आभारी आहें.


माझ्या या पुस्तकानें मराठी वाचकांना गोमंतकाची चांगली ओळख होऊं शकेल अशी आशा वाटते.

'श्री रघुवंश'
पुणें ४

श्रीपाद जोशी

महाराष्ट्र–दिन
१ मे १९६४

[illegible]
३६६५३ [illegible]
३३ [illegible]


सावंतवाडी
बेळगांव
पेडणें
म्हापसें
डिचोली
सांखळी
वाळपई
सतरी
वेळघाट
पणजी
मुरगांव
वास्को
फोंडें
तिनई घाट
दुधसागर
मडगांव
काणकोण
गोमंतक
पोळें
कारवार

ग्रंथालय stamp

# असा आहे हा गोमंतक

भौगोलिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्राचाच अवशिष्ट भाग असलेल्या गोमंतकाची भाषा मराठी आहे हें कांहीं वेगळं सांगायला नको. दक्षिणोत्तर ६७ मैल आणि पूर्वपश्चिम ३७ मैल अशा या लांबट प्रदेशाच्या पूर्वेला सह्याद्रीची पर्वतराजी उभी आहे, आणि पश्चिमेला अथांग अरबी समुद्र पसरला आहे. दक्षिणेला कारवार आणि उत्तरेला तेरेखोलची नदी आणि बेळगांव जिल्हा गोमंतकाच्या सीमा निश्चित करतात.

सुमारे २४८० चौरस मैलांच्या प्रदेशाचे अकरा तालुके आहेत. पेडणे, बार-देश, साखळी, सत्तरी, तिसवाडी, मुरगांव, फोंडे, सांगे, साष्टी, केपें, काणकोण, हे ते अकरा विभाग. आणि या साऱ्या विभागांना जीवनदान करतात तेरेखोल, कोळवाळ, सिंकेरी, मांडवी, जुवारी, साळची, वागणी, तळपणी या प्रमुख नद्या.

रामघाट, प्रवरघाट, अणेघाट, केळघाट, तिनईघाट, दिघीघाट, कुंडलघाट, डोंगरपेघाट हे घाट सह्याद्रीच्या रांगांतून आपल्याला रस्ता देतात. गोमंतकांत प्रवेश करायला समुद्राची बाजू सोडली तर रेल्वेनें लोंढा—कॅसलरॉक मार्ग, एस्. टी. नें दोडा—तिनईघाट हा रस्ता असून समुद्रांतून बोटीने जायचें तर पणजी, मार्मा-गोवा, माजाळी इथं उतरतां येईल.

राजधानीचा मान जातो पणजीकडे. उत्तम बंदरहि आहे तें !

गोमंतकाची सांस्कृतिक परंपरा फार मोठी नि वैचित्र्यपूर्ण आहे. माशेल, मंगेशी, म्हाळसा, वेलिंग, नागेश, महालक्ष्मी, रामनाथ, शांतादुर्गा, कामाक्षी व सप्तकोटीश्वर हीं विख्यात मंदिरें आणि सेंट झेवियरसारखीं चर्चेस यांवरून ती परंपरा स्पष्ट होते.

निसर्गाच्या लीला दाखवतात दूधसाखर, हरवळें येथील धबधबे. आग्वाद, रजमार, फोंडे, मर्दनगड, थिवी, मार्मागोवें, अंजदीव इत्यादि किल्ले इतिहासाची साक्ष देतात तर वर्तमानकाळाची जाणीव बोरी, उसगांव, अस्नोडे येथील प्रमुख पूल करून देतात.

चार शब्दांत गोमंतक हा असा आहे.

# अनुक्रमणिका

पुण्यभूमि गोमंतक
कुलदैवतांचं आगमन १
श्री मंगेश ८
श्रीशांतादुर्गा २०
जुनें गोवें २७
समस्याभूमि गोमंतक
गोमंतकाची भाषासमस्या ३९
कोंकणी भाषिकांची फाळणी ५८
गोमंतकाच्या राजकीय समस्या ६८
गोमंतकाच्या सांस्कृतिक समस्या ८९
गोमंतकाच्या आर्थिक समस्या १०९
वीरभूमि गोमंतक ११७
सौंदर्यभूमि गोमंतक १३९
गोवा-प्रवासांतील मौजा १४६
उपसंहार १५८

वगाइ: ... ग्रं. ग्रां. ... ३६५५३ ... दि: ... क्रमांक ... ३३२ ... नों. दि. ...

# पुण्यभूमि गोमंतक

## कुळदैवतांचें आगर : १

गोवा हें महाराष्ट्राचें नंदनवन किंवा दक्षिणेचें काश्मीर आहे, असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां तें वर्णन सर्वांगीण न होतां निसर्ग-सौंदर्याच्या बाबतीत गोवा काश्मीरशीं स्पर्धा करूं शकतो, एवढाच त्याचा मर्यादित अर्थ घ्यावयाचा. परंतु निसर्गसौंदर्य हें कांहीं गोव्याचें एकमेव वैशिष्टय नव्हे. गायक, वादक, नर्तक, चित्रकार वगैरे अनेक क्षेत्रांतील स्त्रीपुरुष कलावंत गोमंतकानें महाराष्ट्राला व भारताला दिले आहेत. त्या दृष्टीनें गोवा ही कलावंतांना जन्म देणारी भूमि आहे, असें निःसंशयपणें म्हणतां येतें. परंतु एवढ्यानेंहि गोव्याचें वर्णन पूर्ण होत नाहीं. गोव्यांत शेंकडों–हजारों प्रवासी असे भेटतात कीं जे गोव्यांतील निसर्गसौंदर्यहि पाहायला आलेले नसतात अथवा तेथील कलांचा आस्वाद घेण्यासहि आलेले नसतात. ते आलेले असतात आपल्या कुळदेवतेच्या दर्शनासाठीं!–मंगेश, नागेश, रामनाथ, महालक्ष्मी, शांतादुर्गा, महालसा ( म्हाळसा ) वगैरे आपल्या दैवतांना भेटण्यासाठीं! त्यांच्या दृष्टीनें गोवा ही केवळ पुण्यभूमि असते. हिंदुस्थानभर पसरलेल्या गोमंतकीय–विशेषतः सारस्वत स्त्री-पुरुषांच्या मनांत खोलवर कोठेंतरी एक भावना, एक अभिलाषा दडून राहिलेली असते. केव्हांतरी

एकदां गोव्याला जाऊन कुळदेवतेचें दर्शन घ्यावें! नागेशी-मंगेशीपुढें त्यांना काशी-रामेश्वरहि कमी महत्त्वाचे वाटतात. आणि तें स्वाभाविकच नाहीं काय? आपलें घराणें, आपली जन्मभूमि, आपलें कुळदैवत या सर्वांविषयीं खोल कोठेंतरी एक भावना असणें हें तर सुसंस्कृतपणाचेंच एक लक्षण आहे.

## जी गोष्ट हिंदूंची तीच किरिस्ताँवांची

गोमंतकीय किरिस्तांव हा कातोलिक ( रोमन कॅथॉलिक ) पंथाचा अनुयायी असून आचार-विचाराच्या बाबतींत कट्टर सनातनी व श्रद्धाळु आहे. प्रॉटेस्टंट ख्रिश्चन हा सामान्यतः वृत्तीनें उदार, आचार-विचारांनी सुधारक, पुरोगामी व बुद्धिवादी असतो. याच्या उलट कॅथॉलिक हा बहुधा प्रतिगामी, अंधश्रद्ध, संकुचित वृत्तीचा व नव्या विचारांपासून दूर पळणारा असतो. गोमंतकीय ख्रिस्ती लोक कॅथॉलिक असल्यामुळेंच पोर्तुगीज राज्यकर्ते त्यांना हिंदूंपासून वेगळे काढूं शकले. चर्चमध्यें जाऊन प्रार्थना केली कीं झालें. मग बाकीचा वेळ खाणें-पिणें, नाच-रंग वगैरे चैनींत घालविण्यास धर्माची कसलीच अडकाठी नाहीं, समाजाविषयीं आपलें कांहीं कर्तव्य आहे याची जाणीवहि ठेवण्याचें कारण नाहीं, अशीच शिकवण सनातनी हिंदूप्रमाणें कॅथॉलिक खिश्चनांनाहि शेंकडों वर्षांपासून देण्यांत आलेली आहे. त्यामुळें समाजसेवा, समाजसुधारणा, समाजाच्या उन्नतीसाठीं व्यक्तिशः त्याग करणें वगैरे गोष्टी या समाजांत आढळत नाहींत. श्रीमंतांनीं श्रीमंत व गरीबांनीं गरीब राहण्यांतच ईश्वरेच्छा व समाधान मानावें, ही जुन्या हिंदू धर्मातील शिकवण कॅथॉलिकांतहि दृढमूल झालेली दिसते. त्यामुळेंच एका आकाशांतील बापाचीं तीं लेकरेंहि आपसांत उच्चनीच भेदभाव मानतात. ब्राह्मण किरिस्तांव शूद्र किरिस्तांवाशीं प्रसंगीं रोटीव्यवहार ठेवील, परंतु बेटीव्यवहार मात्र करणार नाहीं.

## सम्पन्न देवालयें

एखादा समाज विषमतेच्या धाग्यांनीं जितका अधिक आवळलेला असेल तितकी त्याची ईश्वरनिष्ठा अधिक प्रभावी असते. विशेषतः त्या विषमतेमुळें ज्याला उच्च स्थान लाभलेलें असतें त्याला तें स्थान ज्याच्यामुळें लाभलेलें असतें त्या परमेश्वराबद्दल पराकोटीची कृतज्ञता वाटणें स्वाभाविकच असते; आणि विषमतेचा बळी पडून समाजाच्या पायदळीं तुडवला जाणारा त्याचा भाऊ

बौद्धिक दृष्ट्या कमकुवत असल्यामुळें त्यालाहि त्याच्या दुःखांत सांत्वन देणारा तो परमेश्वरच असतो. अस्पृश्यता व शिवाशीव यांचीं असह्य आगरें व केंद्रस्थानें असलेलीं गोव्यांतील देवस्थानें या वस्तुस्थितीचा पुरावा म्हणून दाखवितां येतील. देवस्थान जितकें अधिक कट्टर व सोंवळें, तितकें तें अधिक सम्पन्न असावयाचें, या सिद्धान्तालाहि गोव्यांतील हिन्दू–ख्रिश्चनांची देवस्थानें अपवाद ठरत नाहीत. वस्तुतः रावापासून रंकापर्यंत सर्वांना मुक्तद्वार असलेलें देवालय सर्वांत अधिक श्रीमंत असलें पाहिजे. परंतु प्रत्यक्ष परिस्थिति उलटीच आढळते. गोमंतकाला स्वातंत्र्य मिळतांच भाषिक वाद जोरांत सुरू झाले, राजकीय रस्सीखेच सुरू झाली आणि आर्थिक क्षेत्रांतील मिरासदारहि पुढें सरसावले. परंतु हरिजनांना मंदिरप्रवेश किंवा सामाजिक समता मिळवून देण्यासाठीं हिरीरीनें झुंजणारा एकहि हरीचा लाल पुढें आला नाहीं, हें कशाचें द्योतक आहे ?

## रमणीय परिसरांतील देवस्थानें :

अर्थात गोव्याला पुण्यभूमि मानणारे श्रद्धावान लोक तेथें जातांना किंवा गेल्यावर अशा प्रकारचे विचारहि मनांत आणणार नाहींत आणि केवळ मौज म्हणून जिवाचा गोवा करावयास जाणारे हौशी व चैनी लोकहि असल्या प्रश्नांनीं आपलें मनःस्वास्थ्य बिघडवून घेणार नाहींत, हेंहि खरें. श्रद्धावान मंडळी देवाचें दर्शन घेऊन कृतकृत्य होतील तर सहलीला गेलेले लोक तेथील रम्य परिसर पाहून खूष होतील. गोव्यांतील हिंदूचीं बहुतेक सारीं देवस्थानें एका लहानशा परिघांतच आहेत. १०–५ मैलांहून अधिक लांबचा पल्ला गांठावा लागत नाहीं. ख्रिस्ती लोकांचीं पुराणप्रसिद्ध मंदिरें ( इगरजा ) मुख्यतः नवें गोवें या एकाच गांवीं असल्यामुळें व तें गांवहि श्री मंगेशीच्या वाटेवरच असल्यामुळें हीं सारीं देवालयें एका दिवसांत पाहून होतात. नारळी, पोफळी व फणस-आंब्याच्या रायांतून डोकावणारीं हीं मंदिरें मोठीं मोहक दिसतात, तेथील शांतता मनाला प्रसन्न करते, तेथील पुजाऱ्याचें शालीन वर्तन देवालयाविषयीं विपरीत भावना येऊं देत नाहीं, तेथील स्वच्छता तर डोळ्यांना विशेषच सुखविते आणि नास्तिकाला सुद्धा क्षणभर देवाच्या दारीं शांतपणें विसावा घ्यावा अशी इच्छा होते. गोमंतकांतील मंदिरांचें हेंच वैशिष्ट्य.

येथें सर्वच मंदिरांचें विस्तृत वर्णन न देतां नमुन्यादाखल एक-दोन मंदिरांचीच

सविस्तर माहिती दिली आहे. तिच्यावरून देवालयांची कल्पना येऊं शकेल.

**देवस्थानासाठीं स्त्रीलिंगाचा वापर :**

गोव्यांत एक मजेदार प्रथा आहे—देवस्थानाचा उल्लेख स्त्रीलिंगांत करण्याची. 'मंगेशीला जाऊन आलों' किंवा 'नागेशीला चाललोंय' अशा तऱ्हेचीं वाक्यें आपल्याला जरा अनोळखी वाटतात. आपल्याकडे 'पंढरी' 'आळंदी' 'जेजुरी' अशी नांवें आहेत, हें खरें, परंतु तीं गांवांचीं नांवें आहेत. तीं देवांवरून पडलेलीं नाहींत. 'अंबाबाईला जाऊन आलों' किवा 'खंडोबाला चाललोय' असें आपण म्हणतों. परंतु देवाच्या नांवाला स्त्रीलिंगी बनवून देवस्थानासाठीं आपण त्याचा वापर करीत नाहीं. ( विठोबाशीं मातेचें नातें निर्माण करण्यासाठीं 'विठाई' असें म्हणतों. परंतु तो प्रकार वेगळा. )

गोमंतकांतील या प्रथेचें कारण ज्या गांवामध्यें किंवा गांवाच्या परिसरांत हीं देवळें आहेत त्यांच्याशीं त्यांचा तसा प्रत्यक्ष संबंध नसतो. तें तें मंदिर हें एक स्वतंत्र संस्थानच असतें. त्यामुळें मंदिर हेंच जेव्हां ग्रामवाचक बनतें तेव्हां तें ईकारान्त स्त्रीलिंगी रूप धारण करतें. प्रियोळचा मंगेश, लोटलीचा रामनाथ किंवा बांदिवडयाचा नागेश असे उल्लेख करण्यापेक्षां मंगेशी, रामनाथी, नागेशी असे उल्लेख करणें अधिक मधुर वाटतें, त्यांत एक प्रकारची मायेची जवळीक प्रत्ययास येते, यांत शंका नाहीं.

**प्रसाद लावणं :**

गोमंतकीय मंदिरांतून 'प्रसाद घेणें' किंवा 'प्रसाद लावणें' या कृतीला एक आगळें महत्त्व असल्याचें आढळून येतें. देवाच्या मूर्तीला कळ्या, फुलें, तांदूळ वगैरे चिकटवून अमुक एक गोष्ट करावी किंवा करूं नये, मनांत योजिलेलें कार्य होईल किंवा नाहीं, हें डाव्या किंवा उजव्या बाजूचें फूल ( किंवा कळी, तांदूळ वगैरे ) खालीं पाडून देवानें आपल्याला सांगावें, अशी देवाची विनवणी किंवा भाकणूक केली जाते. याला 'प्रसाद लावणें' असें म्हणतात. देशावर याला 'कौल लावणें' असें म्हटलें जातें. देशावर सामान्यतः खेडयांतील व मुख्यतः अशिक्षित लोकच गुरवाच्या मार्फत हा कौल लावीत असतात व त्या दैवी आदेशाबरहुकूम आपले बेत आंखीत असतात; परंतु गोव्यांत शहरी, सुशिक्षित,

प्रतिष्ठित लोकहि प्रसाद घेतल्याखेरीज महत्त्वाचें पाऊल टाकीत नाहींत. एखाद्या स्थळाशीं लग्नाचें बोलणें करावयाचें असल्यास आधीं देवाचा प्रसाद घेतला जातो. तो प्रसाद अनुकूल पडला तरच पुढें बोलणीं केलीं जातात. नाहींतर 'प्रसाद मिळाला नाहीं' असें स्पष्ट सांगून बोलणीं थांबविलीं जातात. अमुक एक काम लाभदायक होईल कीं नाहीं, आजारी व्यक्ति आजारांतून उठेल कीं नाहीं, तिला औषधाचा उपयोग होईल कीं अंगारेधुपारे करावेत, वगैरे अनेक 'सांकडी' देवाला घातलीं जातात व त्यांचीं उत्तरें घेऊन त्याप्रमाणें लोक वागतात. गोमंतकीय माणसाच्या भाविकतेचा हा एक मोठा पुरावा म्हणून सांगतां येईल. कित्येकदां देव चटकन् प्रसाद देतो ( म्हणजे डावीकडील किंवा उजवीकडील फूल खालीं पडतें. कपाळावरील फूल पडलें तर तो सर्वोत्कृष्ट प्रसाद समजला जातो!) तर कित्येकदां भक्ताला तीन-तीन दिवस देवाच्या चरणाशीं धरणें धरून बसावें लागतें.

हा प्रसाद मुख्य देवमूर्तीलाच लावला जातो असें नाहीं. मंदिरांतून खास प्रसाद लावण्याच्या मूर्ती असतात. उदाहरणार्थ श्रीमंगेशाच्या मंदिरांत श्रीमंगेशासमोर एक लहानशी काळ्या दगडाची बैठी मूर्ति आहे. या मूर्तीला प्रसाद लावला जातो. तिला ग्रामपुरुष अथवा वत्सगोड्यांचा कुलपुरुष म्हणतात. रामनाथीला श्रीएकनाथ, श्रीशांतादुर्गा, श्रीकामाक्षी व श्रीवेताळ अशा चार देवतांना प्रसाद लावतात.

कांहीं देवांना प्रसाद लावण्याच्या वेळाहि ठरलेल्या असतात. उदाहरणार्थ म्हाडदोळच्या श्रीम्हाळसानारायणीस प्रसाद लावावयाचा असल्यास तो पहांटे श्रीच्या मंगल स्नानानंतर ४-३० ते ५-३० पर्यंतच्या एका तासाच्या अवधींतच लावला पाहिजे.

कोणत्या देवाला कोणता प्रसाद लावावयचा तें ठरलेलें असतें. उदाहरणार्थ श्रीमहालक्ष्मीला तुंब्याच्या फुलांचे प्रसाद, तर श्रीनागेशाला उकड्या तांदुळाचे प्रसाद लावण्याची प्रथा असून ते तांदूळ पुरोहित स्वतः घरीं तयार करवून सोवळ्यांत ठेवतात. ( या चालीवरूनहि या देवळयाचें प्राचीनत्व सिद्ध होत असून हा देव स्थानिक नागपूजक आदिवासींचा असावा असें म्हणतां येतें. ) रामनाथीच्या देवांना करंबलाच्या पानाचे प्रसाद लावतात तर म्हाडदोळच्या म्हाळसानारायणीस तुळशीमंजिरींचा प्रसाद लावला जातो. केरीच्या श्रीविजयादुर्गा देवीकडून प्रसाद

घेतांना ते देवीच्या आसनाला लावण्यांत येतात व ते पटकुळीच्या फुलांचे असतात.

## देवदर्शनाचा बाजार नाहीं :

भारताच्या बहुतेक प्रांतांतील मंदिरें ज्यानें पाहिलीं आहेत त्या माझ्या-सारख्या चौकस मुशाफिराच्या डोळ्यांत गोमंतकांतील मंदिरांसंबंधीं एक गोष्ट चटकन् भरली; आणि आवडलीहि. ती म्हणजे या देवळांतून देवदर्शनाचा बाजार चालत नाहीं. देवदर्शनासाठीं आलेली व्यक्ति ही भक्त नसून आपलें सावज आहे, अशाच भावनेनें बहुतेक तीर्थक्षेत्रातील पंडे-बडवे-उपाध्ये वागत असतात. काशींत, मथुरेंत किंवा पंढरपुरात श्रीमंत यात्रेकरूंचे ते खूनहि पाडण्यास मागें-पुढें पाहात नाहींत, त्यामुळें एकटा-दुकटा धनिक यात्रेकरू जीव मुठींत घेऊनच या तीर्थक्षेत्रांत प्रवेश करतो. ज्याच्याजवळ पैसा नसतो असा भक्त तेवढ्या बाबतींत निःशंक असतो परंतु त्याला त्याच्या दारिद्र्यामुळें सहजासहजीं किंवा सुखासुखी देवदर्शन घडत नाहीं. कारण तेथें देवदर्शनाचा बाजार चाललेला असतो. जो कोणी भरपूर पैसा देईल त्याला व्यवस्थितपणें दर्शन मिळतें. ज्याच्या-जवळ पैसा नसेल त्याचीं नाना प्रकारें अडवणूक केली जाते. देवाचा काळा बाजार चालतो. निदान दर्शनासाठीं आलेल्या माणसाकडे भिकाऱ्यासारखे पैसे मागून हे पंडे-पुजारी-बडवे त्याचा जीव हैराण केल्याशिवाय तरी राहात नाहींत.

ही स्थिति गोव्यांतील देवळांत मुळींच आढळत नाहीं. पैशासाठीं वखवखलेले चेहरे येथें दिसत नाहींत. येथील भटा-ब्राह्मणांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें समाधानाचें, संतोषाचें स्मित आढळतें. तुम्ही नवा पैसाहि देवापुढें ठेवला नाहीं, तरी त्याच्या कपाळाला आंठी पडत नाहीं कीं तुम्हाला तीर्थ व प्रसाद ( देवाचा निर्माल्य ) देण्याला तो टाळाटाळ करीत नाहीं. त्याची ती वृत्ति पाहिली कीं आपल्याला बरें वाटतें आणि आपण स्वेच्छेनें आपल्या ऐपतीप्रमाणें कांहीं ना कांहीं देवापुढें ठेवतों. देवाला अभिषेक, एकादशणी, आवर्तन, लघुरुद्र, महा-रुद्र, नैवेद्य वगैरे करावयाची इच्छा असल्यास त्याबद्दल पैसे देऊन पावती घ्यावयाची. प्रत्येक देवकृत्याचे दर ठरलेले, छापील असतात. त्यामुळें गडबड गोंधळ होण्याची भीतीच नसते.

प्रत्येक मंदिरांत वेगवेगळ्या प्रकारचे सेवेकरी असतात. अभिषेकी ( अभिषेक

व आरती करणारा ), पुजारी ( पुजेसाठी पाणी आणणें, निर्माल्य काढणें, गाभारा झाडणें, गंध उगाळणें, मूर्ति पुसणें, फुलें वाहाणें वगैरे कामें करणारा ), ज्योतकर ( नंदादीप लावणारा ), पुराणिक ( पुराण सांगणारा ), हरिदास ( कीर्तन करणारा ), घसास ( गाभाऱ्या बाहेरील पौरोहित्य करणारा ), भालदार-चोपदार ( वेत्रधार ) वाजंत्री, चौघडावाले, मशालजी, पहारेकरी, शिपाई, कलावंतिणी ( नृत्य-गायन करणाऱ्या ) भाविणी व देवळी ( देवळांतील दिवाबत्ती, साफसफाई वगैरे करणारा ), सोनार, सुतार, लोहार, परीट, तांबट, माळी, बुरुड, कासार वगैरे अनेक प्रकारचे नोकर असतात. एक प्रकारें देवस्थान हें स्वावलंबी स्वतंत्र संस्थानच असतें. येथील नोकरलोक दर्शनार्थ येणाऱ्यांकडे पैसे मागत नाहींत; कारण अशा प्रकारें पैसे मागणें हें कमीपणाचें समजलें जातें. देवकृत्यांचे जे पैसे रोज जमा होतात त्यांची वांटणी दर महिन्यास होऊन सर्व नोकरांना त्यांच्या हिश्श्याची रक्कम दिली जाते. त्यामुळें नोकरांचा त्रास भक्तांना होत नाहीं. अर्थात् गोमंतकांत एकूण भाविकपणाच अधिक असल्यामुळें मंदिराचे नोकरहि आपापलीं कामें इमानानें व श्रद्धेनें करतात, त्यामुळेंहि त्यांचा त्रास इतरांना होत नाहीं.

# श्री मंगेश : २

गोमंतकांतील देवळांच्या बाह्य स्वरूपांत इतकें साम्य आहे कीं पहिल्या दृष्टींत सगळीं देवळें सारखींच भासतात. म्हणून मीं प्रत्येक मंदिराचें एकेक वैशिष्ट्य माझ्या मनाशीं निश्चित करून टाकलें. त्यांपैकीं मंगेशीचें (म्हणजे श्रीमंगेश देवस्थानाचे) वैशिष्ट्य मुख्य रस्त्यापासून मंदिरापर्यंत जाणारा सुमारे दोन फर्लांग लांबचा मनोहर मार्ग हें होय. इतर सर्व मंदिरांसमोरील मार्गापेक्षां हा अधिक लांब व प्रशस्त आहे. पक्का, सीमेंटचा रस्ता. परंतु वाहनांना प्रवेश नाहीं, तुम्ही कितीहि श्रीमंत असला तरी तुमची लाख मोलाची मोटारगाडी बाहेर ठेवून तुम्ही विनम्रपणें पायीं चालतच देवदर्शनासाठीं गेलें पाहिजे. अर्थात् त्याबद्दल तुम्हांला वाईट वाटण्याऐवजीं सभोंवतालच्या निसर्गसौंदर्याचा आनंद लुटण्याची संधि दिल्याबद्दल तशी व्यवस्था करणाऱ्यांचे तुम्ही मनांतल्या मनांत आभारच मानतां. रस्त्याच्या दोहोंबाजूंस कमरेइतके उंच कठडे आहेत; आणि त्यांच्या पलीकडे नारळींच्या गर्द राया. भर दुपारीं सुद्धां कसें शांत थंड वाटतें. मग सायंकाळीं ती शांतता थोडी अधिक गंभीर व कांहींशी उदासवाणी वाटल्यास काय नवल?

बोरीचा पूल चालू होता त्यावेळीं मडगांवहून मोटाररस्त्यानें पणजीला जातांना

मंगेशीवरूनच जावें लागे. मडगांवहून टॅक्सीहि मिळत. अर्ध्या दिवसांत नागेशी, महालक्ष्मी, रामनाथी, शांता दुर्गा, म्हाळसा व मंगेशी हीं सर्व महत्त्वाचीं देवालयें पाहून मडगांवला परत येतां येई. परंतु आतां पोर्तुगीजांनीं बोरीचा प्रचंड पूल उडविल्यामुळें तेथें वाफोरांतून जुवारी नदी ( उर्फ खाडी ) ओलांडावी लागते; आणि गाड्या बदलणें भाग पडतें. त्यांत वेळहि फार जातो व दगदगहि विशेष होते. त्यापेक्षां पणजीहून जाणें फार सोपें. फोंड्याला जाणाऱ्या बसमध्यें बसावयाचें आणि भाणस्तरीचा पूल ओलांडून, कुंडई घाटीनें खालीं उतरावयाचें कीं तासाभरांत मंगेशी ! अंत्रुजेंत म्हणजे फोंडा महालांत प्रियोळ गांवच्या परिसरांत अत्यंत रम्यस्थळीं मंगेशी आहे. गोव्यांतील इतर अनेक देवाप्रमाणेंच मंगेशाचें मूळ वस्तीस्थानहि सासष्टी महालांत होतें तेथें प्रचंड प्रमाणांत बाटवाबाटवी व देवस्थानांचा विध्वंस सुरू झाल्यानंतर श्री मंगेशाला आपलें कुशस्थळी किंवा कुठ्ठाळी हें गांव सोडून इकडे हिजरत ( स्थलांतर ) करावी लागली. गौड सारस्वतापैकीं मुख्यतः वत्स व कौंडिण्य या दोन गोत्रांचे ब्राह्मणच श्री मंगेशाचे कुळावे@ असून गोव्याप्रमाणेंच गोव्याबाहेरहि ह्या कुळाव्या महाजनांची* फार मोठी संख्या आहे. ते अधून-मधून आपल्या सवडीप्रमाणें सहकुटुंब सहपरिवार आपल्या या कुलदैवताच्या दर्शनाला येतात; आपल्या संकल्पानुसार किंवा ऐपतीप्रमाणें तनमनधनानें कुलदेवाची सेवा करतात आणि कृतकृत्य होऊन परत जातात. परंतु श्री मंगेश हा कांहीं फक्त वत्स व गौड गोत्रांपुरताच मर्यादित नाहीं. इतर गोत्रांचे व जाती–जमातींचे लोकहि त्याला भजतात. तीच गोष्ट शांतादुर्गेची. त्यामुळें मंगेश आणि शांतादुर्गा हीं गोव्याचीं प्रातिनिधिक दैवतें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## मधुर सनईनें स्वागत :

सूर्यास्ताचा सुमार. म्हाडद्वोळच्या अलीकडे श्रीमंगेशीच्या महाद्वाराच्या कमानीसमोर आमची बस थांबली. एकूण वातावरण मोठें प्रसन्न होतें. सभोंवतालचें गोमंतकीय निसर्गाचें दृश्य मन मोहून टाकीत होतें. ' श्रीसंस्थान मंगेश ' अशी

---

@ एखाद्या विशिष्ट देवाला आपलें कुलदैवत मानणारीं घराणीं :

* महाजन–यजमान; संस्थानाचे संस्थापक व त्यांचे वंशज.

पाटी असलेल्या महाद्वारांतून प्रवेश करून चिरेबंदी रस्त्यानें एक छोटासा ओहोळ ओलांडून आम्ही मंदिराच्या दिशेनें चालूं लागलों तेव्हां आमचीं मनें कांहींशी भारावलेलीं होतीं. कांहीं ठिकाणचें भक्तीचें वायुमंडल इतकें प्रभावी असतें कीं माणूस कितीहि नास्तिक असला तरी त्याच्यावर तें परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. कदाचित् आमच्यावरील परंपरागत संस्कारांचा तो परिणाम असेल. आणखी एक कारण होतें. सनईवर पूर्वी राग आळविला जात होता. कोमल ऋषभ व कोमल मध्यम यांचे आर्त स्वर हृदयाला स्पर्श करीत होते. त्या सिद्धहस्त शहनाईनवाजाला मी मनांतल्या मनांत धन्यवाद दिले. जेथून ते सूर येत होते त्या नगारखान्याच्या अलीकडेच लालबुंद व पिवळ्या धमक पोफळांचे ( ओल्या सुपाऱ्यांचे ) मोठमोठे घड आणि इतर नानाप्रकारचीं फळें—पानें गुंफून एक कमान तयार केली जात होती. दिवाळीचा पाडवा व सोमवार असा योग होता. त्या दिवशीं त्यामुळें देवाचा विशेष उत्सव; आणि भक्तांचा विशेष उत्साह माघ शुद्ध पौर्णिमेला असतो. त्या तिथीच्या आगेंमागें कित्येक दिवस तेथें महोत्सव चालू असतो. परगांवाहून देव-दर्शनासाठीं येणारे कुळावे हाच मोका साधण्याची धडपड करीत असतात. अर्थात् आम्ही गेलों तेव्हांहि बाहेरचीं एक–दोन कुटुंबें आलेलीं होतींच. परंतु तशीं तीं वर्षभर सारखीं येतच असतात. या मंडळींच्या चेहऱ्यावरील भाबडा भक्तिभाव मोठा पाहाण्यासारखा असतो. दैनंदिन जीवनांत अनेक लांड्यालबाड्या व लटपटी खटपटी करणारीं तीं माणसें कशीं गोगलगायीसारखीं गरीब दिसत असतात.

### तलावांतील मोहक प्रतिबिंब :

नगारखान्याच्या पायरीवर पाऊल टाकतांनाच आपली नजर डावीकडे असलेल्या खोलगट तलावाकडे वळते. मंदिरासमोर तलाव असणें हें गोमंतकीय देवळांचें प्रमुख वैशिष्ट्य त्या तलावानें मंदिराची शोभा तर वाढतेच, परंतु त्याचबरोबर एक प्रकारची पावित्र्यभावनाहि पाहणाऱ्याच्या मनांत निर्माण होते. देवदर्शनापूर्वीं भक्तानें या तलावांत स्नान करावें, निदान हातपाय धुवावेत, अशी मूळ अपेक्षा असणार. आतां या तलावांतील पाणी स्नानाला आमंत्रण देण्याइतकें स्वच्छ नसतें. कांहीं ठिकाणीं तर त्यांत पाय धुण्यासहि मन घेत नाहीं; तरीपण एखादें भाविक कुटुंब तसल्याहि पाण्यांत स्नान करितांना किंवा हातपाय धुतांना दिसतें, तेव्हां वाईट वाटलें तरी आश्चर्य वाटत नाहीं.

## घुमटदार देवालय :

नगारखान्याच्या प्रशस्त दरवाजांतून मंदिराच्या विशाल प्राकारांत किंवा प्रांगणांत प्रवेश करितांच एखाद्या घुमटदार बंगलीवजा असलेलें मंगेशाचें छोटेसें देवालय आपल्याला दिसतें. दक्षिण भारतांतील प्रचंड गोपुरें असलेलीं भव्य देवालयें ज्यानें पाहिलीं आहेत त्याला गोव्यांतील मंदिरें म्हणजे खेळणीं वाटतात—महान् हिमालयासमोर पुण्याची पर्वतीच जणूं! त्यांचा साधेपणा तर खुपण्याइतका डोळ्यांत भरतो—गोव्यांतील माणसांच्या अगदीं विरुद्ध ! गोमंतकीय पुरुषांची भपका-प्रियता, ऐट किंवा स्त्रियांचा नखरेलपणा, दागिन्यांचा सोस यांचा मागमूसहि मंदिराच्या बाह्य स्वरूपावर दिसत नाहीं. जी थोडी मामुली कलाकुसर असते ती लाकडावरील. दगडावरील कारागिरी जवळ जवळ नसतेच. साधेपणांत सौंदर्य पाहणाऱ्या एखाद्या आधुनिक कलावंतानें स्वतःसाठीं बांधलेला बंगलाच जणूं ! मनांत विचार येतो, हिंदु धर्माचा समूळ उच्छेद करावयास टपलेल्या खिस्ती धर्मप्रचारकांना व पोर्तुगीज राज्यकर्त्यांना या मंदिराकडे पाहिल्यानंतर त्यांचा विध्वंस करण्याची इच्छा होऊं नये, उलट त्यांच्याबद्दल एक प्रकारची उपेक्षा व तुच्छताच वाटावी आणि त्यांनीं त्यांच्याकडे दुर्लक्ष करावें, या हेतूनें तर हीं मंदिरें जाणूनबुजून अशीं बांधण्यांत आलीं नसतील नां ? विधवेविषयीं इतरांच्या मनांत अभिलाषा निर्माण होऊं नये, म्हणून तिचें केशवपन करून, तिला अलंकाररहित बनवून तिचें कपाळ पांढरें फटफटीत ठेवून आणि तिला पांढरीं वस्त्रें नेसावयास लावून समाजांतील गुंडांच्या दृष्टीपासून तिचें रक्षण केल्याचें समाधान मानणाऱ्या समाजाच्या मनांत हा विचार विद्यमान नसेलच असें म्हणतां येणार नाहीं !

## सर्वांत उंच दीपस्तंभ :

मंदिराच्या या कमालीच्या साधेपणांत आवारांतील उंच व प्रचंड दीपस्तंभ विशेषच उठून दिसतो. असे दीपस्तंभ मी गोव्यांतच पाहिले. दक्षिण महाराष्ट्रांत देवळांसमोर दगडी दीपमाळा असतात. दक्षिण भारतांत गोपुरें असतात. या दोहोंचें मिश्रण या गोमंतकीय दीपस्तंभांत केलेलें दिसून येते. कदाचित् कुतुबमीनाराचेंहि अनुकरण त्यांत असावें. त्या दीपस्तंभाला आंतून पायऱ्या असतात. त्या चढून वर जातां येतें व तेथून सभोंवतालचा देखावा मोठा सुंदर दिसतो.

मंगेशीचा दीपस्तंभ हा गोव्यांतील इतर सर्व मंदिरांसमोरील दीपस्तंभांपेक्षां उंच व भव्य आहे, हें त्याचें वैशिष्ट्य.

**मंदिराचें वेगळेपण :**

एकामागें एक उभे असलेले तीन घुमट हें मंगेशाच्या मंदिराचें बाह्य वेगळें-पण, चटकन् नजरेंत भरतें. अंगणासभोंवतीं असलेल्या अग्रशाळांमुळें मंदिराला एक प्रकारची नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. परगांवांहून येणाऱ्या भक्तांना राहाण्यासाठीं बांधलेल्या या अग्रशाळा अत्यंत उपयुक्त आहेत यांत शंका नाहीं. देवाच्या प्रथम भेटीसाठीं लागणारे नारळ, केळीं, पानाचे विडे, फुलें वगैरे विक-णारें एक दुकान आहे. तेथून आवश्यक सामग्री घेऊन आपण क्षणभर मंदिरा-कडे डोळे भरून पाहून घेतों. येथून देवाची धूळभेट किंवा धूळदर्शन घ्यावयाचें. प्रत्यक्ष देवाच्या सन्निध जाऊन त्याचें दर्शन घेण्यापूर्वी हातपाय धुवून सर्व तयारी-निशीं रस्त्यावरून, दुरूनच देवाला नमस्कार करणें म्हणजे धूळदर्शन. नव्या मंड-ळींना याची कल्पना नसली तरी जुन्या परंपरेंत वाढलेले स्त्रीपुरुष अशी धूळभेट घेऊन मगच मंदिराच्या पायऱ्या चढतात.

**सभामंडपांतील झगमगाट :**

मंदिराच्या आठदहा पायऱ्या चढून आपण वर गेलों कीं सभागृहांतील † झग-झगीत आरास आपले डोळे दिपवितें. नानाप्रकारच्या रंगीबेरंगी हंड्याझुंबरांनीं सारें छत भरून गेलेलें आहे. अर्थात् त्यांची पद्धतशीर सजावट, त्यांच्यांतील रंगसंगती, सभामंडपाचे ऐसपैस लाकडी खांब, त्या खांबांवरील कमानी, कमानी-वरील सुंदर नक्षीकाम केलेली पटई, वगैरे सर्वच मोठें भपकेबाज आहे. अर्थात् त्यांतहि कलात्मकता आहेच, परंतु ती ढोबळस्वरूपाची. देवळाच्या बाह्य स्वरूपां-तील साधेपणाची मुद्दाम वजावट करण्यासाठींच जणूं हा सारा झगमगाट करण्यांत आलेला असावा, असा भास होतो. कमरेइतक्या उंचीच्या समया, चांदीनें मढविलेले दरवाजे व चौकटी, चांदीचीं घंगाळें, ताटें, वाट्या वगैरे वैभव

---

† मंदिरांतील गाभाऱ्यासमोरच्या ज्या भागाला देशावर सभागृह किंवा सभा-मंडप म्हणतात, त्याला गोव्यांत ‘चौक’ असें नांव आहे.

पाहिल्यानंतर या देवस्थानची आर्थिक स्थिति उत्तम असली पाहिजे याविषयीं मनांत शंका उरत नाहीं.

## जय मांगिरीश !

सभागृहांतून आंत प्रवेश केला कीं तेथें दरवळणाऱ्या फुलांच्या व दीपधूप वगैरेंच्या सुगंधांनीं आपलें मन प्रसन्न होतें. श्री मंगेशाच्या शिवलिंगावर असलेला चांदीचा मुखवटा शांत-गंभीर व आकर्षक वाटतो. गर्भागारांतील स्वच्छता व टापटीप मोठी प्रशंसनीय असते. श्री मंगेशाचें दर्शन घेण्याची एक ठराविक परंपरागत प्रथा आहे. ती प्रथा भक्तांना पाळावी लागते. त्याकामीं पुजारी-सेवेकरी आवश्यक तें मार्गदर्शन करतात. नारळ, केळीं, विडा, फुलें वगैरे देवापुढें ठेवून देवाचें दर्शन घ्यावयाचें, नंतर क्रमाक्रमानें प्रदक्षिणा मार्गातील ग्रामपुरुष मुळकेश्वर व पंचायतनांतील इतर दैवतें यांची भेट घेऊन शेवटीं पुनः श्री मंगेशाला साष्टांग दंडवत घालावयाचा. नंतर पुजाऱ्याकडून तीर्थ व निर्माल्याचा प्रसाद-अंगारा घेऊन क्षणभर खालीं टेकावयाचें. देवदर्शनाला गेल्यानंतर देवासमोर थोडा वेळ बसलेंच पाहिजे, ही प्रथा सार्वत्रिक व सर्वमान्य असली तरी तिचें पालन गोमंतकीय मंदिरांत जितक्या कसोशीनें केलें जातें, तितकें अन्यत्र क्वचितच केलें जात असेल. उकाड्याचें हवामान असल्यामुळें मंदिरांतील तो गार गार स्पर्श आपल्या मनाप्रमाणेंच शरीराचाहि ताप क्षणभर दूर करतो, यांत शंका नाहीं.

मंगेश हें मांगिरीशचें परिवर्तित रूप. मोंगीर किंवा मुंगेर हें शहर आज बिहारमध्यें असलें तरी एकेकाळीं तें गौड (बंगाल) देशांत होतें. तेथील [ तिरहुत (त्रिहोत्रपूर) जवळील ] मोंगीर पर्वताला पूर्वीं मांगिरीश किंवा मानगिरी पर्वत असें नांव होतें. सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला आपल्या निर्मितीबद्दल मोठा गर्व झाला होता. तो गर्व हरण करण्यासाठीं शंकरांनीं त्याच्या सृष्टीचा विध्वंस करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां भगवान् शिवाला प्रसन्न करून घेण्यासाठीं ब्रह्मदेवानें मांगिरीश पर्वतावर त्याची आराधना सुरू केली. याचा अर्थ त्याचा गर्वपरिहार झाला होता. तेव्हां शंकरानें प्रसन्न होऊन आपलें विध्वंसकार्य थांबविलें. ब्रह्मदेवानें या मांगिरीश पर्वतावर स्थापन केलेल्या शिवलिंगाचें नांव पडलें मांगिरीश. त्याचा अपभ्रंश मंगेश.

मांगिरीश पर्वतो नाम पूर्वदेशे त्रिहोत्रके ।
ब्रह्मणा स्थापितं लिंगं पूर्वं तत्र द्विजोत्तम ॥

त्रिहोत्रपूर ( तिरहुत ) हून सरस्वती नदीच्या कांठीं राहाणारे सारस्वत ब्राह्मण परशुरामाच्या निमंत्रणावरून गोव्यांत आले तेव्हां त्यांनीं आपल्याबरोबर भगवान मांगिरीशाला आणलें व अघशी (अघनाशिनी) नदीच्या कांठीं कुशस्थळीं ( कुठ्ठाळी ) येथें त्याची स्थापना केली. तेथून कालांतरानें ती मूर्ति प्रियोळ गांवाच्या परिसरांत आणण्यांत आली. कारण हा भाग त्यावेळीं विजापूरकरांचें मांडलिक असलेल्या सावंतवाडीच्या सौंधेकरांच्या ताब्यांत होता. कालांतरानें सौंधेकरांनीं हैदरअल्लीच्या भीतीनें हा अंत्रुज ( फोंडा ) प्रांत पोर्तुगीजांच्या ताब्यांत दिला. त्यावेळीं तेथें सासष्टीप्रमाणें बाटवाबाटवीचा प्रळय माजणार अशी भीति लोकांना वाटली. परंतु सासष्टींतील बाटवाबाटवींचा अनिष्ट परिणाम धर्मवेड्या पोर्तुगीजांना एव्हांना कळून चुकला होता. तेथील व्यापार बसला होता, उत्पादन घटलें होतें, लोक–जीवन निस्तेज बनलें होतें. म्हणून अंत्रुजेंत बाटवा-बाटवी होणार नाहीं, लोकांनीं निर्भयपणें राहावें, अशा अर्थाचे जाहीरनामे त्यांनीं जागजागीं लावले, आणि आपलें हें आश्वासन कांटेकोरपणें पाळलेंहि. त्यामुळें अंत्रुजेंत सारीं हिंदू मंदिरें निर्धास्तपणें नांदत राहिलीं.

## दोन दंतकथा :

देवस्थान म्हटलें कीं दंतकथा आलीच. श्री मंगेशाच्या विषयींहि अनेक दंत-कथा प्रचलित आहेत. त्यांपैकीं नमुन्यादाखल एक-दोन येथें देत आहोंत.

त्रिहोत्रपूर ( तिरहुत ) च्या मांगिरीश ( मोंगीर ) पर्वतावरील निवासामुळें श्री शंकराला मांगिरीश हें नांव मिळाल्याची कथा मागें आली आहे. आतां या नांवासंबंधीं आणखी एक कथा ऐकण्यासारखी आहे.

गोमंत पर्वताजवळील अघनाशिनी नदीच्या कांठीं कुशस्थळी किंवा कुठ्ठाळी या ठिकाणीं श्री शंकर आले, आणि गुप्तपणें वास करूं लागले. परंतु त्यांच्या या स्थलांतराची माहिती खुद्द त्यांच्या धर्मपत्नीला, पार्वतीलाहि समजली नाहीं. ती त्यांचा शोध करीत करीत अघनाशिनीच्या तीरीं आली आणि पतीच्या दर्शना-साठीं घोर तपश्चर्या करूं लागली. तेव्हां तिची परीक्षा पाहाण्यासाठीं शंकरांनीं भयंकर वाघाचें रूप धारण केलें आणि तिच्यासमोर येऊन डरकाळ्या फोडण्यास

सुरुवात केली. तेव्हां पार्वती शंकराचाच धांवा करूं लागली; ' त्राहि मां गिरीश '-( हे शंकरा माझें रक्षण कर ! ) हा जप करितां करितां तिच्या तोंडून ' मांगिरीश ' ' मांगिश ' असे शब्द निघूं लागले. तेव्हां शंकरांनीं आपलें खरें रूप प्रकट केलें व पार्वतीला वर मागण्यास सांगितलें. त्यावर ती म्हणाली, " माझ्या तोंडून भीतीनं ' मांगिश ' असा शब्द निघाला. म्हणून या प्रसंगाची स्मृति राहाण्यासाठीं तुम्ही याच नांवानं इथं राहावं " श्री शंकरांनीं " तथास्तु " म्हटलें आणि ' मांगिश ' या नांवानेंच या ठिकाणीं पार्वतीसह ते राहिले. पुढें कालांतरानें ' मांगिश 'चेंच ' मंगेश ' असें रूपांतर झालें.

## दुसरी दंतकथा अशीः

कुशाळीला श्रीमांगिरीशाचें आगमगन झाल्यानंतर बराच काळ लोटला. लोकांना शिवलिंगाचें विस्मरण झालें. मंदिराच्या जागीं मोठें जंगल वाढलें. अशा स्थितींत एक चमत्कार घडला. त्या गांवच्या शिवशर्मा नांवाच्या ब्राह्मणाला एका शिवलिंगानें स्वप्नांत दर्शन दिलें आणि म्हटलें, " मी मांगिरीश. शेजारच्या वनांतच राहातों मी. " परंतु शेजारच्या वनांतील ती जागा कशी सांपडावयाची ? शिवशर्मा याच विवंचनेंत असतांना त्याचा गुराखी देवशर्मा लगबगीनें त्याच्याकडे आला आणि सांगूं लागला, " महाराज, एक चमत्कार मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलाय. आपली कपिला गाय दुपारपर्यंत चरते आणि दुधानं कांस भरली कीं जंगलांत एके ठिकाणीं जाऊन आपली कांस रिकामी करून येते. असं बरेच दिवस चाललं होतं. म्हणून मीं आज तिच्यावर पाळत ठेवून तिच्या मागोमाग गेलों. पाहातों तों काय ! एका झाडाखालीं असलेल्या शिवलिंगावर आपल्या आंचळांतलं दूध कपिला सोडीत होती. मोठ सुंदर आहे तें शिवलिंग ! "

अशा प्रकारें स्वप्नांत दिसलेल्या श्री मांगिरीशाचा शोध लागला. शिवशर्म्यानें तात्रडतोब तेथें जाऊन शिवलिंगाचें दर्शन घेतलें आणि ही शुभ वार्ता सभोंवतालच्या वत्स व कौंडिण्य गोत्री सारस्वत ब्राह्मणांना सांगितली. नंतर त्या सर्वांनीं मिळून त्या शिवलिंगाची थाटानें प्राणप्रतिष्ठा करून तेथें मंदिर उभारलें. ज्या देवशर्म्यानें शिवलिंगाचा शोध लावला होता तोहि कालांतरानें तेथें प्रतिष्ठापित झाला. त्याचेंच नांव मुळकेश्वर. श्री मांगिरीशाचें मंगेश हें जसें एक नांव प्रचलित आहे, तसेंच मंगनाथ हेंहि एक गोमंतकीय नांव प्रचलित आहे.

## मंदिराच्या जागीं चर्च !

इ. स. १५६० सालीं सासष्टी भागांत जेझुईट लोकांनीं स्थानिक जनतेला बळजबरीनें ख्रिस्ती बनविण्याचा सपाटा चालविला. त्यांच्यापैकीं पेद्रू मास्कारेंजस यानें कुष्ठाळला जाऊन तेथील 'मखजी' चें देऊळ पाडलें व त्या जागीं एक क्रूस उभारला. चार वर्षांनंतर पाद्री पेरुकुलास यानें तेथें जाऊन एका मरणोन्मुख हिन्दूस सक्तीनें बाप्तिस्मा दिला. त्याबरोबर तेथील हिंदू लोक खवळले आणि त्यांनीं पेरुकुलासला तेथून पिटाळून लावलें. तें प्रकरण तेवढ्यावरच न थांबतां खवळलेल्या हिंदूंनीं त्या पाद्र्याच्या एका पोर्तुगीज नोकराला ठार मारलें आणि तेथें नुकतेंच बांधण्यांत आलेलें चर्च जाळून टाकलें. गुलाम हिंदूंचें हें धाष्ट्र्य पोर्तुगीज सत्तेला कसें सहन होणार ? त्या कृत्याचा सूड घेण्यासाटीं फिरंग्यांनीं कुष्ठाळ येथील सारीं हिंदू देवळें जमीनदोस्त केलीं. त्यांतच मंगनाथाचें म्हणजे मंगेशाचेंहि देऊळ भरडलें गेलें; आणि इ. स. १५६६ सालीं त्या जागेवर चर्च उभारण्यांत आलें. (आतां त्या जागेवर कांहीं अवशेष दिसत नसले तरी कांहीं अंतरावर एक लहानसा तलाव तेवढा दिसतो.)

## प्रियोळला आगमन :

पोर्तुगीजांची धाड देवळावर येतांच कुष्ठाळच्या महाजनांनीं श्रीमंगेशाचें शिवलिंग होडींत घातलें आणि जुवारी नदी ओलांडून विजापूरकरांच्या ताब्यांतील पैलतीर गांठलें. मग प्रियोळ गांवच्या परिसरांत श्री मंगेशाची प्रतिष्ठापना करुन तेथें एक लहानसें मंदिरहि बांधलें. कालांतरानें ही जागा बदलून जवळच दुसऱ्या एका प्रशस्त जागीं मोठें देवालय बांधलें. पुढें तेंहि मंदिर जीर्ण झाल्यावर त्याच्या जागीं आजचें नवें मंदिर उभारलें. हें नवें मंदिर गेल्या पाऊणशें वर्षांच्या आंतीलच आहे. त्यामुळें त्यावर प्राचीन दाक्षिणात्य स्थापत्याची गंभीर छाप दिसत नाहीं; अथवा नव्या जमान्याचा सिमेंटी नखराहि आढळत नाहीं. कुष्ठाळहून मंगेशाचें स्थलांतर पहिल्या प्रथम जेथें झालें त्या जागीं आतां एक तुळसीवृंदावन आहे. तें सध्यांच्या मंदिराच्या प्राकाराबाहेर दक्षिणेस असून दरवर्षीं तुळसी विवाहाच्या दिवशी श्री मंगेशाची पालखी तेथें जात असते.

## रामचंद्र बाबांची देणगी

पेशवाईतील प्रसिद्ध मुत्सद्दी व कर्तबगार तलवारबहाद्दर आणि ग्वाल्हेरच्या शिंदेशाहीच्या संस्थापकांपैकीं एक ( दुसरे जिवबादादा बक्षी हे होते ) रामचंद्र मल्हार सुखठणकर ( कुलकर्णी ) ऊर्फ रामचंद्रबाबा यांचा श्री मंगेशीच्या देवस्थानाशीं आलेला संबंध विशेष उल्लेखनीय आहे.

रामचंद्रबाबा हे सावंतवाडी संस्थानांतील आखली गांवचे कुलकर्णी. दारिद्र्यानें गांजलेल्या स्थितींत कुलदेवी शांतादुर्गा हिच्या दर्शनासाठीं कवळें येथें गेले. देवीचें दर्शन घेऊन आजोळचें दैवत श्रीमंगेश याच्या दर्शनासासाठीं मंगेशीस आले. श्री मंगेशाला अभिषेक करावा अशी इच्छा मनांत उत्पन्न झाली. परंतु त्या वेळीं त्यांच्या खिशांत फक्त एक पावली होती. तेवढ्या चार आण्यांत अभिषेक करण्याचें तेथील पुजारी अभिषेकींनीं नाकारलें. रामचंद्रबाबांना वाईट वाटलें. परंतु त्यांनीं विशेष कांहीं न बोलतां ती पावली समोरच्या तुळसीवृंदावनांत पुरून ठेवली आणि देवाला प्रणाम करून ते चरितार्थाचें साधन शोधण्यासाठीं देशावर आले.

पुढें आपल्या अंगच्या कर्तबगारीनें थोरल्या बाजीराव पेशव्यांची मर्जी संपादून रामचंद्रबाबा राणोजी शिंद्यांचें दिवाण बनले. राणोजीच्या मृत्यूनंतर ते पुनः पेशव्यांच्या दरबारीं येऊन काम करूं लागले.

अशा प्रकारें उच्च पदास पोंचल्यानंतर रामचंद्रबाबा कुलदैवतांच्या दर्शनासाठीं गोमंतकांत आले. कुलदेवता शांतादुर्गा हिचें दर्शन घेऊन मंगेशाच्या दर्शनास आले. त्यावेळीं अभिषेक वगैरे देवकृत्यें करण्यापूर्वीं त्यांनीं मंदिरांच्या महाजनांना बोलावलें आणि पूर्वीं आपण गरीब होतों तेव्हां पावलीचा अभिषेक करण्याचें पुजारी उपाध्यायांनीं नाकारल्याची घटना त्यांना सांगितली. त्यांच्याकडून त्यांनीं असा ठराव करून घेतला कीं यापुढें पावलीनेंच अभिषेक करावा; आणि त्याप्रमाणें तुलसीवृंदावनांत पुरून ठेवलेली पावली उकरून काढून आधीं तिचा मंगेशास अभिषेक करविला आणि मगच मोहरांचा अभिषेक केला.

तेव्हांपासून पावलीनेंच अभिषेक करण्याची प्रथा मंगेशीस चालू आहे.

रामचंद्रबाबांनीं अशा प्रकारें गरिबांनाहि श्रीमंगेशापर्यंत जाण्याचा मार्ग मोकळा करून दिला; परंतु त्याचबरोबर त्यांनीं देवस्थानाची आर्थिक स्थितिहि मजबूत बनविली. पेशव्यांतर्फें त्यांचे मांडलिक सावंतवाडीचे सौंदेकर राजे यांच्या-

करून इनाम गांव व वार्षिक अडीचशें रुपयांची नक्त नेमणूक करून दिली. या इनामगांवासंबंधीं पेशवे सरकारांतून पोर्तुगीज सरकारला आलेला एक खलिता उपलब्ध असून त्यावर 'राजा शाहू नरपति हर्षनिधान बाळाजी बाजीराव प्रधान' असा शिक्का आहे.

## प्रथम क्रमांकाचें देवस्थान :

आर्थिक परिस्थिति व मानसन्मान या दृष्टीनें गोव्यांतील सर्व देवस्थानांत श्री मंगेश देवस्थानाचा क्रमांक पहिला असून दुसरा क्रमांक श्री शांतादुर्गा संस्थानचा व तिसरा श्री रामनाथ देवस्थानाचा आहे, असें मानण्यांत येतें. श्री मंगेश देवस्थानाचें वार्षिक उत्पन्न सुमारें २५ हजार रुपयांचें असून खर्चहि जवळ जवळ तेवढाच आहे.

रोज त्रिकाल पूजा अर्चा, नैवेद्य, आरत्या वगैरे षोडशोपचार मोठ्या उत्साहानें व भक्तीनें चालू असतात. पंचवाद्यांची* व चौघड्यांची नौबतहि त्रिकाळ झडत असते. उत्सव, जत्रा, नवस वगैरेंच्या निमित्तानें महाजनांची व भक्तजनांची नेहमीं रीघ लागलेली असते. लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र, नाना प्रकारच्या पूजा, तुळाभार वगैरे देवकृत्यांमुळें जेवणावळी व संतर्पणें चाललेलीं असतात. जत्रांच्या वेळीं तर लोकांच्या उत्साहाला अगदीं भरतें येतें.

सोमवार हा मंगेशीचा व मंगेशाचा सर्वांत महत्त्वाचा वार. त्या दिवशीं रात्रीं श्री मंगेशाची पालखी निघते. ती मंदिराच्या आवारांतच प्रदक्षिणा घालते. त्या वेळीं देवालयाजवळच ज्यांची समाधि आहे ते संतकवि नाईक स्वामी यांचीं पदें, अष्टकें, झुलवे इत्यादि म्हणण्यांत येतात. श्री मंगेशाच्या कुळाव्या महाजनांचा त्या दिवशीं मंगेशीला मुक्काम असल्यास पालखीचा कार्यक्रम आटोपल्यावांचून त्यांना तेथून प्रयाण करितां येत नाहीं. दिवसा कांहीं कारणानें बाहेरगांवीं जावें लागलेंच, तर संध्याकाळीं पालखी निघण्यापूर्वीं परत यावें लागतें.

बाहेरच्या जगांत कितीहि यश किंवा श्री यांची प्राप्ति झालेली असली तरी श्री मंगेशाचा भक्त मंगेशीला येऊन अत्यंत नम्र, विनीत बनतो. त्यांतच त्याला कृतार्थता वाटते. अशी कृतार्थता वाटावी, असेंच मंगेशीचें एकूण वातावरण आहे, यांत शंका नाहीं !

---

* पंचवाद्यें : सूर, सनई, ताशा, झांज व ढोल.

**म्हाडदोळची महालसा :**

आपण मंगेशीहून प्रियोळ गांवाकडे जाऊं लागलों कीं वाटेंत म्हाडदोळ लागतें. पायीं गेल्यास दहा मिनिटांचा रस्ता. महालसा ( म्हाळसा ) नारायणी देवीचें देवस्थान येथें असल्यामुळें या परिसराला म्हाडदोळ असें नांव मिळालेलें आहे.

मुख्य रस्त्यापासून मंदिराच्या नगारखान्यापर्यंत दुतर्फा दुकानें व घरें असल्यामुळें देशावरील गजबजलेल्या वस्तींतील एखाद्या देवळाचा भास होतो. परंतु आवारांत प्रवेश केल्यानंतर मात्र गोमंतकीय मंदिराचीं वैशिष्ट्यें दिसतात—अग्रशाळा, सभामंडप, दीपस्तंभ, गरुडस्तंभ, प्राकाराबाहेर सुंदर तळें वगैरे. गोव्यांतील विद्यमान मंदिरांपैकीं सर्वांत जुनें – सुमारें अडीचशें वर्षांपूर्वींचें–मंदिर या नात्यानें हें मंदिर विशेष महत्त्वाचें. सासष्टी महालांतील ' वरुणपूर ' ऊर्फ वेर्णे या गांवाजवळील एका उंचवट्यावर प्रथम या देवीचें मंदिर उभारण्यांत आलें होतें. म्हाळशर्मा नांवाच्या कौशिक गोत्री गौड सारस्वत ब्राह्मणाला देवीनें दर्शन देऊन आपलें स्थान सांगितलें होतें. त्यामुळें पुढें तोहि म्हाळपुरुष नांवाचा देव बनला. ७ मार्च १५६७ रोजीं रायतूरचा किल्लेदार कॅप्टन दियोगु यानें देवीच्या मंदिरावर हल्ला चढवून तिची मूर्ति फोडून टाकली. तेव्हां प्रियोळच्या परिसरांत नवें म्हाडदोळ निर्माण करून तेथें दुसरी मूर्ति स्थापन करण्यांत आली. याहि देवस्थानाला रामचंद्र बावांनीं म्हाडदोळवाडी इनाम करून दिली. कांहीं वर्षांपूर्वीं म्हाडदोळची जत्रा ही तिच्यांतील जुगारी खेळ, नाना प्रकारच्या वस्तूंचीं दुकानें वगैरेमुळें गोव्यांतील एक प्रख्यात जत्रा समजली जात असे.

# श्री शान्तादुर्गा : २

श्री शान्ता विजयप्रदा विजयते दुर्गा हृदा तां भजे ।
क्रुद्धौ शान्तियुतौ कृतौ हरिहरौ कृत्वाऽधिहस्ते यथा ॥
शान्ता यैच नमो नमो नहि परं यस्या ममालम्बनम् ।
शान्तायाः खलु किंकरोस्मि रमतां तत्पादयोर्मे मनः ॥

## दुर्गा शान्ता कशी बनली ?

बंगालची दुर्गा गोमन्तकांत आल्यानंतर येथील लोकांप्रमाणें शान्ता बनली अशी कविकल्पना कांहीं मंडळी बोलून दाखवीत असली तरी ती केवळ कल्पनाच आहे. चांगली कल्पना आहे ! परंतु तिला ऐतिहासिक आधार नाहीं. इतिहास असें सांगतो कीं गौड ( वंग ) देशांतील त्रिहोत्रपूर उर्फ तिरहुत या ठिकाणीं आर्यांनींच तिची स्थापना केली होती आणि गोमंतकाच्या वसाहतीच्या वेळीं जे दशगोत्री सारस्वत ब्राह्मण इकडे आले त्यांनीं आपापलीं जीं कुलदैवतें इकडे आणलीं त्यांपैकीं शांतादुर्गा ही एक होती.

चंडी, उग्र असणारी दुर्गा, शान्ता कशी बनली त्याची हकिगत स्कंदपुराणाच्या अंबिका खंडांत आढळते. ती मोठी उद्बोधक आहे.

खूप प्राचीन काळीं एकदां श्री विष्णु व श्री महादेव यांच्यांत कोणत्या तरी मुद्या-

वर मतभेद निर्माण झाला. मतभेदांतून वादावादी व तिच्यांतून भांडण उद्भवलें. भांडणाचें पर्यवसान युद्धांत झालें. विष्णूंनीं आपलें सुदर्शन शंकरावर सोडलें, तेव्हां शंकरांनीं आपलें पाशुपत अस्त्र बाहेर काढलें. दोन्हीं अस्त्रें भयंकर; सारखींच सामर्थ्यवान्. कोणी कोणास हार जाईना. त्यांच्या संघर्षामुळें प्रलयकाळची भयानक स्थिति निर्माण झाली. दोन रेड्यांच्या टकरींत कुंपणाचा चुराडा व्हावा, त्याप्रमाणें बिचारें जग विनाशाच्या गर्तेत जाऊं लागलें.

आपण निर्माण केलेलें जग दोन योद्धयांच्या हट्टापायीं जळून खाक होणार असें दिसतांच बिचारा ब्रह्मदेव घाबरला आणि आदिमाया जगदंबेला शरण गेला. त्याची ती स्थिति पाहून आदिशक्तीला दया आली आणि मातेच्या निर्भयतेनें ती विष्णु व शंकर यांच्या मधोमध जाऊन उभी राहिली. तिनें एका हातानें विष्णूची शेंडी पकडली व दुसऱ्या हातानें शिवाच्या जटा धरल्या. जगन्मातेचा हस्तस्पर्श होतांच दोन्ही देवश्रेष्ठ भानावर आले. त्यांना आपली चूक कळून आली आणि त्यांनीं आपापलीं शस्त्रें परत घेतलीं. त्रस्त जगानें सुटकेचा निःश्वास सोडला आणि तेव्हांपासून दुर्गा ही शांतादुर्गा या नांवानें ओळखली जाऊं लागली. आजहि शांतादुर्गेनें विष्णु व शंकर यांना दोन हातांनीं पकडून धरलें आहे, अशी मूर्तिच आपल्याला दिसते. ही शांतादुर्गा मूळची बंगालची असली तरी आज ती तेथें नसावी असें वाटतें. बंगालमध्यें तिचें उग्र रूप कालीच्या रूपानेंच मुख्यतः प्रचलित आहे. गोमन्तकांत मात्र शान्तादुर्गा ही सर्वत्र जाऊन पोंचली आहे. कवळें (कैवल्यपूर) येथें असलेलें देवालय हें मुख्य असलें तरी गोव्यांत खंडेपार, कुंकळ्ये, गोठण, माशेल, तिम्रें, पालयें, धारगळ, कांदोळी, नेरूल, वांदोडें, मुळगांव, आमोणें, फातर्पें, वेरडे, घुडा, पारोडें, कोळंब, कालापूर वगैरे अनेक ठिकाणीं शान्तादुर्गेचीं मंदिरें आहेत. सारस्वतांपैकीं कौशिक, वास, भारद्वाज व कौण्डिण्य गोत्राचीं घराणीं, साताऱ्याकडील कांहीं देशस्थ ब्राह्मण आणि गोव्यांतील व कर्नाटकांतील कांहीं ब्राह्मणेतर शान्ताईला कुलदेवता मानतात.

### केळशीहून कवळ्यास :

श्री परशुरामानें गोमंतक वसाहतप्रसंगीं त्रिहोत्रपूरहून आणलेल्या कौशिकगोत्री सारस्वत ब्राह्मणांना केळशी किंवा केळोशी (कर्दलीपूर) हें गांव अग्रहार मिळालें. तेथें त्यांनीं आपल्या बरोबर आणलेल्या कुलदेवता शांतादुर्गेची स्थापना केली. कालांतरानें मूळचें देवालय जीर्ण झाल्यानंतर जुनें गोवें येथील एक धनाढ्य

व्यापारी अनू शेणवी‡ यानें सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस स्वखर्चानें मोठें भव्य मंदिर बांधलें. गोमंतकाचा ज्ञात आद्यकवि कृष्णदास शामा यानें इ. स. १५२६ सालीं याच शांतादुर्ग देवालयांत बसून ' कृष्णचरित्र कथा ' हा ग्रंथ मराठीत लिहिला. अशा प्रकारें गोमंतकीय सरस्वतिभक्तांच्या साहित्यसेवेचा संबंध या मंदिराशीं जोडला गेला. यानंतर थोड्याच दिवसांनीं साष्टी तालुक्यांत बाटवा-बाटवीला ऊत आला. इतर देवळांप्रमाणें ' माय ' शांतादुर्गेच्या मंदिरावरहि खिस्त्यांची धाड आली आणि इ. स. १५६६ सालीं तें जाळण्यांत आलें. त्यावेळीं श्री शांतादुर्गेचे महाजन देवीच्या मूर्तीसह तेथून तावडतोब निसटले व थेट सावंतवाडीच्या सौंधेकर राजाच्या ताब्यांतील अंत्रुज ( फोंडा ) महालांत येऊन कैवल्यपूर( कवळें ) येथें त्यांनीं शांतादुर्गेची स्थापना करण्याचें ठरविलें. सध्यांच्या मंदिराच्या उजव्या बाजूस सुमारें १७५ पावलांच्या अंतरावर त्यांनीं आपल्या देवतांच्या मूर्ती ठेवल्या आणि स्थायी मंदिरासाठीं योग्य असें स्थान शोधण्यास सुरुवात केली.

## महारवाड्याच्या जागीं मंदिर

या संशोधनामध्यें केळशीकर महाजनांना सर्वदृष्टींनीं सुयोग्य असें जें स्थान आढळलें तेथें त्यावेळीं गांवचा महारवाडा होता. मोठीच पंचाईत होती. परंतु उदारचरित हरिजनांनीं ' माय 'साठीं आपली परंपरागत जागा खाली करून देण्याचें आनंदानें मान्य केलें. मात्र त्यांनीं आपल्यावतीनें एक अट घातली. ' वर्षांतून एकदां आम्हांला हक्कानें मंदिरांत जाऊन देवीचं दर्शन घेतां आलं पाहिजे. ' ही त्यांची प्रीतीची व भक्तीची अट केळशीकर महाजनांनीं त्वरित मान्य केली व त्या जागेवर देवीचें छोटेसें मंदिर बांधून त्यांत मूर्तीची स्थापना केली ( इ. स. १५६७ ). तेव्हांपासून आजपर्यंत वर्षांतून एकदां माघ शुद्ध षष्ठीच्या दिवशीं सायंकाळीं अस्पृश्य लोक श्री शांतादुर्गेच्या मंदिरांत प्रवेश करून

---

‡ अनू शेणवी हा जुन्या काळचा जागृत हिंदुत्ववादी होता. बाटविलेल्या हिंदूंच्या शुद्धीकरणाचाहि त्यानें प्रयत्न केला होता व त्यामुळें पोर्तुगीजांचा त्याच्यावर विशेष दांत होता. परंतु त्यानें त्यांना जुमानलें नाहीं, असें इतिहास सांगतो.

आपलीं पंचवाद्यें वाजवितात, व देवीचें दर्शन घेतात. त्यावेळीं त्यांना तांदूळ, नारळ, विड्यावर कांहीं पैसे व देवीचे एक लुगडें देऊन त्यांचा सन्मान केला जातो. माघ मासांतील जत्रेची समाप्ति याच हरिजन-प्रवेशानें होत असते. दक्षिण भारतांतील कांहीं मंदिरांतहि वर्षांतून एकदां हरिजनांना प्रवेश देण्याची प्रथा आढळते. अनार्यांचीं मनें राखण्यासाठीं आर्यांनीं ज्या अनेक युक्त्या योजल्या होत्या, त्यांपैकींच ही एक असावी.

**नवीन मंदिराची कहाणी :**

श्री शांतादुर्गेचें आजचें नवें मंदिर फोंड्यापासून मैल-सव्वा मैलाच्या अंतरावर आहे. फोंड्याचें कपिलेश्वराचें मंदिर ओलांडलें कीं दोन खांब लागतात. तेथून डाव्या बाजूला वळलें कीं शांतादुर्गेचें मंदिर दिसतें. समोरचा रस्ता रामनाथीला जातो. आणि देवळासमोरचा रस्ता नागेशीला जातो. लहानशा परिसरांत नागेश, महालक्ष्मी, रामनाथ व शांतादुर्गा हीं चार मंदिरें जवळ जवळ आहेत. त्यामुळें धट्टयाकट्टया माणसाला पायीं देखील तीन-चार तासांत हीं मंदिरें पाहतां येतात. जणूं एकमेकांच्या सोबतीनें राहिलेले चार शेजारीच !

श्री शांतादुर्गेचें मंदिर छोट्याशा उंचवट्यावर आहे त्यामुळें थोडी चढण चढून देवालयाच्या आवारांत जावें लागतें. दाराशीं तलाव, प्रवेशद्वारावर नगारखाना, प्रशस्त आवार, मंदिरासमोरील खांब ऊर्फ दीपस्तंभ, मंदिराच्या सभागृहांत हंड्या झुंबरें वगैरे सर्व गोष्टी मंगेशाच्या व इतर गोमंतकीय मंदिरांसारख्याच आहेत. मात्र मंदिरावरील घुमट जरा वेगळ्या पद्धतीचा, पाश्चात्य स्थापत्यानें प्रभावित झालेला असल्यामुळें आपली दृष्टि आकर्षून घेतो.

हें नवें देवालय सातारच्या श्री शाहू छत्रपतींचें मंत्री नारो राम शेणवी रेगे यांनीं स्वखर्चानें इ. स. १७०८ ते १७३८ च्या दरम्यान बांधविलें. त्याची कहाणी मोठी मजेदार आहे.

नारो राम शेणवी रेगे हे वेंगुर्ल्यांजवळील कोचरे गांवचे गरीब ब्राह्मण. भयंकर दारिद्र्यांतून सुटका व्हावी म्हणून त्यांनीं श्री शांतादुर्गेची खूप दिवस सेवा केली. परंतु दारिद्र्य कांहीं जाईना. अखेर त्या जीवनाचा कंटाळा येऊन त्यांनीं आत्महत्या करण्याचें ठरविलें. परंतु देवीनें त्यांच्या स्वप्नांत येऊन त्यांना सांगितलें, " निराश होऊं नको. देह त्यागाचा विचार सोडून दे. त्याऐवजीं देशत्याग कर, म्हणजे तुझें नशीब उदयाला येईल. "

देवीचा हा आदेश शिरसावंद्य मानून नारो राम शेणवी, सातारकर छत्रपतीं-कडे गेले. तेथें आपल्या अंगच्या गुणांनीं श्रीमंत शाहू छत्रपतींचा इतका विश्वास त्यांनीं संपादन केला कीं त्यांची हुशारी, राजनिष्ठा व सचोटी पाहून छत्रपतींनीं त्यांना आपलें मंत्रीपद बहाल केलें व आपल्या प्रधानमंडळांत त्यांचा समावेश केला.

ज्या माता शांतादुर्गेच्या कृपाप्रसादानें आपण एवढ्या मोठ्या पदाला चढलों तिचा विसर नारो राम मंत्र्यांना कसा पडणार ? त्यांनीं मातेचें दर्शन घेतलें आणि तिच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्यानंतर इ. स. १७३९ सालीं नारो राम यांनीं शाहू छत्रपतींचे पंतप्रधान पाहिले बाजीरावसाहेब यांच्याकडून कवळें गांव श्री शांतादुर्गेची पूजा-अर्चा, धूपदीप व नैवेद्य यांसाठीं इनाम देव-विला. अशा प्रकारें नारो राम मंत्री यांनीं आपलें कर्तव्य केलें. त्याचीं गोड फळें त्यांच्या वंशजांना चाखावयास मिळालीं. शांतादुर्गेच्या दर्शनास मंत्र्यांचे वंशज आले असतां त्यांना देवीच्या संस्थानांतील इतमामानिशीं सामोरें जाण्याची प्रथा आजहि चालू आहे. देवीच्या आरतीच्या वेळी मंत्र्यांना बोलवण्यासाठीं भालदार-चोपदार व मशाल पाठविण्यांत येते. देवळांत मंत्र्यांना बसण्यासाठीं विशिष्ट जागा आहे. मंत्रीमंडळी परत जातांना त्यांना बहुमानाचें देवीचें प्रसाद-वस्त्र आजहि देण्यांत येतें. अशाप्रकारें केलेलें सत्कृत्य वांया जात नाहीं, हा बोध न कळतच जनमानसावर ठसला जातो.

श्री शांतादुर्गा हें गोव्यांतील धनिक देवस्थानांपैकीं एक समजलें जातें. साठ पासष्ट वर्षांपूर्वीं कदाचित् तें गोव्यांतील सर्वांत अधिक श्रीमंत देवस्थान असेल; परंतु इ. स. १८९८ सालीं गुंड पठाणांनीं या देवस्थानावर दरोडा घालून दाग-दागिने व रोकड मिळून त्यावेळच्या सोन्याच्या किंमतीप्रमाणें एक लाख रुपयां-हून अधिक किंमतीचा ऐवज लुटून नेला. त्यामुळें तेव्हांपासून सांपत्तिक दृष्ट्या या देवस्थानाचा क्रमांक दुसरा ( मंगेशीच्या खालीं ) लागला. हिंदू देवस्थानां-जवळील संपत्तीनें आजवर नेहमींच गुंडांना व दरवडेखोरांना निमंत्रण दिलेलें आहे. परंतु हिंदूंनीं त्यापासून कांहीं बोध घेतलेला दिसत नाहीं. हिंदू भक्त संपत्ति-संग्रहाची आपली हौस देवाच्या नांवानें भागवितो आणि एक दिवस कोणीतरी येऊन ती संपत्ति लुटून घेऊन जातो, असें हें चक्र चाललें आहे. या संपत्तीचा उपयोग लोकशिक्षणासाठीं करितां येणार नाहीं काय ?

## शांत, सौम्य, सुहास्यवदना मूर्ति :

मंदिराच्या मुख्य गर्भागारांत श्री शांतादुर्गेची मूर्ति असून जवळच एक शिवलिंग आहे. मूर्ति मोठी मोहक, शांत, सौम्य व सुहास्यवदना आहे. प्रत्येक पंचमीला श्री शांतादुर्गेचा पालखी उत्सव असतो. ह्या मिरवणुकीची सुरुवात रात्रीं साडेदहाला होते. माघ शुध्द प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत चालणारा जत्राउत्सव हा मुख्य वार्षिकोत्सव. प्रतिपदेपासून रोज निरनिराळ्या वाहनांतून देवीची मिरवणूक निघते. पंचमीचा महारथोत्सव हा त्यांतील सुवर्णकळस. षष्ठीच्या दिवशीं हरिजन मंडळी मंदिरप्रवेश करतात आणि नंतरच या महोत्सवाची समाप्ति होते. याखेरीज वैशाख शुद्ध पंचमी, नवरात्र, दसरा, कोजागिरी, होळी वगैरे इतरहि अनेक उत्सव येथें थाटामाटांत साजरे होतात.

## इतर तीन मंदिरांचीं वैशिष्ट्यें

श्री शांतादुर्गेच्या जवळ जीं इतर तीन महत्त्वाचीं मंदिरें आहेत त्यांचींहि कांहीं वैशिष्ट्यें आहेत.

शांतादुर्गेच्या मंदिरापासून जवळच रामनाथी म्हणजे श्री रामनाथ देवाचें (शंकराचें) देवालय आहे. श्री रामानें लंकेवर स्वारी करण्यापूर्वीं जें लिंग स्थापन केलें, त्याला श्री रामनाथ किंवा रामनाथेश्वर हें नांव मिळालें. गौड देशांतून गोमंतकांत वस्ती करण्यासाठीं आलेल्या कौंडिण्य व वत्सगोत्री सारस्वतांनीं रामेश्वराहून हें लिंग आणलें. या लोकांना गोव्यांतील लोटली गांव वसाहतीसाठीं मिळालें. तेथें त्यांनीं त्याची प्रतिष्ठापना केली. पुढें ख्रिस्तीकरणाच्या धामधुमींत लोटलीचें हें देवालय ख्रिस्त्यांनीं जाळून टाकलें तेव्हां (इ. स. १५६६) लोटलीकर महाजन फोंडे महालांतील बांदिवडे येथें आले व तेथें त्यांनीं देवालय बांधलें. त्याला 'रामनाथी' असें नामाभिधान प्राप्त झालें. फोंड्याहून रामनाथी सुमारें दीड मैल अंतरावर आहे. गोमंतकांतील धनाढ्य देवालयांत रामनाथीचा समावेश होतो. येथील मंदिर पुष्कळच नवीन असून शिल्पकला, सौंदर्य व मजबुती अशा सर्व दृष्टींनीं तें उत्तम प्रतीचें समजलें जातें. येथील सज्जा व सभामंडप हीं या मंदिराचीं वैशिष्ट्यें. गोमंतकीय मंदिरांतील सर्वांत मोठा सभामंडप बहुधा हाच असावा.

रामनाथीनंतर आपण पोंचतों श्री महालक्ष्मीला. गोमंतकांत गौड (बंगाल) देशांतून सारस्वत ब्राह्मण येण्यापूर्वीपासून हें दैवत रूढ असावें, असें दिसतें.

महालक्ष्मीचें स्वरूप कोल्हापूरच्या जगदंबेच्या स्वरूपासारखेंच आहे. तिची मूर्ति पाषाणाची व चतुर्भुज असून तिच्या मस्तकावर शिवलिंग, उजव्या वरच्या हातांत गदा व खालच्या हातांत महाळुंग ( फळ ) आहे. डाव्या वरच्या हातांत ढाल व खालच्या हातांत पानपात्र ( पिण्याचें वाडग्यासारखें उथळ भांडें ) आहे. बाजूला सिंहहि आहे. या वर्णनावरून असें वाटतें कीं ही दाक्षिणात्य देवता असावी. पोर्तुगीजांनीं केलेल्या बाटवाबाटवीच्या वेळीं या देवस्थानाला कांहीं त्रास झाला नसावा; कारण हें पूर्वीपासूनच बांदिवडें येथें आहे. गोमंतकांतील इतर देवस्थानांच्या मानानें हें महालक्ष्मीचें देवस्थान गरीब वाटतें. तरीपण येथील मंदिराचा चौक किंवा सभागृह हें विशेष प्रेक्षणीय आहे.

येथून जवळच नागेशी आहे. येथील श्री नागेश देव हा महालक्ष्मीप्रमाणेंच अतिप्राचीन व स्थानिक नाग जमातीचें दैवत असावा. त्यामुळें जुन्या काबिजादींतील इतर देवस्थानांप्रमाणेंच याला ख्रिस्त्यांच्या जुलमाला बळी पडावें लागलें नाहीं. विजयनगरच्या भरभराटीच्या काळांत बांदिवड्याचें श्री नागेश देवालय खूप प्रसिद्ध होतें, असें तेथील शिलालेखावरून सिद्ध होतें.

श्री नागेशाच्या मंदिरासमोरील तळी हें त्याचें वैशिष्ट. या तलावांतील पाणी स्वच्छ असून सुंदरतेच्या दृष्टीनें हा तलाव इतर तलावापेक्षां वेगळा उठून दिसतो. गर्भागारांतील श्री नागेशाच्या सुंदर मूर्तीचें नंदादीपांसह तलावांत पडलेलें मोहक प्रतिबिंब पाहाणें, हा भक्तजनांचा एक आवडता छंद असतो.

श्री नागेशाच्या उत्सवमूर्तीचा वेश सरदारी असून आसन घोडा व हातांत ढाल-तरवार असते. या वेशावरूनहि असें वाटतें कीं स्थानिक लढवैय्या लोकांचें हें परंपरागत दैवत असावें. प्रत्येक सोमवारीं श्री नागेशाचा पालखीउत्सव असतो.

पश्चिमेकडील दरवाजानें आंत प्रवेश करितांना डाव्या बाजूला एक शिला दिसते. तिच्यावर नागेशींचा प्रसिध्द शिलालेख आहे. या शिलालेखाची लिपि देवनागरी व भाषा मराठी असून तिथि पौष वद्य ३० शके १३३५, रविवार ( ता. २४ डिसेंबर १४१३ ) अशी आहे. या शिलालेखावरून असें सिद्ध होतें कीं गोमंतकावर विजयनगरच्या साम्राटांची अधिसत्ता असली तरी तेव्हांहि येथें मराठी भाषाच प्रचलित होती. त्यादृष्टीनें हें देवस्थान ऐतिहासिक दृष्ट्याहि महत्त्वाचें ठरतें.

—०—

# जुनें गोवें : ४

गोवा म्हटलें कीं, कांहीं लोकांच्या डोळ्यां-समोर रम्य वनश्रीनें नटलेली चिंचोळी कोंकणपट्टी उभी राहाते, तर कांहीं रसिकांना मदिरा व मदिराक्षींची आठवण होते. कोणाचें मस्तक मंगेश-नागेशांच्या स्मरणानें नत होतें, तर कोणाच्या कानांत संगीताचे मधुर स्वर घुमूं लागतात. परंतु जगांतल्या व विशेषतः भारतांतल्या कॅथॉलिक किरिस्तावांना तुम्हीं विचाराल तर ते सांगतील, गोवा हें पूर्वेचें रोम आहे. तिथल्या ख्रिस्तमंदिरांचें आणि मुख्यतः संत फ्रान्सिसच्या शवाचें दर्शन जन्मांत एकदां तरी घडावें असें प्रत्येक कॅथॉलिकाला वाटतें. 'काशीस जावें नित्य वदावें' असें भाविक हिंदू म्हणतात. मुसलमानांना मक्केची ओढ असते. तशीच ओढ किरिस्तावांना गोव्याची. पण ती साऱ्या गोव्याची नव्हे. ज्या ठिकाणीं भव्य ख्रिस्त मंदिरें व संत फ्रान्सिसचें शव आहे त्या जुन्या गोव्याची.

## ऐतिहासिक महत्त्व

विशाल व भव्य ख्रिस्त-मंदिरांसाठीं प्रख्यात असलेलें जुनें गोवें ( Vetha Goa ) आज जरी वैराण व ओसाड दिसत असलें, तरी एकेकाळीं अत्यंत भर-

भराटीस आलेल्या शहरांपैकीं तें एक होतें, आणि त्यादृष्टीनें त्याचें ऐतिहासिक महत्त्व लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

गोव्याची राजधानी असलेल्या पणजी ( ऊर्फ गोवा, ऊर्फ नवा गोवा ) शहराहून आपण मंगेशीला जाऊं लागलों कीं वाटेंत ६ मैलांवर रस्त्याच्या दोहों बाजूस असलेलीं प्रचंड ख्रिस्त मंदिरें ( चर्चेस् ) आपलें लक्ष चटकन् वेधून घेतात. बस थांबते आणि बहुसंख्य ख्रिस्ती उतारू खालीं उतरतात. आपणहि तेथेंच उतरावयाचें. कारण तेंच जुनें गोवें.

हिंदू मंदिरांपेक्षां अगदीं उलटें दृश्य येथें दिसतें. सभोंवतीं नारळी पोफळीच्या राया नाहींत, मंदिरापर्यंत दुतर्फा झाडें असलेले प्रशस्त मार्ग नाहींत–कारण तीं रस्त्यापासून दूर नसून रस्त्याला लागूनच आहेत–रस्त्याच्या सपाटीवरच तीं असल्यामुळें मंदिरापर्यंत पोंचण्यास पायऱ्या नाहींत, अथवा हिंदू मंदिरांभोंवतीं अग्रशाळा–धर्मशाळा असल्यामुळें मंदिराला आपोआपच एक प्रकारचा बंदिस्तपणा, प्राकार लाभतो तोहि या ख्रिस्ती मंदिरांना लाभलेला नाहीं. हातपाय धुवून, शुचिर्भूत होऊन मंदिरांत प्रवेश करण्याची कल्पनाच नसल्यामुळें देवळासमोरचीं सुरम्य तळींहि नाहींत. त्यामुळें जुन्या गोव्याच्या परिसरांत हिंडतांना आपण निसर्गाच्या लाडक्या गोमंतकांत नसून देश भागांतील माळरानावरील एखाद्या ओसाड, भग्नावशेषांनीं युक्त अशा ऐतिहासिक स्थळीं आहोंत, असा पदोपदीं भास होतो आणि तो खराहि असतो; त्यांत ऐतिहासिक तथ्यहि असतें.

## आदिलशाहींतील शान

कारण जुनें गोवें हें एक अत्यंत जुनें असें शहर आहे. वस्तुतः ‘ आहे ’ असें म्हणण्याऐवजीं ‘ होतें ’ असेंच म्हटलें पाहिजे. कारण आतां तें एक सामान्य दर्जाचें खेडेंच उरलें आहे. पण एकेकाळीं तें राजधानीचें शहर होतें. हें शहर केव्हां वसविलें गेलें असावें याचें संशोधन अद्यापि झालेलें नाहीं. तरीपण चौदाव्या शतकांतील मुसलमानी राजवटींत तेथें बरींच मुसलमान कुटुंबें राहात होतीं.

विजापूरच्या आदिलशहानें गोमंतक घेतल्यानंतर गोवें हीच आपली राजधानी केली. मांडवी नदीच्या तीरावर वसलेल्या या शहराची रचना त्यावेळीं मोठी सुंदर व व्यवस्थित होती. शहराभोंवतीं मोठा तट असून त्याला चार दरवाजे

होते. तटाच्या आंतला आदिलशहाचा वाडाहि मोठा भव्य व रुबाबदार होता; शानदार राजधानीला शोभेल असाच !

आदिलशाहींत या शहराची चांगलीच भरभराट झाली. बाहेरच्या लोकांची-विशेषतः मुसलमानांची मोठी ये–जा सुरू झाली. राजाश्रयानें अनेक मुस्लिम कुटुंबें येथें स्थायिक झालीं. व्यापारहि खूप वाढला. ' त्यावेळीं गोवें शहराचें उत्पन्न आदिलशाहाला एक लक्ष पार्दाव † येई ' असें इतिहासकार जुआंव द बार्रुस यानें लिहून ठेवलें आहे.

पोर्तुगीजांनीं गोमंतकांत पाय रोवल्यावर इ. स. १५१० पासून ( जुनें ) गोवें हीच आपली राजधानी बनविली. त्यानंतर या शहराची अधिकच भरभराट होत गेली. आदिलशहाच्या अमदानींत येथील सरकारी गोदींत व्यापारी व लढाऊ जहाजें बांधण्यांत येत होतीं. पुढें पोर्तुगीजांनीं त्या गोदीची सुधारणा व वाढ करून तेथें शेंकडों लहान जहाजें बांधलीं. दारूगोळा, तोफा, इत्यादि बनविण्याचा मोठा कारखाना सुरू करून त्यांचा मोठा व्यापार चालू केला. मराठे, दक्षिणी मुसलमान व दिल्लीकर मोंगल हीं सारींच गिऱ्हाइकें त्यांना उपलब्ध असल्यामुळें त्यांचा व्यापार किती जोरांत चालत असेल याची कल्पना येऊं शकते. गोवें शहराची लोकसंख्या त्यावेळीं चार ते सहा लाख होती. त्यावरूनहि गोव्याच्या भरभराटीची कल्पना यावी.

पोर्तुगीजांनीं गोवें बंदराचाहि खूप विकास केला. या बंदरांत देशोदेशींची जहाजें नाना प्रकारचा माल घेऊन येत. जपानहून चांदीनें भरलेलीं जहाजें येत, चीनहून सोनें, रेशीम वगैरे माल येई, मलाक्काहून लवंग, बंगालहून उंची तलम कापड, सिलोनहून दालचिनी व जवाहीर, मलबारहून मिरी–सुंठ, अरबस्तानांतून घोडे, आफ्रिका, ओर्मूज, दीव, मदुरा खंबायत वगैरे नाना प्रदेशांतून अनेक वस्तू येत. गोव्याच्या बंदरांत त्यावेळीं जवळजवळ अर्ध्या जगांतील व्यापारी जहाजांची रहदारी चालू असे.

आज त्या वैभवाची पुसटती साक्ष देणारी एक मोडकी कमान आहे. वास्को डी गामाचा नातू दो फ्रान्सिस्कु याच्या आज्ञेवरून इ. स. १५५९ सालीं बांधलेली. हिच्या वरच्या बाजूस एका कोनाड्यांत सेंट कॅथेरिनची मूर्ति असून खालीं वास्को डी गामाचा पुतळा आहे. तिला व्हाइसरॉयची कमान म्हणतात-मुंबईच्या

( † सुमारें १ रुपया किंमतीचें चांदीचें नाणें. )

गेट वे ऑफ इंडियासारखी ! अर्थात् त्या दोहोंची तुलनाहि करतां येणार नाहीं. कुठें राजा भोज आणि कुठें गंगू तेली ! यौवनानें मुसमुसलेल्या व सम्पन्नतेनें बहरलेल्या रमणीसमोर कंबरेंत वांकलेली एक जख्ख म्हातारी भिकारीण ! परंतु कधींकाळीं याच कमानींतून आपल्या वैभवानें भोंवतालच्या लोकांचे डोळे दिपवून टाकीत, राजेशाही दिमाखानें व रुबाबांत गोरा व्हॉइसरॉय अधिकारसूत्रें घेण्यासाठीं प्रवेश करीत होता, हें ज्यांना माहित असतें त्यांच्या डोळ्यांसमोरून आजची दैन्यावस्था क्षणभर लोप पावून तो वैभवसम्पन्न काळ तरळून गेल्याशिवाय राहात नाहीं. मांडवीचें पात्रहि आतां या कमानीपासून बरेंच दूर गेलें आहे. शतकांच्या गाळानें तें भरून गेलें असावें. तेथें एखादी दरिद्री होडी रेंगाळत इकडून तिकडे जातांना आपल्याला दिसते तेव्हां आपलें मन तिच्या जागीं सोन्याचांदीनें व हिरे माणकांनीं भरलेलीं प्रचंड व्यापारी जहाजें पाहण्याचा प्रयत्न करूं लागतें.

दर्यावर्दी, विलासी व रंगेल पोर्तुगीजांनीं या शहरावर प्रेमहि तसेंच केलें. त्यांनीं पोर्तुगालहून अत्यंत कुशल शिल्पकार व स्थापत्यविशारद आणले व त्यांच्याकडून इंद्रपुरीला लाजवतील अशा सुंदर इमारती बांधविल्या. शहराची रचना युरोपीय शहरासारखी ठेवली. प्रत्येक घरासमोर बाग असलीच पाहिजे, असा सक्त नियम केला. आशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका वगैरे खंडांतून नाना प्रकारचीं फुलझाडें व फळझाडें आणून तीं या बागांतून लावण्याची व्यवस्था केली. त्यामुळें गोवें शहराला एखाद्या पाश्चात्य शहराची शोभा प्राप्त झाली. पोर्तुगीज कारागिरांच्या कौशल्यामुळें गोवें हें भारतांतील लिस्बन ( लि ड गो अ ) आहे, असाच पाहणाराला भास होई आणि पोर्तुगालहून आलेल्या मंडळींना आपण लिस्बनमध्येंच आहोंत असें वाटे.

पणजी हें बंदर मांडवीच्या मुखाशीं असल्यामुळें गोवा बंदरापेक्षां अधिक सोयीचें होतें. म्हणून पोर्तुगीजांनीं १ डिसेंबर १७५९ रोजीं गोमंतकाची राजधानी गोव्याहून हलवून ती पणजीस नेली. या साऱ्या बंदराला त्यांनीं नवें गोवें ( Nova Goa ) असें नांव दिलें. पणजी हें त्या शहराच्या मुख्य वाड्याचें किंवा खेड्याचें नांव. इ. स. १७७४ सालीं जुन्या गोव्यांतून प्रमुख श्रीमंत कुटुंबें बाहेर पडलीं. शहर ओस पडूं लागलें. तेव्हां सरकारनें कोमुनिदादींना ( ग्रामसभांना ) शहर पुनः वसविण्यासाठीं सुमारें ८ लाख अशर्फ्या खर्च करावयास

लावल्या. परंतु त्याचा कांहींहि उपयोग न होतां इ. स. १८०३ पर्यंत जुनें गोवें जवळ जवळ पूर्णपणें मोडून गेलें. व्यक्ति व घराणें यांच्या प्रमाणें शहराच्या-जीवनांतील चढउतारहि मोठा विचित्र असतो, हेंच खरें !

## रोमन कारागिरीची ‘ झलक ’

रोमन शिल्पकला व वास्तुकला यांची किंचित् झलक तुम्हांला पाहावयाची असेल तर तुम्हांला गोव्यालाच गेलें पाहिजे. तेथील सुखवस्तु ख्रिस्ती लोकांच्या घरांवर आजहि रोमन कारागिरीची छाप पाहावयास मिळते. जुनें गोवें येथें पोर्तुगीज कारागिरांनीं बांधलेल्या सां कायतान, बों जेजूस, सांत आगोस्तीन, से पात्रिआर्काल, ( Se Patriarcal किंवा The see Cathedral ), पालासियु-द-इंकिझीसांव, पालसियु-द-व्हिसेरैय ( व्हॉइसरॉयचा वाडा ) वगैरे इमारती विशेष प्रसिद्ध होत्या. त्यांपैकीं चार-पांच आजहि उभ्या आहेत. आणि नव्या गोव्याला जाणारा मुशाफीर मुख्यतः याच इमारती पाहाण्यासाठीं जात असतो. त्यांपैकीं सां कायतानची इमारत रोमच्या सां पेद्र चर्चच्या धर्तीवर आहे, असें म्हणतात. अर्थात् आम्ही रोमचें मशारनिल्हे चर्च पाहिलेलें नसल्यामुळें सां कायतानवरून सां पेद्रची कल्पना करून घेतली.

## मशिदीच्या जागीं कॅथीड्रल

रस्त्याला लागूनच असलेलें सुमारें १५० फूट उंचीचें भव्य ख्रिस्तमंदिर आपलें लक्ष चटकन् वेधून घेतें. यालाच से पात्रिआर्काल किंवा सी कॅथीड्रल अशीं नांवें आहेत. गोव्यांत आलेला पहिला पोर्तुगीज सेनापति आफोन्स द अल्बुकर्क यानें एक मशीद जमीनदोस्त करून तिच्यावर १५१० सालीं हें चर्च बांधण्यास सुरुवात केली व सुमारें २३ वर्षांनीं तें पूर्ण झालें. सेंट कॅथेरीन, सेंट पीटर व मेरी माता यांच्या भव्य मूर्ती यांत आहेत. या चर्चची घंटा ‘ सेंट पीटरची घंटा ’ किंवा ‘ सोनेरी घंटा ’ नांवानें प्रसिद्ध असून ती गोव्यांतच कुंकळ्ळीला तयार करण्यांत आलेली आहे. ती खूप मोठी असून जगांतील उत्कृष्ट घंटांमध्यें तिची गणना होते. या चर्चमधील ऑर्गन गोव्यांतील सर्वांत मोठें वाद्ययंत्र आहे. गोव्यांतील सर्वांत जुनें व सर्वांत मोठें चर्च म्हणूनहि याचें महत्त्व आहे. याच्या-सारखेंच दुसरें भव्य चर्च सेंट फ्रान्सिस असीसी ( Assissi किंवा Assiz ) हेंहि प्रेक्षणीय आहे.

## एका शूर महाकवीचा पुतळा

से पात्रिआर्कालची आठवण कायम केली ती त्याच्यासमोर उभ्या असलेल्या एका पूर्णाकृति प्रचंड पुतळ्यानें. त्याच्याकडे पाहिल्यानंतर असें वाटतें कीं, मध्य युगांत होऊन गेलेल्या एखाद्या युरोपियन योद्ध्याचा किंवा सत्ताधाऱ्याचा तो पुतळा असावा. परंतु वस्तुतः तो आहे एका शूर महाकवीचा. पोर्तुगीज भाषेंतील 'लुझीयदश्' हें महाकाव्य लिहून अमर झालेल्या लुईश द कामोंइश्चा! लिस्बन शहरांत १५२४ मध्यें जन्मलेल्या व तेथेंच १० जून १५८० रोजीं निधन पावलेल्या या वीराचें जीवन जसें अद्‌भुत तसेंच हालअपेष्टांनीं भरलेलें होतें. एका हातांत लेखणी व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन शेवटपर्यंत मातृभूमीसाटीं झुंजत राहिलेला महाकवि जगाच्या इतिहासांत बहुधा विरळाच. कोईब्रा शहरांतील इतिहासप्रसिद्ध विश्वविद्यालयांत शिक्षण घेतल्यानंतर कामोंइश् आफ्रिकेंतील मूर लोकांशीं लढण्यासाठीं पोर्तुगीज सैन्याबरोबर तिकडे गेला. तेथील लढाईत त्याचा एक डोळा जाऊन तो एकाक्ष बनला. त्यानंतर १५५३ सालीं तो गोव्यांत आला. त्यावेळचे पोर्तुगीज अधिकारी अत्यंत बेताल होऊन वागत होते. त्यांचीं कृष्णकृत्यें चव्हाट्यावर आणण्यासाटीं कामोंइश्नें आपली लेखणी चालविली. त्यामुळें तत्कालीन गव्हर्नरची त्याच्यावर इतराजी होऊन त्याला चीन देशांतील माकाव या पोर्तुगीज बेटांत १५५६ सालीं हद्दपार करण्यांत आलें.


माकाव येथील समुद्रकिनाऱ्यावरील एका निवांत गुंफेंत बसून त्यानें 'लुझीयदश्' या आपल्या महाकाव्याचा बराच भाग लिहून काढला. पुढें त्याची शिक्षा रद्द होऊन त्याला गोव्याला आणण्यांत येत असतां मेकांग नदीच्या मुखाजवळ त्याचें जहाज फुटलें. त्यावेळीं कामोंइश् एका हातांत 'लुझीयदश्' ची प्रत धरून दुसऱ्या हातानें पाणी तोडीत मोठ्या प्रयासानें किनाऱ्याला पोंचला. त्यानंतर गोव्यांत व अफ्रिकेंत कांहीं वर्षें हालांत व विपत्तींत काढून तो मायभूमीला परतला. दोन वर्षें खपून त्यानें आपल्या महाकाव्यावरून हात फिरविला व १५७२ सालीं तें प्रसिद्ध केलें. पोर्तुगालच्या राष्ट्रीय वीरांनीं वेळोवेळीं केलेल्या शूर कृत्यांचें, विशेषतः गामानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला त्या कामगिरीचें वर्णन हा या काव्याचा मुख्य विषय असून, अधून-मधून सुंदर अद्‌भुत कथांचा त्यानें वापर केला आहे. जगांतील सर्वश्रेष्ठ सात महाकाव्यांत या 'लुझीयदश्' ची गणना केली जाते. यावरून त्याच्या थोरवीची कल्पना येईल. या



श्री मंगेश



श्री शांतादुर्गा



मंगेश देवस्थान - मंगेशी

महाकाव्यानें कामोंइशला कीर्ति मिळाली, परंतु त्यांचें दारिद्र्य मात्र तसेंच राहिलें. अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्यांच्या नशिबीं असणारी कंगाल स्थिति त्यालाच कशी चुकणार ?

आपल्या एका महाकवीचें कायमचें स्मारक उभारून कलेची कदर करण्यांत आपण भारतीयांहून वरचढ आहोंत, हेंच पोर्तुगीजांनीं सिद्ध केलें होतें, असा विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं !

## सां फ्रान्सिस्कु शाव्हियेरची शवपेटी

अर्थात् आम्हांला खरें औत्सुक्य होतें सेंट फ्रान्सिस झेवियरची शवपेटी पाहाण्याचें. या शवपेटीचें दर्शन घेण्यास भारतांतीलच नव्हे तर जगांतील भाविक कॅथॉलिक गोव्याला येतात. ( सेंट फ्रान्सिस झेवियरचा पोर्तुगीज उच्चार सां फ्रान्सिस्कु शाव्हियेर असा आहे. ) ही चांदीची शवपेटी बों जेजूस ( Bon Jesus – Cood Jesus – भला येशू ) या ख्रिस्तमंदिरांत आहे. आम्ही या ख्रिस्तमंदिराच्या दाराशीं सकाळीं ९ च्या सुमारास पोंचलों, त्यावेळीं तेथें दणकेबाज फटाके उडविण्याचा कार्यक्रम चालू होता. फटाके कशासाठीं उडविले जात आहेत, याची चौकशी केली तेव्हां, आंत प्रार्थना ( Service ) चालू असल्यामुळें त्या आनंदाप्रीत्यर्थ फटाके उडविण्यांत येत असल्याचें आम्हांला सांगण्यांत आलें. कॅथॉलिक ख्रिस्ती लोकांमध्यें प्रार्थनेच्या वेळीं फटाके उडविण्याची प्रथा असेल असें समजून आम्ही गप्प राहिलों. परंतु नंतर अशी कुणकुण कानावर आली कीं नेफा आघाडीवर चिन्यांकडून भारताचा जो दणदणीत पराभव होत होता, त्याबद्दल सां फ्रान्सिस्कूचे आभार मानून आनंद व्यक्त करण्यासाठीं ते फटाके उडविले होते. खरें-खोटें सां फ्रान्सिस्कुच जाणें !

या ख्रिस्त मंदिराची पाठ रस्त्याकडे आहे. त्या बाजूनें इमारतीला आधार देण्यासाठीं उभारलेल्या नुसत्या चार–पांच फूट रुंदीच्या उंच भिंतीकडे आपली नजर जाते आणि हें स्थापत्य वेगळें आहे, भारतीय नाहीं, याची कल्पना आपणाला येते. मंदिराला वळसा घालून आपण त्याच्या दरवाजांत प्रविष्ट होतो, आंत नजर फेंकतों, तेव्हां त्याच्या अंतर्भागांतील भव्यतेनें आपण क्षणांत भारावून जातो.

भव्य दरवाजांतून आम्ही आंत प्रवेश केला. तेथील वातावरण मोठें शांत,

गंभीर व भक्तीनें भारावलेलें होतें. भ्रमराच्या गुंजारवासारख्या आवाजांत प्रार्थना सुरू होती. दारावरच्या पहारेकऱ्याला आम्ही विचारलें. "आम्हांला आंत जायला कांहीं हरकत नाहीं ना?" तो म्हणाला, "कांहींच हरकत नाहीं."

आम्ही आंत जाऊं लागलों. माझ्या पादत्राणांना नाल मारलेले असल्यामुळें त्यांचा खाड् खाड् आवाज त्या प्रचंड मंदिरांत घुमूं लागला. त्या शांत वातावरणांत तो आवाज माझ्याच कानांना खटकला. म्हणून मी मागें वळून पायांतील स्लिपर्स काढूं लागलों. त्याबरोबर जणूं कांहींतरी 'अब्रह्मण्यम्' घडत आहे, असा भाव चेहऱ्यावर आणून तो पहारेकरी मला म्हणाला, "छेः! छेः! असं करूं नका. या मंदिरांत अनवाणी पायांनीं प्रवेश करणं निषिद्ध आहे."

तो नियम मला मोठा चमत्कारिक वाटला. हा नियम फक्त गोव्यांतील ख्रिस्तमंदिरांतच आहे, कीं भारतांतील इतर चर्चेसमध्येंहि असाच नियम आहे, याची मला कल्पना नाहीं. बहुधा फक्त गोमंतकांतील ख्रिस्तमंदिरांतच हा नियम असावा. पोर्तुगीजांनीं गोमंतकीय ख्रिश्चनांना अभारतीय बनविण्यासाठीं योजिलेल्या उपायांपैकीं तो एक असावा. वस्तुतः भारतासारख्या उकाड्याच्या प्रदेशांतील प्रार्थनामंदिरांत दक्षिणेंतील मंदिरांप्रमाणें उघड्या अंगानें व अनवाणी पायांनींच प्रवेश करण्याची प्रथा असणें योग्य–मग तें प्रार्थना मंदिर किरिस्तावांचें असो, मुसल्मानांचें असो, कीं पारशांचें असो. मंदिराच्या दारांत शिखांच्या गुरुद्वाराप्रमाणें पाय धुण्याची व्यवस्था असेल तर अस्वच्छ पावलांनीं कोणी मंदिरांत प्रवेश करणार नाहीं व मंदिराचें पावित्र्य कायम राहील.

माझ्यासमोर मोठें धर्मसंकट उभें राहिलें. पायांतील पादत्राणें तशींच ठेवून आंत जावें तर नालांच्या आवाजानें प्रार्थना करणाऱ्यांच्या एकाग्रतेंत व्यत्यय येणार, आणि पादत्राणांशिवाय आंत प्रवेश मिळणार नाहीं. अखेर आम्ही परत फिरलों आणि त्या मंडळींची प्रार्थना संपेपर्यंत जवळपासचीं सां कायतान वगैरे इतर ख्रिस्तमंदिरें पाहून घेतलीं.

थोड्या वेळानंतर परत आलों, त्यावेळीं भक्तमंडळी प्रार्थना संपवून परत चाललीं होतीं. आम्ही अगदीं आंत प्रवेश करून समोरची नक्षीकाम केलेली चांदीची शवपेटी पाहिली. भारतांत हिरीरीनें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणारा संत फ्रान्सिस्कु शाव्हियेर याचें शव आजहि त्या पेटींत आहे. दर बारा वर्षांनीं किंवा

विशेष संकटप्रसंगीं ही शवपेटी शवदर्शनासाठीं उघडण्यांत येते. गोवा–मुक्तीच्य वेळीं भारतीय फौजा गोव्याच्या सरहद्दीवर गोळा झाल्या असतां ही शवपेटी उघडण्यांत आली होती. गोव्याच्या गव्हर्नर, मुख्य पाद्री व स्थानिक अधिकारी यांच्याजवळ प्रत्येकी एकेक चावी असे व त्या तीन चाव्यांनीं ही पेटी उघडली जात असे. ३ डिसेंबर हा सेंट फ्रान्सिस झेवियरचा मृत्युदिन. त्या दिवशीं तेथें मोठी जत्रा भरते.

## अंगुष्ठमात्र दर्शन

चीन-जपानपर्यंत प्रभु येशूचा संदेश घेऊन गेलेल्या संत झेवियरला चीन-मध्यें धर्मप्रचार ( Sarcophagus ) करीत असतां मृत्यु आला. त्याच्या भक्तांनीं त्याचें शव भारतांत आणून चांदीनें मढविलेल्या शवपेटींत ठेवलें आणि त्यावर इ. स. १५९४ सालीं हें चर्च उभारण्यास सुरुवात केली. तें १६०५ सालीं बांधून पुरें झालें. या चर्चच्या मध्यभागाचें क्षेत्रफळ १६६×५० चौरस फूट असून उंची ५८ फूट आहे. त्याला समोरच्या बाजूस ( पश्चिमेस ) तीन दरवाजे असून त्याच्या खिडक्याहि मोठ्या भव्य व रुबाबदार आहेत. सेंट फ्रान्सिसची शवपेटी फ्लोरेन्टाइन (Florentine) पद्धतीची असून आग्र्याच्या ताजमहालां-तील नूरजहानच्या कबरीशीं सौंदर्याच्या बाबतींत तिची तुलना केली जाते. ही पेटी तांब्याची असून तिच्यावर सोन्या-चांदीचें नक्षीकाम केलेलें आहे. मौल्य-वान् रत्नांचें जडवाचें कामहि त्यावर आहे. विविध रंगांच्या चौकोनी संगमरवरी चबुतऱ्यावर ती ठेवलेली आहे. तिच्यावर सेंट फ्रान्सिसच्या जीवनांतील कांहीं महत्त्वाचे प्रसंग उठावदार नक्षीच्या पद्धतीनें ( Basreliefs ) अंकित केले आहेत. पेटीच्या मागील वेदीवर सेंट फ्रान्सिसचा चार फूट उंचीचा पूर्णाकृति पुतळा असून त्याच्या उजव्या हातांत क्रूस व डाव्या हातांत अधिकारदंड (Baton) आहे. हा पुतळा संपूर्ण चांदीचा असून तो इ. स. १६७० सालीं उर्बानो डूराझो ( Urbano Durazo ) ची विधवा पत्नी lady Genoese हिनें स्वखर्चानें तयार करविला होता. पुतळ्याच्या मस्तकावर सोनेरी मुकुट असून त्यांत रत्नें जडविलेलीं आहेत. १६८३ सालीं छत्रपति संभाजी महाराजांनीं गोव्यावर स्वारी केली असतां गोवा आतां वांचत नाहीं हें पाहून त्यावेळचा व्हाइसरॉय काउंट ऑफ आल्वोर ( Alvor ) यांनीं आपल्या राजसत्तेचें प्रतीक

असलेला राजदंड सेंट फ्रान्सिसच्या मूर्तीच्या हातीं देऊन गोव्याच्या रक्षणाचा भार त्या संतावर सोंपविला. तेव्हांपासून गोव्यांत गव्हर्नर जनरल म्हणून येणारा प्रत्येकजण सेंट फ्रान्सिसच्या या मूर्तीच्या हातून आपला राजदंड घेत असे. पुढें कालांतरानें ही प्रथा आपोआप बंद पडली. अशा प्रकारें या ख्रिस्तमंदिराचें ऐतिहासिक महत्त्वहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सुमारें चार-साडेचार फूट लांबीच्या या शवपेटींत झेवियरचा संपूर्ण देह कसा काय मावतो याचें कुतूहल वाटून मी तेथील एका जबाबदार गृहस्थाला त्याविषयीं विचारलें तेव्हां त्यानें सांगितलें कीं, "संत फ्रान्सिस्कु मूळचाच ठेंगणा होता त्यांत पुनः मृत्यूनंतर त्याचं शरीर खूप आकसलं त्यामुळं तें एवढ्याशा पेटींत मावतं."

संताचें संपूर्ण शरीर जरी पहावयास मिळालें नाहीं, तरी त्याच्या उजव्या पायाचें तिसरें बोट पहावयास मिळतें असें समजल्यावरून आम्ही तें पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली. आणि ती मोठ्या तत्परतेनें पुरी केली गेली. उजव्या बाजूस असलेल्या एका छोटयाशा हॉलमध्यें † अनेक कड्या-कुलुपांच्या बंदोबस्तांत ठेवलेल्या त्या बोटाचें दर्शन आम्हांला त्वरित घडलें. जुन्या काळच्या न्हाव्यांकडे लाकडी दांडा असलेला आयना ( आरसा ) असे तशा प्रकारच्या एका आयन्यांत ( monstrance ) तें बोट बसविलेलें आहे. अर्थात् तेंहि वाळून गेल्यामुळें लहानच दिसतें. चीनमध्यें मृत्यूनंतर जंगलांतील कोल्ह्यांनीं तें बोट तोडून काढलें होतें * तें तसेंच इकडे आणण्यांत आलें व संपूर्ण शवाऐवजीं दर्शनार्थ ठेवण्यांत आलें. आम्ही आमच्या पद्धतीप्रमाणें हात जोडून त्याला नमस्कार केला व संताबद्दलचा आदर व्यक्त केला. त्या गृहस्थानें मात्र खास पाश्चात्य पद्धतीनें त्या आयन्याचें तीनदां चुंबन घेऊन मगच तो आंत ठेवला. थोर पुरुषांच्या शरीराचे अवयव जपून ठेवण्याची ही प्रथा बौद्ध धर्मी-

† या खोलीला Vestry—म्हणजे धर्मोपदेशकाचीं वस्त्रें वगैरे ठेवण्याची चर्चच्या बाजूची खोली—असें म्हणतात. पौर्वात्य देशांतील अत्युत्कृष्ट वस्त्रागारांत तिची गणना होते.

* ही झाली दंतकथा. ऐतिहासिक घटना अशी आहे कीं १८५९ सालीं लोकांच्या दर्शनार्थ शव बाहेर काढलें असतां हें बोट गळून पडलें होतें.

तहि आहे. भगवान् बुद्धांच्या दांतांचें जतन अनेक ठिकाणीं केलेलें आहे. हजरत मुहम्मद साहेबांच्या दाढीचा केंस हजरत बाल या ठिकाणीं श्रीनगर (काश्मीर) मध्यें ठेवण्यांत आलेला आहे. मानवी मनांतील भक्तिभावना या मार्गांनीं व्यक्त होत असते हेंच खरें.

## 'कॅसा प्रोफेसा'ची ऐतिहासिक इमारत

बों जेझूसला लागूनच कॅसा प्रोफेसा ( Casa Professa or Professed House ) ची ऐतिहासिक इमारत आहे. ज्यांनीं आपलें जीवन धर्मप्रसाराला वाहिलें आहे अशा जेझुइट लोकांसाठीं ही इमारत इ. स. १५८५ सालीं बांधण्यांत आली. गोव्यांत जेझुइटांनीं धर्मप्रसाराच्या नांवाखालीं जे अत्याचार व क्रूरकर्मे केलीं, त्यांचें संचालन या इमारतींतून झालें. त्या दृष्टीनेंही उल्लेखनीय आहे. सध्यां येथें एक पुराणवस्तु संग्रहालय (म्युझियम) असून त्यांत सेंट फ्रान्सिस झेवियरचा चांदीचा पुतळा व धर्मसमीक्षणाचें प्रार्थनापुस्तक ( a missal of the Holy Inquisition ) आहे.

## प्रचंड चित्रें

सां कायतान व बों जेझूस या ख्रिस्त मंदिरांतील प्रचंड चित्रें व लहानमोठ्या मूर्ती हें एक महत्त्वाचें आकर्षण म्हटलें पाहिजे. हीं चित्रें ख्रिस्तजीवनावर आधारलेलीं आहेत. पंधरा–वीस फूट उंचीचीं तीं चित्रें पहातांना त्यांची भव्यता खचितच जाणवते. जाणकारांचें म्हणणें असें आहे कीं "व्हॅटिकन * मधल्या मंदिरांतलें नाजुक शिल्प वा चित्र जुन्या गोव्यांतील या प्रचंड मंदिरांत दिसत नाहीं. तेथें प्रचंड शिल्पांची भव्यता जाणवते, पण नाजुकपणा मात्र आढळत नाहीं." मला वाटतें, शिल्पांतील किंवा चित्रांतील नाजुकपणाचें मर्म जाणणारी जनता येथें नसल्यामुळें, तिच्यावर भव्यतेची छाप पडावी या हेतूनेंच मूळ प्रवर्तकांनीं ही योजना आंखली असावी, आणि त्यांचा हेतु साध्यहि झाला असला पाहिजे. कारण भक्तिभावानें एखाद्या ठिकाणीं जमणाऱ्या सर्वसामान्य लोकांवर प्रचंडपणाचा जेवढा परिणाम होतो, तेवढा नाजुक कलाकुसरीचा होत नाहीं,

---

* रोम ( इटली ) जवळील पोपनगरींतील पोपचा वाडा.

असा अनुभव आहे. हिन्दू–मुस्लीम प्रार्थनामंदिरांतहि हा उपाय योजण्यांत आला असल्याचें आपल्याला आढळतें.

## शिवमंदिराचें खिस्तमंदिर

बों जेझूसमधून पहिल्या खेपेला बाहेर पडतांना तेथील पहारेकरी म्हणाला होता, "नदीच्या बाजूला एक महादेवाचं देऊळ आहे, तें पाहून घ्या." मला जरा आश्चर्य वाटलें. एकेकाळीं 'इन्क्विझिशन' (धर्मच्छळ) चें केंन्द्र असलेल्या या नगरींत हिंदूंचें देऊळ कसें राहिलें? परंतु नंतर समजलें कीं, पूर्वी तेथें शिवमंदिर होतें. पण मागाहून त्याचें खिस्तमंदिरांत रूपांतर करण्यांत आलें आहे. पूर्वी कित्येक वर्षेंपर्यंत त्या चर्चवर क्रूस टिकत नसे. मंदिरांतून महादेव हलविला तरी त्याचें सामर्थ्य हललें नव्हतें. तो तेथें क्रूस टिकू देत नसे. चढविला कीं, खालीं पाडीत असे. परंतु आम्ही पाहिलें त्यावेळीं त्यावर क्रूस होता. त्या खिस्तमंदिराच्या एका भागांत हिंदू मूर्ती सांठवून ठेवण्यांत आल्या आहेत असें कळलें, परंतु त्या मंदिराला कुलूप असल्यामुळें त्याचा खरेंखोटेंपणा पडताळून पाहातां आला नाहीं. वर उल्लेखिलेली मांडवीच्या तीरावरील व्हॉइसरॉयची कमान येथून जवळच आहे. व्हास्कु-द-गामा (वास्को डी गामा) नें येथून गोव्यांत प्रवेश केला होता असें ऐकलें, परंतु त्यांत ऐतिहासिक तथ्य नसावें. कारण व्हास्कु-द-गामा केरळमध्यें कालिकत बंदरांत उतरला होता. बहुधा १५१० सालीं गोवा शहरांत प्रवेश करणारा व्हॉइसरॉय आफोंसु-द-आल्बुकर्क हाच पहिला पोर्तुगीज येथून गोव्यांत आला असावा.

## यांचें जतन झालें पाहिजे

जुन्या गोव्यांतील खिस्तमंदिरें, व्हॉइसरॉयची कमान व लुईश-द-कामोंईशाचा पुतळा वगैरे पाहिल्यानंतर माझ्या मनांत असा विचार आला कीं या साऱ्याचें नीट जतन झालें पाहिजे. पोर्तुगीजांनीं आपल्या परीनें गोव्याच्या विकासासाठीं जे प्रयत्न केले त्यांतील कलेशीं संबंधित प्रयत्नांची आठवण बुजूं देतां कामा नये. त्यांनीं बांधलेल्या डांबरी सडका जर आपण उखडून न टाकतां वापरतों तर त्यांनीं बांधलेलीं खिस्तमंदिरेंहि कां राहूं नयेत?

# समस्याभूमि गोमंतक

## गोमंतकाची भाषासमस्या : १

सुमारें वीस वर्षांपूर्वी ( १९४५ सालीं ) मी पहिल्यांदां गोमंतभूमीचें दर्शन घेतलें. त्या वेळीं एक तटस्थ निरीक्षक किंवा रसिक प्रेक्षक एवढीच माझी भूमिका होती. गोव्याबद्दल विशेष ओढ किंवा आपुलकी अशी नव्हती. आमचीं दैवतें किंवा देवळें गोव्यांत नसल्यामुळें त्याकारणानें वाटणारी धार्मिक आत्मीयता माझ्या ठिकाणीं नव्हती. परंतु योगायोगानें त्याच वर्षीं ( ३१ डिसेंबर रोजीं ) गोव्याशीं माझा 'शरीरसंबंध' जुळून आला. मी गोमंतकाचा जांवई बनलों; आणि गोव्याबद्दल एक विशेष जिव्हाळा या रक्ताच्या नात्यानें माझ्या मनांत निर्माण केला. त्यानंतर २–३ वेळां मी गोव्यास जाऊन आलों. परंतु तेथें स्वातंत्र्याचें आन्दोलन सुरू झाल्यापासून माझ्यासारख्या खादीधारी इसमानें गोव्यांत जाणें जोखमीचें झालें. माझी पत्नी व मुलें गोव्यांत जाऊन देवदर्शन करून व नातेवाइकांना भेटून येत होतीं. परंतु मी मात्र गेल्या बारातेरा वर्षांत गोव्याला जाऊं शकलों नव्हतों. अखेर साडेचारशें वर्षांच्या पारतंत्र्यांतून १९ डिसेंबर १९६१ रोजीं गोमंतक मुक्त झाला आणि साऱ्या भारतीयांना गोव्यांत मुक्तपणें प्रवेश व संचार करितां येऊं लागला. गोव्याच्या अंतिम मुक्तिसंग्रामाच्या वेळीं व्यक्तिशः

मला भयंकर मानसिक यातना सोसाव्या लागल्या होत्या. कारण ता. ३ डिसेंबर रोजीं माझी पत्नी गोव्यास गेली आणि ता. ४ रोजीं भारतीय सैन्य गोव्याच्या सरहद्दीवर निघालें. तेव्हांपासून ता. ४ जानेवारी १९६२ रोजीं ती गोव्याहून सुखरूप परत येईपर्यंतचा एक महिना मीं आणि माझ्या मुलांनीं अत्यंत चिंतेंत व अस्वस्थतेंत घालविला. तारा-पत्रें बंद असल्यामुळें सौभाग्यवतीची कांहींच खुशाली कळली नव्हती. शत्रूच्या सुरुंगांतून किंवा आमच्याच सैनिकांच्या गोळी-बारांतून ती सहीसलामत परत येईल कीं नाहीं, याचीच काळजी आम्हांला लागून राहिलेली होती. अखेर गोमंतकाचें स्वातंत्र्य बरोबर घेऊनच ती परत आली आणि तेव्हांच आम्हांला हायसें वाटलें. या साऱ्या घटनेमुळें गोव्याला भेट देण्याची उत्सुकता अधिकच वाढली. सामान्यतः उन्हाळ्यांत गोव्याला जाण्याकडे लोकांची प्रवृत्ति असते. आंबे–फणस–काजू भरपूर खायला मिळतील अशी आशा तिच्या मुळाशीं असते. परंतु स्वातंत्र्यांतली पहिलीच उन्हाळ्याची सुटी असल्यामुळें लोक गोव्यांत भयंकर गर्दी करून तिथल्या लोकांचेंच जीवन असह्य करून सोड-णार असा मीं अंदाज बांधला ( आणि तो तंतोतंत खरा ठरला ! ) व गोवा–प्रवासाचा बेत पुढें ढकलला.

पुण्याहून गोव्याला थेट गाडी सुरू झाली होतीच; तिच्यांतून तिसऱ्या वर्गांत झोंपून जाण्याचीहि सोय झाली. आणि म्हणून स्वतंत्र गोमंतकांतली पहिली दिवाळी त्या मुक्त भूमीवर साजरी करण्याचें ठरवून मी सहकुटुंब सहपरिवार गोव्यास गेलों.

## मुक्त गोमंतकापुढील समस्या

गोव्याच्या बाबतींत सर्वसामान्य मराठी माणूस जेव्हां विचार करतो तेव्हां गोवा हा महाराष्ट्राचाच स्वाभाविक भाग आहे; कोंकणी भाषा ही मराठीची एक बोली, बोलभाषा किंवा उपभाषा आहे; आणि केंद्रीय सरकारच्या मुलुखावेगळ्या हट्टामुळें किंवा महाराष्ट्रद्वेषामुळें गोव्याला महाराष्ट्रांत विलीन केलें जात नाहीं; अशा कांहींतरी ढोबळ कल्पना त्याच्या मनांत तरळूं लागतात. गेल्या वर्षभरांत मराठी वृत्तपत्रांनीं व नियतकालिकांनीं या बाबतींत जें कांहीं भरमसाट व बहु-तांशीं प्रचारकी लिखाण प्रसिद्ध केलें आहे, त्यामुळें मराठी माणसाची गोव्या-कडे पाहण्याची दृष्टि कांहींशीं पूर्वग्रहदूषित झाली आहे; तशी ती माझीहि

झालेली होती. परंतु वृत्तपत्रीय लिखाणावर सर्वस्वीं विसंबून न राहतां तेथील प्रत्यक्ष परिस्थिति आपण पाहावी असें मीं ठरविलें. आणि त्याप्रमाणें उत्तरेकडील डिचोली गांवापासून दक्षिणेस काणकोणपर्यंत आणि पश्चिमेस पणजीपासून पूर्वेस मडगांवपर्यंत अनेक लहानमोठ्या गांवांना मीं भेटी दिल्या, अनेक लहानथोर व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या, शाळा पाहिल्या, शिक्षक–विद्यार्थ्यांशीं चर्चा केल्या आणि गोमंतकापुढील आजच्या समस्यांची माहिती मिळविली.ही माहिती मिळाल्या-नंतर गोव्यासंबंधींच्या आपल्या कल्पना किती फसव्या व वरवरच्या होत्या याची मला कल्पना आली. खरोखरी आज मुक्त गोमंतकासमोर कितीतरी महत्त्वाच्या समस्या आहेत. भाषिक समस्या ही त्यांपैकीं एक असली तरी ती कांहीं एकमेव किंवा प्रमुखहि नव्हे; परंतु मराठी वृत्तपत्रांनीं मुख्यतः याच एका समस्येवर सातत्यानें वाचकांचें लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून मीहि तिच्याविषयींच प्रथम लिहिणार आहें. परंतु तिच्यापेक्षां महत्त्वाची समस्या आर्थिक आहे. तिचेंहि स्वरूप आपण समजून घेतलें पाहिजे. शिवाय राजकीय व सांस्कृतिक प्रश्नहि आहेतच. सुदैवानें या समस्या सोडविण्यासाठीं कटिबद्ध झालेल्या गोमंतकीय कार्य-कर्त्यांशीं माझा फार जुना परिचय होता आणि त्यांनीं अत्यंत विश्वासानें व मोकळे-पणानें गोमंतकापुढील प्रश्नांची माझ्याशीं चर्चा केली. मी स्वतः कोणत्याहि एका पक्षाशीं संबद्ध नसल्यामुळें सर्व मंडळींनीं निःसंकोचपणानें माझ्याशीं चर्चा केली. त्या साऱ्या चर्चांचें व निरीक्षणाचें सार मी या व पुढील प्रकरणांतून वाचकांसमोर ठेवणार आहें.

## गुंतागुंतीचा प्रश्न

महाराष्ट्राच्या दृष्टीनें गोमंतकांची भाषा–समस्या ही एक अत्यंत गुंतागुंतीची समस्या बनलेली आहे. एखादी सुरगांठ सोडवितांना उतावीळपणा किंवा हिसका-हिसकी झाली तर त्या सुरगांठीची निरगांठ बनते आणि मग ती गांठ कापून सोडवावी लागते, असा आपला रोजच्या व्यवहारांतला अनुभव आहे. गोव्याच्या भाषेच्या बाबतींत कांहींसें असेंच झालें असावें, असें दिसतें.

## गोव्याची भाषा कोणती ?

गोव्याची भाषा कोणती, या प्रश्नाचें उत्तर प्रत्येकजण आपापल्या परीनें देत

असला तरी गोव्याची भाषा कोंकणी आहे, हें तटस्थपणें पाहाणाऱ्याला मान्य करावें लागतें. कोणीहि गोंयकार आपल्या घरांत मराठी बोलत नाहीं. स्वतःला पोर्तुगीज समजणारे कांहीं ख्रिश्चन लोक घरीं आपल्या बायका-मुलांशीं पोर्तुगीज किंवा इंग्रजी बोलतात; परंतु गोव्याची भाषा मराठी आहे व म्हणून तो महाराष्ट्रांत समाविष्ट झाला पाहिजे असें जोरजोरांत प्रतिपादन करणारा कट्टर मराठीवादी माणूस आपल्या आई-बापांशीं किंवा बायकामुलांशीं कोंकणींतच बोलत असतो. ज्यांना पोर्तुगीज किंवा इंग्रजी येत नाहीं असे हजारों ख्रिस्ती लोकहि घरीं-दारीं कोंकणीचाच वापर करतात. कोंकणी भाषा कळत नसेल तर गोव्यांतून प्रवास करणें बरेंच जिकीरीचें होतें, असा माझा अनुभव आहे. गोव्याची कोंकणी ही मालवणी कोंकणीइतकी मराठीला जवळची नाहीं. ती प्रयत्नानें शिकून, समजून घ्यावी लागते. नागरी लिपींत लिहिलेली कोंकणी आपल्याला पुष्कळच समजते. कारण तिच्यांत संस्कृत व मराठी शब्दांचा भरणा अधिक असतो. परंतु बोलली जाणारी कोंकणी ही सहजासहजीं आपल्याला कळत नाहीं. तिच्यांतील स्थानिक शब्दांमुळें तर ती अवघड बनतेच, परंतु घाईघाईनें केल्या जाणाऱ्या उच्चारांमुळेंहि ती समजण्यास अवघड जाते. ही झाली सुशिक्षित हिंदूंमध्यें बोलल्या जाणाऱ्या कोंकणीची गोष्ट. ख्रिस्ती लोकांत बोलली जाणारी व रोमी ( रोमन ) लिपींत लिहिली जाणारी कोंकणी ही तर मराठी माणसाला मुळींच समजत नाहीं. ती ऐकतांना आपण लॅटिन कुळांतील पोर्तुगीज किंवा स्पॅनिश भाषा ऐकत आहोंत, असा आपल्याला भास होतो. उदाहरणार्थ, कोंकणी ही स्वतंत्र भाषा आहे असें प्रतिपादन करणारे श्री रवींद्र केळेकर 'कोंकणी परिशदे' ( १९६२ ) च्या 'येवकार अध्यक्ष' ( स्वागताध्यक्ष ) पदावरून जें 'उलोवप' ( भाषण ) करतात तें आपल्याला पुष्कळसें कळतें. ते जेव्हां म्हणतात कीं, "कोंकणिची ध्वनिप्रकृती मराठीपरस वेगळी हें कोंकणींतल्या 'अ'च्या तीन उच्चारां वेल्यान, 'ए' 'ओ'च्या दोन वेगळया उच्चारां वेल्यान, आनी उतरांचे उच्चार करता आसतना ऱ्हस्व-दीर्घांचे तिचे जे निजाचे नेम आसात तांचे वेल्यान दाखोवन दिवंक येतां. कोंकणिची व्याकरणी बांदावळ मराठीपरस वेगळी हेंय तिच्या क्रियापदांच्या नेमां वेल्यान, प्रत्ययांच्या रूपां वेल्यान आनी दुसऱ्या जायत्या व्याकरणी नेमां वेल्यान दाखवन दिवंक येतां," तेव्हां त्यांचें विधान आपल्याला पटलें नाहीं तरी समजतें. परंतु 'व्हावड्यांचो इश्ट' ( कामगारांचा मित्र ) या ख्रिस्ती

लोकप्रिय नियतकालिकांतील रोमी कोंकणी आपल्याला वाचतांहि येत नाहीं, मग समजण्याची गोष्ट तर दूरच.

असें असलें तरी बहुसंख्य गोमंतकीय जनता आपसांतील व्यवहारासाठीं कोंकणीचाच वापर करीत असते. म्हणून गोव्याची भाषा कोंकणी आहे, हें मान्य केलेंच पाहिजे. अर्थात् कोंकणी भाषेच्या ज्या अनेक शैली प्रचलित आहेत त्यांचा समन्वय करणें ही एक फार अवघड गोष्ट आहे, हें कोंकणीवादीहि मान्य करतील.

## कोंकणी – मराठीचा संबंध

गोव्याची भाषा कोंकणी आहे, हें मान्य केल्यानें गोव्याचा भाषिक प्रश्न मात्र सुटत नाहीं. कारण आजवर कोंकणी ही केवळ बोलीभाषा म्हणूनच वापरली गेली आहे. ग्रांथिक भाषा म्हणून कोंकणीचा वापर किंवा पुरस्कार फारसा झालेला नाहीं. फारसा म्हणण्याचें कारण असें कीं हलकींफुलकीं गाणीं, उथळ प्रहसनें, धार्मिक प्रचार वगैरे कामांसाठीं ख्रिस्ती लोकांनीं रोमन लिपींत व कै. श्री शणै गोयबाब ( वर्दे वालावलीकर ) यांच्यासारख्या कांहीं कट्टर कोंकणीवाद्यांनीं नागरी ( मराठी ) लिपींत व कोंकणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. नागरी, रोमन, कन्नड व मल्याळम् या लिपींतून लिहिलेलीं कोंकणीचीं सुमारें तीन–चार हजार पुस्तकें उपलब्ध आहेत असें म्हणतात; परंतु त्यांचें साहित्यिक मूल्यमापन अद्यापि झालेलें नसल्यामुळें त्यांच्या बाबतींत कांहीं मतप्रदर्शन करतां येणार नाहीं.

## मराठीवाद्यांचें म्हणणें

कोंकणी ही आमची ‘ आवै–भास ’ ( मातृभाषा ) असली तरी ग्रांथिक भाषा, पत्रव्यवहार व हिशेबठिशेब ठेवण्याची भाषा ही मराठीच आहे, आणि म्हणून आम्ही मराठीच आहोंत, असें मराठीवादी आवर्जून सांगतात. गोमंतकीय हिंदूंचें सांस्कृतिक पालनपोषण मराठी संतसाहित्यावरच झालें आहे, म्हणून मराठीशीं राजकीय दृष्ट्याहि आपण संबद्ध झालें पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. ‘ मराठीची बाजू घेऊन जोरजोरांत भांडणाऱ्या गोमंतकीयांना स्वतःला मराठी बोलतां येत नाहीं ...भावना उचंबळून आल्या असतां कोणच्याहि गोंयकाराला मराठींत बोलतां येत नाहीं, ’ हें श्री केळेकरांचें विधान निदान मला तरी मान्य करतां येणार नाहीं. कारण गोव्यांतल्या मुक्कामांत मी ज्या ज्या कोंकणीवादी किंवा

मराठीवादी वृद्ध – तरुणांना भेटलों त्या सर्वांशीं मी मराठींतच बोललों आणि ते सारे माझ्याशीं अगदीं अस्खलित मराठींत बोलले. त्यांच्यामध्ये वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध जन्नाप्पा कामती (श्री ज. वि. कामत), श्री काशीनाथ दामोदर नायक, श्री केशव नायक वगैरे वृद्ध मंडळींप्रमाणेंच प्रा. मनोहर सरदेसाई, श्री पुरुषोत्तम काकोडकर, श्री शंकर सरदेसाई, श्री शंकर भंडारी, श्री सुरेश आमोणकर, ॲडव्होकेट गोपाळ आपा कामत, श्री चंद्रकांत केणी आणि श्री रवींद्र केळेकर यांच्यासारखी तरुण मंडळीहि होती. त्यांपैकीं कोणीहि मराठी बोलतांना अड-खळत नव्हते. ही मंडळी नेहेमीं कोंकणीच्या वातावरणांत असतात, मराठी बोलण्याची संधि त्यांना फारशी मिळत नाहीं. तरीहि ते इतकी सफाईदार मराठी बोलूं शकतात, ही खरोखरी कौतुकाची गोष्ट आहे. महादेवशास्त्री, बोरकर, कारे, लक्ष्मणराव सरदेसाई, सातोस्कर वगैरे साहित्यिकांनीं तर मराठीचें भांडार खूपच समृद्ध केलें आहे. तेव्हां मराठीच्या पुरस्कर्त्यांना मराठी बोलतां येत नाहीं, हा आक्षेप बरोबर वाटत नाहीं. बाहेरच्या कांहीं कोंकणीवाद्यांना कोंकणी येत नाहीं, हें मात्र खरें आहे. परंतु माझ्या मतें हा मुद्दा अगदीं गैरलागू आहे. कोंकणी बोलतां येत नसतांहि कोंकणीचा पुरस्कार करणें किंवा मराठींत व्याख्यान देतां आलें नाहीं तरी मराठीचा पुरस्कार करणें हें तात्त्विक दृष्टया चूक आहे असें म्हणतां येणार नाहीं. श्री चक्रवर्ती राजगोपालाचार्य हे एकेकाळीं दक्षिण भारतांत राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार करणाऱ्यांमध्यें अग्रेसर होते. परंतु त्यांना मात्र हिंदी येत नव्हतें. वरवर पाहातां ही विसंगति वाटते, परंतु तशी ती नाहीं. त्यांत व्यवहारापेक्षां तत्त्व प्रधान असतें.

गोमंतकीय लोकांचा मराठीभाषी लोकांशीं अधिक निकटचा संबंध आल्यास तेहि आमच्याइतकेच, किंबहुना आमच्यापेक्षां अधिक शुद्ध व अस्खलित मराठी बोलूं–लिहूं लागतील यांत शंका नाहीं. आज मराठीवादी गोमंतकीयांना मराठी बोलतांना थोडें बुजल्यासारखें वाटतें तें केवळ सराव नसल्यामुळें. तरीपण केळे-करांचा आक्षेप मान्य करूनहि ते मराठीलाच चिकटून राहातील असें दिसतें. या बाबतींत त्यांचेंहि कांहीं म्हणणें आहेच. तें आपण समजून घेतलें पाहिजे.

त्यांचें म्हणणें असें कीं, "कोंकणी ही आम्हांला कितीहि प्रिय असली तरी ग्रांथिक व्यवहार पेलण्याचं सामर्थ्य तिच्यांत नाहीं; आणि जरी तें तिच्यांत आणतां येणार असलं तरी चारसहा लाख लोकांपुरतीच मर्यादित भाषा

स्वीकारण्याऐवजीं चार कोटि मराठी भाषिकांशीं एकरूप बनविणारी मराठीच आम्हीं स्वीकारली पाहिजे. ”

त्यांचा हा युक्तिवाद अगदींच निरर्थक किंवा चुकीचा आहे, असें म्हणतां येणार नाहीं. हिंदीच्या बोलीभाषांनींहि अशाच प्रकारचा निर्णय या शतकाच्या सुरुवातीस घेऊन टाकला आहे. कै. बाबू राजेन्द्रप्रसाद व जयप्रकाशजी आपसांत भोजपुरी भाषेंत बोलत असत, कै. डॉक्टर अमरनाथ झा व ख्यातनाम हिंदी कवि नागार्जुन हे तर आपसांतील पत्रव्यवहारहि मैथिली बोलींत करीत असत. राष्ट्र-कवि मैथिलीशरण गुप्त व कविवर्य पंडित वियोगी हरि हे आपसांत व घरीं बुंदेलखंडी वापरतात. या सार्‍या बोलीभाषा समृद्ध साहित्यिक वारसा असणार्‍या आहेत. तरीहि त्या लोकांनीं आपल्या बोलीभाषांचा आग्रह न धरतां हिंदीच्या सेवेला वाहून घेतलें आहे. व्रज, अवधी, मैथिली, राजस्थानी वगैरे भाषा तर कोणाहि आधुनिक भाषेच्या तोडीच्या आहेत. सूरसागर, रामचरितमानस, मीरा-पदावली वगैरे अक्षयकीर्तीचें साहित्य या भाषांनीं भारताला दिलेले आहे. तरीहि आज त्यांनीं हिंदीसाठीं स्वार्थत्याग करून बोलीभाषेचें स्थान मान्य केलें आहे. त्यामुळें त्या नामशेष झालेल्या नाहींत, लोकजीवनांतील त्यांचें स्थान ढळलेलें नाहीं, हें या संदर्भात लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

## कोंकणीच्या विभिन्न शैलींचा प्रश्न

वर एके ठिकाणीं उल्लेख केल्याप्रमाणें कोंकणीच्या विभिन्न शैलींचा प्रश्न हा सहजासहजीं डावलतां येण्यासारखा नाहीं. गोव्याला जाण्यापूर्वी पंडित महादेव-शास्त्री जोशी यांची गांठ पडली असतां ते मिस्किलपणें मला म्हणाले होते, “ तुम्ही कोंकणीचा पुरस्कार करणार, हें मी जाणतों. पण तसं करतांना आमच्या चित्पावनी कोंकणीचा मात्र विसर पडूं देऊं नका हो ! ” त्यांच्या या उद्गारांतील खोंच मला गोव्याला गेल्यानंतर कळली. गोव्यांतील खिस्त्यांची कोंकणी ही हिंदूंच्या कोंकणीहून इतकी वेगळी आहे कीं, बहुधा तिच्या त्या रूपामुळेंच खिस्ती भाषापंडितांनीं कोंकणी ही मराठीपासून वेगळी असल्याचा सिद्धांत मांडला असावा. खिस्ती कोंकणींत केवळ शब्दच परके नसतात, तर तिची वाक्यरचना व जडणघडण ही देखील विदेशी असते. आतां अलीकडे त्यांनीं आपल्या भाषेला देशी बनविण्याचा प्रयत्न चालविला आहे हें खरें, परंतु तो यशस्वी होण्यास

बराच काळ लागेल, असें दिसतें.

हे झाले मुख्य भेद. त्याखेरीज बारदेसची कोंकणी वेगळी, अंत्रुज ( फोंडा ) महालांतली वेगळी, पेडण्याची वेगळी, डिचोलीची वेगळी, काणकोणची वेगळी आणि महादेवशास्त्री म्हणतात त्याप्रमाणें चित्पावनांची वेगळी. या सर्व शैलींचा समन्वय करून एक प्रमाण शैली ठरविणें हें चांगलेंच अवघड काम आहे.

## पोर्तुगीज सरकारची भूमिका

या बाबतींत पोर्तुगीज सरकारची भूमिका काय होती हें पाहाण्यासारखें आहे. गोव्याच्या मुक्कामांत मला तेथील सार्वजनिक शिरगणतीचें एक छापील पत्रक पाहावयास मिळालें. पोर्तुगीज सरकारनें १५ डिसेंबर १९६० रोजीं आपल्या जनतेची ९ वी सार्वत्रिक शिरगणती घेतली होती. त्यावेळीं कुटुंबाची माहिती मिळविण्यासाठीं एक अत्यंत उपयुक्त पत्रक सरकारनें तयार केलें होतें. त्यावर डाव्या बाजूस पोर्तुगीज सरकारचा शिक्का व ' इश्तादु द् इंदिय– दिरेसांव दुश सेर्व्हीसुश् द् इकोनोमिय रेपार्तिसांव द् इश्तातीश्तिक जेराल ( सेर्व्हीसु दु सेंसु ) ' एवढाच पोर्तुगीज मजकूर नागरी लिपींत होता. बाकी सारें पत्रक शुद्ध, साहित्यिक मराठी भाषेत होतें. फुलस्केपचीं आठ पानें, एवढें मोठें पत्रक पोर्तुगीज सरकारनें मराठींत कां छापलें असेल ? केवळ कोंकणी किंवा पोर्तुगीज भाषा वापरून भागलें नसतें काय ? याचें उत्तर पत्रकांतच सांपडतें.

या पत्रकांत नमुन्यादाखल चार काल्पनिक व्यक्तींची माहिती छापील कोष्टकांत दिलेली आहे. त्यांपैकी दोन हिंदु व दोन ख्रिस्ती आहेत. हिंदु पुरुषाचें नांव शंकर नाईक व त्याच्या पत्नीचें नांव पार्वती नाईक आहे. ख्रिस्ती स्त्रीचें नांव लुईस फेर्नांदिस व पुरुषाचें नांव कार्लुस द सौझ आहे. यांपैकीं कार्लुस द सौझ हा भारतीय ( इंदियान ) पिता व युरोपीय ( येवरोपेव ) माता यांचा मुलगा असल्यामुळें त्याची मातृभाषा पोर्तुगीज नोंदविण्यांत आलेली आहे, तर इतर तिघांची मातृभाषा कोंकणी दिलेली आहे. येथपर्यंत ठीक आहे. परंतु ' दुसरी कोणती भाषा ( एक किंवा अनेक ) लिहितांवाचतां येते ? ' या प्रश्नाला देण्यांत आलेलें उत्तर मोठें मार्मिक आहे. बिचारी पार्वती हिंदु स्त्री. त्यामुळें ती अडाणीच असली पाहिजे हें गृहीत धरून तिला लिहितांवाचतांच येत नाहीं, असें नोंदविण्यांत आलें आहे, तर लुईस फेर्नांदिस या पंचवीस वर्षांच्या बाईला कोंकणी

व इंग्रजी या दोन या भाषा येतात आणि कार्लुस द सौझ या वीस वर्षांच्या तरुणाला इंग्रजी लिहितांवाचतां येतें असें नमूद करण्यांत आलें आहे. खरी गंमत शंकर नाईकच्या बाबतींत आहे. त्याचें शिक्षण मराठी चौथीपर्यंत झाल्याचें नमूद करण्यांत आलेलें असून, त्याला फक्त मराठी लिहितांवाचतां येतें असें नोंद-विण्यांत आलें आहे. याचा अर्थ त्याची मातृभाषा कोंकणी असली तरी लुईस फर्नां-दिस या ख्रिस्ती बाईप्रमाणें त्याला कोंकणी लिहितांवाचतां येत नाहीं. जणूं हिंदूंनीं मराठीच लिहायला–वाचायला शिकायचें असतें असें पोर्तुगीजांनीं गृहीत धरलें होतें. शिरगणतीपत्रकें पोर्तुगीजप्रमाणें रोमी कोंकणींत व इंग्रजींतहि छापलीं गेलीं होतीं, परंतु तीं नागरी कोंकणींत मात्र छापलेलीं नव्हती !

## कोंकणीवाद्यांची बाजू

येथवर आपण मराठीवादी गोमंतकीयांचें म्हणणें समजावून घेतलें. आतां कोंकणीवादी लोकांचें म्हणणें काय आहे तें पाहूं.

आचार्य काकासाहेब कालेकर हे गोमंतकीय कोंकणीवाद्यांचे नेते व पाठीराखे समजले जातात. त्यांनीं आपल्या 'पुण्यभूमि गोमंतक' या ऑक्टोबर १९५८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या लेखसंग्रहांत कोंकणीच्या समर्थनार्थ जे मुद्दे मांडले आहेत तेच कोंकणीवाद्यांचे मुद्दे आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जनजागृतीसाठीं जनतेची भाषाच वापरावी लागते, आणि गोमंतकीय जनतेची भाषा कोंकणी असल्यामुळें ज्यांना जनसेवा करावयाची असेल त्यांना कोंकणीची उपेक्षा करून चालणार नाहीं, हा कोंकणीवाद्यांचा मुद्दा मराठीवाद्यांनाहि नाकारतां येईल, असें मला वाटत नाहीं.

तसेंच गोमंतकीय हिंदु व ख्रिस्ती यांना एकत्र आणणारी कोंकणी ही एकमेव भाषा आहे, आणि गोव्याचें एकूण जनजीवन सुसंघटित, समर्थ व समृद्ध होण्याला कोंकणीची मदत सर्वांत अधिक होईल हा कोंकणीवाद्यांचा मुद्दा मराठी-वाद्यांना खोडून काढतां येणार नाहीं.

कोंकणी ही मराठीची बोली आहे, हें कोंकणीवाद्यांना मान्य नाहीं. पंडित व विद्वान् भाषाशास्त्री यांनीं या बाबतींत कांहीं निर्णय दिला तरी त्यांना त्याची पर्वा नाहीं. 'कोंकणी ही आमची भाषा आहे, अशी आमची श्रद्धा आहे आणि तेवढी श्रद्धा आम्हांला पुरेशी आहे,' असें कांहीं कोंकणीवादी मजजवळ

म्हणाले. मी त्यांच्या या श्रद्धेची कदर करतों. कोंकणी माझी मातृभाषा असती आणि तिच्या द्वारें मला लोकसेवा करावयाची असती तर मीहि असेंच म्हणालों असतों.

अर्थात् एकदां कोंकणी ही जनतेची भाषा आहे, हें मान्य केल्यानंतर तिचा विकास घडवून आणणें हें क्रमप्राप्त कर्तव्य बनतें. म्हणून जे तरुण गोमंतकीय धर्मप्रसारकांच्या हिरीरीनें कोंकणीचा प्रसार व विकास करीत आहेत, त्यांच्याबद्दल मला आदरच वाटतो. जो कोणी निष्ठेनें, श्रद्धेनें, जिद्दीनें, आपल्या मातृभाषेची सेवा करीत असेल, त्याची कदर करावी, हेटाळणी करूं नये असेच मी टिळक–आगरकर – चिपळूणकरांकडून शिकलों आहें, आणि ज्यांनीं कोंकणीवाद्यांची हेटाळणी केली त्यांनीं मराठीची अ–सेवाच केली, असें माझें स्पष्ट मत आहे.

परंतु गोव्यांत आज कोंकणीवादी व मराठीवादी हे जणूं दोन युद्धयमान पक्ष बनले आहेत. ते एकत्र येत नाहींत, आले तरी मनमोकळेपणानें एकमेकांशीं बोलूं शकत नाहींत. कारण प्रत्येकानें असा दृढ ग्रह करून घेतला आहे कीं माझा प्रतिपक्षी हा अप्रामाणिक व संधिसाधू असून मी मात्र अत्यंत प्रामाणिक व निष्ठावान् आहें. ही स्थिति बदललीच पाहिजे.

## पुस्तक–प्रकाशनाचा उपयोग


कोंकणीच्या विकासासाठीं ' गोमंत भारती, ' ' कोंकणी भाशामंडळ ' वगैरे संस्थांनीं चालविलेले प्रयोग अत्यंत प्रशंसनीय असेच आहेत. गांधी स्मारक निधीच्या मदतीनें गोमंत भारतीतर्फे अनेक कोंकणीं पुस्तकें नागरी लिपींत प्रसिद्ध झालेलीं असून त्यांचा खप मराठी पुस्तकांच्या खपांच्या तुलनेनें मुळींच कमी नाहीं, हें मराठीच्या पुरस्कर्त्यांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. नागरी कोंकणींतून ' कोंकणीं ' व ' नवें गोंय ' यांसारखीं कांहीं नियतकालिकेंहि ही मंडळी चालवीत आहेत. अर्थात् या प्रयत्नांत त्याग–भावना हा महत्त्वाचा घटक आहे. लेखक रॉयल्टी किंवा पारिश्रमिक घेत नाहींत व विक्रेते कमिशन घेत नाहींत. यामुळें हें शक्य होतें हें उघड आहे.

## या प्रयत्नांतील उणीव


परंतु याच वेळीं या प्रयत्नांतील उणीवहि लक्षांत घेतली पाहिजे. गोव्यांतील कांहीं ख्रिस्ती लोकांनीं कोंकणीसाठीं नागरी लिपीला मान्यता दिली असली तरी



बॉं जॅझूस



सांत अंतोन



सेंट फ्रान्सिस असीसी हें भव्य व महत्त्वाचें खिस्तमंदिर

अद्यापि त्यांनीं नागरी लिपि शिकण्यास सुरुवात केलेली नाहीं. त्यामुळें कोंकणी-वादी लोकांचें नागरींतील साहित्य हें खिस्ती लोकांपर्यंत जाऊन पोंचत नाहीं. त्यांच्यामध्यें अद्यापिहि रोमी कोंकणीचाच खूप मोठ्या प्रमाणावर प्रचार चालू आहे. जे लोक नागरी लिपींतील कोंकणी वाचतात ते मराठी वाचूं–समजूं शकतात, त्यामुळें त्यांच्या कोंकणी वाचनामागें मुख्यतः कोंकणी-प्रेमाचीच भूमिका असते. केवळ शौक किंवा एक चूष म्हणूनहि ही मंडळी कोंकणीचीं पुस्तकें व नियतकालिकें घेत असण्याची शक्यता आहे. परंतु तेवढीहि उत्सुकता खिस्ती लोक दाखवीत नाहींत; त्यामुळें कोंकणी-पुरस्काराचा मूळ हेतूच विफल होतो असें मराठीवादी म्हणूं शकतील. परंतु ही नुकतीच सुरुवात आहे. हळूहळू ही परिस्थिति बदलेल आणि फार मोठ्या संख्येनें खिस्ती लोक नागरी लिपींतील कोंकणी पुस्तकें वाचूं लागतील, असा आशावाद बाळगण्यास हरकत असूं नये.

## कोंकणीच्या शिक्षणाचा प्रयोग

कोंकणी ही स्वतंत्र लोकभाषा आहे, असें एकदां मान्य केल्यानंतर तिच्या शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे, हें ओघानेंच येतें. त्याप्रमाणें आतां गोमंतका-मध्यें कोंकणीच्या प्राथमिक शाळा सुरू करण्यांत आल्या आहेत. आपल्या मुलांनीं कोणत्या भाषेंत शिकावें हें ठरविण्याचा अधिकार पालकांना देण्यांत आलेला आहे. त्याप्रमाणें (१९६२ सालीं) ३७ हजार मुलांच्या पालकांनीं मराठी शाळेंत, अडीच हजार मुलांच्या पालकांनीं कोंकणी शाळेंत, ६ हजार मुलांच्या पालकांनीं पोर्तुगीज शाळेंत व अडीच हजार मुलांच्या पालकांनीं इंग्रजी शाळेंत नांवें नोंदविलीं होतीं. १९६३ सालीं मराठी – इंग्रजी शाळांतील संख्या वाढली पण कोंकणी विद्यार्थ्यांची संख्या घसरून ८०० वर आली. अर्थात् यांत खासगी शाळांतील विद्यार्थ्यांचा समावेश नाहीं.

## मीं पाहिलेली मराठी शाळा

गोव्यांतील मुलांना मराठींत दिलें जाणारें शिक्षण नीट समजत नाहीं, तीं केवळ पोपटपंची करायला शिकतात, त्यांना ज्ञानप्राप्तीचा आनंद लाभत नाहीं, म्हणून शिक्षणाचा प्रारंभ कोंकणींतून झाला पाहिजे, हें कोंकणीवाद्यांचें म्हणणें मला मान्यच होतें. परंतु या बाबतींतील माझा प्रत्यक्ष अनुभव मात्र थोडा वेगळा ठरला. काणकोण (पालोळे) येथील प्राथमिक शाळेंत जाऊन तेथील

वर्ग मीं पाहिलें. इयत्ता चौथीच्या मुलांना आतांपर्यंत न शिकविलेला मराठी धडा शिकविण्यास मीं तेथील शिक्षिकेला सांगितलें व त्या मुलांना ती मराठी भाषा कितपत कळते, याचा अंदाज घेतला. मला असें आढळून आलें कीं मराठी चौथीच्या मुलांना महाराष्ट्रांत शिकविल्या जाणाऱ्या चौथीच्या पुस्तकांतील मराठीचा धडा समजण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. कांहीं वाक्यांचें स्पष्टीकरण त्यांनीं कोंकणींतून करावें असें मीं त्यांना सांगितलें, तेव्हां ती गोष्ट त्यांना थोडी अडचणीची वाटली. उलट मराठीमधून स्पष्टीकरण करणेंच त्यांना सोपें गेलें. बहुधा धडा शिकवितांना जें एक मराठी वातावरण निर्माण होतें, त्याचा तो परिणाम असावा. पहिल्या दोन इयत्तांना शिकवितांना मात्र कोंकणीचा भरपूर वापर केला जातो. त्या वर्गांत आढळलेली आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे वर्गांतील एक ख्रिस्ती मुलगाच सारस्वत मुलांपेक्षां अधिक हुशारीनें प्रश्नांचीं उत्तरें देत होता. आणि मग मला एका जाणकाराचे बोल आठवले. तो मला म्हणाला होता, "गोव्याचे ख्रिस्ती लोक अत्यंत बुद्धिमान् आहेत. त्यांना जाणूनबुजून मराठीपासून दूर ठेवण्यांत आलं होतं. पण जर उद्यां त्यांनीं मराठी शिकायला सुरुवात केली तर ते आम्हां सारस्वतांपेक्षां अधिक झपाट्यान मराठी शिकून त्यांत प्रावीण्य मिळवतील." काणकोणचें हायस्कूल मराठी माध्यमाचें आहे. तेथील विद्यार्थी मराठी भाषेत ६० टक्क्या-पर्यंत गुण मिळवतात व त्यांत ख्रिस्ती विद्यार्थीहि मागे नसतात, असें त्या हायस्कूलचे एक तरुण शिक्षक श्री. शिवानंद उसगांवकर यांनीं मला सांगितलें. श्री. उसगांवकर यांचें शिक्षण इंग्रजी माध्यमांतून झालें असल्यामुळें मराठींतून शिकविणें त्यांना थोडें त्रासाचें वाटतें. पण त्यांना तें आवडतें. (महाराष्ट्रांतहि इंग्रजींतून मराठी माध्यमाकडे येतांना प्रारंभीं हा त्रास झाला होताच!)

## कोंकणी भाषा कोण शिकतील?

अर्थात् असें असलें तरी ज्यांना कोंकणींतून शिक्षण घ्यावयाचें आहे, त्यांना तें घेतां आलें पाहिजे, तशी सोय त्यांना उपलब्ध करून दिली गेली पाहिजे, असें मला वाटतें. परंतु खरी अडचण अशी आहे कीं कोंकणी भाषा कोण शिकणार? श्री. ज. वि. कामत मला म्हणाले, "कोंकणीला आमचा मुळींच विरोध नाहीं. परंतु या कोंकणीवाद्यांच्या साऱ्या उड्या सरकारी मदतीवर आहेत. सरकारी

ग्रं. क्र. ९.८ २५५ ५० : ६१

मदतीशिवाय आम्ही आजवर साडेचारशे मराठी शाळा चालविल्या. या लोकांनीं निदान एक तरी शाळा चालवून दाखवावी, असं माझं अनेक वर्षांपासून या लोकांना आव्हान आहे."

कोंकणीवाद्यांनीं हें आव्हान आतां स्वीकारावें असें मला वाटतें.

परंतु या बाबतींत अनेक लोकांच्या मनांत कांहीं कटु भावना असल्याचेंहि मला आढळून आलें. एक गृहस्थ चिडून म्हणाले, "अहो हा सगळा प्रचारी स्टंट आहे. हे कोंकणीवादी आपल्या मुलांना, भावांना कोंकणीऐवजी इंग्रजी शिकवितात अन् इतरांनीं मात्र त्यांच्या मुलांना कोंकणी शिकवावं हा यांचा आग्रह. तें कोण ऐकणार ? केवळ सरकारी बडग्याखालीं सांपडलेले अडाणी किंवा गरीब पालकच नाइलाजानं आपल्या मुलांना कोंकणी शाळांत घालतील. खाजगी इस्पितळांतला खर्च देण्याची ऐपत नसलेले दरिद्री नि बेबारशी लोकच सरकारी इस्पितळांत जातात ना, तसंच होणार हें !"

महाराष्ट्रांत ज्या सत्तारूढ काँग्रेसपक्षानें मराठी पांचवीपासून चालू असलेलें इंग्रजी शिक्षण बंद करून तें आठवीपासून सुरू केलें त्या पक्षांतील मंत्री, पुढारी व श्रीमंत कार्यकर्ते त्यावेळीं आपापल्या मुलांना कॉन्व्हेंट स्कूल्समधून शिकवूं लागले होते, याची आठवण मराठी लोकांमध्यें अजून ताजी आहे. तोच प्रयोग कोंकणीच्या बाबतींत होणार आहे, अशी रास्त शंका अनेकांनीं मजजवळ बोलून दाखविली. मी निरुत्तर झालों, हें मला मान्य केलें पाहिजे.

## एक मोठा धोका

एका कार्यकर्त्याशीं या बाबतींत बोलत असतां ते म्हणाले, "कोंकणीच्या शाळा कां चालणार नाहींत, या बाबतींत माझं अनुमान जरा वेगळंच आहे. मुलगा शाळेंत जातो म्हणजे कांहींतरी नवं, वेगळं शिकतो अशी पालकांची भावना असते. मराठी शिकतांना आपण कांहींतरी शिकत आहोंत असं कोंकणीभाषी विद्यार्थ्याला वाटतं, नि आपला मुलगा कांहींतरी शिकतोय् असं पालकाला वाटतं. परंतु तो कोंकणी शिकायला लागला तर येत असलेलंच काय शिकायचं असं मुलाला नि त्याच्या पालकालाहि वाटेल. आजवर भटाबामणांनीं मराठी शिकून आपली उन्नति करून घेतली. आतां आमच्या मुलांना कायमचं मागासलेलं ठेवण्यासाठीं त्या लोकांनीं हें कोंकणीचं पिल्लूं बाहेर काढलंय असा जर गावड्यांनीं

नि सुदिरांनीं (शूद्रांनीं) समज करून घेतला तर त्यांना समजावणं फार कठीण होईल. ”

हा धोका खरोखरीच मोठा आहे. म्हणून हा प्रयोग करतांना हा धोका टाळण्याचा प्रयत्न कोंकणी–वाद्यांप्रमाणेंच मराठी–प्रेमी लोकांकडूनहि झाला पाहिजे असें मी म्हणेन. शिक्षण देणाऱ्यांविषयीं शिक्षण घेणाऱ्याच्या मनांत कधींहि अविश्वास निर्माण होतां कामा नये.

## गोमंतकांतील मराठीच्या शाळा

१९६० च्या खानेसुमारीप्रमाणें गोव्याची एकूण लोकसंख्या ५,९५,५६९ असून त्यांपैकीं ३,९५,६१५ हिन्दु, २,२८३९५ खिस्ती व ११५५९ मुसलमान आहेत. येथील शाळांची संख्याहि पाहाण्यासारखी आहे. मराठी शिक्षणाची व्यवस्था पोर्तुगीज सरकारनें न केल्यामुळें गेलीं कित्येक शतकें हें काम खाजगी संस्थांतर्फेंच चालू होतें. १९६० सालीं सुमारें ४५० मराठी शाळा चालू होत्या. या शाळांतून एकूण सुमारें पन्नास हजार मुलें शिकत असावींत. मराठी माध्यमांतून एस्. एस्. सी. पर्यंत शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळांची संख्या पांच किंवा सहा असून त्या मुख्यतः मुलींच्या शाळा आहेत. इंग्रजी माध्यमांतून शिक्षण देणाऱ्या खासगी माध्यमिक शाळाची संख्या ५२ असून त्यांची विद्यार्थी-संख्या ११८५१ आहे. आजवर येथील माध्यमिक शाळा महाराष्ट्रांत एस्. एस्.सी बोर्डाला जोडलेल्या होत्या. त्या दिल्ली बोर्डाला जोडण्याची कारवाई सुरू झालेली आहे. परंतु लोकसेवकांचें साह्य व आपसांतील एकजूट यांच्या बळावर माध्यमिक शाळांचे संचालक ही कारवाई हाणून पाडतील असा रंग दिसतो.

## खिस्ती लोक मराठी शिकतील काय ?

कोंकणी ही हिंदूंना व खिस्त्यांना एकत्र जोडणारी भाषा आहे, असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां खिस्ती लोक मराठी शिकणार नाहींत असें गृहीत धरलें जातें. हें गृहीतकृत्य कितपत साधार आहे, याचाहि मीं कानोसा घेण्याचा प्रयत्न केला. खिस्ती लोकांना रोमन लिपींतून कोंकणी शिकणें कांहीं दिवस आवडेल हें खरें; परंतु नागरी लिपि त्यांना शिकावी लागली—आणि राजभाषा हिंदीसाठीं त्यांना ती शिकावी लागणारच आहे—तर मराठी शिकण्यास त्यांना फारशी अडचण भासणार नाहीं, असें शिक्षणक्षेत्रांतील कांहीं मंडळींनीं सांगितलें. खिस्ती समाजाशीं

घनिष्ठ परिचय असलेल्या एका गृहस्थांनीं या प्रश्नाचा एक वेगळाच पैलू माझ्यासमोर ठेवला. ते म्हणाले, " ख्रिस्ती लोक हे जसे बुद्धिमान् आहेत तसेच ते व्यवहारचतुरहि आहेत. पोर्तुगीज लोक आतां भारतांत परत येणार नाहींत नि म्हणून पोर्तुगीज भाषेचा यापुढं कांहीं उपयोग नाहीं, हें लक्षांत येतांच ते जितक्या तत्परतेनं पोर्तुगीज भाषेचा त्याग करतील तितक्याच तत्परतेनं आपल्याला मराठी जीवनाशीं समरस व्हावयाचं आहे, हें लक्षांत येतांच ते मराठीचा स्वीकार करतील. एखादं तत्त्व उराशीं बाळगून त्यासाठीं वाटेल तो त्याग करण्याचं शिक्षणच त्यांना कधीं मिळालेलं नाहीं. कारण ही गोष्ट पोर्तुगीजांच्या रक्तांतच नव्हती तर ते गोमंतकीय ख्रिस्त्यांना ती कशी शिकवणार ? " गोमंतकीय ख्रिस्ती मंडळी मराठीला भिऊन इंग्रजीचा आसरा घेतील व अँग्लो-इंडियनांप्रमाणें अभारतीय बनतील, अशी भीति कांहीं कोंकणीवाद्यांना वाटते व त्यांनीं तसें बनूं नये यासाठीं कोंकणीचा वापर करावा, असें ते म्हणतात. परंतु ही भीति व्यर्थ आहे. पारशी लोकांप्रमाणेंच गोमंतकीय ख्रिस्तीहि सदैव राज्यकर्त्यांच्या पक्षालाच राहातील, आणि आपला स्वार्थ व व्यवहार ज्यायोगें साधेल तोच मार्ग अवलंबितील असें जाणकारांचें मत आहे.

ख्रिस्ती लोकांमध्यें हिंदीचा प्रचार मात्र खूप झपाट्यानें होऊं लागलेला आहे. माझे मित्र श्री माधव पंडित व त्यांचे सहकारी यांनीं ख्रिस्ती लोकांत हिंदीचा प्रचार करण्याचें खूप मोठें काम हातीं घेतलें असून गोव्याच्या स्वातंत्र्य–संग्रामांत ख्रिस्ती तरुणांशीं त्यांचा संबंध असल्यामुळें त्यांना ख्रिस्ती मंडळींचा चांगला पाठिंबाहि आहे. हिंदीमुळेंहि कदाचित् मराठीकडे वळण्यास ख्रिस्त्यांना मदत होईल असें म्हणतात.

## कॉंग्रेस–कार्यकर्त्यांची भूमिका

अखिल भारतीय कॉंग्रेस समितीनें गोव – दीव – दमणसाठीं एक तदर्थ समिति ( adhoc committee ) स्थापन केलेली होती. या तदर्थ समितीचे संयोजक ( Convener ) श्री पुरुषोत्तम काकोडकर हे माझे आश्रमीय साथी व सहकारी. गेलीं वीस वर्षें त्यांच्याशीं माझा संबंध आहे. पोर्तुगीज सत्तेविरुद्ध लढणारे झुंझार वीर म्हणून त्यांना सारा भारत ओळखतो. ते पोर्तुगालमध्यें हद्दपारीची व तुरुंगाची शिक्षा भोगीत होते तेव्हांहि त्यांच्याशीं माझा पत्रव्यवहार चालू होता.

त्यामुळें मी गोव्यांत गेल्याबरोबर आधीं त्यांची भेट घेणें हें स्वाभाविकच होतें. परंतु त्यावेळीं दिल्लींतील वरिष्ठ नेत्यांशीं विचारविनिमय करण्यासाठीं ते दिल्लीला गेलेले होते. म्हणून ते परत येईपर्यंत मी गोव्यांत भरपूर फिरून घेतलें आणि तेथील परिस्थिति पाहून व लोकांना भेटून पुष्कळ माहिती मिळवली. त्यामुळें त्यांची भेट झाली त्यावेळीं मजजवळ प्रत्यक्ष अनुभव जमा झालेला होता, हें एका परीनें बरेंच झालें. कॉंग्रेस कमिटीची कचेरी हेंच काकोडकरांचें निवासस्थान व दिवसांतील चोवीस तास कॉंग्रेसच्या कार्यासंबंधीं चिंतन, मनन व अंमलबजावणी करणें एवढेंच त्यांचें काम.

ता. ४ नोव्हेंबर रोजीं मी त्यांना भेटायला गेलों त्यावेळीं योगायोगानें तदर्थ समितीचे चिटणीस श्री शंकर सरदेसाई व समितीचे एक सभासद व थोर लोकसेवक ॲडव्होकेट गोपाळ आपा कामत हे दोघे तेथें होते. त्यामुळें आमची दीड–दोन तास चाललेली चर्चा चांगली भरीव व विधिधांगी झाली. गोव्यासंबंधींचे भावी निर्णय हे जरी गोमंतकीय जनतेच्या इच्छेनुसारच घेणांत यावयाचे असले तरी केन्द्रीय सरकारची इच्छा ही त्यांत अत्यंत प्रभावी राहाणार आहे; आणि केन्द्रीय सरकार ज्या पक्षाचें बनलेलें आहे त्या पक्षाची गोमंतकीय शाखाहि कमी प्रभावी ठरणार नाहीं, हें उघड आहे. त्या दृष्टीनें या मंडळींशीं झालेली चर्चा विशेष मोलाची व महत्त्वाची होती यांत शंका नाहीं. दुसरे दिवशीं आणखी तीनचार तास श्री पुरुषोत्तम काकोडकर यांच्याशीं गोमंतकाच्या प्रश्नांसंबंधीं चर्चा करण्यांत मीं घालविले. मुरगांव ( मार्मागोवा ऊर्फ वास्को डी गामा ) येथें भारतीय सेनापतींनीं पोर्तुगीज गव्हर्नराकडून ज्या ठिकाणीं शरणागति स्वीकारली तें स्थानहि श्री भाऊ काकोडकरांनीं ( भाऊ हें त्यांचें घरगुती नांव ) मला नेऊन दाखविलें. त्यावेळींहि आम्ही गोव्याच्या समस्यांसंबंधीं बोललों.

मी स्वत: कॉंग्रेसवाला नव्हें आणि महाराष्ट्रांत व भारतांत कॉंग्रेसनें सत्ताप्राप्तीसाठीं जे डावपेंच लढविले व आजहि ती लढवीत आहे ते मला मुळींच मान्य नाहींत. त्यामुळें गोमंतकांतील या कॉंग्रेसकार्यकर्त्यांशीं बोलतांना माझ्या मनांत कांहीं पूर्वग्रह होते, हें मान्य केलें पाहिजे. शिवाय या मंडळींविषयीं गोव्यांतील लोकांकडून मला पुष्कळच भलें–बुरें ऐकावयालाहि मिळालें होतें. तरीपण गोमंतकाच्या भाषासमस्येच्या बाबतींत या कॉंग्रेसी मंडळींनीं आपली जी भूमिका माझ्यासमोर मांडली ती मला पुष्कळच निर्दोष व ग्राह्य वाटली.

ते म्हणाले, "आम्ही कोंकणीचे पक्षपाती आहोंत, असा एका बाजूनें आमच्यावर आरोप केला जातो, तर दुसऱ्या बाजूनें आम्ही कोंकणीला पुरेसं उत्तेजन देत नाहीं, त्याअर्थीं छुपे मराठीवादी आहोंत, असा प्रचार केला जातो. वस्तुतः आम्ही कोंकणीवादीहि नाहीं अथवा मराठीवादीहि नाहीं. आम्ही जनतावादी आहोंत. आमचीं ध्येयधोरणं नि कार्यक्रम जनतेपर्यंत नेऊन पोंचविणं हें आमचं उद्दिष्ट. त्यासाठीं जिथं कोंकणी उपयोगी पडेल तिथं आम्ही कोंकणी वापरतों नि जिथं मराठी जास्त प्रभावकारक ठरेल, तिथं मराठीचा वापर करतों. कोंकणी शिकूं इच्छिणाऱ्यांना कोंकणींतून नि मराठी शिकूं इच्छिणाऱ्यांना मराठींतून शिक्षण मिळालं पाहिजे, असं आम्ही मानतों."

मला वाटतें, हीच भूमिका ते घेऊं शकतात.

गोमंतकांत मराठीचा प्रचार वाढविण्यासाठीं काय केलें पाहिजे हें सांगतांना श्री कामत व काकोडकर म्हणाले, "इथल्या लोकांना उत्तम नि भरपूर मराठी वाचायला मिळालं पाहिजे. त्यासाठीं जागजागीं मुक्तद्वार वाचनालयं नि ग्रंथालयं उघडण्यांत आलीं पाहिजेत. मराठीवाद्यांनीं निष्कारण वितंडवाद घालीत न बसतां या दृष्टीनं कांहीं विधायक कार्य हातीं घेतलं तर आम्हीहि आमच्याकडून शक्य तेवढा हातभार त्या कामीं लावूं."

आज जे मराठीवादी देशभक्तीचा मोठा आव आणून इतरांना सरकारधार्जिणे ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत ते पोर्तुगीजांच्या जमान्यांत पोर्तुगीज गव्हर्नरांच्या एका कृपादृष्टीसाठीं कसे आतुर झालेले असत आणि पोर्तुगीज सरकारच्या सेन्सॉर बोर्डावर काम करणाऱ्या या मराठीवाद्यांनीं मराठी पाठ्यपुस्तकांतील गांधी–नेहरूसंबंधींचा मजकूरच नव्हे, तर गणिताच्या पुस्तकांतील राष्ट्रीय झेंड्याचीं किंवा तत्सम उदाहरणेंहि काढून टाकण्याच्या कामीं कसा हिरिरीनं पुढाकार घेतला होता, हेंहि या मंडळींकडून मला समजलें. अर्थात् क्षुद्र स्वार्थच ज्यांना कळतो अशी मंडळीं गुलामगिरींत राज्यकर्त्यांचे पाय धरून कशी जगत असतात आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर देशभक्तीचा मोठा आव कसा आणतात हें आम्हीं भारतांत पाहिलेलेंच असल्यामुळें त्यांच्या त्या माहितीनें मला आश्चर्य वाटलें नाहीं.

ख्रिस्ती लोकांच्या बाबतींतील त्यांची भूमिकाहि तशी सदोष नाहीं. परंतु तिच्यांतील एक धोका मीं त्यांच्या नजरेस आणला. मी त्यांना म्हणालों, "मुसलमानांचीं

मतं मिळावींत म्हणून आमच्याकडे कॉंग्रेसनं जो एक ' खतरताक ' प्रयोग केलाय् तो तुम्ही समजून घ्या आणि मग त्या दृष्टीनं पावलं टाका. महाराष्ट्रांतल्या मुसलमानांची मातृभाषा उर्दू नाहीं; परंतु तिथल्या मुल्ला–मौलवींना आणि जातीय पुढाऱ्यांना मुसलमानांवरली आपली पक्कड ढिली होऊं द्यायची नाहीं, म्हणून त्यांना इतर हिंदूंत मिसळतां येऊं नये याकरितां त्यांनीं मुसलमानांसाठीं उर्दू शाळांची मागणी केली. मुसलमानांचीं मतं विरोधकांना मिळूं नयेत म्हणून कॉंग्रेसवाल्यांनीं ती मागणी मान्य केली. याचा परिणाम असा झाला कीं मुस्लिम समाज कायमचाच वेगळा पडला. शिवाय उर्दूतून माध्यमिक अथवा उच्च शिक्षण घेण्याची सोय नसल्यामुळं मुस्लिम विद्यार्थ्यांना केवळ प्राथमिक शिक्षण घेऊनच थांबावं लागतं. राज्यकाभारांत उर्दूला कांहीं स्थान नसल्यामुळं उर्दू शिक्षणाचा तसा कांहीं प्रत्यक्ष उपयोगहि नाहीं. ख्रिस्ती आणि कोंकणी यांच्या बाबतींत ही घोडचूक राज्यकर्त्यांकडून केली जाणार नाहीं, एवढंच तुम्ही पहावं, अशी माझी अपेक्षा आहे. ”

## माझे निष्कर्ष

या प्रश्नासंबंधींचें उपलब्ध साहित्य नजरेखालीं घातल्यानंतर व गोव्यांत हिंडून तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मी पुढील निष्कर्षांवर येऊन ठेपलों आहें :—

( १ ) कोंकणी ही स्वतंत्र भाषा आहे कीं मराठीची बोली अथवा उपभाषा आहे या चर्चेंत न पडतां गोव्यांतील ज्या लोकांना कोंकणी ही आपली मातृभाषा आहे असें वाटतें त्यांचें म्हणणें मराठी–भाषी लोकांनीं प्रामाणिकपणें मान्य करावें.

( २ ) गोमंतकीय जनतेला कोंकणींतून बोललेलें सुलभतेनें समजतें, ही वस्तुस्थिति मान्य करून जी मंडळी विचारप्रचारासाठीं कोंकणीचा वापर करतात त्यांच्या हेतूविषयीं मराठीच्या पुरस्कर्त्यांनीं शंका घेऊं नये. कोंकणीच्या विकासामुळें मराठीला कसलाहि धोका नाहीं. चार कोटि लोकांच्या भाषेनें चार लाख लोकांच्या भाषेला भिणें हें हास्यास्पद म्हटलें पाहिजे.

( ३ ) ज्यांना कोंकणींतून किंवा मराठींतून शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांना तशा सोयी उपलब्ध झाल्या पाहिजेत, असा आग्रह मराठीच्या पुरस्कर्त्यांनीं

धरावा. शक्य झाल्यास त्या कामीं सक्रीय साह्यहि करावें. कोंकणी – मराठीचा वाद कालांतरानें समाधानकारकपणें मिटणार आहे, अशी श्रद्धा बाळगून हें काम करावें म्हणजे आज कोंकणीचा आग्रह बाळगणारे ख्रिस्तीहि उद्यां मराठीच्या बाजूस येतील. परंतु कोंकणी – मराठीचा वाद चिघळत राहिल्यास आज मराठी-बद्दल प्रेम नसलेले ख्रिस्ती इंग्रजीकडे वळतील आणि अँग्लो – इंडियन जमाती-प्रमाणें ते या देशांत परकेच राहतील.

( ४ ) मराठी ही शत्रुभाषा नसून सखी – भाषा आहे ही भावना कोंकणी-वाद्यांनीं मनांत बाळगावी. म्हणजे कोंकणीचा प्रचार याचा अर्थ मराठीचा धिक्कार असें समीकरण जनमानसांत रूढ होणार नाहीं.

( ५ ) कोंकणी – मराठीच्या बाबतींतील शेवटचा निर्णय गावडे, कुणबी, सुदिर, भंडारी, कोळी वगैरे हिंदू – ख्रिस्ती जनतेनेंच घ्यावयाचा आहे. त्या जनतेला सुशिक्षित बनविणें — मग तें कोंकणीच्या द्वारें असो कीं मराठीच्या द्वारें असो— हें आपलें कर्तव्य आहे, ही गोष्ट कोंकणी – मराठी – वाद्यांनीं ओळखावी.

( ६ ) ज्यांना गोमंतकांत मराठीचा अधिकाधिक प्रसार व्हावा असें वाटत असेल त्यांनीं पुस्तकें, नियतकालिकें, नाटकें वगैरेंच्या द्वारें गोव्यांत मराठीचें वातावरण तयार करण्याकडे अधिक लक्ष द्यावें. आज सुशिक्षित गोमंतकीय हिंदु मुख्यतः मराठी पुस्तकें व नियतकालिकेंच वाचतात. ही गोष्ट दृष्टीआड करूं नये. ज्यांना कोंकणीचा पुरस्कार व प्रसार करावयाचा आहे त्यांनींहि मराठी नियतकालिकांच्या माध्यमाचें सामर्थ्य ओळखलें पाहिजे.

( ७ ) महाराष्ट्र-सरकार महाराष्ट्रांतील मराठी साहित्याच्या उन्नतीसाठीं जशी आर्थिक मदत देतें तशीच मदत त्यानें गोमंतकांतील कोंकणी – मराठी साहित्याच्या विकासासाठीं उदारपणें दिली पाहिजे. त्यायोगें ज्यांच्या मनांत महाराष्ट्राविषयीं अविश्वास किंवा दुंजाभाव असेल त्यांना थोडाफार विश्वास व आपलेपणा वाटूं लागेल.

# कोंकणी भाषिकांची फाळणी : २

दिल्लीच्या ‘ भारतीय भाषासंघ ’ या आचार्य काकासाहेब कालेलकरांच्या मार्गदर्शनाखालील संस्थेतर्फे मडगांव ( गोवा ) येथें ‘ त्रिवेणी ’ या नांवांचें एक हिन्दी – मराठी – कोंकणी त्रैभाषिक पाक्षिक प्रसिद्ध होत असतें. गोमंतकीय जनतेच्या सर्वांगीण विकासाचा उच्च पातळीवरून विचार करणारें असें हें पाक्षिक आहे. त्याचे संपादक श्री चंद्रकांत केणी यांनीं ता. २६–६–६३ च्या अंकांत ‘ यत्र–तत्र–सर्वत्र ’ या सदरांत ‘ गोमंतक मराठी साहित्य संमेलनांत राहून गेलेल्या त्रुटी व विसंगती ’ या शिर्षकाखालीं कांहीं विचार मांडले आहेत. श्री चंद्रकांत केणी गोव्याच्या सध्यांच्या भाषिक राजकारणांत कोंकणीचे पुरस्कर्ते व पाठीराखे म्हणुन ओळखले जातात. त्यामुळें त्यांचे विचार हे एकूण कोंकणीवाद्यांचें प्रतिनिधित्व करतात, असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं. त्यांनीं आपल्या या टिप्पणींत मांडलेले विचार श्री. बा. भ. बोरकर यांच्यासारख्या इतर कोंकणीवाद्यांकडूनहि मीं ऐकले आहेत. म्हणून कोंकणीवाद्यांचा एक मित्र या नात्यानें त्यांच्या या विचारांतील ‘ त्रुटि ’ व ‘ विसंगति ’ दाखवून देणें माझें कर्तव्य आहे, असें वाटून मी हे विचार मांडण्यास प्रवृत्त झालों आहें.

आपल्या टिप्पणींत श्री चंद्रकांत केणी लिहितात :—

" गोवा महाराष्ट्रांत विलीन व्हावा, कारण कोंकणी ही मराठीची बोली आहे; म्हणजेच गोवा मराठी – भाषिक प्रदेश आहे. '— असाच तर्कवाद तद्विषयक ठरावामागें ठेवला आहे. तत्त्वतः व व्यक्तिशः मला स्वतःला हा मुद्दा अमान्य असला तरी क्षणभर तात्त्विक चर्चेसाठीं आपण गृहीत धरूया कीं कोंकणी ही मराठीची एक बोली आहे. या न्यायानें भाषावार प्रान्तरचना स्वीकारलेल्या तत्त्वाला धरून गोवा महाराष्ट्र राज्यांत विलीन झाला पाहिजे, यांत मुळीच शंका नाहीं. परंतु गोव्याची कोंकणी तेवढी मराठीची बोली, आणि गोव्याबाहेरील कोंकणी, विशेषतः मंगळूरकडील कोंकणी हिचा मराठीशीं कांहींच संबंध पोंचत नाहीं, असें म्हणणें चुकीचें होईल. मंगळूरच्या आसपासच्या प्रदेशांत जवळ-जवळ नव्वद टक्के लोक कोंकणी–भाषिक आहेत. हा प्रदेश महाराष्ट्रांत यावा म्हणून महाराष्ट्रीय नेत्यांकडून प्रयत्न कां होत नाहीं ? कीं कोंकणीभाषिकांची फाळणी करून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति त्यांना करायची आहे ? "

संयुक्त महाष्ट्राच्या पुरस्कर्त्यांवर श्री केणी यांनीं केलेला हा शंकायुक्त आरोप जितका गंभीर तितकाच सूचकहि आहे. मी स्वतःला एकभाषिक राज्यांचा व म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कर्ता मानतों. यामुळें हा आरोप मजवरच आहे असें वाटून मी हा खुलासा करीत आहें.

## वस्तुस्थितीचा विपर्यास

श्री केणींनीं व इतर कोंकणीवादी मंडळींनींहि मंगळूरकडील भाषेसंबंधीं विधान करतांना ( नेहमींच ) वस्तुस्थितीचा विपर्यास केला आहे. तो म्हणजे ' मंगळूरच्या आसपासच्या प्रदेशांत जवळ–जवळ नव्वद टक्के लोक कोंकणी–भाषिक आहेत, हा होय. हें विधान पूर्णपणें चुकीचें आहे, असें मी स्वतःच्या अनुभवावरून निश्चितपणें सांगू शकतों. १९४८ च्या मे–जून महिन्यांत मंगळूर, मूडबिद्री, उडुपी, कारकळ, वेणूर, मल्पे वगैरे भागांत माझे मित्र श्री बाबुराव कामत यांच्याबरोबर मी संपूर्ण तीस दिवस हिंडत होतों. त्या भागांत ताडगुळाचें काम सुरू करण्यासाठीं ते हिंडत होते आणि तेथील लोकस्थिति जाणून घेण्यासाठीं मी त्यांच्याबरोबर फिरत होतों. आमच्या त्या मुक्कामांत आम्हांला कोंकणी

बोलणारी एकहि बिगरसारस्वत व्यक्ति भेटली नाहीं. त्या प्रदेशांतील जनतेची लोकभाषा तुळू असून व्यवहारभाषा कन्नड आहे. तेथील सारस्वत मंडळी मात्र घरीं कोंकणी बोलतात. अर्थात त्यांतहि कोंकणी न बोलणारीं कांहीं घराणीं असण्याची शक्यता आहे. श्री केणी व इतर कोंकणीवादी मंडळी जेव्हां असे म्हणतात कीं, ' मंगळूरच्या आसपासच्या प्रदेशांत जवळ जवळ नव्वद टक्के लोक कोंकणी–भाषिक आहेत ' तेव्हां त्यांना ' नव्वद टक्के सारस्वत लोक कोंकणी भाषिक आहेत. ' असें अभिप्रेत असावें ! कदाचित कांहीं ख्रिस्ती मंडळीहि कोंकणी बोलत असतील; परंतु सारस्वत व ख्रिश्चन यांच्या व्यतिरिक्त असलेली नव्वद टक्के जनता ही तुळू व कानडीच बोलते, ही वस्तुस्थिति आहे.

## या गैरसमजाचें कारण

वस्तुस्थिति अशी असतांना त्या भागाची जनभाषा कोंकणी आहे, असा गैरसमज कां पसरला असावा ? याचें कारण अगदीं उघड आहे. दक्षिण कानडा-मध्यें सारस्वत जमात ही सर्वांत अधिक पुढारलेली आहे. गेलीं कित्येक शतकें तिनें त्या प्रदेशावर आपलें सर्वंतोगामी वर्चस्व बसवून ठेवलें आहे. बहुतेक सारा व्यापार, बँकिंगचा व्यवसाय, सरकारी नोकऱ्या, जमीनदाऱ्या यांत सारस्वतांचाच भरणा आहे. मद्राशांप्रमाणें सारस्वतहि आपापल्या क्षेत्रांत आपल्या जात-भाईंना प्रथम वाव देण्याचें धोरण कटाक्षानें अमलांत आणतात, त्यामुळें आपो-आपच त्यांचीं सत्ताकेंद्रं निर्माण होतात. दक्षिण कानडाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनावरहि त्यांचाच प्रभाव सर्वांत अधिक आहे. यामुळें दक्षिण कानडा हा सारस्वतांचा जिल्हा असल्याची कल्पना सगळीकडे पसरली. मुंबई ही गुजरात्यांची आहे, असा समज महाराष्ट्राबाहेर सर्वत्र पसरलेला होताच ना ? तशीच कांहींशी स्थिति दक्षिण कानडा जिल्ह्यासंबंधीं सारस्वतांच्या बाबतींत झालेली आहे.

## त्यांची कोंकणी तुम्हांला कळतें ?

दक्षिण कानडा जिल्ह्यांतील त्या एक महिन्याच्या मुक्कामांत आम्हांला एक मजेदार अनुभव आला. तो असा कीं, तेथील सारस्वतांची तथाकथित कोंकणी ही आम्हांला कळत नाहीं. मंगळूरच्या सुशिक्षित सारस्वतांत भारतांतील सर्वच

शहरी शिक्षितांप्रमाणें प्रत्येक वाक्यांत एक-दोन तरी इंग्रजी शब्द वापरलेच पाहिजेत अशी प्रामाणिक श्रद्धा असल्यामुळें त्यांची भाषा आम्हांला थोडीफार कळली. परंतु उडुपी, मूडबिद्री वगैरे छोट्या शहरांतील आणि ग्रामीण भागांतील सारस्वतांची कोंकणी आम्हांला मुळींच कळत नसे. मला स्वतःला गोव्याची हिंदू –कोंकणी बरीचशी कळते, श्री बाबुराव कामत यांना माझ्याहून ती अधिक कळत असे. ( कारण त्यांच्या घरीं मालवणी कोंकणीचा थोडाबहुत प्रघात आहे. ) परंतु आम्हां दोघांनाहि गोव्याची ख्रिस्ती–कोंकणी मुळींच कळत नसे. ( आजहि कळत नाहीं ). मंगळूरी कोंकणीहि आम्हांला गोव्यांतील ख्रिस्ती–कोंकणीसारखीच अगम्य वाटली. याचें कारण ग्रामीण भागांतील कोंकणींत तुळूचे शब्द फार मोठ्या प्रमाणांत आलेले आहेत. त्यामुळें श्री बाबुराव कामत हे बैलहोंगलचे सारस्वत असूनहि त्यांना मंगळूरी सारस्वतांशीं बोलतांना तेथील प्रादेशिक भाषेचा, कानडीचाच आश्रय घ्यावा लागत होता. अर्थात् मला कानडी कळत असली तरी बोलतां येत नव्हती. म्हणून इंग्रजींतूनच सर्व व्यवहार करावा लागत असे. श्री चंद्रकांत केणी किंवा त्यांच्यासारखे इतर कोंकणीवादी जेव्हां संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना गर्हिवरून असें विचारतात कीं आम्हां कोंकणी–भाषिकांची फाळणी करण्यास तुम्ही कां सरसावलां आहांत ? तेव्हां त्यांना एकच प्रश्न विचारावासा वाटतो कीं, उडुपी मूडबिद्रीच्या सारस्वतांची कोंकणी तुम्हांला कळेल तरी काय ?

## कोंकणी–भाषिकांची फाळणी आधींच झालेली आहे

कोंकणी–भाषिकांची फाळणी करण्याच्या हेतूचा आरोप ज्यावेळीं कोंकणीवादी मित्र मराठीवादी मंडळींवर करतात तेव्हां ते ही गोष्ट विसरतात कीं कोंकणी–भाषिकांची फाळणी पूर्वींच झालेली आहे. आणि ती तशी होणें अपरिहार्यच होतें. ठाणें–कुलाबा– रत्नागिरी या कोंकणपट्टींतील कोंकणीभाषी लोक पुरातन काळा-पासून पश्चिम –महाराष्ट्रांत नांदत आहेत. कारवारचे कोंकणीभाषी लोक पूर्वीं-पासून मुंबई प्रांताच्या कर्नाटक भागांत आहेत आणि मंगळूरकडील कोंकणीभाषी मंडळी जुन्या मद्रास प्रांतांतून नुकतीच नव्या म्हैसूर राज्यांत आली आहेत. कार-वार आणि मंगळूर यांच्यामध्यें उत्तर कानडा जिल्हा आहे. त्यांत कोंकणीभाषी लोक नाहींत. त्यामुळें रत्नागिरी, कारवार व मंगळूर हीं कोंकणी भाषिकांचीं तीन केंद्रें भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्याच एकमेकांपासून वेगळीं पडलेलीं आहेत.

पोर्तुगीजांच्या अमदानींत गोव्याचा कोंकणीभाषी प्रदेश हा असाच वेगळा पडला होता. या चार केंद्रांना एकत्र जोडल्याखेरीज कोंकणीभाषिकांची फाळणी नाहीशीं होणार नाहीं, आणि तशी शक्यता सध्यां तरी दिसत नाहीं. कारण गोव्याचें स्वतंत्र राज्य बनलें तरी महाराष्ट्र–कर्नाटकांतील कोंकणीभाषी प्रदेश त्यांत सामील होतील, असें नाहीं. यामुळें गोव्याच्या स्वतंत्र राज्यानेंहि सारे कोंकणी-भाषी एकत्र येणार नाहींत.

## गोवा नेतृत्व करूं इच्छितो काय ?

या विस्कळीत कोंकणी प्रदेशाचें एकत्रीकरण करून त्यांचें एक राज्य बनवावें व त्याचें केंद्र गोव्यांत रहावें अशी कल्पना कांहीं मंडळी बोलून दाखवितात. ती कितपत शक्य कोटींतील आहे, याचा श्री चंद्रकांत केणींनीं व त्यांच्यासारख्या बुद्धिनिष्ठ कोंकणीवाद्यांनीं अवश्य विचार करावा. ज्याप्रमाणें महाराष्ट्रानें पुण्याची मराठी ही प्रमाण मराठी म्हणून मान्य केली त्याप्रमाणें गोव्याची (हिंदूंची) कोंकणी ही प्रमाण कोंकणी म्हणून रत्नागिरी, कारवार व मंगळूर या केंद्रांनीं मान्य केली तर गोव्याला कोंकणीच्या बाबतींतील नेतृत्व मिळूं शकेल, हें खरें; परंतु तशी शक्यता मला तरी दिसत नाहीं. आज त्या त्या केंद्रांतील लोकांना स्थानिक नेतृत्व लाभलेलें आहे. त्यांनीं गोमंतकीय सारस्वतांचें नेतृत्व मान्य करण्यास केवळ कोंकणी–प्रेमानें उद्युक्त व्हावें, इतकें तें प्रेम प्रबळ आहे काय ? येथें मीं फक्त सारस्वतांचा उल्लेख अशासाठीं केला आहे कीं गोव्यांतील गावडे, सुदिर, कोळी, भंडारी वगैरे लोकांना शेजारच्या प्रांतांतील व विशेषतः महा-राष्ट्रांतील त्यांच्या जातवाल्यांचें आकर्षण अधिक वाटणार व आजवरच्या ब्राह्मणी नेतृत्वाच्या कचाट्यांतून स्वतःची सुटका करून घेण्यासाठीं ते धडपड करणार अशीं लक्षणें दिसत आहेत.

## प्रादेशिक भाषा प्रभावशाली

मंगळूरच्या कोंकणीभाषी सारस्वतांना महाराष्ट्रांत आणण्याचे प्रयत्न महा-राष्ट्रीय नेत्यांकडून कां होत नाहींत, असा सवाल जेव्हां श्री चंद्रकांत केणी हे करतात, तेव्हां मराठी नेते हे विस्तारवादी असून सभोंवतालच्या प्रदेशांतील जनतेच्या इच्छेविरुद्ध तिला महाराष्ट्रांत आणण्याची धडपड त्यांनीं चालविली आहे, हा कन्नड पुढाऱ्यांचा आरोप खरा आहे, असेंच ते गृहीत

धरतात. त्यांनीं एवढें ओळखलें पाहिजे कीं आजचा जमाना लोक—शाहीचा आहे आणि लोकशाहीमध्यें लोकांची इच्छा हीच प्रमाण असतें. बेळगांव—कारवारच्या जनतेला म्हैसूर राज्यांत राहाणें सुखावह वाटत असतें तर तिनें ग्रामपंचायतीपासून विधानमंडळांपर्यंतच्या निवडणुकींत महाराष्ट्र एकीकरण समितीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमतांनीं निवडून आणलें नसतें, आणि त्यांची इच्छा नसतांना महाराष्ट्रीय नेते तेथें पाऊलहि टाकूं शकले नसते. कोंकणीवादी मंडळींनीं जो प्रचार चालविला आहे कीं मराठी नेते हे उपरे असून त्यांना गोव्याचा प्रदेश गिळंकृत करावयाचा आहे, तो या लोकशाहीच्या कसोटीवर घांसून पाहिला पाहिजे. आज गोव्यांत खपणाऱ्या मराठी वृत्तपत्रांवरून गोमंतकीय जनतेचा ओढा कोणीकडे आहे, हें कोणीहि तटस्थ मनुष्य सहज सांगूं शकेल. गोमंतक मराठी साहित्य सम्मेलनाला जमलेल्या हजारों मराठीप्रेमी जनतेनेंहि आपली इच्छा स्पष्ट शब्दांत व्यक्त केली आहे. कोंकणीवाद्यांच्या प्रचारामुळें उद्यां गोव्यांत मराठी व महाराष्ट्र यांबद्दल परकेपणाची भावना निर्माण झाली आणि त्यांनीं आपला सवतासुभा चालवावयाचें ठरविलें तर मराठी नेते त्यांच्या इच्छेविरुद्ध गोव्यांत जाऊन प्रचार करतील काय ? गोव्याचें महाराष्ट्रांत विलीनीकरण व्हावें, अशी इच्छा बाळगणारा फार मोठा प्रभावी वर्ग गोव्यांत आहे, म्हणूनच मराठी पुढारी गोव्यांत पाऊल टाकूं शकतात, हें उघड आहे.

मंगळूरच्या सारस्वतांना महाराष्ट्र व मराठी भाषा यांच्याबद्दल अशी आपुलकी वाटत नाहीं. त्यामुळें तो भाग महाराष्ट्रांत यावा असें इच्छिणेंसुद्धां चूक ठरेल. त्या भागांतील कोंकणीभाषिकांनीं कोंकणी ही आपली बोलीभाषा असून कन्नड हीच आपली प्रादेशिक भाषा आहे, असें अनेक शतकांपासून मानलें आहे. त्यांच्या त्या निष्ठेला सुरुंग लावणें शक्यहि नाहीं, इष्टहि नाहीं. अशीच निष्ठा मराठीच्या बाबतींत गोमंतकीयांनीं अनेक शतकें उराशीं बाळगली आहे. त्यांना त्या निष्ठेपासून विचलित करण्याचे प्रयत्न कोंकणीवाद्यांनीं सुरू केले आहेत. परंतु त्यांनीं आपली पातळी फार घसरूं दिल्यामुळें त्या प्रयत्नांचा उलटाच परिणाम होत असल्याचें दिसत आहे. गांधींचा खून करणारा गोडसे हा महाराष्ट्रीय भट होता, म्हणून सारे महाराष्ट्रीय भट हे गांधींचे खुनी आहेत, असा प्रचार कोंकणी पत्रांतून सर्रास चालतो. असल्या प्रचाराचा विपरीत

परिणाम न झाला तरच आश्चर्य.

## तुम्हांला म्हैसूरमध्यें सामील व्हावयाचें आहे काय ?

६ लाख लोकसंख्या असलेल्या गोव्याचें वेगळें राज्य बनविणें कितपत व्यवहार्य आहे, त्यापासून गोमंतकीय जनतेचा काय फायदा होईल, वगैरे मुद्यांची चर्चा मीं पुढील प्रकरणांतून केली आहे; म्हणून त्यांची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. 'आम्हां कोंकणीभाषिकांची फाळणी करूं नका' म्हणणाऱ्यांच्या हेतूविषयीं कसलीहि शंका न घेतां त्यांतील एक मोठा धोका मात्र दाखवून दिला पाहिजे.

कोंकणीभाषिकांचें सलग राज्य आज बनूं शकत नाहीं, कारण मराठी व कनडी-भाषिकांचे मुलूख त्यांच्या दरम्यान आहेत. शिवाय महाराष्ट्रांतील कोंकणीभाषी व कर्नाटकांतील कोंकणीभाषी हे आपापल्या प्रदेशांत दृढमूल झालेले आहेत. त्यांना एका नव्या राज्यांत एकत्र आणावयाचें म्हणजे पूर्ण वाढ झालेला वृक्ष उपटून दुसरीकडे लावण्यासारखें आहे. तेव्हां कोंकणीभाषिकांची फाळणी करूं नका याचा अर्थ एकच होतो; तो म्हणजे इतर कोंकणीभाषी लोक ज्या प्रदेशांत आहेत त्या प्रदेशांत आम्हांला जाऊं द्या. महाराष्ट्रांतहि कोंकणीभाषी लोक आहेत. त्यामुळें गोव्यानें महाराष्ट्रांत यावयाचें ठरविलें तर तें योग्यच होईल. त्याचप्रमाणें कर्नाटकांतहि कोंकणीभाषी लोक आहेत, म्हणून कर्नाटकांत सामील होण्याचाहि निर्णय या मुद्यावर गोव्याला घेतां येईल. कोंकणीचें मराठीशीं फार साम्य असल्यामुळें गोवा महाराष्ट्रांत गेल्यास कोंकणी मराठींत मिसळून जाईल; याच्या उलट कानडीशीं कोंकणीचा कांहीं संबंध नसल्यामुळें गोवा कर्नाटकांत गेल्यास कोंकणी टिकून राहील, असें मानणारी कांहीं मंडळी आहेत. श्री चंद्रकांत केणी व त्यांचे सहप्रवासी जेव्हां गोव्याच्या महाराष्ट्रांतील सामीलीकरणाला विरोध करतात, तेव्हां त्यांच्यासमोर म्हैसूर राज्यांत सामील होण्याखेरीज दुसरा पर्याय नसतो. कर्नाटक प्रदेश कॉंग्रेस कमेटीनें व म्हैसूर सरकारनें कांहीं कोंकणीभाषी हस्तकांच्यामार्फत तसे प्रयत्नहि चालविले असल्याची कुणकुण मला गोव्यांत ऐकावयास मिळाली होती. तिच्यांत कांहीं तथ्यांश असेल तर कोंकणीवाद्यांनीं निर्भीडपणें असें सांगितलें पाहिजे कीं, "मंगळूरच्या कोंकणीभाषिकांशीं आम्हाला संपर्क साधावयाचा आहे, आणि रत्नागिरीच्या कोकणीभाषिकांपेक्षां ते

आम्हांला अधिक जवळचे वाटतात. म्हणून आम्ही महाराष्ट्राऐवजीं म्हैसूरमध्यें सामील होणें पसंत करतों. अर्थात् त्याचबरोबर म्हैसूरची प्रदेशभाषा जी कन्नड तिचाहि आम्ही आमची व्यवहार–भाषा म्हणून स्वीकार करतों." विचारांची अशी स्पष्टता जनतेसमोर ठेवून त्यांनीं आपलें म्हणणें गोंयकरांना पटवून द्यावें, म्हणजे मराठी नेते चुकूनहि गोव्याच्या वाटेला जाणार नाहींत.

## 'गोंयकारांची भास न्हय ?'

मला वाटतें, बहुसंख्य कोंकणीवाद्यांना या धोक्याची किंवा संकटाची कल्पना नसावी. कोंकणीचें वेगळें राज्य बनलें तर आपला कांहीं फायदा होईल, सरकारी नोकऱ्या मिळतील, मंत्रिपदें भूषवितां येतील, लोकांचें पुढारीपण करितां येईल, अशा अंधुक कल्पना घेऊनच बहुधा कोंकणीवाद्यांनीं आपला मोर्चा उभारला असावा असें दिसतें. म्हैसूर राज्यांत गेल्यास आपल्याला कानडी शिकावें लागेल आणि कदाचित् नेतृत्वहि उरणार नाहीं–कारण आज कर्नाटकाचें राजकीय नेतृत्व ब्राह्मणांकडे राहिलेलें नसून लिंगायत व वक्कलिग यांच्याकडे गेलेलें आहे– हें त्यांच्या लक्षांत आल्यास त्यांचें कोंकणीप्रेम कदाचित् ओसरेल. परंतु त्यावेळीं फार उशीर झालेला असेल. त्यांनीं स्वतःच्या हातांनींच साखळ्या म्हणून कानडीच्या शृंखला आपल्या पायांत घालून घेतलेल्या असतील. तरी या संभाव्य धोक्याचा गोंयकारांनीं आतांपासूनच विचार करावा.

मराठी ही गोंयकरांची भाषा नव्हे, असा जो प्रचारघोशा कोंकणीवाद्यांनीं चालविला आहे, तो त्यांना शेवटीं म्हैसूरमध्यें घेऊन जाईल हें त्यांनीं ओळखलें पाहिजे.

मराठीविषयीं गोव्यांतील हिंदूंना प्रेम वाटतें, ही जितकी स्पष्ट व स्वयंसिद्ध गोष्ट आहे, तितकी गोव्यांतील किरिस्तांवांना मराठीविषयीं प्रेम वाटत नाहीं, ही गोष्ट स्पष्ट व सिद्ध झालेली नाहीं. पोर्तुगीजांच्या सांस्कृतिक दडपणाखालीं गोव्याचा खिस्ती समाज इतका दडपला गेलेला होता कीं त्या बिचाऱ्याला मराठीविषयीं आपल्याला प्रेम वाटतें कीं नाहीं, हें ठरविण्याचीहि संधि नव्हती. आतां त्याला ती संधि मिळालेली आहे. मराठीविषयीं गोवेकर खिश्चनांना काय वाटतें, हें ते आपल्या मुलांना कोणत्या शाळेंत घालतात यावरून दिसून येईल. पाळोळें (काणकोण) येथील मराठी शाळेंत खिस्ती मुलें आनंदानें व हिंदूंच्या बरोबरीनें

मराठी शिकत असलेलीं मीं स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलीं आहेत. त्यामुळें गोव्याचे ख्रिस्ती लोक यापुढेंहि मराठीला परकीय मानतील असें मी समजूं शकत नाहीं. योग्य वातावरण निर्माण केल्यास गोमंतकीय किरिस्तांवहि मराठीचा अभ्यास आस्थेनें करतील आणि त्यांच्यांतूनहि रेव्हरंड टिळकांसारखे थोर मराठी 'सारस्वत' निर्माण होतील, याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं.

परंतु मुसलमानांच्या बाबतींत पाकिस्तानी मुल्लामौलवींनीं अवलंबिलेलें धोरणच किरिस्तांवांच्या बाबतींत गोव्यांतील कोंकणीवादी अवलंबिणार असतील तर त्यांतून संघर्ष निर्माण होणें अपरिहार्य आहे. जातीयवादी मुल्लामौलवींनीं व पुढाऱ्यांनीं मुसलमानांच्या मनांत असें भरवून दिलें कीं, "तुम्ही भारतीय नाहीं; ज्या प्रदेशांत तुम्हीं राहतां त्या प्रदेशांच्या भाषा तुमच्या मातृभाषा नव्हेत, तुम्ही वेगळेच आहांत." आणि त्यांतून पाकिस्तान निर्माण झालें. गोव्यांतील ख्रिश्चनांना कोंकणीवादी मंडळी जर सारखें असें सांगत राहतील कीं, "तुम्ही महाराष्ट्रीय नाहीं, तुमची भाषा मराठी नव्हे, तुमचा महाराष्ट्राशीं कांहीं संबंध नाहीं." तर महाराष्ट्राच्या राजधानींत–मुंबईत–राहूनहि गोव्याचे ख्रिश्चन अँग्लोइंडियनांप्रमाणें परकेच राहतील. त्याची जबाबदारी मराठीवाद्यांवर राहाणार नाहीं, ती कोंकणीवाद्यांनाच स्वीकारावी लागेल. 'हिंदुस्तानाचे दोन तुकडे केले ते मुसलमानांनीं न्हय, हिंदुत्ववादी लोकांनींच' असें जेव्हां श्री रवींद्र केळेकर (उल्लिखित लेखांत) म्हणतात तेव्हां ती त्यांची नुसती पोपटपंची असते. सत्तास्वीकाराची घाई झालेल्या भारतीय नेत्यांनीं गांधीजींचा सल्लाहि धुडकावून लावून देशाची फाळणी केली, हें ऐतिहासिक सत्य आहे. तेवढें कर्तृत्व करण्याचें सामर्थ्य नसणाऱ्या हिंदुत्ववाद्यांवर थोपणें म्हणजे हास्यास्पदतेची कमाल होय. ज्यांनी सत्तेचा स्वीकार केला व उपभोग घेतला (आणि आजहि घेत आहेत) त्यांनीं फाळणीचें पाप दुसऱ्यावर लोटण्याचा विश्वामित्री प्रचार चालविला तर ती राजकीय 'चालबाजी' समजूं शकते, परंतु राजकीय नेतृत्वाची हांव नसणाऱ्या केळेकरांसारख्यांनीं त्याच प्रचाराची ध्वनिमुद्रित आवृत्ति बनावें, हा केवळ दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. याच वृत्तींतून गोव्याच्या ख्रिश्चनांच्या 'अँग्लोइंडियन'त्वाचें खापर मराठीवाद्यांवर फोडण्याची क्लृप्ति निघालेली आहे. गोमंतकीय किरिस्तांवांना राष्ट्रीय बनविण्याची गरज ही आजची निकडीची गोष्ट आहे. ती बाजूला ठेवून त्यांच्या मनांत महाराष्ट्र व मराठी भाषा यांच्याविषयीं

परकेपणाची भावना वाढीस लावण्याचेच प्रयत्न कळत–नकळत कोंकणीवादी मित्रांनीं चालविले आहेत असें आज तरी दिसतें. अर्ध्या जिल्ह्याएवढें क्षेत्रफळ असलेल्या गोव्याशींच निष्ठा राखा असें सांगणारे कोंकणीवादी मित्र किरिस्तांवांना ‘ अभारतीय ’ बनण्यास मदत करीत आहेत कीं विशाल महाराष्ट्रांत विलीन होऊन संपूर्ण भारताशीं एकरूप बनण्याची प्रेरणा देणारे मराठीवादी लोक किरिस्तांवांना ‘ ॲंग्लोइंडियनां’च्या जमातींत ढकलत आहेत, याचा विचार सुज्ञांनींच करावा.

## कोंकणीवाद्यांनीं आपल्या भूमिकेचा फेरविचार करावा

मी स्वतः कोंकणीवादी नसलों तरी कोंकणीभक्त आहें. कोंकणीचा अवश्य विकास झाला पाहिजे, असें मी मानतों. परंतु त्या विकासाच्या नैसर्गिक मर्यादाहि मला दिसतात. कोंकणीभाषिकांचा एखादा स्वतंत्र प्रान्त किंवा राज्य बनूं शकेल, असें मला वाटत नाहीं. कोंकणीभाषिकांना मराठी किंवा कानडी भाषांच्या राज्यांतच राहावें लागणें अपरिहार्य आहे. मंगळूरकडील कोंकणीभाषी लोकांनीं कन्नड भाषेशीं जमवून घेण्याचें ठरविलें आहे. कारवारच्या कोंकणीभाषिकांना महाराष्ट्रांत येण्याची इच्छा आहे; त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. अशा स्थितींत कोंकणीभाषिकांचा एखादा सलग विभाग अस्तित्वांत आहे अशा दिवास्वप्नांत रंगून जाऊन मराठीवादी पुढारी जबरदस्तीनें त्याची फाळणी करून गोव्यांतील कोंकणीवाद्यांना वेगळें काढण्याचा उपद्व्याप करीत आहेत, अशा तऱ्हेचा बागुलबुवी प्रचार कोंकणीभक्तांनीं करूं नये. त्यांत त्यांचें कांहींच हित साधणार नाहीं. त्याऐवजीं कोंकणीच्या झेंड्याखालीं गोळा झालेल्यांमध्यें खरे कोंकणीभक्त कोण आहेत आणि पेंढारी व बाजारबुजगे कोण आहेत हें त्यांनीं पारखून त्यांना दूर ठेवावें व खऱ्या कोंकणीभक्तांच्या साह्यानें कोंकणीचा विकास करण्याचा प्रयत्न करावा, अशी कोंकणीचा एक मराठी भक्त या नात्यानें माझी त्यांना विनंती आहे.

# गोमंतकाच्या राजकीय समस्या : ३

राजकीयदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या राष्ट्राच्या गुलामगिरींत साडेचारशें वर्षेपर्यंत खितपत पडल्यामुळें गोमंतकांत आधुनिक राष्ट्रांत आढळणाऱ्या राजनैतिक समस्या निर्माणच होऊं शकल्या नाहींत. पोर्तुगाल हा आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतहि राजकीयदृष्ट्या इतका मागासलेला आहे, कीं तेथें लोकांमध्यें साध्या नागरिक हक्कांचीहि जाणीव नाहीं; मग लेखन–भाषण– संघटन – स्वातंत्र्याची तर गोष्टच बोलावयास नको. अशा राष्ट्राच्या अमलाखालीं दडपला गेलेला गोवा वस्तुतः संपूर्णपणें अंधकार–युगांतच नांदत राहावयाचा; परंतु भाषा, संस्कृति, सामाजिक संबंध वगैरे नात्यांनीं शेजारच्या महाराष्ट्राशीं गोव्याचा जिवंत संपर्क संतत राहिल्यामुळें गोमंतकांतील सुशिक्षितांना आधुनिक राजनीति हें अगदींच गौडबंगाल वाटलें नाहीं. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांचे अनेक भक्त व अनुयायी गेल्या चाळीस– पन्नास वर्षांपासून गोव्यांत वावरत आहेत. त्यांपैकीं बहुतेकजण राजकारणापासून अलिप्त राहून सामान्य नागरिक या नात्यानें वावरणारे असले तरी गोमंतकांत राजकीय जागृतीचें बीजारोपण करण्याचें काम त्यांच्याकडून आपोआप होत राहिलें. अर्थात् हें सारें अप्रत्यक्ष रीत्या घडत होतें. त्यामुळें भारतांतल्या-

प्रमाणें तेथे राजनैतिक पक्ष, त्यांच्या संघटना, त्यांचे हेवेदावे असे फारसे वाढले नाहींत. स्वातंत्र्यपूर्व काळांत नॅशनल कॉंग्रेस गोवा व गोवा मुक्ति–फौज ( Goa Liberation Army ) यांसारख्या संस्था काम करीत होत्या व त्यांत वेगवेगळ्या विचारसरणींचे कार्यकर्ते सहभागी झालेले होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या संस्थांची गरज संपली व त्या आपोआपच विलीन झाल्या. त्यानंतर भारतांतील कॉंग्रेस, प्रजासमाजवादी, जनसंघ, साम्यवादी वगैरे पक्ष आपापलीं दुकानें गोव्यांत लौकरच थाटतील असें वाटत होतें. त्याप्रमाणें राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सैनिक गोव्यांत शाखा भरवूं लागले, नॅशनल कॉंग्रेस ( गोवा ) च्या आधारानें प्रजा-समाजवादी कार्यकर्ते महाराष्ट्रांत सामील होण्याचा प्रचार करूं लागले व कम्यु-निस्टांनीं खाणकामगारांत बस्तान बसविण्यास सुरुवात केली. परंतु अखिल भारतीय कॉंग्रेसच्या प्रचंड झंझावातापुढें हे चिल्लर प्रयत्न फारसा टिकाव धरूं शकले नाहींत. गोव्याबाहेरील भारतांत ज्याप्रमाणें प्रत्येक सत्ताकांक्षी व संधिसाधू माणूस कॉंग्रेस-मध्यें शिरला आहे अथवा शिरत आहे, त्याप्रमाणें गोव्यांतहि कॉंग्रेसप्रवेशाची एकच लाट उठली आहे. जुलै १९६२ मध्यें अखिल भारतीय कॉंग्रेसची शाखा गोव्यांत स्थापन होतांच प्रथम नॅशनल कॉंग्रेस ( गोवा ), नंतर गोवा लोकशाही पक्ष आणि त्यानंतर गोवा प्रॉव्हिन्शिअल कॉंग्रेस या संघटना बरखास्त होऊन त्यांतील लोक कॉंग्रेसमध्यें घुसले. त्यात मराठीवादी आहेत, कोंकणीवादी आहेत आणि स्वतंत्र गोमंतकवादीहि आहेत. त्यामुळें आधुनिक किंवा वैज्ञानिक अर्थानें गोमंतकांत राजनैतिक समस्या विद्यमान आहे, असें म्हणतां येत नाहीं. परंतु तेथील भाषिक, सांस्कृतिक व सामाजिक समस्यांतून कांहीं राजकीय समस्या गोव्यांत निर्माण झालेल्या आहेत. त्यांचा विचार आपण करूं.

## गोव्याचें राजकीय भवितव्य

गोमंतकापुढील एक अत्यंत महत्त्वाची राजनैतिक समस्या म्हणजे गोव्याचें राजकीय भवितव्य ही होय. गोव्याचें स्वतंत्र राज्य बनवायचें ? कीं तो शेजारच्या राज्यांत विलीन करावयाचा ? त्यांचें विलीनीकरण करावयाचें असेल तर तें कोणत्या राज्यांत करावें ? महाराष्ट्रांत कीं म्हैसूरमध्यें ? या प्रश्नांची चर्चा सुशिक्षित लोकांमध्यें खूप जोरांत चाललेली दिसून येते. गोवा कायमचा स्वतंत्र प्रांत किंवा प्रदेश म्हणून राहावा असें मानणारे कांहीं लोक भेटतात तर कांहीं

मंडळी गोव्यांतील तांतडीचे प्रश्न सुटेपर्यंत तो वेगळा ठेवून नंतर शेजारच्या राज्यास जोडून टाकावा असें म्हणतात. याच्या उलट गोव्याच्या स्वतंत्र राज्याची कल्पनाहि सहन करूं न शकणारे व तो ताबडतोब महाराष्ट्रांत विलीन झाला पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादन करणारे शिक्षित लोकहि कांहीं थोडेथोडके नाहींत. यांतील अंतस्थ प्रवाह मोठे परस्परविरोधी व गमतीदार वाटले. कोंकणी–मराठीच्या वादांत एकमेकासमोर दंड ठोकून उभे असणारे आग्रही लोक गोव्याच्या राजकीय भवितव्याचा प्रश्न निघतांच एकमेकांच्या हातांत हात घालून उभे राहिलेले दिसतात, तर त्याच्या उलटहि परिस्थिति पाहावयास मिळते आणि त्रयस्थ माणूस आश्चर्यचकित होतो.

## स्वतंत्र राज्याचे पुरस्कर्ते

गोमंतकाची कोंकणी भाषा ही मराठीहून सर्वस्वी वेगळी व स्वतंत्र भाषा आहे, अशी श्रद्धा बाळगणारे लोक प्रामुख्यानें स्वतंत्र गोमंतक राज्याचे पुरस्कर्ते आहेत, हें खरें असलें तरी कोंकणी ही मराठीची बोली असून गोव्याची राज्यव्यवहार–भाषा मराठीच राहिली पाहिजे, असें प्रतिपादन करणारे कांहीं कट्टर मराठी-वादीहि जेव्हां गोवा स्वतंत्र राहिला पाहिजे, असें हिरीरीनें प्रतिपादितात, तेव्हां आपल्याला थोडें आश्चर्य वाटतें. ही मराठीवादी मंडळी थोडी असली तरी मुख्यतः भांडवलवाले, कारखानदार, मोठे जमीनदार व इतर धनिक या वर्गांत मोडतात. गोवा स्वतंत्र राहिल्यास आपली धनिकशाही अबाधित राहील, महाराष्ट्रासारखे कूळकायदे गोव्याला लागू होणार नाहींत, आणि मग अनिर्बंध सुखी जीवन आपल्याला उपभोगतां येईल या आशेंतून त्यांचा हा आग्रह निर्माण झालेला आहे.

कोंकणी भाषेच्या पुरस्कर्त्यांची या बाबतींत भूमिका अधिक सोज्ज्वळ व लोक-शाही स्वरूपाची आहे. जनतेला राज्यकारभारांत मोकळेपणानें भाग घेतां यावयाचा असेल तर तो राज्यकारभार जनतेच्या भाषेंत चालला पाहिजे, हें तत्त्व सर्वमान्यच आहे. गोव्याची भाषा कोंकणी आहे, हें एकदां मान्य केलें कीं तेथील राज्यकारभार कोंकणींत चालला पाहिजे, हें आपोआपच मान्य करावें लागतें. गोवा महाराष्ट्रांत किंवा म्हैसूरमध्यें सामील झाल्यास तेथील राज्य-कारभार मराठींत किंवा कानडींत चालेल आणि मग जनतेला भाषिक गुलाम-गिरींत खितपत पडावें लागेल, म्हणून लोकभाषेंत राज्यव्यवहार करतां यावा

यासाठीं गोव्याचें स्वतंत्र राज्य बनलें पाहिजे, असा या मंडळींचा आग्रह आहे. त्याखेरीज एक भावनात्मक बाजूहि या प्रश्नाला आहे. कवि बा. भ. बोरकर यांच्याशीं या बाबतींत मी चर्चा करीत असतां ते म्हणाले, " आजवरच्या इतिहासांत गोमंतकीय माणसानं गोव्यावर कधींच राज्य केलं नाहीं. कधीं कदंबानीं, कधीं यादवांनीं, कधीं विजयनगरच्या राज्यकर्त्यांनीं, कधीं विजापूरकरांनीं, आणि शेवटीं साडेचारशें वर्षे पोर्तुगीजांनीं आमच्यावर राज्य केलं. आतां कुठं आम्हांला राज्य करण्याची संधि लाभते आहे. राज्य करण्यात काय सुख असतं त्याचा जो अनुभव तुम्ही शिवाजी महाराजांच्या काळापासून घेतां आहांत, तसा थोडा तरी अनुभव आम्हांला घेऊं द्या ना ! नाहींतर लोकांना वाटायचं, पोर्तुगीज गेले आणि मराठे आले ! " अर्थात् या उद्गारांत थोडा मिस्किल खोंचकपणा असला तरी नवीनच मिळालेल्या स्वातंत्र्याचा अनुभव घेऊन पाहावा, ही स्वाभाविक वृत्तिच प्रामुख्यानें आहे असें मी मानतों. अर्थात् साहित्य, शिक्षण, अर्थशास्त्र वगैरे अनेक क्षेत्रांत आज महाराष्ट्रांत गोमंतकीय प्रतिभावंत व विद्वान् तळपत आहेत आणि एका अर्थानें ते विशाल महाराष्ट्रावर राज्यच करीत आहेत, हा सूक्ष्म फरक या संदर्भात लक्षांत घेतां येण्यासारखा आहेच.

आपल्याला राज्य करण्याचें सुख अनुभवावयास मिळालें नाहीं असें गोमंतकीय ख्रिस्ती मात्र म्हणूं शकणार नाहींत. कारण पोर्तुगीजांच्या अमदानींत व्यवहारतः गोमंतकीय ख्रिस्ती लोकांनींच राज्य केलें आहे. जगाच्या पाठीवर सर्वत्र संचार करून स्वातंत्र्यांतील मुक्ततेचाहि त्यानीं अनुभव घेतलेला आहे. गोमंतकाचें वेगळें राज्य बनल्यास तेथील इंग्रजी-पोर्तुगीजभाषी ख्रिस्त्यांना त्यांत विशेष महत्त्वाच्या जागा मिळतीलच याची खात्री नाहीं; उलट, इंग्रजीचें प्राधान्य मान्य करणाऱ्या म्हैसूर–महाराष्ट्रांत आपल्या कर्तबगारीला अधिक विस्तृत क्षेत्र मिळेल अशी भावना त्यांच्या मनांत असल्यास आश्चर्य नाहीं. तरी परंतु स्वतंत्र कोंकणी राज्याचा पुरस्कार करणाऱ्यांमध्यें ख्रिस्ती मंडळी प्रामुख्यानें दिसतात.

गोमंतकाचें वेगळें राज्य बनूं शकल्यास कोंकणीचा विकास झपाट्यानें होईल, हा मुद्दा वरवर पाहतां कोणालाहि मान्य होईल, असाच आहे. त्यामुळें कोंकणीच्या पुरस्कर्त्यांनीं स्वतंत्र कोंकणी राज्याची मागणी केल्यास ती स्वाभाविक व सुसंगतच म्हणावी लागेल. ' वरवर पाहतां ' असें मी मुद्दाम म्हणतों. कारण या बाबतींतील काश्मीरचा अनुभव फारसा आशादायक नाहीं, याचें विवेचन

याच प्रकरणांत मीं अन्यत्र केलें आहे.

## कोंकणी–वाद्यांचा स्वतंत्र राज्याला विरोध

परंतु कोंकणी–वाद्यांकडून गोव्याच्या स्वतंत्र राज्याला विरोध होत असल्याचें पाहून मात्र आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाहीं. या बाबतींतील एक अनुभव येथें नमूद करण्यासारखा आहे. एक कट्टर कोंकणीवादी मला म्हणाले, “ आमची भाषा कोंकणी आहे. आणि तिचा भरपूर विकास झाला पाहिजे, असं माझं मत आहे; परंतु गोव्याचं वेगळं राज्य बनविण्याच्या कल्पनेला मात्र माझा कसून विरोध आहे. इतकं छोटं राज्य बनलं तर वशिलेबाजी, लांचलुचपत आणि गटबाजी भयंकर बोकाळेल असं मला वाटतं. गेल्या कांहीं दिवसांतल्या गोमंतकीय नेत्यांच्या हालचाली पाहून मी या निर्णयावर येऊन पोंचलोंय कीं जितक्या लौकर गोवा महाराष्ट्रांत विलीन होईल तेवढं बरं ! ”

सत्तेची अभिलाषा न बाळगतां केवळ लोकसेवा हेंच ध्येय असणाऱ्या लोकसेवकांची भूमिका अशीच असायला हवी. सुदैवानें नव्या लोकनियुक्त मंत्रिमंडळाची भूमिका हीच आहे.

## स्वतंत्र राज्याचे विरोधक

गोमंतकाचें महाराष्ट्रांत तावडतोब विलीनीकरण करून टाकावें असें म्हणणारे कट्टर मराठीवादी आपल्या मुद्याच्या बाबतींत तितकेच आग्रही आहेत. गोव्याचें स्वतंत्र राज्य ठेवल्यास फुटीर प्रवृत्ती वाढतील व मग सगळी बजबजपुरी माजेल अशी भीति त्यांना वाटते. या मंडळींच्या बाबतींत गोव्यामध्यें मला अशी टीका ऐकू आली कीं, “ हे लोक हिंदुत्वनिष्ठ, किंबहुना ख्रिश्चनविरोधी आहेत. ख्रिस्ती लोकांवर यांचा विश्वास नाहीं. पोर्तुगीजांनीं धर्मप्रचारासाठीं ‘ इन्क्वि-झिशन’च्या नांवानें हिंदूंचा जो भयंकर छळ केला त्याचा त्यांना विसर पडत नाहीं. ख्रिस्त्यांनीं आजवर जें ऐश्वर्य अन् वर्चस्व उपभोगलं त्याचा सूड घेण्याची सुप्त इच्छा या लोकांच्या मनांत आहे. त्यामुळं ख्रिस्त्यांच्या सोयी-गैरसोयींचा विचारहि करावयास ते तयार नाहींत. इतकंच नव्हे तर किरिस्तावांना एखादी गोष्ट गैरसोयीची असेल तर ती मुद्दाम घडवून आणण्याची खटपट ते करतील—मग ती गोष्ट त्यांना स्वतःलाहि गैरसोयीची कां असेना ! महाराष्ट्रांत सामील

होण्यानं किरिस्तावांची कुचंबणा होईल, हें उघड दिसत असल्यामुळंच हे मराठीवादी लोक महाराष्ट्रांत जाण्याचा जोरदार पुरस्कार करीत आहेत." अर्थात् अशा प्रकारचे आरोप करण्यास त्या मंडळींजवळ काय आधार आहे, त्याची मला कल्पना नाहीं, म्हणून हे आरोप खरे आहेत, असें मी धरून चालत नाहीं. श्री. ज. वि. कामत यांच्याशीं या बाबतींत बोलणें झालें असतां ते म्हणाले, "गोव्याच्या सहा लाख लोकसंख्येंत किरिस्तावांची संख्या सुमारें सव्वादोन लाख आहे. त्यापैकीं जवळजवळ दोन लाख लोक जुन्या काबिजादींत म्हणजे तिसवाडी, सासष्टी, मुरगांव नि बारदेस या चार तालुक्यांत आहेत. त्यांच्यासाठींच गोव्याचं वेगळं राज्य करायचं असेल तर या चार तालुक्यांचं म्हणजे सुमारें सव्वातीन लाख लोकसंख्येचं वेगळं राज्य अवश्य करा. नव्या काबिजादीं-तल्या (फोंडा, डिचोली, पेडणें, केंपें, सांगें, काणकोण व सत्तरी या सात तालुक्यां-तल्या) लोकांचा कोंकणी राज्याला मुळींच पाठिंबा मिळावयाचा नाहीं. त्यांचा संबंध कारवार, बेळगांव, सावंतवाडीशींच राहिलेला आहे नि राहणार."

## जनतेचा विचार काय ?

गोमंतकाच्या राजकीय भवितव्यासंबंधींची ही चर्चा मुख्यतः उच्चवर्णीय हिंदूंत—म्हणजे सारस्वत ब्राह्मणामध्येंच—चालते. गावडे, कुणबी, सुदिर, भंडारी, मराठा, गायक वगैरे आम जनतेचें मत कोणीं विचारांत घेतलें असावें असें दिसत नाहीं. वस्तुतः उद्यां या प्रश्नावर लोकमत अजमावण्याचा प्रसंग उद्भवला तर हेच लोक निर्णायक मत देतील. परंतु ह्या लोकांत शिक्षणाचा प्रसार फार थोडा असल्यामुळें जातीच्या नांवावर त्यांचीं मतें मागितलीं व मिळविलीं जातील हें उघड आहे. त्यावेळीं या लोकांच्या मनाचा व मताचा कल महाराष्ट्रांत जाण्याकडे झुकण्याची अधिक शक्यता आहे. कारण आतां महा-राष्ट्रांत मराठ्यांचें राज्य सुरू झालें आहे. गोमंतकांतील ब्राह्मणेतर जनता आजवर 'बामणां'च्या वर्चस्वाखालींच पिचत आलेली आहे. स्वतंत्र गोमंतकाच्या जादू-गिरींत अडकल्यास पुन्हा याच 'बामणां'ची सत्ता निमूटपणें लोकशाहीच्या नांवानें स्वीकारावी लागेल अशी भीति त्यांना वाटत असल्यास आश्चर्य नाहीं. याच्या उलट महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर समाज कूळकायदा, सावकारी-विमोचन कायदा, मंदिरप्रवेश कायदा, वगैरे कायद्यांच्या आधारें झपाट्यानें पुढें सरसावत

असलेला पाहून त्याच्याशीं एकरूप बनण्यास हा गोमंतकीय पददलित समाज विशेष उत्सुक राहील असें दिसतें. परंतु स्वतंत्र राज्याच्या पुरस्कर्त्यांनीं या समाजाचा कांहीं विचार केला असावा असें दिसत नाहीं. "गोव्याच्या भवितव्याबद्दल गोव्यांत सार्वमत घेतलें गेल्यास ९९ टक्के लोक स्वतंत्र गोव्याच्या बाजूनें मत देतील."—असें कोंकणीचे पुरस्कर्ते व स्वतंत्र गोमंतकवादी छाती-ठोकपणें सांगतात, तर तेवढ्याच आत्मविश्वासानें महाराष्ट्र–मराठी–वादी लोक आपल्या पक्षाला ९९ टक्के मतें मिळतील असें सांगतात.

## ख्रिस्ती लोकांत योग्य प्रचार हवा

या प्रश्नाच्या बाबतींत ख्रिस्ती लोकमत कांहींसें उदास व कांहींसें भांबावलेलें दिसलें. आपण महाराष्ट्रांत गेलों तर आपल्यावर कांहींतरी आपत्ति ओढवेल, अशी भीति त्यांना एकीकडून वाटते, तर दुसरीकडून स्वतंत्र गोव्याच्या संकुचित क्षेत्रांत दुय्यम नागरिक या नात्यानें आपली गळचेपी व कोंडी होईल कीं काय अशीहि आशंका त्यांना वाटते. वस्तुतः त्यांनीं अशी भीति बाळगण्याचें काय कारण ? भारतांतील इतर प्रदेशांत शेंकडों, लाखों ख्रिस्ती लोक सुखासमाधानानें नांदत नाहींत काय ! फार दूर कशाला ? गोमंतकाच्या दक्षिणेस असलेल्या केरळ-मध्यें आज केवढा मोठा ख्रिस्ती समाज आनंदांत राहत आहे ! केरळच्या राजकारणांत ख्रिस्ती लोकांचा फार मोठा हात नेहेमींच असतो. गोमंतकीय ख्रिस्ती समाज प्रतिगामी पाद्रयांच्या मानसिक दास्यांतून मुक्त होऊन विशाल भारतीय समाजाशीं एकरूप बनेल तर नेतृत्वाच्या बाबतींत त्याला मुळींच साशंक राहावें लागणार नाहीं. मात्र ही गोष्ट त्यांना पटवून देणारा एखादा येशुभक्त खलील जिब्रान गोमंतकांत अवतरला पाहिजे. तोंपर्यंत ज्यांनाज्यांना या समाजा-पर्यंत जाऊन पोंचतां येईल त्यांनींत्यांनीं त्यांच्या मनांतील अनाठायी भीति दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आजवर चालत आलेलें आपलें धार्मिक स्वातंत्र्य यापुढेंहि अबाधित राहील, एवढी एकच हमी किरिस्तावांनीं बहुसंख्य समाजाकडून घ्यावी. ( घटनेनें त्यांना ती दिलेली आहेच. ) आपल्या नांवावर सवतासुभा मागणाऱ्या लोकांचें पितळ उघडें पाडण्यास ही किरिस्तांव मंडळीच पुढें येतील तर पुष्कळ प्रश्न सहज सुटूं शकतील. या देशांत विभक्तपणाचा विचार फार झपाट्यानें पसरतो, ऐक्याचा विचार मात्र मोठ्या मुष्किलीनें मूळ

धरतो असा अनुभव आहे. तेव्हां भाषेच्या किंवा प्रदेशाच्या नांवानें वेगळे-पणाचा प्रचार करणाऱ्या मंडळींनीं अधिक विचार करायला हवा.

## स्वतंत्र राज्याची मागणी गोव्यासाठींच कां ?

मराठीच्या अहिराणी, डांगी, वऱ्हाडी वगैरे इतर अनेक बोली विद्यमान असतां केवळ कोंकणीसाठींच वेगळ्या राज्याची मागणी कां केली जाते याचें उत्तर 'पुण्यभूमि गोमंतक' या आचार्य काकासाहेब कालेलकरांच्या लेखसंग्रहांत सांपडतें. एका प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणतात, "कोंकणी मराठीची बोली असली तरी तिला अहिराणी, डांगी आणि वैदर्भी अशा बोलींच्या पंक्तीला बसविणें योग्य होणार नाहीं. कोंकणी बोलणारा समाज अलग आहे, सलग आहे, समर्थ आहे आणि कोंकणी भाषा अनेक रीतींनीं संपन्न आहे. म्हणून कोंकणी लोकांनीं स्वतःपुरता स्वतःच्या भाषेचा पुरस्कार करावा." परंतु काकासाहेबांचा हा दावा अहिराणी व वऱ्हाडी बोली बोलणारे लोक मान्य करतील असें वाटत नाहीं. (बिचारा डांग तर अन्यायानें गुजरातेंत कोंबला गेलाच आहे !) कारण त्या बोली बोलणारे समाजहि अलग, सलग व समर्थ असून त्यांच्या भाषाहि चांगल्याच सम्पन्न आहेत. वऱ्हाडी मंडळींनीं स्वतंत्र विदर्भासाठीं मोठें आंदोलनहि केलें. परंतु शेवटीं विशाल भारतांतील विशाल महाराष्ट्रांत सामील होणेंच त्यांनीं त्यागभावनेनें पसंत व मान्य केलें. गोमंतकानें मनांत आणल्यास त्यालाहि हें अशक्य होणार नाही. अर्थात् गोमंतक वेगळा राहिल्यास गोमंतकीयांच्या सांस्कृतिक, आर्थिक विकासाला फार मोठ्या प्रमाणांत हातभार लागणार असेल आणि महाराष्ट्रांत सामील झाल्यानें त्याची अपरिमित हानि होणार असेल तर त्यानें वेगळेंच राहावें, असें मी म्हणेन; परंतु या दोन्ही गोष्टी निर्विवादपणें सिद्ध मात्र झालेल्या नाहींत.

## गोव्यांतहि कम्युनिस्ट आहेत

गोव्यांतहि कम्युनिस्ट आहेत, याची कल्पना भारतावरील चिनी आक्रमणा-नंतर श्री. चंद्रकांत काकोडकर, श्री. दिवाकर काकोडकर, श्री. जॉर्ज वाझ, श्री. जेराल्ड परेरा, श्री. नारायण पालेकर वगैरे वीस कम्युनिस्ट पुढाऱ्यांना स्थानबद्ध करण्यांत आल्याची बातमी ३० नोव्हेंबर १९६२ रोजीं पुण्या–मुंबईकडील वृत्तपत्रांत

प्रसिद्ध झाल्यावर महाराष्ट्रांतील वाचकांना आली. याचा अर्थ ही मंडळी मुळींच गाजावाजा न करतां खाणकामगार, शेतकरी वगैरे वर्गांत काम करीत होती. गोमंतकाचें भवितव्य ठरविण्याच्या वेळीं जनतेंत काम करणाऱ्या या कार्य-कर्त्यांच्या प्रभावाचाहि विचार राज्यकर्त्यांना व इतर राजकीय पक्षांना करावा लाग-णार आहे. एखादा छोटासा प्रदेश स्वतंत्र राहिल्यास आपल्याला आपलें वर्चस्व प्रभावीपणें प्रस्थापित करतां येतें, असा साम्यवाद्यांचा ( केरळ, बंगाल वगैरे राज्यांच्या उदाहरणांवरून ) अनुभव आहे. त्यामुळें गोव्याचें स्वतंत्र राज्य असावें, या मागणीला कम्युनिस्टांनीं जोरदार पाठिंबा दिल्यास कोणाला आश्चर्य वाटूं नये. वैयक्तिक स्वार्थासाठीं गोमंतकाच्या स्वतंत्र राज्याची मागणी करणाऱ्या मराठी भांडवलवाल्यांनीं व कोंकणीवाद्यांनीं स्वतंत्र गोमंतकावर कम्युनिस्टांचें वर्चस्व प्रस्थापित होण्याची व देशाच्या सुरक्षितेला व ऐक्याला आणखी एक धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाहीं, असें मला वाटतें.

## काश्मीरचें उदाहरण :

या संदर्भात मला काश्मीरचें उदाहरण घ्यावेंसें वाटतें. काश्मीरी भाषा बोल-णारे सुमारें ३० ते ३५ लाख लोक असावेत. ( पाकिस्तानवाले प्रचार करतांना ४० लाख काश्मीरी असें म्हणतात; परंतु त्यांत डोगरी भाषा बोलणाऱ्या जम्मूच्या लोकांचाहि समावेश ते करीत असावेत ! ) त्यांतील १०–१२ लाख लोक आज पाकिस्तानव्याप्त काश्मीरांत आहेत. उरलेल्या लोकांचें काश्मीर हें स्वतंत्र राज्य बनलेलें आहे. काश्मीरी भाषा बोलणारे लोकहि अलग,सलग व समर्थ असून काश्मीरी भाषा कोंकणीपेक्षां कितीतरी पटींनीं अधिक संपन्न आहे. भारताची राज्यघटना व साहित्य अकादमी यांनीं काश्मीरीला स्वतंत्र भाषा म्हणून मान्यताहि दिलेली आहे. परंतु आज काश्मीरीची काय स्थिति आहे ? काश्मीरच्या राज्यकारभारांत किंवा शिक्षणांत तिला मुळींच स्थान नाहीं. तें स्थान पूर्वीपासून उर्दू भाषेनें पटकावलेलें आहे. कोंकणी व मराठी यांत जेवढें साम्य आहे तेवढेंहि काश्मीरी व उर्दू यांमध्यें नाहीं. तरीहि काश्मीरी लोकांनीं लेखन-वाचन, पत्रव्यवहार व राज्यकारभार यांसाठीं उर्दूचाच अवलंब करण्याचें पसंत केलें आहे. काश्मीरी भाषेंत एकहि वृत्तपत्र निघत नाही. एखादें मासिक निघालें तरी चालत नाहीं.

सुशिक्षित हिंदु–मुसलमान हिन्दी, उर्दू किंवा इंग्रजी वृत्तपत्रें व नियतकालिकें वाचतात. अधूनमधून कांहीं कवितासंग्रह वगैरे काश्मीरींत निघतात, परंतु त्यांना वाचक वेताचेच मिळतात. गोव्याचें वेगळें राज्य केलें तरी कोंकणीची स्थिति काश्मीरीहून कांहीं वेगळी व अधिक चांगली होईल असें समजण्यास फारसा आधार नाहीं. कारण काश्मीरीला तिच्या विशिष्ट राजकीय स्थानामुळें जें महत्त्व दिलें जात आहे तेंहि कोंकणीला देण्याची गरज राज्यकर्त्यांना भासणार नाहीं. एखाद्या भाषेंत तेवढ्या तोलाचें साहित्यिक निर्माण होऊं शकले नाहींत तर तिचें स्वतंत्र राज्य बनूनहि ती फारसें कर्तृत्व दाखवूं शकत नाहीं, ही गोष्ट, आसाम व ओरिसा या दोन प्रांतांच्या उदाहरणांवरूनहि दिसून येते. साहित्य अकादमीनें मान्यता दिलेल्या असमिया व उडिया या भाषांनीं गेल्या पंधरा वर्षांत कोणती अखिल भारतीय दर्जाची कलाकृति भारताला दिली आहे ?

## म्हैसूरचा गोमंतकावरील दावा

गोवा म्हैसूरमध्यें सामील करावा असें म्हणणारी एकहि व्यक्ति मला गोमंतकांत भेटली नाहीं. ६ लाख लोकवस्तीच्या गोव्यांत कानडी बोलणारे फक्त ८१३ लोक आहेत, व तेहि बहुधा मजूर म्हणून कर्नाटकांतून अलीकडे आलेले आहेत, ही वस्तुस्थिति ध्यानांत घेतल्यास याचें आश्चर्य वाटणार नाहीं. गोमंतकाचें वेगळें राज्य असावें असें म्हणणारे लोकहि गोव्याचें स्वतंत्र राज्य बनणार नसेल तर तो महाराष्ट्रांत सामील करावा असेंच प्रतिपादितात. त्यामुळें गोव्यांतील लोक म्हैसूरमध्यें सुखासुखीं जातील ही गोष्ट शक्य कोटींतील वाटत नाहीं. परंतु बेळगांव–कारवारचा मराठीभाषी भाग जोंपर्यंत त्याच्या इच्छेविरुद्ध म्हैसूरमध्यें डांबून ठेवण्यांत आलेला आहे, तोंपर्यंत गोमंतकाला त्याच्या इच्छेविरुद्ध म्हैसूरमध्यें घालण्यांत येणारच नाहीं, असा भाबडा आशावाद बाळगून गाफील राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारवारचा व दक्षिण कानडा ( मंगळूर ) चा कोंकणीभाषी प्रदेश म्हैसूरमध्यें असल्यामुळें गोव्याच्या कोंकणीभाषी प्रदेशावर तो शेवटपर्यंत आपला हक्क सांगणार, हें उघड आहे. त्या दृष्टीनें जे लोक गोव्याची भाषा मराठी असून कोंकणी ही तिची बोली आहे, अशी भूमिका घेतात त्यांना अंतिम परिणामाचा विचार करतां दोष देतां येणार नाहीं. गोव्याचा प्रदेश एके काळीं विजयनगर व विजापूर या कर्नाटकीय राज्यांच्या आधिपत्याखालीं होता, म्हणून त्यावर

कर्नाटकाचा हक्क आहे, असें म्हणणारे कर्नाटकी पुढारी महाधूर्त तरी असले पाहिजेत किंवा महामूर्ख तरी. कारण, लोकशाहीच्या जमान्यांत असे हक्क सांगा वयाचें ठरविल्यास महाराष्ट्राला निम्म्याशिम्म्या भारतावर आपला हक्क सांगतां येईल. परंतु पाकिस्तान जसा प्रत्येक बाबतींत भारताला त्रास देण्याची संधि वायां जाऊं देत नाहीं, तसा कर्नाटक हाहि महाराष्ट्राची कुरापत काढण्याची संधि सहसा जाऊं देत नाहीं. गोव्याच्या बाबतींतहि त्यानें तेंच धोरण अवलंबिलें आहे. तेथील कोंकणीच्या पुरस्कर्त्यांना आणि काँग्रेस–कार्यकर्त्यांना कर्नाटक काँग्रेसनें आंजारण्या-गोंजारण्याचा प्रयत्न केला असल्यास तें अशक्य नाहीं. परंतु कर्नाटकीय पुढाऱ्यां-कडून कोंकणीवाद्यांना हजारों रुपयांची मदत मिळत असल्याच्या बातम्या या मात्र खोडसाळ अफवाच आहेत, असें मला वाटतें.

अर्थात् मला कांहीं कोंकणीवादी असे भेटले, कीं ज्यांच्या मनांत कारवार–मंगळूरच्या कोंकणीभाषी लोकांशीं गोव्याच्या कोंकणीभाषी लोकांचा संपर्क वाढावा व शक्य झाल्यास त्यांच्यासह कोंकणीचें एक स्वतंत्र राज्य निर्माण केलें जावें, असा अंधुकसा विचार घोळत आहे. अशा लोकांना हाताशीं धरून कर्नाटकांतील कांहीं उपद्व्यापी पुढारी लोकमानसांत कदाचित् थोडाफार गोंधळ माजवूं शक-तीलहि, परंतु गोव्यांतील जागृत जनता या बाबतींत वेळींच सावध होऊन पुढील धोका टाळल्याशिवाय राहणार नाहीं, असें मला वाटतें. आज उघडपणें म्हैसूर-मध्यें जाण्याची भाषा बोलणारा माणूस गोव्यांत सांपडत नाहीं एवढें मात्र निश्चित.

## विशाल कोंकणी राज्याची कल्पना

वरील कल्पनेंतील मंगळूरचा भाग भौगोलिक दृष्ट्या अलग असल्यामुळें ती आपोआपच बारगळेल. परंतु गोव्याच्या भोंवतीं असलेला कोंकणीचा प्रदेश एकत्र आणून एक विशाल कोंकणी राज्य बनविण्याची शक्यता कांहीं मंडळींनीं बोलून दाखविली. हा भाग सामान्यतः असा असेल:—

### रत्नागिरी जिल्ह्यांतील तालुके

| तालुका | क्षेत्रफळ ( चौरस मैल ) | लोकसंख्या |
|---|---|---|
| कणकवली | २९९ | १,११,५०६ |
| कुडाळ | ३१७ | १,१४,३६९ |

| | | |
|---|---|---|
| देवगड | २८४ | १,०१,२०६ |
| मालवण | २५६ | १,२७,६८४ |
| सावंतवाडी | ५१६ | १,३९,०११ |
| वेंगुर्ले | १२७ | ८६,६४० |
| एकूण | १७९९ | ६,८०,४१६ |

## कर्नाटकांत गेलेले मराठी तालुके

| | | |
|---|---|---|
| बेळगांव | ३९४ | ३,४३,४२९ |
| खानापूर | ६७५ | १,२८,१९६ |
| हल्याळ | ३१५ | ६२,५३३ |
| कारवार | २८४ | ९१,३७९ |
| सुपा | ७३२ | ३४,३८४ |
| एकूण | २४०० | ६,५९,९२१ |

## या भागांसह होणारा बृहत्गोमंतक

| क्षेत्रफळ ( चौरस मैल ) | लोकसंख्या |
|---|---|
| ५५११ | १९,३५,९०६ |

३६५५३

अशा प्रकारें बनणारा हा बृहत् गोमंतक क्षेत्रफळानें आजच्या महाराष्ट्रांतील अकोला, औरंगाबाद, चांदा, नासिक, उस्मानाबाद, पुणें व सोलापूर या जिल्ह्यांपेक्षां आणि लोकसंख्येनें बृहन्मुंबई व पुणें या जिल्ह्यांपेक्षां लहान होईल. आजच्या महाराष्ट्रांत वर्धा हा लोकसंख्येच्या दृष्टीनें सर्वांत लहान जिल्हा आहे. परंतु त्याची लोकसंख्या ( ६,३१,३६७ ) ही गोव्याच्या लोकसंख्येपेक्षां अधिक आहे. अशा स्थितींत गोव्याचेंच नव्हे तर बृहत् गोमंतकांचेंहि वेगळें राज्य करणें कितपत योग्य होईल याचा विचार राज्यकर्ते केल्याशिवाय राहणार नाहींत. आजपर्यंत भारताच्या मध्यवर्ती सरकारांत महाराष्ट्राची न्याय्य बाजू हिरीरीनें मांडणारी प्रभावी व्यक्ति नव्हती; त्यामुळें पंडित नेहरूंच्या कानाशीं लागूं शकणाऱ्या काका–मामांची चलती होती, असा प्रवाद गोव्यांत अनेक ठिकाणीं ऐकण्यास मिळाला. त्यांत कांहीं तथ्य असेल असें मी मानीत नाहीं. परंतु आतां श्री. यशवंतराव चव्हाणांसारखा महाराष्ट्राचा धडाडीचा व हुशार

प्रवक्ता संरक्षणमंत्रिपदासारख्या महत्त्वाच्या जागेवर गेल्यामुळें यापुढें महाराष्ट्रावर केंद्राकडून अन्याय होणार नाहीं, किंबहुना महाराष्ट्राच्या सूचनांकडे विशेष लक्ष दिलें जाईल, अशी आशा निर्माण झालेली आहे. गोमंतकाच्या बाबतींत मराठी लोकांनीं उतावीळपणानें कांहीं आन्दोलन करूं नये, योग्य वेळीं योग्य त्या गोष्टी गोमंतकीयांच्या संमतीनेंच घडून येतील असें आश्वासन श्री. यशवंतरावांनीं पूर्वींच दिलेलें आहे. तेव्हां स्वतंत्र गोमंतक अथवा कोंकणी राज्य यासारख्या फुटीर प्रवृत्तींना फारसा वाव मिळणार नाहीं, अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नसावी.

## गोमंतक विद्यापीठाची कल्पना

महाराष्ट्रांतील व कर्नाटकांतील मराठी भाषी तालुके गोव्याला जोडल्यानंतर जो बृहत् गोमंतक तयार होईल त्यासाठीं एक स्वतंत्र गोमंतक विद्यापीठ स्थापन करतां येईल असें मराठी–महाराष्ट्र–वादी प्रा. अ. का. प्रियोळकर यांचें मत आहे. त्याविषयींहि कांहीं मंडळींनीं शंका व्यक्त केली. आज चार कोटि लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रांत सहा विद्यापीठें आहेत. म्हणजे सुमारें पासष्ट लाख लोकवस्तीला एक विद्यापीठ पडतें. सामान्यतः पांच–सहा जिल्ह्यांसाठीं मिळून एक विद्यापीठ काढलें जातें. बृहत् गोमंतकाची लोकसंख्या एक-दीड जिल्ह्याएवढी होईल. म्हणजे त्याच्यासाठीं स्वतंत्र विद्यापीठ काढावयाचें असल्यास त्यांत आणखी चार पांच जिल्हे समाविष्ट करावे लागतील. असे समाविष्ट करतां येण्यासारखे जिल्हे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाशीं संलग्न झालेले आहेत. त्यामुळें गोमंतकासाठीं वेगळें विद्यापीठ न काढतां तो मुंबई, पुणें किंवा शिवाजी या विद्यापीठांच्या कक्षेंत घालावा असें कांहीं लोकांना वाटतें. परंतु पोर्तुगीज, फ्रेंच, स्पॅनिश, लॅटिन वगैरे भाषा आणि पाश्चात्य कला व शास्त्रें यांच्या अध्ययनाचा हेतु समोर ठेवून केंद्रीय सरकारच्या मदतीनें एखादें स्वतंत्र गोमंतक विद्यापीठ स्थापन करण्याची कितपत शक्यता आहे, याचा विचार करण्यास हरकत नसावी, असें मला वाटतें.

# गोव्यांतील लोकसंख्येचा तक्ता

| तालुका | हिंदु | खिस्ती | मुसलमान | इतर | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| जुन्या काबिजादी ( Velhas Conquistas ) | | | | | |
| १ गोवें ( तिसवाडी ) | ४०,८८९ | ३६,७११ | १४९३ | ७ | ७९,१०० |
| २ सासष्टी | २५,६७३ | ९३,३३० | ३०४१ | १ | १,२२,०४५ |
| ३ मुरगांव | १३,४२४ | १८,८५३ | १७८० | ४ | ३४,०६१ |
| ४ बारदेस | ५६,६८७ | ४०,८९८ | ६०६ | — | ९८,१९१ |
| नव्या काबिजादी ( Novas Conquistas ) | | | | | |
| १ फोंडा | ५२,६६८ | ६,३२० | ६९४ | — | ५९,६८२ |
| २ डिचोली | ४२,८४३ | २,१५५ | १०६३ | १० | ४६,०७१ |
| ३ पेडणें | ३९,५४३ | ५,३३७ | १६५ | — | ४५,०४५ |
| ४ केंपें | १९,०१९ | १२,०७१ | ४७० | — | ३१,५६० |
| ५ सांगें | २३,००४ | ६,४८९ | ७२७ | ८ | ३०,२२८ |
| ६ काणकोण | १७,५८८ | ५,६५१ | ११२ | — | २३,३५१ |
| ७ सत्तरी | २४,२[illegible]७ | ५७२ | १३७८ | — | २६,२२७ |
| एकूण | ३,५५,६१५ | २,२८,३९५ | ११,५२९ | ३० | ५,९५,५६९ |

## गोव्याचें स्वतंत्र राज्य चालूं शकेल काय ?

मराठी लोकांना मराठी भाषेचा संयुक्त महाराष्ट्र कशासाठीं हवा होता ? आपल्या मातृभाषेंतून आपला सांस्कृतिक विकास अधिक झपाट्यानें होईल आणि तसा विकास व्हावयाचा असेल तर आपल्या मातृभाषेचें स्वतंत्र राज्य असणें आवश्यक आहे, असें मराठी भाषिकांनीं मानलें. अशा वेळीं ज्यांना कोंकणी ही मराठीहून वेगळी व स्वतंत्र भाषा आहे असें वाटतें, त्यांना कोंकणीच्या विकासासाठीं वेगळें राज्य मागण्याचा हक्क नाहीं असें मराठी भाषिक लोक कोणत्या तोंडानें म्हणूं शकतील ?

तेव्हां गोव्याचें स्वतंत्र राज्य बनवितां येईल किंवा नाहीं, बनवावें किंवा नाहीं या बाबतींत प्रत्येकाला वैयक्तिक मत बाळगतां येईल; परंतु असें राज्य चालूं शकेल किंवा नाहीं हा मात्र अर्थशास्त्राचा प्रश्न आहे. गोव्याचें एकूण क्षेत्रफळ ९,२६,०७५ एकर असून त्यापैकीं २,४३,५०० एकर जमीन लागवडीखालीं आहे. त्यापैकी १,२४००० एकर जमीन भाताच्या लागवडीखालीं आहे. गोमंतकांतील लोक सामान्यतः भात व मासळीच खातात. समुद्रकिनारा व खाड्या यांमुळें मासळी भरपूर मिळूं शकते. परंतु भात मात्र पुरेसें पिकत नाहीं. भाताचें एकूण उत्पादन ८ लाख खंडी ( गोव्याची खंडी = आपल्याकडील जुना दीड मण, नवीन सुमारें सव्वाशेन मण, दोन मोठीं पोतीं भरून ) होतें. ६ लाख लोकांना माणशीं दरसाल २ खंडी या हिशेबानें १२ लाख खंडी भात हवें. याचा अर्थ गोव्यांत पिकणारें भात गोव्याला ६ ते ८ महिने पुरतें. नारळाचें उत्पादन गोव्यांत पुष्कळ होतें. परंतु भाताप्रमाणेंच नारळ हाहि गोव्याच्या लोकांचा दैनंदिन आहार आहे. त्यामुळें गोव्यांत पिकणारा नारळ बहुधा गोव्यालाच लागेल. गोव्यांत कापूस व तंबाखू होत नाहीं. त्यामुळें वस्त्र व धूम्रपान ( त्याचें प्रमाण गोव्यांत फार मोठें आहे ) यांच्या बाबतींत गोव्याला शेजारच्या प्रांतांवरच अवलंबून राहावें लागेल. त्या दृष्टीनें गोमंतक हा स्वावलंबी आहे असें म्हणतां येणार नाहीं.

परंतु गोव्यांतील लोखंड – मँगेनीजच्या खाणींतून निघणारी लोखंड–मँगेनीज-युक्त माती व दगड जपान वगैरे देशांना विकून गोमंतकाला भरपूर परदेशी चलन मिळत असे. १९६१ सालीं लोखंड व मँगेनीजचे दगड विकून जवळजवळ १९ कोटि रुपये मिळाले होते. या पैशाच्या जोरावर गोव्याचें वेगळें राज्य सुस्थिर होऊं शकेल अशी कल्पना कांहीं मंडळींनीं बोलून दाखविली ती कितपत बरोबर

आहे तें अर्थशास्त्रज्ञच सांगूं शकतील; परंतु एक सामान्य नागरिक या नात्यानें या संदर्भात कांहीं प्रश्न माझ्या मनांत उत्पन्न झाले. ते मी तेथील मंडळी-समोरहि मांडले.

मुख्य प्रश्न असा कीं, देशांतील खनिज संपत्तीवर अधिकार कोणाचा असतो? सबंध देशाचा? कीं ज्या प्रदेशांत ती संपत्ति निर्माण होते त्याचा? मला वाटतें, तो अधिकार केन्द्रीय सरकारचा असावा. तसें नसतें तर रॉकेल-पेट्रोलच्या खाणींमुळें आसाम व गुजरात आणि लोखंड-दगडी कोळशांच्या खाणींमुळें बिहार-बंगाल हीं राज्यें या देशांतील सर्वांत धनाढ्य राज्यें बनलीं असतीं. परंतु तसें झाल्याचें दिसत नाहीं. उलट आसामला रॉकेलवर किती रॉयल्टी मिळावी याचा निर्णय केंद्र-सरकारलाच करावा लागला. अशा स्थितींत लोखंड-मँगेनीजचे दगड विकून किंवा तेथेंच कच्च्या लोखंडाचे कारखाने काढून मिळणाऱ्या उत्पन्नावर गोव्याचें स्वतंत्र राज्य चालविण्याची कल्पना भारताच्या राज्यघटनेला धरून असावी असें वाटत नाहीं.

दुसरा प्रश्न असा कीं, लोखंड-मँगेनीजचा हा दगड किती दिवस पुरेल? आज ना उद्यां त्याचा सांठा संपणारच. मँगेनीजचा सांठा आतांच खालावला आहे. प्रत्यक्ष आंकडेच पाहा :

गोव्यांतून निर्यात झालेलीं खनिजें

| | १९५७ | १९५८ | १९५९ |
|---|---|---|---|
| लोखंड | २६,७४,००० टन | २४,७५,००० टन | ३६,२८,००० टन |
| मँगेनीज | १,२६,००० टन | ७५,००० टन | ५५,००० टन |

हा सांठा संपल्यावर मग आम्ही शेजारच्या प्रांतांत विलीन होऊं असें जर गोमंतकीय म्हणत असतील तर कालांतरानें दरिद्री व दिवाळखोर बनणाऱ्या प्रदेशाचें कोण बरें प्रेमानें स्वागत करील?

तिसरा प्रश्न असा कीं, खनिज संपत्ति आहे एवढ्याच मुद्द्यावर एखाद्या भागाला स्वतंत्र राज्याचा दर्जा द्यावयाचें ठरलें तर कोलारच्या सोन्याच्या खाणी, पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणी, कोल्हापूरच्या बॉक्साईटच्या खाणी, चांदा जिल्ह्यांतील कोळशाच्या खाणी, जमदेशपूरच्या लोखंडाच्या खाणी वगैरे भाग स्वतंत्र राज्यें बनण्याचा दावा करूं शकतील. मुंबईसारखें धनाढ्य शहरहि नगर-राज्य बनण्याची मागणी करूं शकेल, आणि मग या प्रक्रियेला कांहीं अंतच

राहाणार नाहीं. म्हणून हा मुद्दा विचारांत घेतां येणार नाहीं, असें मला वाटतें. आपण सर्व बाबतींत स्वावलंबी बनूं शकतों असा साधार दावा सांगणाऱ्या विदर्भाला अखेर शेवटीं महाराष्ट्रांत सहभागी व्हावें लागलें. तेव्हां टीचभर गोमंतकाचा स्वतंत्र राज्याचा दावा कोणी मान्य करील असें वाटत नाहीं.

## गोव्याची स्वतंत्र संस्कृति ?

गोव्यानें फिरंग्यांच्या अमदानींत एक वेगळी पाश्चात्याभिमुखी संस्कृति विकसित केली असून तिचें संरक्षण व संवर्धन करण्याचें वचन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं दिलेलें आहे, म्हणून गोव्याचें वेगळें राज्य बनलें पाहिजे, असा मुद्दा कांहीं लोक मांडतात. या बाबतींत एवढेंच सांगतां येईल कीं, गोव्याच्या या तथाकथित मोहक संस्कृतीविषयीं पंडितजींना मिळालेली माहिती बरोबर नाहीं. ही संस्कृति कांचघरांतील कुंडींत वाढविलेल्या रोपट्यासारखी एका कृत्रिम वातावरणांत तयार करण्यांत आलेली होती. तें वातावरण नाहींसें होतांच तिचें वेगळेपणहि आपोआपच कापराप्रमाणें उडून जाईल. हैद्राबादच्या विशिष्ट संस्कृतीच्या बाबतींतहि पंडितजींची अशीच दिशाभूल करण्यांत आली होती; आणि त्यामुळें हैद्राबादचें विलीनीकरण कांहीं काळ लांबणीवरहि पडलें होतें. परंतु लोकमताच्या दडपणापुढें त्यांना नमावें लागलें आणि हैद्राबादी संस्कृतीविषयीं आपण बाळगलेल्या कल्पना अगदींच ठिसूळ पायावर रचलेल्या होत्या असा त्यांना अनुभव आला. स्वातंत्र्योत्तर गोमंतकांतहि फिरंगी संस्कृति इतक्या झपाट्यानें लोप पावूं लागलेली दिसते, कीं थोड्याच अवधींत तिचें हें तथाकथित वैशिष्ट्यहि विलयाला जाईल.

## ही सारी धडपड कशासाठीं ?

परंतु माझ्यासारख्या तटस्थ निरीक्षकासमोर असा प्रश्न उभा राहातो, कीं ही सारी धडपड कशासाठीं करायची ? काहीं थोड्या संधिसाधू, चलाख व लटपट्या लोकांना मंत्री बनून खोऱ्यानें पैसा ओढता यावा आणि इतर जनतेनें त्या राज्यव्यवस्थेसाठीं रक्ताचें पाणी करून पैसा पुरवावा यासाठीं ? स्वतंत्र राज्य बनवायाचें म्हणजे कायदेमंडळ हवें, उच्च न्यायालय हवें, शिक्षण, संस्कृति वगैरे बुडीत खातीं हवींत. आणि हें सारें कशासाठीं ? तर केवळ लाख दोन लाखांचें

प्रतिनिधित्व करण्याचा दावा सांगणाऱ्या लोकांना खूष करण्यासाठीं ! मणिपूर, हिमाचल प्रदेश, काश्मीर, त्रिपुरा वगैरे केन्द्रशासित प्रदेशांची आर्थिक तूट भरून काढतांकाढतां केंद्रीय सरकार आधींच हैराण झालें आहे. त्यांत पुनः गोव्याच्या आर्थिक तुटीचा बोजा त्यानें स्वतःवर काय म्हणून लादून घ्यावा ? वरील राज्यें शेजारच्या प्रांतांत विलीन करण्यामध्यें कांहीं राजकीय अडचणी आहेत. तशी अडचण गोव्याच्या किंवा पॉंडेचरीच्या बाबतींत मुळींच नाहीं. दीव-दमणला गुजरातपासून वेगळें काढून भाषा, भूगोल किंवा संस्कृति यांच्या बाबतींत कसलेंहि साम्य नसलेल्या गोव्याशीं जखडून ठेवण्यांत काय औचित्य आहे ? परंतु दीव-दमणचे लोक गुजरातेंत विलीन होऊं इच्छीत नाहींत, ते वेगळेच राहूं इच्छितात, असें श्री. पुरुषोत्तम काकोडकर यांच्याकडून मला कळलें, तेव्हां मला आश्चर्य वाटलें नाहीं. कारण सत्ताधारी व सत्ताकांक्षी लोकांचें महत्त्व हें नेहमींच विभक्तपणांत असतें. आपण सिंधूंत विलीन झालों तर आपल्याला कोणीच विचारणार नाहीं, ही भीति बिंदूला नेहमींच वाटत असते. सिंधूंत विलीन होण्यांतच आपल्या जीवनाचें सार्थक आहे, हें ओळखणारे बिंदू विरळाच !

## घाईनें निर्णय नको

या सर्व विवेचनाचा अर्थ असा नव्हे कीं गोमंतकीय जनतेच्या इच्छेविरुद्ध तिला शेजारच्या महाराष्ट्रांत ताबडतोब विलीन करून टाकावें. तसें झाल्यास गोमंतकांत फार मोठी प्रतिक्रिया होईल असें नाहीं; परंतु त्यामुळें लोकांचीं मनें दुखावतील. लोकशाहीचा दावा करणाऱ्यांनीं तरी अशा हुकूमशाही मार्गाचा पुरस्कार करूं नये. गोमंतकाच्या बाबतींत जो कांहीं निर्णय घ्यावयाचा तो शांत-पणें, घाईगर्दी न करतां, लोकांच्या इच्छा जाणून घेऊन व वेळप्रसंगीं लोकांना विश्वासांत घेऊन घेतला गेला पाहिजे. तसें झाल्यास घेतलेला निर्णय अमलांत आणण्यास जनतेकडून आनंदानें सहकार्य मिळेल.

त्या दृष्टीनें गोव्यांत इतर केंद्रशासित प्रदेशांप्रमाणें प्रादेशिक विधानमंडळ (टेरिटोरिअल कौन्सिल किंवा लेजिस्लेटिव्ह असेंब्ली) स्थापन करण्याची कल्पना चांगली आहे. कांहीं वर्षें गोव्याचा कारभार या प्रादेशिक विधानमंडळा-मार्फत चालल्यास स्वतःवर राज्य करण्याची गोमंतकीयांची हौसहि भागेल आणि असा राज्यकारभार जनतेला कितपत सुखकारक होतो, निःस्वार्थीपणानें लोक-

सेवा करण्यास किती लोक पुढें येतात, ते किती हुशारीनें राज्यशकट चालवूं शकतात, वगैरे गोष्टींचीहि कल्पना येईल.

" गोमंतकाच्या अशा कांहीं विशिष्ट नि वेगळ्या समस्या आहेत. त्या सोडविण्याच्या दृष्टीनें गोमंतक कांहीं काळ केन्द्रीय सरकारच्या आधिपत्याखालीं राहावा " असें मत गोवा–दीव–दमण कॉंग्रेसच्या तदर्थ समितीचे संचालक, चिटणीस व कांहीं सभासद यांनीं मजजवळ व्यक्त केलें. मला वाटतें, या प्रयोगाला महाराष्ट्रविलीनीकरणवादी मंडळींनीं विरोध करूं नये. राज्यकारभार हातीं घेतल्याशिवाय त्यांतील अडचणी लक्षांत येणार नाहींत.

अर्थात ही तरतूद कायमची नसून तात्पुरती आहे आणि गोमंतकीय जनतेला स्वेच्छेनें ती केव्हांहि बदलतां येईल असें प्रारंभींच स्पष्ट करण्यांत यावें.

गोमंतकांतील ग्रामपंचायतींच्या निवडणुका नुकत्याच झाल्या असून, बहुसंख्य ठिकाणीं जनतेचे प्रतिनिधी एकमतानें निवडून आले आहेत. त्यांत जनतेनें जाती–पातीचाहि विचार केला आहे, असें निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या नांवावरून दिसतें. टेरिटोरिअल कौन्सिलच्या किंवा लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकींतहि बहुधा असेंच घडेल आणि जुने पुढारी बाजूला पडून नवे लोकप्रतिनिधी पुढें येतील असा अंदाज बांधतां येतो. हे प्रतिनिधी सवत्या सुभ्याचा आग्रह धरण्याऐवजीं शेजारच्या प्रांतांतील आपल्या ज्ञातिबांधवांशीं राजकीयदृष्ट्या एकरूप बनण्याचीच इच्छा व्यक्त करतील अशी अधिक शक्यता आहे.

## राजकीय पक्ष संघटित व्हावेत

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गोव्यांतील विविध राजकीय पक्ष अगदींच निस्तेज व अस्तंगतप्राय झाल्याचें दृश्य पाहून कोणाहि सच्च्या लोकशाहीप्रेमी व्यक्तीला वाईट वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. पक्षरहित लोकशाहीच्या सर्वोदयवादी विचारप्रणालीला अनुसरून ही परिस्थिति निर्माण झाली असती तर तिचें स्वागत अवश्य करतां आलें असतें; परंतु ही परिस्थिति केवळ संधिसाधूपणामुळेंच निर्माण झालेली आहे; त्यामुळें विशेष वाईट वाटतें. वेगवेगळ्या विचारसरणींचें प्रतिनिधित्व करणारे अखिल भारतीय पक्ष गोव्यांत योग्य प्रकारें संघटित होतील तर तेथील राजकीय जीवन अधिक चैतन्यमय व सक्रिय बनेल असें मला वाटतें.

## राज्यकारभारांत त्वरित सुधारणा झाली पाहिजे

गोव्याच्या राजकीय समस्यांमध्यें मुक्तीनंतर तेथें चालू झालेला राज्यकारभार ही एक मोठी किचकट समस्या बनलेली आहे. बाहेरून गोव्यांत गेलेले अधिकारी आपण एखाद्या अत्यंत मागासलेल्या व जंगली प्रदेशांत आलों आहोंत, येथील राज्ययंत्र कोसळून पडलें होतें, तें सावरण्याचें कार्य आपल्याला करावयाचें आहे व येथील लोक राज्यकारभाराचा श्रीगणेशहि जाणत नाहींत, अशा थाटांत अत्यंत मग्रूरीनें, उर्मटपणें व अपमानास्पद पद्धतीनें वागतात, ही तक्रार प्रत्येक ठिकाणीं ऐकावयास मिळाली. त्याबद्दल आश्चर्यहि वाटलें नाहीं. कारण पश्चिम–महाराष्ट्रांतील सरकारी अधिकाऱ्यांच्याच नव्हे, तर साध्या कारकुनांच्याहि विरुद्ध हीच तक्रार विदर्भांतील आणि मराठवाड्यांतील जनता व सरकारी अधिकारी आजहि करतांना आढळतात. तेव्हां गोव्यांतील लोक बाहेरून आलेल्या सरकारी नोकरांविरुद्ध तशी तक्रार करीत असल्यास नवल नाहीं. त्यांत पुन्हा महाराष्ट्रांतून जितके नोकर आणले जातील तितकेच म्हैसूरमधूनहि आणण्याचा जो महामूर्खपणाचा निर्णय प्रारंभीं घेण्यांत आला, त्यामुळेंहि राज्यकारभारांत गोंधळ निर्माण झाला; कारण मराठी नोकरांची भाषा गोव्याच्या लोकांना थोडीतरी कळते, परंतु कानडीचा तर त्यांना गंधहि नाहीं. अशा स्थितींत त्यांच्यावर कानडी अधिकारी आणून लादणें म्हणजे निर्बुद्धपणाची कमाल होती. ही चूक आतां थोडीफार दुरुस्त केली जात आहे असें कळलें. परंतु तिच्यांत आमूलाग्र बदल झाल्याशिवाय कांहीं उपयोग नाहीं.

तसेंच गोमंतकांतील राज्यकारभार मोडकळीस आला होता, ही कल्पना साफ चुकीची आहे. तेथें अत्यंत व्यवस्थित कारभार चाललेला होता. उलट आतांच कारभारांत गोंधळ व गबाळेपणा आला आहे. तो काढून टाकावयाचा असेल तर स्थानिक नोकरवर्गाचें अधिक मोठ्या प्रमाणावर साह्य घेऊन प्रथम राज्यकारभाराचा गाडा पूर्वस्थळावर आणला पाहिजे आणि मगच त्यांत हळूहळू नवीन सुधारणा केल्या पाहिजेत. साडेचारशें वर्षें अंगवळणीं पडलेली राज्यव्यवस्था दूर करण्यास साडेचार वर्षें लागली तरी तो कांहीं फार मोठा काळ नव्हे. पोर्तुगीज राज्यकर्ते अत्यंत अदबीनें, संयमानें व जनतेशीं मिळूनमिसळून वागत. तशीच संवय बाहेरून गेलेल्या सरकारी नोकरांनीं स्वतःला लावून घेतली तर जनतेमध्यें नव्या राजवटीविषयीं असलेला निम्मा–अधिक रोष आपोआपच कमी

होईल. या बाबतींत गोमंतकीयांच्या भावनांचें मूल्य कमी लेखण्यांत येऊं नये, एवढीच अपेक्षा.

## राजकीय भवितव्य अधांतरीं ठेवूं नका

काश्मीरचा प्रवास करून आल्यानंतर मीं काश्मीरच्या भवितव्यासंबंधीं जे विचार मांडले होते तेच गोव्याच्या संदर्भांतहि मांडतां येतील. काश्मीरचें भवितव्य प्रारंभीं अनिश्चित ठेवण्यांत आल्यामुळें—काश्मीरी लोकांना आपलें भवितव्य ठरविण्याचा, स्वयंनिर्णयाचा हक्क आहे, असें आमच्या पंतप्रधानांनीं जाहीर करून टाकल्यामुळेंच तेथील प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे. आतां बारा वर्षांनंतर ह्या जाहीर आश्वासनांतील चूक लक्षांत आली आहे, परंतु ती दुरुस्त करणें अवघड झालें आहे. तरीपण अजूनहि फार विलंब न लावतां काश्मीरचें भारतांत संपूर्ण सामिलीकरण करावें आणि शक्य असल्यास शेजारच्या हिमाचल प्रदेशाशीं किंवा पंजाबशीं तो प्रांत जोडून टाकावा, असें मला वाटतें. तसें झालें तरच तेथील मुस्लिम जनतेच्या मनांतील अनिश्चितता नाहींशी होईल व यूनोच्या देखरेखीखालीं सार्वमत घेण्यांत यावयाचें असून त्यावेळीं पाकिस्तानांत सामील होण्याची संधि आपल्याला मिळणार आहे, अशी जी सुप्त भावना तेथील जनतेच्या मनांत घर करून राहिली आहे, तिचें उच्चाटन होऊं शकेल.

हीच गोष्ट गोव्याच्या बाबतींतहि सांगतां येईल. गोमंतकाचे तात्कालिक व निकडीचे प्रश्न सुटेपर्यंत तो भाग केन्द्रीय सरकारच्या देखरेखीखालीं राहील व त्यानंतर तो आपोआप शेजारच्या महाराष्ट्रांत विलीन होईल असें केन्द्रीय सरकारनें एव्हांच स्पष्ट सांगून टाकावें. तसें झाल्यास गोमंतकांतील जनता महाराष्ट्राशीं एकरूप होण्याच्या दृष्टीनें मानसिक व इतर तयारी करूं शकेल. जे ख्रिस्ती बांधव पोर्तुगीज-इंग्रजीच्या चक्रांत अडकले आहेत, त्यांना मराठी शिकण्यास पुरेशी सवड मिळेल. आणि महाराष्ट्रांत सामील होण्याच्या वेळीं ते पूर्णपणें तयार झालेले असतील. याच्याऐवजीं कोंकणीचें स्वतंत्र राज्य किंवा गोव्याचा वेगळा प्रांत बनणार आहे, अशी आशा त्यांच्या मनांत निर्माण केली गेल्यास पुढेंमागें महाराष्ट्रांत येण्याच्या वेळीं त्यांची मानसिक व भाषिक दृष्ट्या फारच कुचंबणा होईल.

# गोमंतकाच्या सांस्कृतिक समस्या : ४

गोव्यामध्यें हिंदू व ख्रिश्चन असे दोन प्रमुख समाज आहेत; त्यामुळें गोमंतकाच्या सांस्कृतिक व सामाजिक समस्या मुख्यतः या दोन समाजांशीं निगडित असणें स्वाभाविक आहे. परंतु त्यांचें स्वरूप तेवढ्यापुरतेंच मर्यादित मात्र नाहीं. ख्रिश्चनांप्रमाणें हिंदूंमध्येंहि प्रगत-अप्रगत, वरिष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच वगैरे जे अनेक भेदभाव शेंकडों वर्षांपासून चालत आलेले आहेत, त्यांच्याहि कांहीं विशिष्ट समस्या आहेत. गोमंतकाच्या एकूण समस्यांविषयीं विचार करतांना हे सारे प्रकार लक्षांत घेतले पाहिजेत.

## किरिस्तांवांची समस्या : त्यांचें विराष्ट्रीकरण ( Denationalisation )

गोव्याच्या एकूण सुमारें ६ लाख लोकसंख्येपैकीं सव्वादोन लाख लोक ' कातोलिक ' म्हणजे कॅथॉलिक ख्रिस्ती आहेत. लक्षावधि ख्रिश्चन लोक ज्या भारतांत शेंकडों वर्षांपासून सुखासमाधानानें नांदत आहेत तेथें दोन-अडीच लाख ख्रिस्त्यांचा प्रश्न ही एक जटिल समस्या कां बनावी, हें अनेकांना कळत नाहीं. त्यासाठीं गोमंतकांतील ख्रिस्ती लोकांची सत्यस्थिति प्रथम समजून घेतली पाहिजे.

पोर्तुगालच्या साडेचारशें वर्षांच्या गुलामगिरीनें गोमंतकाचें सर्वांत मोठें नुकसान जर कोणतें झालें असेल तर तें म्हणजे गोमंतकीय ख्रिस्ती लोकांचें पोर्तुगीजांनीं केलेलें विराष्ट्रीकरण ( Denationalisation ) हें होय. गोव्यांतील लोकांनीं आपल्या सत्तेविरुद्ध बंड करून उठू नये म्हणून पोर्तुगीजांनीं शेंकडों वर्षांपासून त्यांच्या मनावर असें बिंबवण्याचा प्रयत्न केला कीं, 'गोवा हा पोर्तुगालचा एक समुद्रपार प्रांत असून गोंयकार हा जन्मानें पोर्तुगीजच आहे.' मराठी साधुसंतांचा प्रभाव आणि मराठी राष्ट्रनेत्यांशीं मराठीच्या द्वारें राहिलेला भावनिक संबंध यांमुळें गोव्यांतील हिंदु जनतेवर पोर्तुगीजांच्या या प्रचाराचा कांहीं परिणाम झाला नाहीं; किंबहुना उलटाच परिणाम झाला, आणि गोमंतकीय हिंदु हा अधिक कट्टर, अधिक स्वाभिमानी बनला. गोव्याच्या ख्रिस्ती लोकांवर मात्र या शिकवणुकीचा अद्भुत परिणाम झाला आणि आपला भारताशीं कांहीं संबंध नसून पोर्तुगाल हीच आपली मातृभूमि आहे व आपण जन्मानें, धर्मानें, वंशानें पोर्तुगीज आहोंत, अशी त्यांची पक्की श्रद्धा बनली. मराठी पाठ्य पुस्तकांतून—

सागर–भूमि–रणपटू नरवर
जनपद वीर्य निधि जितकाल !
चढवा पुन्हा विभवाच्या
धवलगिरीवरि हा पोर्तुगाल !
अहा ! गतकालिंच्या स्मृतिमधूनी
ध्वनि येई श्रवणिं सखोल
महनीय पूर्वजांचा
तुज देईल सुयश अमोल !
तय्यार व्हा ! तय्यार व्हा !

स्थित भूमि–जलधिवरी
तय्यार व्हा ! तय्यार व्हा !
प्रिय देशास्तव समरीं
साहुनि तोफांचा भडिमार !
फडके ध्वजा विजयवती
भूषवी नभा विमला

कळवो युरोप जगभरिं कीं,
पोर्तुगाल मृत न जाहला !
तव भू समृद्धिहि चुंबी
जलधी प्रेमाल्हादें
विजयी तुझा बाहू हा
नवसृष्टि जगाला दे ! •
तय्यार व्हा ! तय्यार व्हा !

नमु हा उदित रवि होई
क्षितिजीं सदाशेच्या
अपमानारव तव होवो
सूचक पुनरुत्थानाचा
माता उषा प्रबला ही
चुंबी आम्हां किरणीं
पोषूनि रक्षूनि तैसी
अनिवार विधिघटनीं
तय्यार व्हा ! तय्यार व्हा !

हें पोर्तुगीज राष्ट्रगीत मुलांना शिकविलें जात होतें आणि गोवा हा पोर्तुगालचा एक प्रांत आहे, ( इस्तादू पोर्तुगीज द् इंदिय—Estado Portuguesa da India ) असा पुकारा सतत केला जात होता; तरी 'वंदे मातरम्' हेंच आपलें राष्ट्रगीत आहे आणि गोमंतक हा भारताचा व भारतांतील कोंकण-भूमीचा एक छोटासा भाग आहे, हीच श्रद्धा हिंदूंनीं शेंकडों वर्षें जतन करून ठेवली. त्यांनीं राज्यकारभार, नोकरीचाकरी व व्यापार उदीम यांसाठीं पोर्तुगीज भाषाहि शिकून घेतली, परंतु तिला कधीं स्वैंपाकघराच्या उंबरठ्याच्या आंत येऊं दिलें नाहीं. आपली मराठी भाषा, संस्कृत, भारतीय नृत्य-संगीत वगैरे संस्कृतीच्या साऱ्या अंगांचें त्यांनीं जिद्दीनें जतन केलें. त्यामुळें स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय जनजीवनाशीं समरस होतांना त्यांना कांहींच मानसिक अडचण भासत नाहीं.

किरिस्तांवांच्या बाबतींत मात्र याच्या अगदीं उलट परिस्थिति होती. पोर्तुगीज

लोक इंग्रजांपेक्षां कमी घमेंडखोर व येथील लोकांत मिसळणारे असल्यामुळें गोमंतकीय ख्रिस्ती समाजाशीं ते फार लौकर एकरूप बनले. अँग्लोइंडियन लोकांप्रमाणें गोव्यांत एक इंडो–पोर्तुगीज जमात तयार झाली. ती स्वतःला पोर्तुगीजच समजूं लागली. हें समजणें इतकें खोलवर रुजलेलें होतें कीं गोमंतक स्वतंत्र होतांच या जमातींतील बहुसंख्य लोक पोर्तुगीज सैनिक व नोकर यांच्याबरोबर पोर्तुगालला निघून गेले. अशा प्रकारें त्यांचा प्रश्न सुटला. परंतु जे काळे किरिस्ताव गोव्यांत राहिले त्यांचा प्रश्न तसाच टांगता राहिला आहे. हे लोक शरीरानें ( नाइलाजास्तव ) भारतीय राहिले असले तरी मनानें व चालीरीतींनीं बव्हंशीं पोर्तुगीज बनले आहेत. कित्येक ख्रिस्ती कुटुंबांची मातृभाषाच पोर्तुगीज बनलेली आहे. त्यांना कोंकणीहि येत नाही, * मग मराठीचें तर नांवच नको. कांहीं ख्रिस्चनांनीं पोर्तुगीज भाषेबरोबरच इंग्रजाचाहि सखी मातृभाषा म्हणून स्वीकार केलेला आहे. काळा रंग व भारतीय चेहरा मोहरा असलेली ही मंडळी आपल्या छोट्या बालबच्च्यांशीं जेव्हां इंग्रजींत किंवा पोर्तुगीजमध्यें बोलतांना आपण पहातों तेव्हां विराष्ट्रीकरणाच्या बाबतींत पोर्तुगीजांनीं इंग्रजांवर कशी कडी केली होती याचा प्रत्यय आपल्याला येतो, आणि खेदहि वाटतो !

---

* दिल्लीच्या 'नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड एकॉनॉमिक रिसर्च' या संस्थेंत काम करणारे श्री. रा. के. पाटील यांचा या बाबतींतील अनुभव मोठा नमुनेदार आहे. ता. ७–१२–६२ च्या आपल्या पत्रांत त्यांनीं मला लिहिलें होते :–

"व्यावसायिक कारणामुळें मला गेले २।३ महिने गोव्यांत राहावें लागलें व गोमंतकीय समाजाच्या निरनिराळ्या थरांतील लोकांशीं माझा संबंध आला. प्रतिष्ठित ख्रिस्चन कुटुंबांत जेवण्याची, राहाण्यावागण्याची संधि मला लाभली. त्यावेळीं मी जरी त्यांच्याशीं व त्यांच्या बायकामुलांशीं कोंकणींतून बोलण्याचा आग्रह धरीत होतों, तरी ते माझ्याशीं इंग्रजींतून व आपसांत पोर्तुगीजमधून बोलत. जास्त परिचय झाल्यानंतर मी त्यांना या बाबतींत विचारलें असतां त्यांनीं 'कोंकणी ही फक्त नोकरां-चाकरांशीं बोलण्याची भाषा आहे,' असें मला सांगितलें. हें त्यांचें कोंकणीवरील प्रेम !"

## पाश्चात्य वेषभूयेची गुलामगिरी

या ख्रिस्ती लोकांचा पोषाख संपूर्णपणें पाश्चात्य धर्तीचा ( सूट-बूट-हॅट असा ) असतो. कोट व हॅट यांचा या लोकांवर इतक जबरदस्त पगडा आहे कीं कमरेला फक्त लंगोटी लावणारा कोळी किंवा भंडारीहि अंगांत कोट व डोकीला हॅट घालतो.

साडी नेसतां येणारी सुशिक्षित ख्रिस्ती स्त्री तर विरळाच. ख्रिस्ती स्त्री ही तिच्या आंखूड झग्यावरून आणि मानेपर्यंत कापलेल्या ( बॉबकट ) केंसांवरूनच ओळखली जाते. तिचे दागिनेहि अभारतीय असतात, हें काय सांगायला हवें ? अर्थात् खालच्या ( कोळी वगैरे ) वर्गांतील ख्रिस्ती बायका साड्या ( किंवा गोव्यांत ज्याला कापड म्हणतात तें ) नेसतात व बॉबकटहि करीत नाहींत; परंतु त्यांचें ख्रिस्तीपण झांकत नाहीं.

पाश्चात्य पोषाखाचें श्रेष्ठत्व हिंदु पुरुषांनींहि मान्य केलें होतें. फरक एवढाच कीं त्यांनीं आपल्या देवघरांत व स्वैंपाकघरांत भारतीय पंचा किंवा धोतर टिकवून ठेवलें होतें. परंतु समाजांत वावरतांना सुटाबुटांतच वावरलें पाहिजे, असा कांहींसा अलिखित नियम त्यांनीं राजीखुषीनें स्वीकारला होता. या बाबतींतील एक वैयक्तिक आठवण या ठिकाणीं नमूद केल्यास तें अप्रस्तुत ठरणार नाहीं.

सुमारें सतरा वर्षांपूर्वीची गोष्ट. मला लग्नानंतर प्रथमच गोव्यांत सहकुटुंब जावयाचें होतें. आपला नवरा गरीब असला तरी गरीब दिसूं नये, गबाळ्या असला तरी गबाळ्या दिसूं नये, अशी जगांतल्या सर्वसामान्य विवाहित स्त्रीप्रमाणें माझ्या पत्नीचीहि इच्छा होती. ती स्वाभाविक होती, हेंहि मला मान्य होतें; परंतु तिच्या पूर्ततेसाठीं तिनें मला ज्या धर्मसंकटांत टाकलें त्यांत अडकण्याची मात्र माझी तयारी नव्हती. गोव्यांतले लोक सुटाबुटांत वावरणाऱ्यालाच सुसंस्कृत व श्रीमंत समजतात, म्हणून आपल्या नवऱ्यानेंहि गोव्याला जातांना सुटबुटांत असलें पाहिजे, असा तिचा आग्रह. परंतु तिची ही मागणी मला मोठी अपमानास्पद वाटली. त्या वेळपर्यंत मीं कधींच सूट वापरला नव्हता. गांधीजींच्या प्रत्यक्ष आश्रमी वातावरणांत जरी मी राहात नसलों तरी त्यांच्या जवळपास होतों. त्यामुळें विदेशी पद्धतीची वेषभूषा हें गुलामगिरीचें लक्षण आहे, अशी माझी तीव्र भावना होती. ( अर्थात् स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही भावना

पुष्कळच ओथट झाली आणि कपड्यांच्या बाबतींत फक्त प्रमाणित खादी वापरणें, याखेरीज इतर कसलेंच बंधन मीं स्वतःवर घालून घेतलें नाहीं; परंतु पारतंत्र्याच्या काळांत मात्र वेषभूषेंतील पाश्चात्य अनुकरणाची मला मनस्वी चीड होती. ) म्हणून मीं ती विनंतीवजा सूचना साफ झिडकारली आणि सौभाग्यवतीचा रोष पत्करूनहि तिच्यासह साध्या धुवट कपड्यांत गोव्याला गेलों. सुदैवानें त्याचा कांहीं वाईट परिणाम न होतां — म्हणजे आपल्याबद्दल कांहीं गैरसमज मागें न ठेवतां — मी तिकडून परत आलों. परंतु तेथील झकपक कपडेवाल्या लोकांमध्यें आपण अगदींच परके आहोंत असा भास मात्र मला पदोपदीं होत होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एका वर्षातच या बाबतींत गोमंतकीय लोकमानसांत पुष्कळ परिवर्तन झाल्याचें आढळलें. पहिल्या चार–सहा महिन्यांतच मडगांवच्या खादीभवनानें लाख–सव्वा लाखाची विक्री केली, यावरूनहि लोकांच्या अभिरुचीचें वारें कसें बदललें आहे याची कल्पना येईल. अर्थात् हें परिवर्तन मुख्यतः शहरी, पांढरपेशा हिंदूंमध्येंच झालेलें आहे व ख्रिस्ती समाज अद्यापि जुन्या पाश्चात्य वेषभूषेलाच चिकटून राहिलेला आहे, हेंहि तितकेंच खरें.

अर्थात् वेषभूषा व आवडीनिवडी या बाह्य गोष्टी आहेत. त्यांच्या बाबतींत प्रत्येकाला स्वातंत्र्य असलेंच पाहिजे. परंतु परक्या देशाविषयीं प्रेम बाळगून स्वदेशाचा तिरस्कार करणें ही गोष्ट केव्हांहि क्षम्य मानली जाणार नाहीं. भारतावर इंग्रजांची राजवट होती तेव्हां सगळी आबादीआबाद होती आणि स्वराज्य येतांच हालअपेष्टांना सुरुवात झाली, अशी तक्रार करणारे लोक आजहि आपल्या आजूबाजूस वावरत आहेत. त्या अर्थानें पोर्तुगीज राजवटीचें गुणगान करून भारतीय राजवटीला गोमंतकीयांनीं नांवें ठेवलीं तर त्यांना दोष देतां येणार नाहीं. परंतु आपल्याला भारताच्या गुलामगिरींतून मुक्त करण्यासाठीं सालाझार परत येणार आहे अशी आशा बाळगणाऱ्या गोमंतकीय ख्रिश्चनांच्या भावनांचें समर्थन कोण कसें करूं शकेल ?

## ख्रिस्ती लोक भारतविरोधी आहेत काय ?

अशी आशा बाळगणारे भारतविरोधी ख्रिस्ती लोक गोव्यांत खरोखरीच आहेत काय ? या बाबतींत अनेक प्रवाद गोव्यांत प्रवास करितांना आपल्याला ऐकावयास मिळतात. आजवर ख्रिस्ती लोकांच्या वर्चस्वाखालीं राहून कंटाळलेले

व चिडलेले हिंदू ख्रिश्चनांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल शंका घेत असतील, तर त्यांत अस्वभाविक असें कांहींच नाहीं. परंतु सरसकट सारेच किरिस्ताँव भारतविरोधी आहेत असें मानण्यास फारसा पुरावा उपलब्ध असेल असें मला वाटत नाहीं. कांहीं तात्कालिक घटनांमुळें अशाप्रकारच्या संशयाला बळकटी येते यांत मात्र शंका नाहीं. परंतु अशा घटना घडूं नयेत व घडल्या तरी त्यांतून संशय निर्माण होऊं नये, या बाबतींत सरकार, ख्रिस्ती नेते व सामाजिक कार्यकर्ते यांनीं जेवढें प्रयत्नशील राहिलें पाहिजे, तेवढे ते राहात नाहींत, असें खेदानें म्हणावें लागतें.

या बाबतींत कांहीं अनुभव येथें नमूद करण्यासारखे आहेत. गतवर्षी चिनी आक्रमणामुळें लोकांनीं दिवाळी साजरी करूं नये, असें गोमंतकीय जनतेनें ठरविलें होतें. त्याप्रमाणें गोव्यांत सर्वसामान्यपणें लोकांनीं दिवाळीचा दिवस ( गोव्यांतील दिवाळी एकच दिवसाची असते ) अत्यंत गंभीरपणें घालविला; परंतु कांहीं ख्रिश्चन वस्त्यांतून फटाक्यांचे आवाज ऐकूं आल्याचें अनेकांनीं सांगितलें. पणजीच्या ' गोमंतक ' दैनिकानेंहि आपल्या अग्रलेखांत तसा उल्लेख केला होता. चिनी आघाडीवर चिन्यांकडून भारताचे दणदणीत पराभव होत असल्याच्या बातम्या ऐकून त्याबद्दल आपला आनंद व्यक्त करण्यासाठीं किरिस्ताँवांनीं हे फटाके उडविले असें लोकांचें म्हणणें.

ता. ३० ऑक्टोबर १९६२ रोजीं श्री. रवीन्द्र केळेकर यांच्यासह मी जुनें गोवें येथील बों जेझूस, सां कायतान वगैरेंच्या इगरजी ( चर्चेस ) पाहण्यासाठीं गेलों असतां तेथेंहि फटाक्याचा धूमधडाका चालू असल्याचें आम्हांला आढळलें; म्हणून आम्ही चौकशी केली. तेव्हां, ' प्रार्थना चालू होती, म्हणून फटाके उडविले, ' असें उत्तर मिळालें. त्या उत्तरानें आमचें समाधान झालें नाहीं तें कबूल केलें पाहिजे. कारण प्रार्थना चालू असतांना फटाके उडविण्याची प्रथा तेथें नाहीं. तसें सांगण्याऐवजीं ' सहज गंमत म्हणून फटाके उडविले, ' असें जर त्या लोकांनीं सांगितलें असतें तर तें अधिक योग्य झालें असतें !


आणखी एक घटना. ता. २८ ऑक्टोबर रोजीं मी डिचोली या तालुक्याच्या गांवीं होतों. तेथें त्या दिवशीं रात्रीं एक प्रचंड मिरवणूक किरिस्ताँव मंडळींनीं काढली होती. धो धो पाऊस पडत असतांहि शेंकडों ख्रिस्ती लोक एका हातांत छत्री व दुसऱ्या हातांत पेटलेली मेणबत्ती घेऊन अत्यंत शिस्तींत चालले होते. थाटांत शृंगारलेले अनेक ट्रक्स मिरवणुकींत होते, जोरदार बँड होता आणि

फटाक्यांची सरबत्ती होती. अशा प्रकारची मिरवणूक डिचोलीच्या लोकांनीं पूर्वीं कधीं पाहिली नव्हती. म्हणून ती कसली मिरवणूक आहे, याची आम्ही मिरवणुकींतील कांहीं ट्रक-ड्रायव्हरांकडे चौकशी केली. परंतु त्यांना कांहीं उत्तर देतां आलें नाहीं. 'आम्हांला ट्रक घेऊन यायला सांगितलं म्हणून आम्ही आलों,' असें त्यांनीं सांगितलें. इतरहि कांहीं मंडळींकडे चौकशी केली, परंतु कोणालाच कांहीं सांगतां आलें नाहीं. अखेर एका पाद्रयाकडे चौकशी केली तेव्हां 'आज येशू राजा झाला त्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठीं ही मिरवणूक आहे,' असें त्यानें सांगितलें. ख्रिस्ती पुराणांची माहिती आम्हांला नसल्यामुळें आम्हीं त्याचें तें स्पष्टीकरण मान्य केलें. परंतु गांवच्या लोकांना मात्र तें पटलें नाहीं. ते म्हणाले, "ही सारी लबाडी आहे. भारतावरल्या चिनी आक्रमणाबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठीं आणि सालाझारनं परत यावं म्हणून देवाजवळ प्रार्थना करण्यासाठीं ही मिरवणूक काढलीय् किरिस्तॉवांनीं !"


चिनी आक्रमणाविषयीं खोट्या अफवा पसरवून जनतेंत घबराट व भारताविषयीं अप्रीति निर्माण केल्याबद्दल ख्रिस्ती लोकांना अटक केल्याच्या बातम्या अधूनमधून वृत्तपत्रांत येत असतच.

या बाबतींतील आणखी एक पुरावा म्हणून असें सांगण्यांत आलें कीं, संरक्षण-निधीला उदारपणें साह्य करण्यासाठीं फारच थोडे किरिस्तॉव धनिक पुढें आले आहेत. गोव्यामध्यें हिंदूंप्रमाणेंच ख्रिस्ती जमीनदार (भाटकार) व सावकार आहेत. परंतु भारतावरील चिनी आक्रमणाला प्रतिकार करण्याचें प्रतीक म्हणून पैसा किंवा सोनें देण्याची इच्छा ख्रिस्ती समाजाला होत नाहीं. याचा अर्थ भारत-चीन संघर्षांत त्यांची सहानुभूति भारताकडे नसून पाकिस्तान्यांप्रमाणें चीनकडेच आहे. दुसऱ्या महायुद्धांत ब्रिटनविरुद्ध लढणाऱ्या जर्मनी-जपानविषयीं भारतीयांना जशी छुपी सहानुभूति होती, तशीच कांहींशीं सहानुभूति गोमंतकीय ख्रिश्चनांच्या मनांत चिन्यांविषयीं आहे.

अर्थात् गोव्यांत कांहीं हिंदू मंडळी अशीहि भेटली कीं, ज्यांनीं ख्रिश्चनांच्या या वागणुकीचें दुसऱ्या एका दृष्टिकोनांतून स्पष्टीकरण केलें. ते म्हणाले, "सामाजिक किंवा राजकीय कामासाठीं पदरमोड करण्याची, दोन पैसे उचलून देण्याची गोमंतकीय ख्रिश्चनांना कल्पनाच नाहीं, मग संवय कुठली असणार? कारण ते आदर्श म्हणून ज्या पोर्तुगीजांकडे गेलीं साडेचारशें वर्षें पाहात आले आहेत,



सेंट फ्रान्सिसची शवपेटी ज्या ख्रिस्तमंदिरांत आहे तें हें ' बॉं जेझूस ' ख्रिस्तमंदिर



सेंट फ्रान्सिसचें शव ठेवलेली सोनें-चांदी-रत्नें
यांनीं मढवलेली शवपेटी

त्यांच्यांतच मुळीं ही त्यागभावना नाहीं. धार्मिक-शैक्षणिक बाबतींतहि त्यांना कधीं त्याग करावा लागला नाहीं. कारण त्या साऱ्या बाबींची जबाबदारी सरकारनें उचललेली होती. त्यामुळें सरकारकडून किंवा दुसऱ्यांकडून, फक्त घेणं एवढंच त्यांना माहीत आहे. देण्याची त्यांना कल्पनाच नाहीं, म्हणून हें असं घडतं. याच्या उलट हिंदूंना धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक वगैरे सर्वच कामांसाठीं गेलीं साडेचार शतकं पदरमोड करावी लागली आहे. सरकारकडून कांहीं मदत मिळण्याचं दूरच राहिलं, अडथळेच येत होते. अशा स्थितींत भारत-सरकारकडून आर्थिक मदतीची हांक येतांच ती त्यांच्या हृदयाला भिडली आणि पहिल्या महिन्यांतच माणशीं एक रुपया या हिशेबानं सहा लाखांहूनहि अधिक रुपयांची रक्कम त्यांनीं जमा केली. ही रक्कम मुख्यतः शहरांतल्या सुशिक्षित, श्रीमंत हिंदू लोकांकडून जमलेली आहे. खेड्यापाडयांतून पसरलेल्या गरीब-श्रीमंत लोकांपर्यंत आम्ही जाऊन पोंचलों तर याहूनहि मोठी रक्कम आम्हांला उभी करतां येईल."

## भारतीय मुसलमान व गोमंतकीय किरिस्तॉंव

गोव्यांतील खिश्चनांविषयीं विचार करितांना आपल्या डोळ्यासमोर भारतांतील मुसलमान लोक उभे राहातात. जातीयवादी मुस्लिमपुढारी आणि मुसलमानांचीं मतें मिळावींत म्हणून त्यांना अज्ञानांधःकारांत ठेवणारे स्वार्थी हिंदू पुढारी यांच्यामुळें भारतीय मुसलमान हा अजूनहि भारतीय बनूं शकलेला नाहीं. तो एके काळीं या देशांतील राज्यकर्ता समाज होता आणि आपण संघटित राहिलों तर 'हँसके लिया पाकिस्तान, लढके लेंगे हिंदुस्तान' ही घोषणा आपल्याला खरी करून दाखवितां येईल अशी भावना त्या समाजाच्या अंतःकरणांत कोठेंतरी दबा धरून बसलेली आहे. त्यामुळें आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंधरा वर्षांनींहि स्वातंत्र्यदिनादिवशीं मुस्लिम मोहोल्ल्यांतून पाकिस्तानी झेंडे फडकतात, पाकिस्तानी खेळाडूंच्या विजयाबद्दल इकडे विजयसमारंभ साजरे होतात आणि अधून मधून 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या घोषणा ऐकूं येतात. संरक्षण-निधीला मदत करण्यास भारतीय मुसलमान फार उत्साहानें पुढें आले आहेत, असेंहि दृश्य क्वचितच दिसतें. परंतु या साऱ्या परिस्थितीची जबाबदारी केवळ मुस्लिम पुढाऱ्यांवर टाकत येणार नाहीं. तिच्यांतील फार मोठा वांटा मुसलमांच्या जातीयतेला खतपाणी

वालणाऱ्या येथील राजकीय पक्षांकडे व विशेषतः सत्ताधारी पक्षाकडे जातो. मुसलमानांना भारतीय बनविण्याचे कितीसे पद्धशीर प्रयत्न सत्ताधारी पक्षानें केले ? उलट त्यांना संकुचित जातियवादाच्या गर्तेत ठेवणाऱ्या धार्मिक-जातीय पुढाऱ्यांना जवळ करून मुस्लिम जातीयवादाला सत्ताधारी पक्षानें हातभारच लावलेला नाहीं काय ? साऱ्या भारतीयांसाठीं एकच कायदा करण्याऐवजीं मुस्लिम-ख्रिश्चनांना वगळून फक्त हिंदूसाठीं हिंदूकोड करण्यामुळें आपण भारतीय नाहीं, पाकिस्तानी आहोंत, अशीच भावना मुसलमानांमध्यें निर्माण झाली नाहीं काय ? महाराष्ट्र गुजरात, कर्नाटक वगैरे प्रांतांतील मुसलमानांची मातृभाषा मराठी, गुजराती, कानडी असतांना केवळ त्यांच्या पुढाऱ्यांना खूप करण्यासाठीं मुस्लिम विद्यार्थ्यांचें त्यांत अहित आहे हें दिसत असूनहि राज्य सरकारांनीं मुसलमानांसाठीं वेगळ्या उर्दू शाळा चालविल्या आहेतच ना ? या शाळांतून कसलें शिक्षण दिलें जातें याचीहि आमच्या राज्यकर्त्यांना कल्पना नसते. त्यामुळें भारतमाता किंवा राणा प्रताप–शिवाजीमहाराज अथवा गांधी–नेहरू यांच्याविषयीं अप्रीति निर्माण करणारा मजकूर उर्दू शाळांतील पुस्तकांतून मोठ्या प्रमाणावर असल्याच्या तक्रारी अधूनमधून ऐकावयास व वाचवावयास मिळतात ना ?

## जनतासंपर्क वाढविला पाहिजे

अशा स्थितींत गोमंतकीय खिश्चनांना दोष देण्यांत काय अर्थ ? नव्या परिस्थितीशीं समरस होण्यास त्यांना थोडा अवधि लागेल हें गृहीतच धरलें पाहिजे. मात्र या अवधींत सरकारनें व सामाजिक–राजकीय कार्यकर्त्यांनीं या समाजाचें हार्द समजून घेण्याचा व त्याला आपलेसें करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या कामीं कोंकणी भाषेचें चांगलें साह्य होईल, हें मराठीवादी मंडळींनाहि उमगेल. अर्थात् कोंकणीवाद्यांनींहि हें पाहिलें पाहिजे कीं कोंकणीचा पुरस्कार करतांना आपण खिस्ती समाजाला कायमचें हिंदूंपासून दूर राहण्यास मदत तर करीत नाहीं ना ? कोंकणीच्यामार्फत त्यांच्यामध्यें मराठी व हिंदीचा भरपूर प्रचार केला गेल्यास त्यांच्यांतील व हिंदूंतील अंतर पुष्कळच कमी होईल. परंतु याच्याउलट कोंकणी हें आपलें पुढारीपण व वेगळेपण टिकवण्याचें एक साधन आहे, या भावनेनें काम केलें गेल्यास गोव्यांतील खिश्चनांची अवस्था महाराष्ट्रांतील मुसलमानांसारखीच होईल. सुदैवानें हातावर मोजण्याइतकेच कां असेनात,

राष्ट्रवादी ख्रिस्ती कार्यकर्ते आज गोमंतकांत विद्यमान आहेत. त्यांनीं मनावर घेतल्यास हें संकट टाळणें सहज शक्य होईल.

## फिरंगी संस्कृतीचीं वैशिष्ट्यें कोणतीं ?

गोमंतक भारतांत समाविष्ट झाल्यानंतरहि त्याचें वैशिष्ट्य ( identity ), सांस्कृतिक वेगळेपणा ( individuality ) टिकवून धरण्यांत येईल असें आश्वासन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनीं वेळोवेळीं दिलें असल्यामुळें त्या आश्वासनाचा अर्थ समजून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

'गोव्याचें सांस्कृतिक वेगळेंपण' असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां तें कोणाचें वेगळेंपण असतें ? हिंदूंचें ? किरिस्तावांचें ? कीं उभयतांचें ? गोमंतकांतील हिंदू हे सावंतवाडी–मालवण–वेंगुर्लें व कारवार–सुपा–हल्याळ या भागांतील हिन्दूंपेक्षां सांस्कृतिकदृष्ट्या वेगळे आहेत काय ? त्यांचे आचार–विचार, देवधर्म, बोली–भाषा, संवयी वगैरेंचा विचार करितां ते सर्वसामान्य कोंकणी हिंदूंहून कांहीं वेगळे आहेत, असें मानण्यास फारसा आधार नाहीं. त्यांच्यावर मराठी भाषा व साहित्य, महाराष्ट्रीय पेहेराव, आणि महाराष्ट्रांतील संत व वीरपुरुष यांचीं जीवनें या सर्वांचा प्रभाव इतका स्पष्टपणें दिसून येतो कीं कोणीहि पूर्वग्रहरहित तटस्थ व्यक्ति त्यांना महाराष्ट्रीयच समजेल. अर्थात् इंग्रजांकडून त्यांच्या शिष्टाचारांतील कांहीं भाग जसा भारतांतील सुशिक्षितांनीं गुलामी वृत्तीनें किंवा योग्य व आवश्यक म्हणून उचलला आहे, तसा गोव्यांतील हिंदूंनीं बराबाहेरील वागणुकींत थोडाफार भाग पोर्तुगीजांच्या शिष्टाचारांतून उचलला असल्यास त्यावरून त्यांनीं फिरंगी संस्कृतीचा अंगीकार केला आहे असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय भाषा व पेहेराव वगैरे बाबतींत पोर्तुगीज संस्कृतीचें जें श्रेष्ठत्व गोमंतकीय हिंदूंनीं नाइलाजानें व लाचारीनें स्वीकारलें होतें तेंहि ते मोठ्या प्रमाणावर झपाट्यानें झुगारून देत आहेत, असें स्वातंत्र्यानंतर एका वर्षानें तेथें गेलेल्या बाहेरच्या माणसाला चट्‌दिशीं दिसून येतें.

याचा अर्थ असा कीं, गोमंतकीय हिन्दूंचें फिरंगी संस्कृतीवर कधींच प्रेम नव्हतें व आजहि नाहीं; आणि तिचें विलयन झालें तर त्याबद्दल त्यांना कांहींच सोयरसुतक वाटणार नाहीं.

परंतु सुमारें सव्वादोन लाख गोमंतकीय किरिस्तॉवांवर मात्र फिरंगी संस्कृतीचा

जबरदस्त प्रभाव पडलेला आहे, हें नाकारतां येणार नाहीं. हा प्रभाव त्यांनीं स्वेच्छेनें किंवा आनंदानें स्वीकारला होता असें नव्हे. पोर्तुगीज राजसत्ता व धर्मसत्ता यांनीं संगनमत करून तो त्यांच्यावर लादला होता. पोर्तुगीजांनीं आपले आचार–विचार, भाषा, पेहेराव, खाणें-पिणें, नांवें, आडनांवें वगैरे गोमंतकीय खिश्चनांवर लादलीं आणि त्यांना काळे पोर्तुगीज बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हिंदूंना प्रथम बळजबरीनें बाटवून त्यांना किरिस्तॉंव बनवावयाचें आणि मग त्यांच्यावर पोर्तुगीज संस्कृति थापावयाची, अशी ती प्रक्रिया होती. बाट-लेल्या माणसांनीं आपलीं जुनीं नांवें बदलून नवीं पोर्तुगीज नांवें धारण केलीं पाहिजेत, पुरुषांनीं धोतरें व स्त्रियांनीं चोळ्या न वापरतां पाटलोणी व झगे वापरले पाहिजेत, त्यांनीं गोमांस व डुकराचें मांस खाल्लें पाहिजे, दारू प्याली पाहिजे, वगैरे बंधनें तर पोर्तुगीजांनीं व त्यांच्या क्रूर पाद्र्यांनीं गोमंतकीयांवर लादलींच, परंतु माणसाला प्राणांहून प्रिय असणारी मातृभाषाहि त्यांनीं गोमं-तकीयांकडून हिरावून घेतली आणि त्यांना घरीं–दारीं पोर्तुगीज भाषा बोलण्यास भाग पाडलें. अशा स्थितींत गोमंतकीय खिस्ती, भारतीय उरला असता तरच आश्चर्य !

अर्थात् १९१० सालीं पोर्तुगालमध्यें लोकशाही पद्धतीची राज्यक्रांति झाल्या-नंतर हा छळ व जुलमजबरदस्ती कांहींशीं कमी झाली आणि सामान्य खिस्ती लोक आपल्या शेजाऱ्या–पाजाऱ्यांची कोंकणी भाषा बोलूं लागले. परंतु वरिष्ठ वर्गांतील किरिस्तॉंवांनीं पोर्तुगीज भाषेला मातृभाषा म्हणून जें स्वीकारलें होतें तें सोडलें नाहीं. आजहि गोव्यांत अशीं पुष्कळ खिस्ती घराणीं सांपडतील कीं जीं आचरणानें व मनानें पोर्तुगीज बनलेलीं आहेत. ते लोक घरांतहि पोर्तुगीज भाषा बोलतात. मात्र अशा लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेनें थोडीच अस-णार, हें उघड आहे. आतां ती मंडळी आपल्या मुलांना इंग्रजी शाळांतून पाठवीत आहेत, याचा अर्थ भारतांतील ॲंग्लो–इंडियन जमातीप्रमाणें इंडो–पोर्तुगीजांची ही एक लहानशी जमात भारतांत राहाणार आहे. तशी ती राहिली तरी त्याबद्दल काळजी करण्याचें विशेष कारण नाहीं, असें मला वाटतें. कारण कालांतरानें इंग्रजीचें माहात्म्य कमी होतांच या इंग्रज–इंग्रजी-धार्जिण्या जमाती आपोआप भारतीय बनतील हें उघड आहे.

बहुसंख्य खिस्ती जनता मात्र फार लवकर भारतीय बनेल अशीं लक्षणें

दिसत आहेत. तिला महाराष्ट्रांतील कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट खिस्ती समाजाशीं मिसळण्याची संधि मिळाल्यास ती झपाट्यानें भारतीय व महाराष्ट्रीय बनेल, यांत शंका नाहीं.

मध्यंतरीं कांहीं दिवसांपूर्वीं राष्ट्रीय एकात्मतासमितीचे अध्यक्ष डॉक्टर संपूर्णानंद यांनीं मुसलमानांमध्यें भारतीयता निर्माण होण्याचा एक उपाय म्हणून अशी सूचना केली होती कीं, मुसलमानांनीं अरबी नांवांचा त्याग करून भारतीय नांवें धारण करावींत. वस्तुतः ही अत्यंत मोलाची सूचना होती. परंतु तिचा स्वीकार किंवा पाठपुरावा केल्यास भारतांतील मुसलमानांची नाराजी होईल या भीतीनें कोणत्याच राजकीय पक्षानें तिचा पाठपुरावा केला नाहीं. गोव्याच्या खिश्चनांच्या बाबतींतहि हीच सूचना मला मांडावीशी वाटते. गोमंतकीय खिश्चनांना पोर्तुगीज बनविण्यासाठीं पोर्तुगीजांनीं त्यांना लॅटिन नांवें दिलीं. आतां त्यांना पुन्हां भारतीय बनवावयाचें असेल तर त्यांचा धर्म कायम ठेवून त्यांना भारतीय नांवें घेण्यास प्रोत्साहन दिलें पाहिजे. अरबी प्रदेशांतील खिस्ती लोक (खलील जिब्रानसारखे खिस्तभक्तहि) अरबी नांवें धारण करण्यांत अभिमान बाळगतात. महाराष्ट्रांत टिळक, मोडक, सूर्यवंशी वगैरे प्रामाणिक खिस्ती आहेतच. अशा स्थितींत गोमंतकीय खिश्चनांनीं शुद्ध उच्चारतांहि न येणारीं नांवें टाकून भारतीय नांवें धारण केलीं तर त्यांच्या धार्मिकतेंत कसलाहि उणेपणा येणार नाहीं, हें त्यांच्यांतील बुद्धिवादी पुढाऱ्यांनीं त्यांना पटवून दिलें पाहिजे. कॅथॉलिक पाद्रयांच्या वर्चस्वाखालीं असलेल्या सावंतवाडी, कोल्हापूर वगैरे भागांतील खिस्ती लोकांनीं अँटनीचें अनंत, फ्रान्सिसचें परशुराम वगैरे लोकसुलभ रूपांतरें केलींच आहेत. त्या पद्धतीनेंहि ही प्रक्रिया घडून येऊं शकेल. अर्थात् राज्यकर्त्यांनीं फाजील उदारतेच्या आहारीं जाऊन किंवा सत्ताधारी पक्षानें मतें मिळविण्याच्या मोहाला बळी पडून, नाइलाजानें अभारतीय बनलेल्या या समाजाला तसेंच ठेवण्याचा प्रयत्न केला नाहीं, तरच हें शक्य होईल. जी गोष्ट नांवांच्या बाबतींत तीच पोषाख, खाणें-पिणें वगैरे बाबतींत सांगतां येईल.

## काळ्या ढगाची रुपेरी कडा

भारतीय राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें विचार करतां गोमंतकीय खिस्ती समाजाची आजची स्थिति पुष्कळच निराशाजनक व काळोखानें भरलेली आहे, हें मान्य

करावें लागतें. या काळ्या ढगालाहि कांहीं रुपेरी कडा आहेत व त्या कडांचा योग्य प्रकारें विस्तार होत गेल्यास ढगाचा काळेपणा कालांतरानें नाहींसा होऊं शकेल, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

यांपैकीं महत्त्वाची रुपेरी कडा म्हणजे गोमंतकीय खिश्चनाला आपल्या मातृभूमीबद्दल–गोव्याबद्दल–वाटणारी विलक्षण ओढ. गोव्याचा खिश्चन, जगाच्या पाठीवर कुठेंहि गेला तरी त्याचें मन गोव्यांतील आपल्या झावळांच्या खोपटांत किंवा इवल्याशा घरकुलांतच गुंतलेलें असतें. आपलें घर व घराणें टिकून राहावें, यासाठीं प्रसंगीं स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊनहि तो घरीं पैसे पाठवितो. त्याच्या या मातृभूमिप्रेमांतूनच त्यास राष्ट्रभक्तीचें बाळकडू पाजविणें शक्य आहे. पोर्तुगाल व पोर्तुगीज यांच्याशीं कायावाचामनानें एकरूप झालेले बहुसंख्य खिस्ती लोक पोर्तुगालला निघून गेले आहेत. आतां येथें उरलेले लोक गोमंतकाला आपली मातृभूमि व कर्मभूमि मानून त्याच्याद्वारें भारताच्या सेवेंत आयुष्य घालविणार आहेत, असें समजण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्यांच्या मनांत भारताविषयीं आत्मीयता निर्माण करणें जड जाऊं नये. मात्र तसा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे, व त्यासाठीं प्रथम त्यांच्या मनांतील भीति नाहींशी केली पाहिजे.

दुसरी रुपेरी कडा म्हणजे कोंकणी भाषेविषयीं त्यांना वाटणारी आत्मीयता. कोंकणीहि न येणारे खिस्ती लोक गोव्यांत आहेत, त्यांना फक्त पोर्तुगीज किंवा इंग्रजीच येते, हें खरें; परंतु त्यांची संख्या अगदींच हाताच्या बोटांवर मोजतां येईल एवढी आहे. इतर बहुतेक किरिस्तॉंव कोंकणीच बोलतात. अर्थात् त्यांची कोंकणी हिंदूच्या कोंकणीहून अगदीं भिन्न आहे. तिच्यांत केवळ पोर्तुगीज शब्दांचाच अधिक भरणा आहे असें नव्हे, तर तिची वाक्यरचनाहि पोर्तुगीज धर्तीची असून तिचें उच्चारणहि ते लोक पोर्तुगीज उच्चारणाच्या धर्तीवर करतात. त्यामुळें बॉबकट केलेल्या, आंखूड झगा घातलेल्या, कपाळाला कुंकू नसलेल्या छटेल किरिस्तॉंव छोकरीसारखी ती भासते, हेंहि खरें. परंतु तिचा आत्मा अद्यापि भारतीय आहे. आतां पोर्तुगीजांचा संपर्क तुटल्यानंतर त्यांना मराठीच्या संपर्कांत येण्याची संधि प्रयत्नपूर्वक दिली गेल्यास त्यांच्या भाषेवरील विदेशीपणाचा पगडा कमी होऊन ती अधिकाधिक भारतीय बनूं लागेल, अशी आशा करण्यास हरकत नसावी. हें काम घिसाडघाईनें होऊं शकणार नाहीं, हें स्पष्ट

आहे. परंतु त्या दिशेनें पावलें टाकण्यांत विलंब होऊं नये. त्यांतील पहिलें पाऊल म्हणजे 'तुमची संस्कृति वेगळी, तुमची भाषा वेगळी, तिचं रक्षण आम्ही करणार आहोंत,' हा प्रचार प्रथम बंद करावा आणि 'तुम्ही संस्कृतीनं भारतीयच आहांत, तुमची भाषाहि भारतीयच आहे,' असा अधिक वास्तववादी प्रचार सुरू करावा. यायोगें किरिस्तॉवांना हिंदूंपासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न करणारे पाद्री चिडतील, कांगावा करतील, पण त्यांना भीक घालतां कामा नये.

## हिंदूंतील जातीयता व उच्चनीच भाव

भारतांतील इतर हिंदूंप्रमाणेंच गोमंतकीय हिंदूंसमोरहि जाति-निर्मूलनाची समस्या आ वासून उभी आहेच. परंतु धर्मप्रसारक ख्रिस्ती मिशनरी व विधर्मी राज्यकर्ते यांच्या रूपानें एक जबरदस्त समान शत्रु समोर उभा होता तोंपर्यंत जातिभेद व उच्चनीच भाव हे एक प्रकारें आंतल्या आंत दबलेले राहिले. पददलितांनीं त्याविरुद्ध कधीं आवाज काढला नाहीं. त्यामुळें गोव्यांत एक गैरसमजहि पसरला. तो असा कीं महाराष्ट्राप्रमाणें आपल्या येथें जातीयता किंवा जातीय कटुता नसून सगळें आबादीआबाद आहे. गोमंतकांत ब्राह्मण (सारस्वत), भाटकार (जमीनदार) व त्यांचे गावडे–कुणबी गुणकार अथवा मागेली (कुळ) यांचे संबंध किती सलोख्याचे आहेत, याची वर्णनें आजपर्यंत खूप ऐकण्यांत येत होतीं. परंतु स्वातंत्र्य येतांच त्याचा पहिला परिणाम या संबंधांवर झालेला दिसून येतो. एका वर्षांतच जमीनमालक व कुळ यांचे संबंध भारतांतील इतर प्रदेशांतील जमीनमालक व कुळ यांच्या संबंधांसारखे बनले आहेत. हीच गोष्ट सामाजिक, धार्मिक बाबतींतहि घडत आहे.

## अस्पृश्यांचा प्रश्न

आजवर राजकीय दडपणामुळें जातीय विषमता लपून राहिली. ती आतां वर येऊं लागली आहे. ब्राह्मणेतर समाजांत जसजसा शिक्षणाचा प्रसार वाढूं लागेल तसतशी सारस्वतांची परंपरागत श्रेष्ठत्वाची मक्तेदारी नाहींशी होऊं लागेल. त्या दृष्टीनें त्यांनीं जर आपण होऊन समतेच्या दिशेनें पावलें टाकलीं तर तें सर्वांनाच लाभदायक ठरेल. आज गोमंतकांत हरिजनांची स्थिति महाराष्ट्रांतल्या अस्पृश्यां-इतकीं नसली तरी पुष्कळच दयनीय आहे. मंदिरें, तळीं, विहिरी वगैरे सार्व-

करावें लागतें. या काळ्या ढगालाहि कांहीं रुपेरी कडा आहेत व त्या कडांचा योग्य प्रकारें विस्तार होत गेल्यास ढगाचा काळेपणा कालांतरानें नाहींसा होऊं शकेल, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

यांपैकीं महत्त्वाची रुपेरी कडा म्हणजे गोमंतकीय ख्रिश्चनाला आपल्या मातृभूमीबद्दल–गोव्याबद्दल–वाटणारी विलक्षण ओढ. गोव्याचा ख्रिश्चन, जगाच्या पाठीवर कुठेंहि गेला तरी त्याचें मन गोव्यांतील आपल्या झावळांच्या खोपटांत किंवा इवल्याशा घरकुलांतच गुंतलेलें असतें. आपलें घर व घराणें टिकून राहावें, यासाठीं प्रसंगीं स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊनहि तो घरीं पैसे पाठवितो. त्याच्या या मातृभूमिप्रेमांतूनच त्यास राष्ट्रभक्तीचें बाळकडू पाजविणें शक्य आहे. पोर्तुगाल व पोर्तुगीज यांच्याशीं कायावाचामनानें एकरूप झालेले बहुसंख्य ख्रिस्ती लोक पोर्तुगालला निघून गेले आहेत. आतां येथें उरलेले लोक गोमंतकाला आपली मातृभूमि व कर्मभूमि मानून त्याच्याद्वारें भारताच्या सेवेंत आयुष्य घालविणार आहेत, असें समजण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्यांच्या मनांत भारताविषयीं आत्मीयता निर्माण करणें जड जाऊं नये. मात्र तसा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे, व त्यासाठीं प्रथम त्यांच्या मनांतील भीति नाहींशी केली पाहिजे.

दुसरी रुपेरी कडा म्हणजे कोंकणी भाषेविषयीं त्यांना वाटणारी आत्मीयता. कोंकणीहि न येणारे ख्रिस्ती लोक गोव्यांत आहेत, त्यांना फक्त पोर्तुगीज किंवा इंग्रजीच येते, हें खरें; परंतु त्यांची संख्या अगदींच हाताच्या बोटांवर मोजतां येईल एवढी आहे. इतर बहुतेक किरिस्तॉंव कोंकणीच बोलतात. अर्थात् त्यांची कोंकणी हिंदूंच्या कोंकणीहून अगदीं भिन्न आहे. तिच्यांत केवळ पोर्तुगीज शब्दांचाच अधिक भरणा आहे असें नव्हे, तर तिची वाक्यरचनाहि पोर्तुगीज धर्तीची असून तिचें उच्चारणहि ते लोक पोर्तुगीज उच्चारणाच्या धर्तीवर करतात. त्यामुळें बॉबकट केलेल्या, आंखूड झगा घातलेल्या, कपाळाला कुंकू नसलेल्या छटेल किरिस्तॉंव छोकरीसारखी ती भासते, हेंहि खरें. परंतु तिचा आत्मा अद्यापि भारतीय आहे. आतां पोर्तुगीजांचा संपर्क तुटल्यानंतर त्यांना मराठीच्या संपर्कांत येण्याची संधि प्रयत्नपूर्वक दिली गेल्यास त्यांच्या भाषेवरील विदेशीपणाचा पगडा कमी होऊन ती अधिकाधिक भारतीय बनूं लागेल, अशी आशा करण्यास हरकत नसावी. हें काम घिसाडघाईनें होऊं शकणार नाहीं, हें स्पष्ट

आहे. परंतु त्या दिशेनें पावलें टाकण्यांत विलंब होऊं नये. त्यांतील पहिलें पाऊल म्हणजे ‘तुमची संस्कृति वेगळी, तुमची भाषा वेगळी, तिचं रक्षण आम्ही करणार आहोंत,’ हा प्रचार प्रथम बंद करावा आणि ‘तुम्ही संस्कृतीनं भारतीयच आहांत, तुमची भाषाहि भारतीयच आहे,’ असा अधिक वास्तववादी प्रचार सुरू करावा. यायोगें किरिस्तॉवांना हिंदूपासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न करणारे पाद्री चिडतील, कांगावा करतील, पण त्यांना भीक घालतां कामा नये.

## हिंदूंतील जातीयता व उच्चनीच भाव

भारतांतील इतर हिंदूंप्रमाणेंच गोमंतकीय हिंदूंसमोरहि जाति-निर्मूलनाची समस्या आ वासून उभी आहेच. परंतु धर्मप्रसारक खिस्ती मिशनरी व विधर्मी राज्यकर्ते यांच्या रूपानें एक जबरदस्त समान शत्रु समोर उभा होता तोंपर्यंत जातिभेद व उच्चनीच भाव हे एक प्रकारें आंतल्या आंत दबलेले राहिले. पददलितांनीं त्याविरुद्ध कधीं आवाज काढला नाहीं. त्यामुळें गोव्यांत एक गैरसमजहि पसरला. तो असा कीं महाराष्ट्राप्रमाणें आपल्या येथें जातीयता किंवा जातीय कटुता नसून सगळें आबादीआबाद आहे. गोमंतकांत ब्राह्मण (सारस्वत), भाटकार ( जमीनदार ) व त्यांचे गावडे–कुणबी गुणकार अथवा भागेली (कुळ) यांचे संबंध किती सलोख्याचे आहेत, याची वर्णनें आजपर्यंत खूप ऐकण्यांत येत होतीं. परंतु स्वातंत्र्य येतांच त्याचा पहिला परिणाम या संबंधांवर झालेला दिसून येतो. एका वर्षातच जमीनमालक व कुळ यांचे संबंध भारतांतील इतर प्रदेशांतील जमीनमालक व कुळ यांच्या संबंधांसारखे बनले आहेत. हीच गोष्ट सामाजिक, धार्मिक बाबतींतहि घडत आहे.

## अस्पृश्यांचा प्रश्न

आजवर राजकीय दडपणामुळें जातीय विषमता लपून राहिली. ती आतां वर येऊं लागली आहे. ब्राह्मणेतर समाजांत जसजसा शिक्षणाचा प्रसार वाढूं लागेल तसतशी सारस्वतांची परंपरागत श्रेष्ठत्वाची मक्तेदारी नाहींशी होऊं लागेल. त्या दृष्टीनें त्यांनीं जर आपण होऊन समतेच्या दिशेनें पावलें टाकलीं तर तें सर्वांनाच लाभदायक ठरेल. आज गोमंतकांत हरिजनांची स्थिति महाराष्ट्रांतल्या अस्पृश्यां-इतकी नसली तरी पुष्कळच दयनीय आहे. मंदिरें, तळीं, विहिरी वगैरे सार्व-

जनिक ठिकाणीं हरिजनांना मुक्त प्रवेश मिळत नाहीं. ( कांहीं देवळांतून वर्षांतून एकदां हरिजनांना प्रवेश मिळतो, परंतु त्यानंतर देऊळ गोमूत्र वगैरेंच्या साह्यानें पुन्हा शुद्ध केलें जातें. ) गोव्यांतील महत्त्वाच्या देवळांमध्यें हरिजनांनाच प्रवेश मिळत नाहीं, असें नव्हे तर भटाब्राह्मणांखेरीज इतरांनाहि कमी लेखलें जातें. यामुळें सोनार, वैश्य, क्षत्रिय, भंडारी वगैरे इतर सवर्णांनीं आपापल्या जमातींचीं देवळें उभारलेलीं असून ते आपापल्या देवळांतील कुलदैवतांची पूजा आपल्या जातींतील ' भटां 'कडूनच करवितात. अशा स्थितींत हरिजनांनीं मडगांव येथें आपलें असें वेगळें श्रीकृष्णाचें मंदिर बांधलें असल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. दामोदरन् संजीवय्या यांनीं गोमतकांतील शांतादुर्गा, मंगेशी वगैरे मंदिरांत जाऊन देवदर्शन घ्यावें अशी लोकांनीं मागणी केली होती; परंतु त्यांचा कार्यक्रम आंखणाऱ्या स्वागत-समितीनें देवदर्शनाचें कलमच वगळलें होतें आणि लोकांच्या भावना दुखवून आपण मंदिरप्रवेश करूं इच्छित नाहीं, अशी समंजस व उदारपणाची भूमिका श्री. संजीवय्या यानीं घेतली व मडगांव येथील हरिजन–श्रीकृष्णाचें दर्शन घेण्यावरच समाधान मानलें, अशी बोलवा आहे. अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अध्यक्षांची जिथें ही स्थिति तिथें सामान्य दरिद्री हरिजनांची काय अवस्था असेल त्याची कल्पनाच केलेली बरी ! गोमंतकीय हिंदू समाज हा भारतांतील इतर हिंदूंच्या मानानें अधिक उदार, सर्वसमावेशक, थोर मनाचा आहे, असा डंका ज्यांनीं पिटला त्याचे डोळे या घटनांनीं उघडतील अशी आशा आहे.

गोव्यांत हिंदूंच्या सुमारें दोन हजार जाती–पोटजाती आहेत असें म्हटलें जातें. त्यांत सारस्वत, भट, वैश्य, सोनार, शिंपी, वगैरे उच्चवर्णीयांप्रमाणेंच गावडे, भंडारी, सुदिर (शूद्र ), कोळी, मराठा गायक ( कलावंत ) , कुणबी वगैरे इतर अनेक जमाती असून त्यांच्यांत भावनात्मक ऐक्य निर्माण करण्यासाठीं गोमंतकीय कार्यकर्त्यांनीं कंबर कसली पाहिजे. त्या कामीं महाराष्ट्रांतील समाज-सेवकांकडून त्यांना चांगलें सहकार्य मिळेल.

## गोमंतक मराठा समाजाची समस्या

वर उल्लेखिलेल्या जातिभेदाच्या समस्या साऱ्या हिंदू समाजालाच लागू होणाऱ्या असल्यामुळें त्यांचा नुसता उल्लेख केला आहे. परंतु गोव्याच्या

स्वतःच्या अशा कांहीं सांस्कृतिक–सामाजिक समस्याहि आहेत. त्यांचाहि समाज-धुरीणांनीं धीटपणें विचार केला पाहिजे. त्यांपैकीं एका समस्येचा उल्लेख या ठिकाणीं थोड्या विस्तारानें करावयाचा आहे. कारण तिची नीट कल्पना आपल्याला नाहीं.

ही समस्या गोमंतक मराठा समाजाची समस्या आहे. या समाजाला 'कलावंत समाज' वगैरे इतरहि अनेक नांवें आहेत. परंतु या समाजानें आतां स्वतःसाठीं 'गोमंतक मराठा समाज' असें नांव स्वीकारलें असल्यामुळें तें नांव येथें वापरण्यांत आलेलें आहे. गोव्यांतील देवळांतून देवाची सेवा म्हणून नृत्य व गायन करणाऱ्या स्वतंत्र स्त्रिया (कलावंतिणी) असत. त्यांना भाविणी किंवा देवदासी असें म्हणत. देवळाशीं संबंधित पुजारी, महाजन किंवा भक्त यांच्या विषयवासनांची तृप्ती करण्याचीहि जबाबदारी त्यांच्यावर असे. या शरीरसंबंधांतून निर्माण झालेली संतति म्हणजेच हा गोमंतक मराठा समाज. गोवा आणि त्याच्या आसपासचे प्रदेश मिळून या समाजाची लोकसंख्या सुमारें ५० हजार असावी, असें म्हणतात.

देवदासी ही दुकान थाटून बसलेली वेश्या नव्हती. बहुतेकदां एखाद्या शेठला धरून जन्मभर त्याच्याशीं पत्नीच्या नात्यानें ती राहात असे; परंतु ती देवाला वाहिलेली असल्यामुळें तिचें कायदेशीर लग्न होत नसे; आणि म्हणून तिची संतति ही बेकायदाच गणली जाई. त्यांपैकीं मुली या पुन्हां देवदासी किंवा कलावंतिणी बनून आपल्या आईचा धंदा पुढें चालवीत आणि मुलगे आपल्या कुटुंबावर किंवा समाजावर भार बनून निष्क्रिय जीवन कंठीत. कधींकधीं त्यांतून साजिंदे (गायनांतील साथीदार) तयार होत. परंतु एकूण विचार करतां त्यांचें जीवन दुर्दैवीच असे. त्यांचीं लग्नें होऊं शकत नसत. त्यामुळें त्यांच्यांतहि अनीति बोकाळे. या सर्व परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठीं या समाजांतील पुरुषांनीं कंबर कसली. आणि आपल्या समाजांतील मुलींनीं कलावंतिणी न बनतां गृहिणी बनावें असा प्रचार सुरू केला. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत या प्रचाराला चांगलें फळ येऊन कलावंत समाजांतील मुली–मुलें लग्नें करूं लागलीं आणि शरीरविक्रय करणाऱ्या देवदासींची संख्या घटूं लागली. आज या समाजांत पुष्कळच कर्तबगार पुरुष निर्माण झाले आहेत आणि बहुतेक मुली शिकून, गृहिणी बनत आहेत. परंतु हा समाज तुच्छ मानला गेल्यामुळें तथाकथित वरिष्ठ समाजांशीं त्याचा

रोटी-बेटी व्यवहार होत नाहीं, व याची त्या समाजाला भयंकर खंत वाटते. वस्तुतः स्वतःला कलासक्त म्हणविणाऱ्या गोमंतकीयांनीं या बाबतींत पुढें येऊन या समाजाला आपल्याशीं एकरूप बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु बहुतेकांची सहानुभूति ही केवळ शाब्दिकच असते असा अनुभव आहे. आज गोव्यांत भाविणी किंवा देवदासी अशा फार थोड्या उरल्या आहेत. सुस्वरूप व गायन वादनांत प्रवीण असलेल्या बहुतेक देवदासी मुंबईस जाऊन स्थायिक झाल्या आहेत. केवळ नाइलजानें किंवा धार्मिक श्रद्धेमुळें देवळांत सकाळ–संध्याकाळ आरतीच्या वेळीं भजनें गाणाऱ्या किंवा पालखीपुढें नृत्य करणाऱ्या कांहीं रूप-हीन, वयस्कर व गरीब देवदासी आढळतात; परंतु त्यांनाहि या व्यवसायांतून मुक्त करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

देवदासींप्रमाणेंच देवळाची झाडलोट, दिवाबत्ती वगैरे करणारा देवळी समाज आणि खासगी रखेल्यांपासून निर्माण झालेली संतति यांच्यापुढेंहि हीच समस्या विद्यमान आहे.

## केरळांतील उदाहरण

या संकर–संततीचा विचार करीत असतां केरळमधील नायर–मेनन जमातीचें स्मरण आपल्याला झाल्याशिवाय राहात नाहीं. नंबुद्री ब्राह्मणांमध्यें फक्त थोरल्या भावानेंच लग्न करण्याची प्रथा पूर्वी रूढ होती. इतर भाऊ नायर–मेनन जमातींतील स्त्रियांशीं शरीरसम्बन्ध ठेवीत. याला ‘सम्बन्धम्’ असें म्हणत. केरळांत मातृ-सत्ताक समाज–व्यवस्था प्रचलित असल्यामुळें या संबंधांतून जन्मास येणारी संतति ही स्वाभाविकपणेंच नायर–मेनन बने. परंतु अशा संबंधां-बद्दल तेथील लोकमानसांत तुच्छता किंवा तिरस्कार कधींच निर्माण झाला नाहीं. उलट नंबुद्री ब्राह्मणाशीं असा संबंध येणें ही एक मोठेपणाची किंवा वांच्छनीय गोष्टच समजली जात असे. कालांतरानें ही प्रथा नाहींशी झाली आणि नायर–मेनन यांचीं आपापल्या जमातींत लग्नें होऊं लागलीं. मला वाटतें, गोमंतकीय मराठा समाजाच्या बाबतींतहि इतर लोकांनीं हीच भूमिका घेतली पाहिजे. अर्थात् रक्तशुद्धतेचे व वांशिक श्रेष्ठत्वाचे खोल संस्कार ज्यांवर झालेले आहेत असे गोमंतकीय भट व सारस्वत या कामासाठीं इतक्या लौकर पुढें येतील अशी अपेक्षा बाळगणें व्यर्थ आहे. परंतु महाराष्ट्रांतील इतर शिक्षित समाजांनीं या

बाबतींत पुढाकार घेतल्यास ही समस्या लौकर सुटेल, अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

## वेगळ्या व्यक्तिमत्वाचा भ्रम सोडला पाहिजे

सारांश गोमतकांतील सांस्कृतिक व सामाजिक समस्या कांहीं बाबतींत थोड्या वेगळ्या स्वरूपाच्या असल्या तरी तेवढ्यावरून गोव्याला एक वेगळें व्यक्तिमत्व (individuality किंवा identity) आहे असें मानण्यास सबळ पुरावा नाहीं. फिरंगी राज्यकर्त्यांनीं गोमंतकीय ख्रिस्त्यांचें विराष्ट्रीकरण (denationalisation) करण्यांत पुष्कळ यश मिळविलें असलें तरी पद्धतशीरपणें प्रयत्न केल्यास त्याचें पुन्हां राष्ट्रीकरण करणें अशक्य नाहीं. त्यासाठीं त्यांनीं आजच्या स्थितींतच राहावें, असा प्रयत्न करण्याचें सोडून दिलें पाहिजे. कांचघरांमध्यें कृत्रिम हवामान निर्माण करून जगाच्या पाठीवरील कोणतीहि वनस्पति कोठेंहि वाढवितां येते. परंतु तें कृत्रिम वातावरण काढून टाकल्यास ती वनस्पति मरून जाते. गोमंतकीय ख्रिस्त्यांनीं दडपणाखालीं स्वीकारलेली फिरंगी संस्कृति, केवळ आम्ही किती उदार आहोंत हें जगाला दिसावें म्हणून कृत्रिम मार्गांनीं टिकवून ठेवण्यांत कांहीं फायदा आहे, असें मला वाटत नाहीं. उलट तसें केल्यास भारतीय समाजाशीं एकरूप बनूं इच्छिणाऱ्या किरिस्तॉंवांच्या मार्गांत त्यामुळें भावनिक अडथळा निर्माण होईल. आदिवासींची संस्कृति (त्यांचें नृत्य, गायन वगैरे) टिकविली पाहिजे असें म्हणणाऱ्या लोकांना आचार्य दादा धर्माधिकारी जें सांगतात, तेंच गोमंतकाची वेगळी संस्कृति टिकवावी, असें म्हणणाऱ्यांना सांगतां येईल. दादा म्हणतात, "आदिवासी लोकांना तुमच्याप्रमाणें सुसंस्कृत बनण्याची इच्छा असेल तर त्यांना जबरदस्तीनें आदिवासी ठेवण्यांत काय अर्थ ? त्याऐवजीं तुम्हांला त्या संस्कृतीचें फारच प्रेम असेल तर तुम्ही तिचा स्वीकार करा; तुमच्या मुलांबाळांना आदिवासी नृत्य-गायन शिकवा."

आज गोमंतकीय ख्रिश्चनांना भारतीय संगीत कळत नाहीं, आवडत नाहीं. त्यांच्याकरतां गोवा आकाशवाणीवरून तासन् तास पश्चिमी संगीत वाजविलें जातें. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेऊन भारतीय संगीताला अधिक लोकसुलभ बनविण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं, पाश्चात्य संगीत जाणणाऱ्यांची वेगळी जात कायम ठेवण्यांत काय अर्थ आहे ? त्याऐवजीं पाश्चात्य संगीताला जवळ असणाऱ्या सिनेसंगीताच्या द्वारें त्यांच्यांत भारतीय संगीताची आवड निर्माण

करण्याचा प्रयत्न अधिक योग्य ठरणार नाहीं काय ?

हीच गोष्ट कपडे–लत्ते, आहारविहार वगैरे बाबतींतहि लागू पडते. आपल्या देशांत या बाबतींत भरपूर विविधता पूर्वीपासूनच विद्यमान आहे. गोमंतकीय ख्रिश्चनांनीं बुटासुटांत राहून, टेबलावर बसून, कांट्याचमच्यांनीं डुकरें खाल्लीं किंवा मद्यपान केलें तरी कांहीं बिघडत नाहीं. परंतु कधींमधीं खादीची सुरवार व शेरवानी घालून, किंवा धोतर नेसून, पाटावर बसून साध्या हातांनीं कढीभात किंवा पुरीभाजी खाण्यास आणि दारूशिवाय चालविण्यास त्यांनीं तयार झालें पाहिजे, एवढी जाणीव त्यांना दिली जावी. म्हणजे त्यांच्या संस्कृतीच्या संरक्षणाचा प्रश्न फारसा नाजुक व हळवा राहाणार नाहीं. मला स्वतःला असें वाटतें कीं, ख्रिश्चनांची सांस्कृतिक समस्या सोडविण्याच्या कामीं त्यांच्याकडून मुळींच विरोध होणार नाहीं; उलट ती व्यवहारचतुर जमात आपण होऊन या कामीं सहकार्य करण्यास पुढें येईल. त्या बाबतींत खरा अडथळा मुसलमानांच्या मुल्लामौलवींप्रमाणें ख्रिश्चनांच्या धर्मगुरूंकडून–पाद्र्यांकडून–आणि स्वतःकडे फुकटचा भलेपण यावा म्हणून धडपडणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांकडूनच येणार आहे. परंतु भारतावर चीनचें आक्रमण होतांच पाकिस्तान, पाकिस्तानप्रेमी मुसलमान व भारतद्वेष्टे ख्रिश्चन यांनीं जी भूमिका घेतली आहे, तिच्यावरून आमच्या राज्यकर्त्यांचें व राजकीय पुढाऱ्यांचे डोळे उघडतील व ते अधिक वास्तववादी भूमिका घेतील, अशी आशा आपण करूं या. ख्रिश्चनांच्या बाबतींत हिंदूंकडून व विशेषतः हिंदूंमधील उच्च वर्णीयांकडून ख्रिस्ती लोकांना योग्य सहकार्य व आत्मीयतेची वागणूक मिळत नाहीं, हेंहि विसरतां कामा नये.

हिंदूंमधील अंतर्गत सामाजिक समस्या सोडविण्याच्या बाबतींत मात्र महाराष्ट्रांतील समाजसेवकांनीं पुढें येण्याची गरज आहे. कारण गेलीं पन्नास–साठ वर्षें अशा प्रकारचें समाजसुधारणेचें कार्य ते करीत आले आहेत. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा गोमंतकीय कार्यकर्त्यांना मिळाला पाहिजे. आज महाराष्ट्रांतील वृत्तपत्रें व नियतकालिकें गोव्यासंबंधीं लिहितांना मुख्यतः कोंकणी-मराठी वादाचाच कीस काढीत असतात. त्याऐवजीं त्यांनीं गोमंतकांतील सामाजिक समस्यांचें स्वरूप विशद करणारे लेख प्रकाशित केल्यास गोमंतकाला व मराठी कार्यकर्त्यांनाहि त्यांचा चांगला उपयोग होईल.

# गोमंतकाची आर्थिक समस्या : ५

गोव्यासमोर आज ज्या समस्या उभ्या आहेत त्या सर्वांत स्थानिक लोकांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची समस्या म्हणजे आर्थिक समस्या होय. या समस्येची जाणीव बाहेरून गेलेल्या माणसालाहि पदोपदीं तीव्रतेनें होत असते.

## महागाई वाढली !

गोव्यांत आपण प्रवेश केल्यापासून एकच ओरड सारखी ऐकूं येते, ती म्हणजे, 'महागाई वाढली !' आपल्याला प्रथम आश्चर्य वाटतें. कारण तेथील वस्तूंचे भाव तसे कांहीं आपल्याकडील भावांपेक्षां फार अधिक नाहींत. किंबहुना अनेक बाबतींत ते सारखेच आहेत. मग ही महागाईची ओरड कां ? या प्रश्नाचें उत्तर जाणून घेण्यासाठीं आपल्याला गोमंतकाच्या आर्थिक स्थितीचा ओझरता परिचय करून घेतला पाहिजे.

## कृत्रिम स्वताई

अन्न व वस्त्र या बाबतींत गोवा हा महाराष्ट्रांतील रत्नागिरी जिल्ह्याप्रमाणें

नेहमींच परावलंबी राहिला आहे. निकस जमीन व डोंगराळ प्रदेश असल्यामुळें यांत आश्चर्य किंवा खेद वाटण्यासारखें कांहींच नव्हतें व नाहीं. भारताशीं (म्हणजे येथील ब्रिटिश सत्तेशीं ) गोव्याचे ( म्हणजे पोर्तुगीज सरकारचे ) संबंध जोंपर्यंत सलोख्याचे होते, तोंपर्यंत गोव्यांतील नारळ, सुपारी, काजू, दारू, सुकी मासळीवगैरे पदार्थ भारतांत येत आणि त्यांच्याबदली तांदूळ, भाजीपाला, कडधान्य, गूळ, साखर वगैरे पदार्थ गोव्यांत जात; त्यामुळें स्वस्ताई–महागाईचा सवाल फारसा आला नाहीं. परंतु भारत सरकारनें १९५५ सालीं गोव्याची आर्थिक नाकेबंदी केल्यानंतर ही परिस्थिति बदलली. गोव्यांतून तेथील स्थानिक उत्पादन भारतांत येणें व भारतांतील माल गोव्यांत जाणें बंद झालें व गोव्यांत महागाई वाढली. या महागाईमुळें असन्तोष वाढूं नये यासाठीं पोर्तुगीज सत्तेनें पाकिस्तान, ब्रह्मदेश, अंगोला, मोझांबिक ( आफ्रिका ) व वगैरे देशांतून तांदूळ, साखर, गहूं वगैरे दैनिक गरजेच्या वस्तू मुबलक प्रमाणावर मागवून गोव्यांतील जनतेला त्यांचा कमी किमतींत पुरवठा केला.— जसा काश्मीरी लोकांना चौदा आणे शेराचा तांदूळ तीन आणे शेराप्रमाणें दिला जातो–याच वेळीं गोव्याचा कच्च्या लोखंडाचा निर्यात व्यापार वाढल्यामुळें बाहेरून गरजेच्या व चैनीच्या वस्तू मुबलक प्रमाणांत येऊं लागल्या व भारत सरकारची नाकेबंदी निष्फळ ठरली. त्यामुळें गोव्यांत एक प्रकारची कृत्रिम स्वस्ताई व सुबत्ता निर्माण झाली. सोनें, परदेशी कापड, मोटारी, घड्याळें, फाउंटनपेन्स, ट्रॅन्झिस्टर, मद्यें, सिगारेट्स वगैरे मालावर आयातकर नसल्यामुळें हा माल पूर्वींहि गोव्यांत खूप स्वस्त मिळत होता. हा माल चोरट्या मार्गानें भारतांत नेऊन त्यावर भरमसाट नफा मिळविण्याचा राजरोस धंदाच गेलीं कित्येक वर्षें गोव्यांतील व भारतांतील कांहीं लोक करीत होते. १९६० सालीं गोव्यांत ४७ लाख रुपयांची परदेशी तंबाखू व सिगारेट्स यांची आयात झाली. ६ लाख लोकसंख्येपैकीं मुलें व स्त्रिया वगळतां सुमारें २ लाख लोक धूम्रपान करतात असें गृहीत धरलें तरी ते एका वर्षांत ४७ लाखाच्या सिगारेट्स फस्त करतील हें कसें शक्य आहे ? याचा अर्थच असा कीं यांतील बहुतेक माल चोरट्या मार्गानें भारतांत येत होता. गोवा स्वतंत्र होतांच ही सारी कृत्रिम स्वस्ताई नाहींशी झाली आणि गोव्यांतील भाव महाराष्ट्र–मुंबईतील भावांसारखेच बनले. फक्त फळें व भाजीपाला मात्र आजवर कधीं नव्हता इतका स्वस्त गोव्यांत

मिळूं लागला; कारण शेजारच्या राज्यांतून त्याची आवक भरपूर होऊं लागली.

## मँगेनीज व लोखंड यांनीं केलेला परिणाम

१९५० पर्यंत गोव्याचें राज्य हें एक तुटीचें राज्य होतें. १९१० सालीं गोव्याची आयात ६३ लक्षांची, निर्यात २५ लक्षांची व तूट ३८ लक्षांची होती. ही तूट सोसूनहि पोर्तुगालनें केवळ प्रतिष्ठा ( Prestige ) टिकविण्यासाठीं गोवा आपल्या ताब्यांत ठेवला होता, व त्यापायीं पोर्तुगीज जनतेच्या घामांतून मिळणारा पैसा खर्च होत होता. अर्थात् गोमंतकांतील ख्रिस्ती लोक फार मोठ्या संख्येनें भारतांत व परदेशांत, विशेषतः आफ्रिकेंत जाऊन तेथून गोव्यांतील आपल्या नातेवाइकांना जे पैसे पाठवीत असत त्यांचाहि उपयोग गोव्याची अर्थव्यवस्था सांवरून धरली जाण्यास होत होता, हेंहि खरेंच आहे.

## लोकांच्या प्राप्तींत भरमसाट वाढ

लोखंड व मँगेनीजच्या खाणींचा व्यवसाय अकल्पितपणें खूपच भरभराटीला आला. कच्च्या लोखंडाचे आंतरराष्ट्रीय दर वाढल्याचा तो मुख्यतः परिणाम होता. गोव्यांतील खाणधंद्यांत सुमारें ७ कोटि रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून त्यापैकीं तीन–चतुर्थांश भारतीय व इतर परदेशी आहे. हें परदेशी भांडवल कर्जाच्या स्वरूपांत आहे. या व्यवसायानें गोमंतकांतील कित्येक भिक्षाधीशांना लक्षाधीश बनविलें, तर आजवर गोव्यांत कधींच नसलेले कोट्याधीश या धंद्यांतून उदयाला आले. मजुरांना इतकी मजुरी मिळूं लागली कीं त्यांच्या हातांत घड्याळें, बोटांत सोन्याच्या अंगठ्या व गळयांत सोन्याच्या सांखळ्या दिसूं लागल्या. कामगार स्त्रिया मखमलीच्या चोळ्या घालूं लागल्या. लिहितां–वाचतां येणारा माणूस शेंकड्यांत पगार मिळवूं लागला. पोर्तुगीज सरकारनें व विशेषतः १९५४ च्या अखेरीस गोव्यांत आलेल्या व्हास्सालु द सिल्वा ( Vassalo de Silva ) या उदारमतवादी पोर्तुगीज गव्हर्नरानें स्थानिक जनतेची मर्जी संपादण्यासाठीं सरकारी तिजोरीचीं दारें सताड उघडलीं. हिंदु व ख्रिस्ती असा भेद न करितां ज्या व्यक्तीनें किंवा संस्थेनें सार्वजनिक कामासाठीं पैसा मागितला तिला तो मुक्त हस्तानें देण्यांत आला. एकीकडून असा पैसा वाटण्यांत येत होता आणि दुसरीकडे सरकारी नोकरांचे पगार अवाच्या सवा वाढवून लोकांच्या मनांत

पोर्तुगीज सत्तेविषयीं लोभ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता.

**पोर्तुगीज अमदानीमधील भरमसाट पगार :—**

| | | |
|---|---|---|
| पोस्टमन | दरमहा | २५० रुपये |
| पोर्तुगीज शाळेंतील शिक्षक | ” | ९०० ” |
| सरकारी कचेऱ्यांतील कारकून | ” | ४०० ते ६०० ” |
| आकाशवाणींतील तंत्रज्ञ | ” | ६०० ” |
| कार्यक्रम-निवेदक | ” | ९०० ” |
| बँकेंतील कारकून | ” | ८०० ” |

दाभोळीच्या विमानतळावर भोजनाची चव पाहाण्यासाठीं एक अधिकारी नेमण्यांत आला होता. उतारूंसाठीं तयार केलेल्या खाद्यपदार्थांची चव पाहाणें एवढेंच त्याचें काम. परंतु त्याचा पगार होता दरमहा ८५० रुपये !

अशा प्रकारें पोर्तुगीजांनीं निर्माण केलेली कृत्रिम सुबत्ता नाहींशी झाल्यामुळें गोव्यांतील लोक हळहळत आहेत, हें स्वाभाविकच आहे. परंतु स्वातंत्र्य हें नेहमींच तात्कालिक सुबत्ता आणणारें नसते, उलट त्रास, संकटें, हालअपेष्टा यांचाच नजराणा तें घेऊन येतें, असा आपला अनुभव आहे. पण म्हणून कांहीं पारतंत्र्याची इच्छा बाळगावयाची नसते, ही गोष्ट गोमंतकांतील लोकांना शक्य त्या प्रसंगीं समजावून सांगण्याचा मीं प्रयत्न केला.

## बेकारीची समस्या

स्वातंत्र्याबरोबर संकटें व जबाबदाऱ्या येतात, हें तात्त्विक दृष्ट्या बरोबर असलें तरी त्या संकटांना तोंड देणें व जबाबदाऱ्या पार पाडणें हेंहि स्वतंत्र जनतेचें कर्तव्य असतें. त्या दृष्टीनें गोव्यापुढील प्रश्नांचा विचार केला पाहिजे.

आज गोव्यापुढील मुख्य प्रश्न बेकारीचा आहे. ही बेकारी वेगवेगळ्या कारणांनीं उत्पन्न झालेली आहे. तीं कारणें समजून घेतलीं तरच तिच्या निवारणाचे मार्ग सांपडूं शकतील. यांतील कांहीं कारणें अपरिहार्य होतीं तर कांहीं राज्यकर्त्यांच्या अदूरदर्शीपणांतून निर्माण झालेलीं आहेत. त्यामुळें प्रत्येक कारणाचा स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे. अपरिहार्य कारणांचा धीरानें व धैर्यानें स्वीकार केला पाहिजे व परिहार्य कारणांचें निवारण धीटपणें करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## खाणींच्या कामांतील मंदी

गोव्याच्या मुक्ततेनंतर पहिला फटका खाणधंद्याला बसला. याचीं अधिकृत कारणें अद्यापि पुढें आलेलीं नाहींत. त्यामुळें त्या धंद्याशीं असलेल्या संबंधित व्यक्तींशीं विचारविनिमय केल्यानंतर जीं कारणें समजलीं तीं येथें दिलीं आहेत.

सर्वांत महत्त्वाचें कारण असें कीं, पोर्तुगीजांच्या अमदानींत येथील लोखंड–मॅंगेनीजमिश्रित दगड–माती शब्दशः मातीमोलानें विकली जात होती. कारण सरकारला त्याचें कांहींच सोयरसुतक नव्हतें. आतां भारत सरकारनें ते दर वाढविल्यामुळें स्वस्तांत माल खरेदी करणाऱ्यांना त्यांत कांहीं आकर्षण उरलें नाहीं. उलट या कच्च्या मालापासून अशुद्ध लोखंड व मॅंगेनीज तयार करण्याचा कारखाना ब्रोरी गांवाजवळ उभारण्यांत येणार आहे, अशी बोलवा आहे. त्यामुळें हा कच्चा माल बाहेर न गेला तरच बरें, अशी भारत–सरकारची भूमिका आहे.

कांहीं मंडळींच्या मतें एकूण जागतिक मंदी हेंच या धंद्यांतील मंदीचें कारण आहे. शिवाय बड्या खाणमालकांनीं आधुनिक यंत्रें वापरून माल काढण्यास सुरुवात केल्यामुळें छोट्या खाणमालकांचा माल पडून राहूं लागला. तसेंच परदेशी हुंडणावळींतील व बँकिंगच्या अडचणी, सरकारची कायदेशीर बंधनें वगैरे इतरहि कांहीं कारणें असण्याची शक्यता आहे. कारणें कोणतींहि असलीं तरी या धंद्याला मंदी आलेली आहे व त्यामुळें बऱ्याच प्रमाणांत बेकारी वाढली आहे, यांत शंका नाहीं.

## या बेकारीवरील उपाय

ही बेकारी दूर करण्यासाठीं भारत–सरकार व भारतीय उद्योगपति यांनीं पुढें आले पाहिजे. विद्यमान खाणींची पहाणी करून व नव्या खाणी कोठें काढतां येतील याचा शोध घेऊन सध्यांच्या खाणमालकांचें विशेष आर्थिक नुकसान होऊं न देतां खाणधंद्याचें एकसूत्रीकरण व संघटन केलें पाहिजे. तें करितांना या धंद्यांत पूर्वीपासून काम केलेल्या व सध्या बेकार झालेल्या लोकांना प्रथम कामावर घेतलें पाहिजे. बाहेरचे उद्योगपति या धंद्यांत शिरले तर स्थानिक लोक बेकार होतील आणि बाहेरचे मजूर व तंत्रज्ञ मोठ्या संख्येनें गोव्यांत येतील, ही गोमंतकीयांना वाटणारी भीति सरकारनें व उद्योगपतींनीं प्रत्यक्ष उदाहरणानें दूर केली पाहिजे. कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर करण्याचे कारखाने

गोव्यांत निघाल्यास त्यायोगेंहि या बेकारीला चांगला आळा बसूं शकेल.

## सरकारी नोकरांतील बेकारी

जास्तींत जास्त लोकांनीं आर्थिक लाभाच्या लोभानें पोर्तुगालशीं राजनिष्ठ राहावें, या हेतूनें पोर्तुगीजांनीं जसे आपल्या नोकरांचे पगार भरमसाट वाढविले तशा कांहीं नवीन जागाहि निर्माण केल्या. प्रारंभीं आणलेले निग्रो सैनिक अंगोल्यांतील जनतेचा उठाव दडपून टाकण्यासाठीं तिकडे परत न्यावे लागल्यामुळें पोलिसदल व सैन्य यांत सरकारनें स्थानिक लोकांची खूप मोठ्या संख्येनें भरती केली. भारतीय सैन्य गोव्यांत शिरतांच बहुतेक स्थानिक सैनिकांनीं लष्करी गणवेष टाकून देऊन नागरी वेष धारण केला. अशा प्रकारें सरकारी नोकरांत बेकारी निर्माण झाली. पोर्तुगीजांनीं वाढविलेले पगार कमी होतील कीं काय अशी भीतीहि सरकारी नोकरांत आढळून येते. अर्थात् कृत्रिमपणें वाढविलेले पगार योग्य पातळीवर आणले गेल्यास त्याबद्दल सरकारला कोणी दोष देणार नाहीं. उलट सरकार त्याबाबतींत खंबीर धोरण अवलंबीत नाहीं, अशीच लोकांची तक्रार आहे. पोर्तुगीज प्राथमिक शिक्षकाला चारशें रुपये पगार आणि मराठी खासगी प्राथमिक शिक्षकाला साठ–सत्तर रुपये पगार, हा अन्याय फार दिवस सहन केला जाणार नाहीं, हें उघड आहे. आतां सरकारनें सुरू केलेल्या सर्वच प्राथमिक शाळांतील शिक्षकांना ११० रुपये पगार मिळूं लागल्यामुळें एका प्रकारें लोक संतुष्ट आहेत, असें दिसतें. त्या दृष्टीनें खासगी माध्यमिक शाळांतील शिक्षकांची स्थिति मात्र मोठी हलाखीची आहे. सरकारकडून भरपूर अनुदान मिळाल्याखेरीज ती सुधारणार नाहीं, हें उघड आहे.

सारांश, नव्या राजवटीमुळें जे सरकारी नोकर बेकार झाले असतील त्यांच्या परिस्थितीची पाहणी करून सरकारनें त्यांना पुनः आपल्या वेगवेगळ्या खात्यांत सामावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांना गोव्यांत नोकऱ्या देतां येत नसतील तर गोव्याबाहेरच्या कोंकणपट्टींत त्यांना नोकऱ्या मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

## बँकेचें भिजत घोंगडें

गोव्याचें अर्थकारण चालविणारी 'बँको नॅशनल अल्ट्रामरीनो' ही एकमेव पोर्तुगीज बँक पोर्तुगीजांच्या निर्गमनानंतर बंद करण्यांत आली. या बँकेंत अनेक

लहान–थोर व्यक्तींचे पैसे होते. सुमारें नऊ–दहा कोटींचा मामला असावा. परंतु अजूनहि सरकारनें या बँकेंतील ठेवींसंबंधींचा निर्णय जाहीर करून लोकांना त्यांचे पैसे न दिल्यामुळें अनेकांची कुचंबणा झालेली आहे. हें भिजत घोंगडें कां पडलें आहे, याचें उत्तर कोणीं देत नाहींत. एवढी रकम मोकळी झाल्यास गोव्यांतील आर्थिक तंगी कांहीं अंशानें कमी होईल, असें कांहीं मंडळींनीं बोलून दाखविलें.

## लॉटरी बंद केल्याचा परिणाम

गोव्यांतील लोकांशीं—विशेषतः ख्रिश्चनांशीं—बोलतांना एका गोष्टीबद्दल सर्वांनीं एकमतानें आपली नापसंती व चीड व्यक्त केली. ती म्हणजे गोवा लॉटरी बंद करण्यांत सरकारनें केलेली घिसाडघाई. या लॉटरीपासून मिळणारें उत्पन्न सार्वजनिक इस्पितळांसाठीं वापरलें जात होतें. त्यामुळें भारतसरकार बक्षिसरोख्यांच्या रूपानें जो एक प्रकारचा सौम्य जुगार ( रकमेच्या व्याजाचा ) चालवितें, तशाच प्रकारचा हा जुगार होता, म्हणून तो बंद करण्याची कांहीं जरुरी नव्हती, असें कांहीं लोक म्हणाले; तर लॉटरी बंद करण्यास विरोध नसलेल्या लोकांचा आक्षेप फक्त सरकारच्या घिसाडघाईला होता. या व्यवसायांत कांहीं हजार लोक गुंतलेले होते. त्यांना कसलीहि पूर्वसूचना न देतां अकस्मातपणें लॉटरी बंद केल्यामुळें त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे.

## दारूबंदी होणार काय ?

या लॉटरीबंदीबरोबरच दारूबंदी व्हावयाची; परंतु कोठूनतरी कळ फिरली आणि ती लांबणीवर पडली. गोव्याच्या ग्रामीण भागांतून फिरतांना तेथील लोक चिंताग्रस्तपणें ‘ इथं आतां दारूबंदी होणार काय ? ’ असा प्रश्न विचारतात तेव्हां त्यांच्या चिंतेची कल्पना येते. गोव्यांत दारूबंदी नाहीं, याचा अर्थ तेथें सगळे लोक दारू पितात असा कोणी करूं नये. प्रत्यक्ष माडी काढणारे व दारू गाळणारे भंडारी तर दारूपासून बव्हंशीं अलिप्तच असतात. ते दारू पिऊं लागले तर दिवसांतून तीनदां माडावर चढणें त्यांना कसें शक्य होईल ? या व्यवसायांत शेंकडों हजारों लोक गुंतलेले असून दारूबंदी झाल्यास त्या सर्वांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. म्हणून दारूबंदी करण्यापूर्वी नीरा, ताडगूळ वगैरे उद्योगांत या लोकांना

गुंतविण्याची व्यवस्था करावी लागेल. दारूबंदीच्या बाबतींत कोणताहि निर्णय विसाडघाईनें न घेतां तिच्या सर्व परिणामांना तोंड देण्याची तयारी करूनच तो निर्णय घेतला जावा, अशी गोमंतकीय जनतेची इच्छा आहे.

## शेतीमालाचें उत्पादन वाढविलें पाहिजे

गोमंतक हा मूलतः व मुख्यतः शेतीप्रधान प्रदेश. भात, नाचणी, नारळ, सुपारी, काजू, अमसुल हीं येथील मुख्य पिकें. परंतु सुमारें बारा वर्षांपूर्वी लोखंड–मँगेनीजच्या खाणींचा व्यवसाय इतका भरभराटीस आला कीं लोकांचें शेतींतील लक्ष उडालें आणि जो तो खाणींत काम करूं लागला. खाण–मजुरांना भरपूर मजुरी मिळूं लागल्यामुळें शेतांत राबण्यासाठीं मजूर मिळेनासे झाले. या सर्वांचा परिणाम शेतीची आबाळ होण्यांत झाला. आतां पुनः लोक शेतीच्या व्यवसायाकडे वळूं लागले आहेत. आजवर येथील शेतकऱ्याला जमीनमालकास ( मग ती ग्रामसंस्था असो कीं खासगी व्यक्ति असो ) शेतांत उत्पन्न होणाऱ्या मालापैकीं निम्मा माल द्यावा लागत असे. त्यामुळें शेती करण्यांत त्याला विशेष उत्साह किंवा आकर्षण वाटत नसे. आतां शेतकऱ्यांनीं मालकाला एक–चतुर्थांश किंवा एक–षष्ठांश खंड द्यावा, अशा प्रकारची हालचाल सरकारी गोटांतूनहि सुरू झालेली आहे. त्यामुळें शेती–व्यवसायांत शिरण्यास शेतकऱ्यांना थोडेंफार आकर्षण वाटूं लागेल असें दिसतें.

तसेंच गोमंतकीय शेतकऱ्यांत अधिक उत्पन्नाबद्दल उत्साह निर्माण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सरकारी कर्मचारी व बिनसरकारी कार्यकर्ते यांच्याकडून झाला पाहिजे. डोंगराळ व पडीत जमीन लागवडीखालीं आणणें, आज लागवडीखालीं असलेल्या जमिनींतून जपानी पद्धतीचा वापर करून अधिक पीक काढणें, नारळ, सुपारी, काजू यांचें उत्पादन वाढविण्याचे नवे उपाय शोधून काढणें, रत्नागिरी जिल्ह्याप्रमाणें कलमी आंब्यांची मोठ्या प्रमाणावर लागवड करणें, मच्छीमारीचा विकास करण्यासाठीं यांत्रिक होड्यांचा वापर करणें, त्यांत सहकारी पद्धतीचा अवलंब करणें, ताज्या मासळीला शहरी बाजार उपलब्ध व्हावा यासाठीं सहकारी संस्थेतर्फे मालट्रक, लहान आगबोटी ( स्टीम लॉंचेस ) वगैरेंचा उपयोग करणें वगैरे अनेक मार्गांनीं जमिनींतील व समुद्रांतील शेतीचें उत्पादन वाढवितां येण्यासारखें आहे.

# वीरभूमि गोमंतक

पश्चिमेस अरबी समुद्र आणि पूर्वेला सह्याद्रीची लांबलचक रांग या सुमारें ३७ मैल रुंदीच्या व दक्षिणोत्तर ६५ मैल लांबी असलेल्या गोव्याच्या चिंचोळ्या पट्टीचें एकूण क्षेत्रफळ १५३७ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेला तेरेखोलची खाडी व सावंतवाडी असून दक्षिणेला कारवारच्या माजाळी गांवाची हद्द आहे. वस्तुतः गोवा किंवा गोमन्तक हा महाराष्ट्राच्या कोंकण भागाचा, ज्याला प्राचीनकाळीं 'अपरान्तक' या नांवानें संबोधलें जात होतें त्याचाच भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या अविभाज्य भाग आहे. त्यामुळें पोर्तुगीजांच्या अमदानींत राजकीय कारणांमुळें आणि आतां स्वातंत्र्यामध्यें कांहीं हितसंबंधीं लोकांच्या क्लृप्त्यांमुळें तो प्रदेश महाराष्ट्रापासून वेगळा राहिला तरी महाराष्ट्राला त्याच्याविषयीं नेहमींच आत्मीयता वाटत आलेली आहे. तेथील लोक, त्यांचीं भाषा, त्यांचीं दैवतें वगैरेंच्या बाबतींत मराठी माणसाला कधीं परकेपणा असा वाटलाच नाहीं. तो परकेपणा निर्माण करण्याचा असा पद्धतशीर प्रयत्न आतां चालू झाला आहे, परंतु पाण्यावर काठी मारून त्याचे दोन भाग करण्यासारखाच हा प्रयत्न अंतीं निष्फळ ठरणार आहे यांत कांहींच शंका नाहीं.

## ‘ गोवा ’ शब्द कसा बनला ?

गोवा या नांवाच्या व्युत्पत्तीसंबंधीं विद्वानांत एकमत नाहीं. वेगवेगळी मंडळी वेगवेगळीं व्युत्पत्ति मानतात.

‘ गो ’ म्हणजे गाय व ‘ मन्त ’ म्हणजे ‘ युक्त. ’ गोमन्त म्हणजे गायीगुरांनीं युक्त असलेला, भरलेला प्रदेश. ‘ क ’ लघुत्व, सौंदर्य व प्रियत्व दर्शविणारा प्रत्यय आहे. एकेकाळीं या छोट्याशा प्रदेशांत गाई बैलांचीं भरपूर खिल्लारें असलीं पाहिजेत व त्यावरून त्याला हें नांव पडलें असावें ही सर्वमान्य होण्यासारखी व्युत्पत्ति किंवा उपपत्ति होय.

दुसरी एक उपपत्ति अशी : मडगांवहून पणजीला मोटारीनें जातांना वाटेंत एका बाजूला पिलारची सेमीनारी ( खिस्ती धर्माचें विद्यापीठ ) लागते. त्या जागीं फार पूर्वी गोपकपट्टण ही कदंब राजांची राजधानी होती. (आज जेथें पिलारची सेमीनारी आहे त्याच ठिकाणीं आठशें वर्षांपूर्वी कदंबांचा राजवाडा होता. ) जुवारी नदीवरील या गोपकपट्टण शहराचें आगशी बंदर कालांतरानें गाळानें भरून निकामी झाल्यानें कदंब कुळांतील चौथा जयकेशी यानें राजधानीचें स्थलांतर करून मांडवीच्या तीरावरील गोवा शहर बसविलें असें म्हणतात. गोपक किंवा गोप म्हणजे गवळी. त्यांचें पट्टण म्हणजे शहर. या गोपकपट्टणाचाच अपभ्रंश होतां होतां गोवा किंवा गोवें हा शब्द बनला. यानंतर जुनें गोवें व नवें गोवें ( पणजी ) हीं दोन शहरें पुढें आल्यामुळें या मूळ गोव्याला थोरलें गोवें असें नांव मिळालें. आजमितीस या थोरल्या गोव्यांत जुनें अवशेष असे फारसे उरलेले नाहींत. जुन्या- गोव्यांतील चर्चेस पाहण्यासारखीं असलीं तरी त्यांचेंहि महत्त्व उरलेलें नाहीं. त्यामुळें नवें गोवें म्हणजेच गोवें शहर असें समजलें जातें. [ गोमन्तकाच्या मुक्तिसंग्रामानंतर मला पणजीहून एक तार आली होती. तिच्यावर गांवांचें नांव फक्त ‘ गोवा ’ असें लिहिलेलें होतें. त्यावेळीं गोवा म्हणजे नवा ( Nova ) गोवा किंवा पणजी हें ज्ञान प्राप्त करून घ्यावें लागलें होतें. वस्तुतः नवें गोवें म्हणजे पणजी नव्हे, पणजी ही नव्या गोव्याची मुख्य वाडी. परंतु आतां त्या सर्व शहरालाच पणजी हें नांव रूढ झालें आहे. ]

आणखी एक उपपत्तिः एकवीस वेळां पृथ्वीला निःक्षत्रिय बनविणाऱ्या परशुरामानें ही पृथ्वी ब्राह्मणांना दान केली. आतां त्या दान केलेल्या पृथ्वींत कसें

राहावयाचें ? म्हणून त्यानें बाण मारून समुद्राला मागें हटविलें. आणि तेथें स्वतःला राहाण्यासाठीं जागा करून घेतली. अशा प्रकारें ‘ गौ ’ म्हणजे बाणाच्या ‘ मा ’ म्हणजे माराचा अन्त जेथें झाला तेथपर्यंतचा प्रदेश म्हणजे ‘ गोमान्तक ’. त्यावरून गोमन्तक व गोवा हीं रूपें बनलीं.

पश्चिम किनाऱ्यावरील गुजरातच्या खंबायतपासून केरळच्या कालिकतपर्यंत किंवा तमिळनाडच्या कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या कोंकणपट्टीचा त्या त्या प्रदेशांत परशुरामाशीं संबंध जोडला जातो. एकीकडे सह्याद्रीची रांग व दुसरीकडे अरबी समुद्र यांच्यामधील चिंचोळ्या पट्टीचा प्रदेश भूस्तरशास्त्राच्या दृष्टीनेंहि अधिक नवीन, अलीकडील आहे असें म्हणतात. त्यामुळें तो परशुरामानें समुद्रांतून बाहेर काढला असल्याची समजूत या प्रदेशांत रूढ झाली असल्यास आश्चर्य नाहीं. परशुरामानें पृथ्वीदान केल्यानंतर स्वपराक्रमानें समुद्र मागें हटवून ही यज्ञभूमि तयार केली आणि पंचगौड ( बंगाल ) प्रदेशाच्या त्रिहोत्रपूर (तिरहुत) नगरांतील दहा ब्राह्मणांचीं सहासष्ट कुळें तेथें आणून वसविलीं व हरमल पेडणें या गांवाजवळ मोठा यज्ञ करविला. त्या यज्ञाची राख जेथें गोळा करण्यांत आली तेथें भस्माचा एक प्रचंड पर्वत तयार झाला. त्याचें नांव पडलें गोमयांचल. त्याचेंच पुढें गोमांचल बनलें व त्यावरून गोमान्तक व गोमन्तक हे शब्द बनले, असेंहि सांगितलें जातें. परंतु व्युत्पत्ति–शास्त्राच्या कसोटीवर ही व्युत्पत्ति कितपत टिकाव धरील हें सांगणें कठीण आहे. परंतु व्युत्पत्ति कांहींहि असली तरी या दोन नांवांपैकीं गोमंतक हें काव्यपूर्ण नांवच आतां रूढ होत आहे.

गोव्यांतील रिवण गांवाजवळ तपःसाधनेला उपयुक्त अशा मोठ्या गुहा आहेत. त्यावरून रिवण म्हणजे पूर्वीचें ऋषिवन असून तेथें गौतम ऋषि इतर सात ऋषींसह तपश्चर्या करीत होते, अशी दंतकथा प्रचलित आहे. या गौतम ऋषींच्या नांवावरून या भागाला गोमन्तक असें नांव वर्णविपर्ययाच्या नियमानुसार मिळालें असें कांहीं लोक म्हणतात. परंतु त्यालाहि व्युत्पत्तिशास्त्राचा आधार कितपत मिळू शकेल, हें सांगणेंहि अवघड आहे.

## गोव्यांतील सारस्वत

गोव्यांतील कुणबी, गावडे, गांवकर, वेळीप, गाबीत, कोळी, भंडारी, सुदीर

(शूद्र) वगैरें स्थानिक किंवा मूलनिवासी * हे रंगरूप, स्वभाव, प्रकृति वगैरेंच्या बाबतींत शेजारच्या कोंकणांतील लोकांहून वेगळे नाहींत. तेथील भट म्हणजे देशस्थ, कोंकणस्थ व विशेषतः कऱ्हाडे ब्राह्मण हेहि महाराष्ट्रांतील त्या त्या पोटजातीशीं संबंध असणारे आहेत. परंतु तेथील सारस्वत जमात ही अनेक बाबतींत स्थानिक जनतेहून वेगळी असल्याचें दिसून येतें. (त्यांतच जे सारस्वत पोर्तुगीजांच्या आमदानींत बाटून ख्रिस्ती झाले, त्यांचाहि समावेश होतो. त्यांचा धर्म बदलला तरी मूळ स्वभाव–प्रकृतींत विशेष फरक पडलेला नाहीं.)

आहार-विहार, देवदैवतें, संवयी, आवडीनिवडी वगैरे बाबतींत गोव्याच्या सारस्वतांचें बंगाली ब्राह्मणांशीं खूपच साम्य आहे. मातमासळीच्या जेवणावर दोन्ही समाजांची विशेष भक्ति आहे. जिभेवर ताबा नसणें हें दोघांच्याहि स्वभावाचें समान वैशिष्ट्य. खमंग, चमचमीत खावें आणि डोळे उघल्यापासून डोळे मिटेपर्यंत बोलत राहावें हा त्यांचा अत्यंत आवडीचा छंद. त्यामुळें शरीर-श्रमाबद्दल कंटाळा व बौद्धिक कामाबद्दल आकर्षण. पिढयानुपिढ्या कमावली गेल्यामुळें बुद्धि चांगली तीक्ष्ण बनलेली. उत्तमोत्तम करडालत्ता व फुलें-दागिने यांचा भलता सोस. पोटासाठीं जगाच्या पाठीवर कुठेंहि जावें लागलें तरी आपल्या जन्मभूमीची मातृभूमीची ओढ कमी व्हायची नाहीं. बौद्धिक क्षेत्रांत कितीहि प्रगति झाली तरी भाविकपणा व भावनाविवशता यांच्यांत मुळींच कमतरता यायचा नाहीं. अशीं आहेत बंगाली व गोंयकार सारस्वत यांचीं कांहीं वैशिष्ट्यें.

'अ'काराला किंवा 'आ' काराला 'ओंकार' बनविण्याची बंगाली धाटणी कोंकणींतहि आढळते. अर्थात् ती बंगालीइतकी प्रचुरतेनें कोंकणीत नाहीं. ते 'रस' (आमटी)ला 'रोस' म्हणतील, 'हा इतका साधा प्रश्न' असें म्हणण्या-ऐवजी 'हो इतलो सादो प्रस्न' असें म्हणतील.

'श, ष, स' च्या बाबतींत अराजक हें बंगाली भाषेचें वैशिष्ट्य कोंकणीनें इतकें आपलेंसें केलें आहे कीं, बंगाली माणूस 'भाषा' लिहून 'भाशा' बोलेल; तर कोंकणीं माणूस बोलतांनाच नव्हे तर लिहितांनाहि 'भाशा' 'परिशद', 'प्रस्न',

* गोव्यांतील मूळ आदिवासी व महार यांनाच 'कोङ्क' किंवा 'कोङ्ग' ही संज्ञा होती. त्यांचें राहाण्याचें वन (भूमि) म्हणजे 'कोंक–वन'–कोकण, अशी उपपत्ति कांहीं मंडळी लावतात.

'मनीस' (मनुष्य) 'वर्स' 'दिश्टी' (दृष्टि) 'सोद' (शोध) असे शब्द वापरील.

बंगाली माणसाचा भांडकुदळपणा गोंयच्या सारस्वतांनीं किती तंतोतंत उचलला आहे, हें सध्यां तेथें चालू असलेल्या कोंकणी–मराठीच्या वादावरून कुणाच्याहि लक्षांत यावें.

अर्थात् बंगाली माणसाची रसिकता, कलात्मकता, घराबाहेरची टापटीप वगैरे अनेक चांगल्या गोष्टीहि गोवेंकर सारस्वतांनीं बंगालमधून आपल्याबरोबर आणलेल्या आहेत. त्यांनीं बंगालच्या दुर्गेला गोव्यांत आणून तिला शांता बनविलें असलें तरी देशावरल्याप्रमाणें ती कांहीं अगदीं अंबा बनली नाहीं.

या सारस्वत मंडळींनीं गोव्याचें सांस्कृतिक जीवन चांगलें समृद्ध बनविलें. गायन, वादन, चित्रकला यांच्या विकासाच्या कामीं खूप हातभार लावला. पेशवाईच्या काळापासून या सारस्वतांनीं महाराष्ट्राच्या राजकारणांतहि खूप महत्त्वाची कामगिरी बजावली. बक्षी जिवबादादा केरकर, रामचंद्रबाबा सुखठणकर, छत्रपतींचे मंत्रि नारोराम शेणवी रेगे, बाळोबा तात्या पागनीस वगैरे नांवें या संदर्भात सहज आठवतात. आधुनिक काळांतील थोर सारस्वत व ख्रिस्ती मंडळींचाहि गोव्याशीं सांस्कृतिक किंवा भावनिक संबंध होताच. डॉक्टर भाऊ दाजी लाड, माधव चंद्रोबा डुकले, न्यायमूर्ति सर गोविंद नारायण मांडगांवकर, डॉक्टर जरसन द कुन्हा, न्यायमूर्ति तेलंग, डॉक्टर रामकृष्णपंत भांडारकर, सर नारायण चंदावरकर, जोआकिम आल्वा, आचार्य काकासाहेब कालेलकर, श्री धर्मानंद कोसंबी, पु. मं. लाड, शिवेश्वरकर, डॉक्टर आल्बन डिसोझा, डॉक्टर कोलॅसो, डॉक्टर मास्करेन्हास, श्रीमतीबाई नार्वेकर, अंजनीबाई लोलेकर, ज्योत्स्ना भोळे, वगैरे विभिन्न क्षेत्रांतील कर्तबगार स्त्री-पुरुषांचीं नांवें या संदर्भात आठवतात. प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन शौर्य गाजविणारे वीर आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत अद्‌भुत् कामगिरी करून दाखविणारे वीर यांच्या कर्तबगारींत फरक असला तरी तो प्रकारात्मक, गुणात्मक नव्हे.

## ऐतिहासिक कालांतील फेरफटका

अर्थात् हें सुद्धां एक प्रकारें मनाचें समाधान करून घेणें झालें. बंगाल्याप्रमाणें गोमंतकीय माणूसहि रणक्षेत्रावरील पराक्रमाच्या बाबतींत प्रसिद्ध किंवा नांवाज-

लेला नाहीं. 'न धरीं शस्त्र करीं मी, गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' अशीच त्याची भूमिका राहिलेली दिसते. त्यामुळें गोव्यावर खुद्द गोवेकरांनीं राज्य केल्याचा दाखला इतिहासांत मिळत नाहीं. तरीपण गोवेकरांच्या मनःपिंडाची कल्पना येणाच्या दृष्टीनें ऐतिहासिक काळांत एक फेरफटका मारून येणें उचित होईल.

## कदंबांची कारकीर्द

गोवा हा आजच्या स्वरूपांतील वेगळा घटक पोर्तुगीजांच्या अमलानंतरच अस्तित्वांत आलेला आहे. तत्पूर्वी तो कोंकणाचा म्हणजेच पर्यायानें महाराष्ट्राचा एक भाग होता. अर्थात् त्यावेळीं महाराष्ट्राच्या सीमाहि आजच्याप्रमाणें आंखीव नसल्यामुळें गोवा महाराष्ट्रांत अंतर्गत होता, या विधानालाहि आपोआपच मर्यादा पडणार, हे उघड आहे. तरीपण भाषा व संस्कृति यांचा विचार करितां तो महाराष्ट्राचाच भाग होता असें म्हणावें लागतें. त्यामुळें महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांवर राज्य करणारे मौर्य, राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, कदंब, यादव, विजयानगरचे राय, कलबुर्ग्याचे (गुलबर्ग्याचे) बहामनी सुलतान वगैरे राजवंशांनीं किंवा राजसत्तांनीं कोंकणाबरोबर गोव्यावरहि राज्य केलें.

मौर्य घराण्यांतील सम्राट् अशोकानें बौद्ध धर्माच्या प्रचारासाठीं अपरान्तकांत (कोंकणात) पाठविलेले दूत गोव्यांतहि पोंचले आणि त्यांनीं तेथें मौर्यांचा अंमल बसवून धर्मप्रसाराबरोबर बौद्ध विहार उभारण्याचेंहि काम केलें. गोव्यांतील रिवण, लामगांव, हरवळें, लोटली, आकें, रेडी वगैरे ठिकाणीं बौद्धांच्या हीनयान पंथाचे साधे विहार तर सांपडतातच, परंतु बारदेसांतील कोळवाळ येथें भगवान् बुद्धाची मूर्तिहि आहे.

वर उल्लेखिलेल्या अनेक राजसत्तांनीं गोव्यावर राज्य केलें असलें तरी दीर्घ काळापर्यंत गोव्यावर राज्य करून आपल्या सत्तेची छाप मागें ठेवणारा राजवंश म्हणजे कदंबांचाच होय. कारवार जिल्ह्यांतील वनवासी येथें उदयास आलेल्या कदंबांची सत्ता इसवी सनाच्या आठव्या शतकांत गोव्यावर प्रस्थापित होण्यापूर्वीं या प्रदेशावर शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे घराण्यांनीं राज्य केलें.

'प्रेमें मालव, वंग, गुर्जर तुला मानोत हर्षा प्रभू ।

केव्हांहि अरिच्या पदीं न नमली माझी महाराष्ट्र भू ॥'— असा बाणे

दार निरोप सम्राट् हर्षवर्धनाला पाठविणारा राष्ट्रकूटराज गोविंद यानें गोमंतकावर इसवी सनाच्या सातव्या शतकांत आक्रमण करून, हा प्रांत आपल्या राज्यांत समाविष्ट केला होता. आपल्याच वंशांतील एका क्षत्रपाची ( मांडलिकाची ) त्यानें या प्रांताचा राज्यकारभार चालविण्यासाठीं नेमणूक केली. त्या क्षत्रपाची राजधानी सासष्टी तालुक्यांतील चांदूर ( चंद्रपूर ) येथें होती.

गोव्याचें कदंब घराणें हें प्रथम वनवासीच्या कदंबांचें मांडलिक होतें. परंतु नंतर ते स्वतंत्र झाले. नवव्या शतकांत गोव्याच्या कदंब घराण्यांतील दुसरा जयकेशी हा स्वतःला ' कोंकण चक्रवर्ती ' म्हणवून घेत असे. परंतु त्याच सुमारास त्याची राजधानी गोपकपट्टण येथून वीस मैलांवर चांदूर येथें असलेला राष्ट्रकूट नृपति चंद्रादित्य हा स्वतःला परमवीर, परमभट्टारक, महाराजाधिराज म्हणवून घेत होता. यावरून या सम्राटांचें साम्राज्य दहा-वीस मैलांच्या परिघापुरतेंच मर्यादित असलें पाहिजे, हें स्पष्ट होतें. तरीदेखील स्वतःला ' वनवासी पुरवराधीश्वर ' ही मानाची बिरुदावली लावून घेणारें गोव्यांतील हें कदंब घराणें १२७२ मध्यें यादव सेनापति बिच्चण याच्या हल्ल्याला बळी पडून नामशेष होईपर्यंत सुमारें साडेतीनशें वर्षें सातत्यानें गोव्याच्या छोट्याशा भागावर राज्य करीत राहिलें. या घराण्यांतील गुहल्लदेव ( पहिला ), गुहल्लदेव ( दुसरा ) व जयकेशी ( पहिला ) हे राजे विशेष पराक्रमी होते. साऱ्या कोंकण प्रांतावर त्यांचा दरारा होता. गुहल्लदेवानें शिलाहारांचाहि पराभव केला होता. यावरून कदंबांच्या पराक्रमाची कल्पना यावी. हें कदंब घराणें कन्नड भाषिक होतें व त्यानें गोव्यांत कानडी भाषेचा प्रसार करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु मराठीच्या प्रभावापुढें त्यांचें कांहीं चालू शकलें नाहीं. आज महाराष्ट्रांत कदम, कदमबांडे वगैरे आडनांवें असलेले क्षत्रिय मराठे हे या कदंबांचेच वंशज असले पाहिजेत. त्यावरूनहि कन्नड कदंबांना मराठीनें कालांतरानें किती आत्मसात करून टाकलें याची कल्पना यावी.

कदंबांनीं ' बृहद् भैरवगद्याणक ' आणि ' लघु भैरवगद्याणक ' या नांवाचीं स्वतःचीं नाणींहि प्रचलित केलीं आणि समाजांत सुरक्षितता, स्वास्थ्य , समाधान निर्माण करून विद्या–कलांच्या विकासास चांगला हातभार लावला. भावी कालांत विकसित झालेल्या मराठी संस्कृतीचें प्रारंभिक संगोपन विदर्भ, मराठवाडा वगैरे केन्द्रांप्रमाणें गोमन्तकांत करण्याचें श्रेय या कदंबांना आहे. तसे ते

फार सामर्थ्यवान् नव्हते. चालुक्य, कलपुरी, होयसळ वगैरे महापराक्रमी राजसत्तांचें मांडलिकत्व मान्य करूनच त्यांनीं स्वायत्तता उपभोगिली; परंतु आपल्या छोटयाशा प्रदेशांतील लोकजीवन उन्नत व्हावें, म्हणून त्यांनीं शक्य ते सारे प्रयत्न केले असें इतिहासांत नमूद आहे.

## मुसलमानी अमदानी

कदंबांकडून यादवांनीं गोव्याचें राज्य जिंकून घेतलें. परंतु ते जेमतेम शंभर वर्षें राज्य करूं शकले. कारण इ. स. १२९४ सालीं अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरीच्या यादवांचा पराभव केल्यानंतर गोव्यांत आपोआप मुसलमानी अंमल सुरू झाला. अर्थात् दक्षिणेंत बहामनी सत्ता दृढमूल होईपर्यंत गोव्यांत स्थानिक मराठी व ब्राह्मण सरदारांचेंच राज्य चालत राहिलें. १३५१ मध्यें हसन गंगू जाफरखान ( बहामनी ) यानें गोव्यावर स्वारी करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला. जाफरखान हसनशाह याचा दिवाण महंमद गवान यानें दक्षिण कोंकण जिंकून त्याचा एक सुभा बनविला. त्याची राजधानी होनावर ( कारवार ) येथें होती. गोव्याचा प्रदेश या सुभ्यांत समाविष्ट झाला. होनावरच्या नबाबाची ही मुसलमानी सत्ता गोमंतकांत सुमारें पन्नास वर्षें टिकली. तेवढया अवधींत मुसलमानांकडून हिंदूंचा खूपच धार्मिक छळ झाला. देवळें पाडण्यांत येऊन तेथें मशिदी उभारण्यांत आल्या व अनेक हिंदूंना जबरदस्तीनें बाटवून मुसलमान बनविण्यांत आलें.

## विजयनगर साम्राज्यांत गोवा

परंतु लौकरच गोव्याच्या नशिबींचा हा छळ थांबला. विजयनगरचें हिंदू साम्राज्य प्रबळ होतांच त्याचा सेनापति माधव मंत्री यानें गोव्यांतील वसंत माधव व माइ शणै वागळे या मुत्सद्यांच्या सल्ल्यानुसार गोमंतकावर स्वारी करून त्याची मुस्लिम अमलांतून सुटका केली. त्यानंतर सुमारें साठ वर्षेंपर्यंत गोवा प्रांत विजयनगरच्या राजसत्तेखालीं राहिला. हा काळ गोमंतकीय जनतेच्या भरभराटीचा व उत्कर्षाचा ठरला. गोवा हेंच पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख बंदर असल्यामुळें त्या शहराची खूप भरभराट झाली. आयातनिर्यातीचें तें द्वारच नलें. त्यामुळें गोमंतकीय जनतेनें, विशेषतः तेथील पुढारलेल्या सारस्वतांनीं,

या संधीचा चांगला फायदा घेतला आणि त्यांनीं व्यापारांतच नव्हे तर रण-क्षेत्रावरहि पराक्रम गाजविला. ‘ सूर्यराव ’, ‘ प्रतापराव ’, ‘ विश्वासराव ’, ‘ यशवंतराव ’, ‘ दंडनायक ’, ‘ दलपति ’ ( दळवी ) वगैरे पदव्या मिळविणारीं अनेक घराणीं त्या जातींतून उदयास आलीं.

## पुनः मुसलमानी अमलाखालीं

परंतु गोव्याचा हा उत्कर्ष लौकरच संपुष्टांत आला. बहामनी राज्याची एक शाखा विजापूरची आदिलशाही प्रबळ झाली आणि यूसुफ आदिलशहा यानें इ. स. १४९९ सालीं गोमंतकावर स्वारी करून तो आपल्या राज्याला जोडून टाकला. हा यूसुफ आदिलशहा कवि, कलारसिक व उदार होता. गोव्याच्या निसर्ग-सौंदर्यानें मोहित होऊन त्यानें तेथेंच सुंदर सुंदर राजवाडे बांधले व त्यांत तो राहूं लागला. हिंदूंना आपल्याबद्दल परकेपणा वाटूं नये म्हणून त्यानें राज्यकारभारांत त्यांना मोठ्या प्रमाणावर सहभागी केलें. ‘देसाई’, ‘ सरदेसाई ’, ‘ प्रभुदेसाई ’ वगैरे घराणीं याच काळांत उदयास आलीं व गोमंतकाच्या इतिहासांत गाजलीं.

## पोर्तुगीजांची जुलमी राजवट

परंतु हा इतिहास एवढ्यावरच थांबला नाहीं. त्यांतील अगदीं काळीकुट्ट पानें तर पुढेंच होती. मुसलमानांची चांचेगिरी व धार्मिक जुलूम यांनीं त्रासून गेलेल्या हिंदूंनीं भारताच्या दक्षिण किनाऱ्यावर, कालिकत येथें नुकत्याच आलेल्या ( ७ मे १४९८ ) गोऱ्या फिरंग्यांची – पोर्तुगीजांची–मदत मागितली. विजयनगरच्या आरमारांतील एक अधिकारी सरदार तिमय्या नायक व कृष्ण नायक यांच्या विनंतीवरून पोर्तुगीज सेनापति आफोंस द अल्बुकर्क यानें १७ फेब्रुवारी १५१० रोजी गोवा बेट जिंकून घेऊन आग्वादच्या किल्ल्यावर पोर्तुगीज झेंडा चढविला. आदिलशाहानें पुनः गोव्यावर हल्ला करून तें परत मिळविलें. परंतु अल्बुकर्कनें जय्यत तयारीनिशीं दुसऱ्यांदा आक्रमण करून २५ नोव्हेंबर १५१० रोजीं पुनः गोवें सर केलें. अशा प्रकारें गोव्याच्या भूमींत पोर्तुगीजांनीं रोवलेला पाय १९ डिसेंबर १९६१ पर्यंत सतत ४५१ वर्षें कायम टिकून राहिला. इतक्या दीर्घ मुदतीपर्यंत परकीयांच्या गुलामगिरींत राहिलेला गोवा हाच बहुधा भारताचा भाग असावा.

## 'इन्क्विझिशन 'नें उडविलेला हाहाःकार

खिश्चन लोकांपैकीं प्रॉटेस्टंट लोक हे सुधारक, उदार असतात तर कॅथॉलिक पंथाचे अनुयायी हे कर्मठ, सनातनी, संकुचित दृष्टीचे व क्रूर असल्याचें इतिहासावरून दिसून येतें. पोर्तुगालचे राज्यकर्ते नुसते कॅथॉलिकच नव्हते तर मनानें लोकशाहीविरोधी व धर्मवेडे, किंबहुना जंगली होते. इ. स. १५४१ सालीं पोर्तुगालमध्यें सत्तेवर आलेला डों जुवाव तिसरा हा राजा म्हणजे धर्मवेडेपणाचा अर्क होता. त्याच्याच प्रेरणेनें पोर्तुगालमध्यें 'धर्म विचारणी सभे' ची (inquisition * ची) स्थापना होऊन कमीं कट्टर खिस्त्यांचा पद्धतशीर छळ करण्यांत येऊं लागला. तेथें नवदीक्षित–पूर्वाश्रमींचे ज्यू–खिस्त्यांच्या धर्मनिष्ठेविषयीं शंका येतांच त्यांना जिवंत जाळण्यांत आलें. इतकेंच नव्हे तर त्यांच्या निरपराध बायकामुलांच्याहि क्रूरपणें कत्तली करण्यांत आल्या. स्तनपान करणाऱ्या मुलांना त्यांच्या मातांपासून हिसकावून घेण्यांत आलें आणि त्यांचे पाय पकडून डोकीं खालीं करून तीं भिंतीवर आपटून त्यांना ठार करण्यांत आलें. ज्या खिस्तमंदिरांत नवखिश्चनांनीं आश्रय घेतला, तींहि त्या धर्मवेड्यांनीं उध्वस्त करून टाकलीं.

सुधारलेल्या युरोपांतील पोर्तुगालमध्यें जर ही स्थिति होती, तर मागासलेल्या, अज्ञानांधकारांत खितपत पडलेल्या भारतांत पोर्तुगीज धर्मवेड्यांनीं काय हाहाःकार उडवून लावला असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

हिंदूंच्या निमंत्रणावरून आलेल्या अल्बुकर्कनें प्रथम मुसलमानांचा कांटा काढला. ६ हजार मुसलमानांची त्यानें कत्तल केली. या रक्तपाताचा इतका गाजावाजा झाला कीं अखेर अल्बुकर्कला परत बोलावून पोर्तुगीज सरकारला त्याच्या जागीं लॉपीश याची गोव्याचा गव्हर्नर म्हणून नेमणूक करावी लागली.

मुसलमानांच्या छळानें खूष होणाऱ्या हिंदूंचे डोळे लवकरच उघडले. पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं हिंदूंचा इतका भयंकर छळ केला कीं त्यांच्यापेक्षां मुस्लिम राज्यकर्ते हजारपटींनीं बरे, असें म्हणण्याची पाळी हिंदूंवर आली. मुसलमानांचा मुख्य भर देवळें पाडण्यावर होता. सक्तीचें सामुदायिक धर्मपरिवर्तन करण्याचा

---

* inquisition = शोध; तपासणी; चौकशी; पाखंडी लोकांच्या मताची चौकशी करणारी धर्मसभा.

३६६५३ १२६ : १९७ मू.म.वा.सं.
३३२ नों. दि. २८/५/६

त्यांनीं फारसा प्रयत्न केला नाहीं. परंतु पोर्तुगिजांनीं देवळांचा नाश करून तेथें इगरजा ( चर्चेस ) तर उभारल्याच, परंतु गांवच्या विहिरींत किंवा घरांच्या छपरांवर पाव टाकून गांवेंच्या गांवें बाटविण्याचा जो सपाटा त्यांनीं चालविला, त्यानें हिंदूंना दे माय धरणी ठाय करून सोडलें. खिस्ती बनण्यास जो विरोध करील तो पाखंडी. त्याला जिवंत जाळणें किंवा इतर प्रकारच्या यमयातना देऊन त्याचे हालहाल करणें, हें पोर्तुगीज अधिकाऱ्यांचें मुख्य कार्य बनलें.

या अत्याचारांतून नवदीक्षित खिस्तीहि सुटूं शकले नाहींत, किंबहुना इन्क्विझिशनचा मुख्य त्रास त्यांनाच झाला, ही विश्वास न बसण्यासारखी गोष्ट होय. ‘ नव्यानेंच धर्मांतरित झालेल्यांनीं त्यांची जात व जातनिदर्शक गोष्टी तर सोडल्याच पाहिजेत; पण शिवाय जेत्यांचे ( पोर्तुगीजांचे ) रीतिरिवाज, पोषाख, भाषा व नांवेंसुद्धां स्वीकारलीं पाहिजेत असा पोर्तुगीज मिशनऱ्यांचा आग्रह होता. नवधर्मांतरितांनीं मांसाशन सक्तीनें सुरू केलें पाहिजे, ही अपमानास्पद अटहि लादण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. ’

‘ दि गोवा इन्क्विझिशन ’ या नांवाचें एक उत्कृष्ट पुस्तक प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी लिहिलेलें असून त्यांत या विषयासंबंधी संपूर्ण माहिती आलेली आहे.

भारतांत इतरत्र झालेला खिस्ती धर्मप्रचार व गोव्यांतील खिस्ती-धर्मप्रचार यांत एक मूलभूत फरक होता. इतर ठिकाणच्या पाद्र्यांनीं व मिशनऱ्यांनीं हिंदूंना नुसतें खिश्चन बनविलें. त्यांना ‘ अभारतीय ’ बनविण्याचा प्रयत्न केला नाहीं, त्यांचीं नावें, पोषाख, आचार-विचार यांत आमूलाग्र फरक करण्याचा अट्टाहास बाळगला नाहीं. परंतु गोव्यांत मात्र एतद्देशीयांच्या धर्मपरिवर्तनाबरोबरच त्यांच्या विराष्ट्रीकरणा ( de-nationalisation ) चाहि कसोशीनें व कटाक्षानें प्रयत्न करण्यांत आला. गोवा इन्क्विझिशननें पुरुषांना धोतरें नेसण्यास आणि बायकांना चोळ्या घालण्यास बंदी केली होती. इ. स. १७३६ मध्यें इन्क्विझिशननें पुढील फर्मान काढलें होतें :

“ हिंदुस्थानच्या नागरिकांना असा हुकूम करण्यांत येत आहे कीं, पुरुषांनीं घरांत अथवा घराबाहेर केव्हांहि हिंदु पद्धतीचें धोतर नेसतां कामा नये. तसेंच हिंदु स्त्रिया वापरतात तशी चोळीहि स्त्रियांनीं वापरूं नये. ” ( ‘ दि गोवा इन्क्विझिशन ’–पृष्ठ : १०५ )

बाप्तिस्माच्या वेळीं, बाटणाऱ्यांना जुनीं भारतीय नांवें टाकून द्यावीं लागत व त्यांच्याऐवजीं नवीन पोर्तुगीज नावें धारण करावीं लागत. त्यानंतर एखाद्या खिस्तेतरानेंसुद्धा त्याना जुन्या नांवानें हांक मारणें हा गुन्हा मानला जाई. वर उल्लेखिलेल्या इन्क्विझिशनच्या फर्मानांत त्याच पानावर असा उल्लेख आहे:

" भारतीय हिंदी प्रजा व पोर्तुगीज नागरीक या दोघांनाहि असा हुकूम करण्यांत येत आहे कीं त्यांनीं कोणाहि खिस्त्याला हिंदु नांवानें अथवा आड-नांवानें हांक मारूं नये किंवा त्याचा त्या नांवांनीं उल्लेखहि करूं नये."

एतद्देशीय भाषेचें उच्चाटन करून तिच्या जागीं पोर्तुगीज भाषेची स्थापना करण्यासाठीं गोव्याचा गव्हर्नर कोन्डे द आल्वोर यानें इ. स. १६८४ मध्यें काढलेल्या हुकुमांत पुढील मजकूर आहे:


" आजपासून तीन वर्षांच्या काळांत या प्रदेशांतील लोकांनीं पोर्तुगीज भाषा शिकून ती वापरण्यास सुरवात केली पाहिजे; आणि जे जे व्यवहार व करार होतील त्यासाठीं सदैव हीच भाषा वापरली पाहिजे; आणि हा हुकूम मोडून जे स्वभाषेचा वापर करतील त्यांना कडक शासन करण्यांत येईल."

या इन्क्विझिशननें १४५४ लोकांना जिवंत जाळलें, १७३२ लोकांना नाना प्रकारच्या क्रूर शिक्षा ठोठावल्या व ६० हजार लोकांना सक्तीनें बाटवून खिस्ती बनविलें. यावरून या धर्मसमीक्षण सभेच्या भयंकरतेची कल्पना येईल. तटस्थ वृत्तीच्या पोर्तुगीज इतिहासकारांनीं व विद्वानानींहि या इन्क्विझिशनचा धिःकारच केला. इ. स. १८८५ सालीं पोर्तुगीज सरकारचे सेक्रेटरी जनरल म्हणून गोव्यांत आलेले उदारमतवादी विद्वान् संशोधक डॉ. जे. एच. कुंञ्या (कुन्हा) रिव्हार यांनीं या परिस्थितीचें वर्णन पुढील शब्दांत केले आहे:

" प्रारंभीं विजयोन्मादांत हिंदूंची देवळें जमीनदोस्त करण्यांत आलीं. हिंदूंच्या पूजामूर्ती, पूजेचीं उपकरणें वगैरेंच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करण्यांत आल्या. देशी ग्रंथ, त्यांत मूर्तिपूजेचें पाखंड भरलेलें असणार या संशयानें, आगीच्या भक्ष्य-स्थानीं फेंकले गेले. खिस्ती धर्माचा स्वीकार न करणाऱ्या सर्व जनतेचा समूळ उच्छेद करण्याची ही इच्छा आरंभीं दिसून आली आणि दोन शतकें उलटल्या-वरहि हा उपाय अमलांत आणण्याचा सल्ला सरकारला गभीरपणें देणारी व्यक्ति आढळून यावी, हें लक्षांत घेण्यासारखें आहे."



दूधसागरचा धबधबा



बोरिमचा पूल

एव्हरचे आर्चबिशप यांनीं १८९७ मध्यें याबद्दल असे उद्गार काढले होतेः "इन्क्विझिशन ही संस्था अत्यंत नीच स्वरूपाची होऊन गेली. परंतु त्यांतल्या त्यांत या नीचतेची व दुष्टपणाची कमाल जर कुठें झाली असेल तर ती 'त्रिबुनाल द गोवा' ( Tribunal Dc Goa ) मध्यें. या 'त्रिबुनाल'ला 'पवित्र सरकार' असें संबोधण्यात येई. हा एक मोठाच विरोधाभास होता. इन्क्विझिशनचे निवाडे देणारे लोक आपल्या विषयवासनेस वश न होणाऱ्या स्त्रियांना पकडून तुरुंगांत टाकीत, त्याच्यावर बलात्कार करीत व मग 'धर्मबुडव्या' म्हणून त्यांना जाळून टाकावयास लावीत."

आंतॉनियु व नॉरॉंज हे न्यायाधीश 'गोमंतकीय हिंदु व पोर्तुगीज रिपब्लिक' या आपल्या ग्रंथांत म्हणतात, "हालअपेष्टांची कमाल झाली. गरीब बिचारे हिंदू आपलीं घरें-दारें, जमीनजुमला, उद्योगधंदा सर्व कांहीं सोडून देऊन जमावानें शेजारच्या प्रांतांत निघून जाऊं लागले आहेत. पुढें पुरुष, त्यांच्या मागें बायका, व शेवटीं लहानमोठीं मुलें, अधून मधून वृद्ध, अपंग, रोगी यांचीहि वाण नाहीं. अशा प्रकारें हिंदु लोक सतत दिवसामागून दिवस मायभूमीचा त्याग करून निघून जात आहेत."

इ. स. १५१० पासून १७६३ पर्यंत पोर्तुगीजांच्या ताब्यांत गोमन्तकाचे तीनच तालुके होते; गोवा, बारदेस व सासष्टी ( सालसेत ). किनाऱ्यालगतच्या या तीन तालुक्यांना मिळून जुन्या काबिजादी ( Velhas Conquistas ) अशी संज्ञा आहे. पोर्तुगीजांनीं ज्या स्थानिक रहिवाशांचा धार्मिक छळ केला ते मुख्यतः या जुन्या काबिजादींत राहाणारेच होते. या वेळीं या तीन तालुक्यांच्या भोंवतीं असणारे पेडणें, डिचोली, सत्तरी, फोंडा, सांगें, केंपें व काणकोण हे सात तालुके विजापूरकर, सावंतवाडीकर भोंसले व सौंदेकर वडियार यांच्या ताब्यांत असल्यामुळें पोर्तुगीजांच्या छळाला कंटाळलेली जनता आपलीं देव-दैवतें घेऊन या शेजारच्या तालुक्यांत आश्रयास गेली. कांहीं सारस्वत कुटुंबें समुद्रमार्गानें मंगळूर ( दक्षिण कानडा ) व कोचीन ( कोच्चि-केरळ ) या भागांत गेलीं. सुमारें साठ हजार हिंदु अशा प्रकारें गोमंतकांतून निर्वासित झाले असल्याचा पोर्तुगीज दप्तरांत पुरावा सांपडतो. याचमुळें आजहि मंगळूर व कोचीन भागांत हजारों सारस्वत कुटुंबें आढळतात. त्यांनीं आपली कोंकणी भाषा प्रयत्नपूर्वक जतन करून ठेवली आहे. या निर्वासितांत गोवा शहरांतील व्यापारी व त्यांचा

नोकरवर्ग यांचाच मुख्यतः भरणा होता. त्यांच्या या देशांतरामुळें गोवा शहराचा व्यापार संपुष्टांत आला.

## गोवामुक्तीचे मराठ्यांचे प्रयत्न :

गोव्यांतील निरपराध हिंदूंच्या छळाची हकीगत ऐकून त्यांच्याच रक्तामांसाचें असलेल्या मराठ्यांचें रक्त खवळलें नसतें तरच आश्चर्य. त्याप्रमाणें गोव्याच्या मुक्तीसाठीं छत्रपति शिवाजीमहाराजांपासून पेशव्यांपर्यंत अनेकांनीं अनेक प्रकारें पराक्रमाची शर्थ केली. त्यांत त्यांना पूर्णपणें यश आलें नाहीं हें खरें, परंतु मराठ्यांचा वचक पोर्तुगीजांना बसला, हिंदूंच्या धार्मिक छळाला आळा बसला आणि पोर्तुगीजांना भारतीय भूमीवर अधिक आक्रमण करण्याची हिंमत झाली नाहीं. इ. स. १६६३ मध्यें शिवाजीमहाराजांचें सैन्य वेंगुर्ल्यावर चालून गेलें, त्यावेळीं त्यांनीं आपल्या ताब्यांतील प्रदेशावर आक्रमण करूं नये, म्हणून पोर्तुगीजांनीं त्यांच्याशीं तह घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं शिवाजी-महाराज गोव्यांतील डिचोली येथें तहासाठीं गेले असतां नार्वे येथील सप्तकोटे-श्वर – मंदिराचा जीर्णोद्धार त्यांनीं करविला. ( इ. स. १६६८ ). तशा आशयाचा शिलालेख आजहि सदर देवालयाच्या भव्य प्रवेशद्वारावर पाहावयास मिळतो. शिवछत्रपतींनीं गोवा महालास लागून असलेल्या फोंडा महालाचा ताबा इ. स. १६७५ सालीं घेतला. आणि पोर्तुगीजांकडून चौथाई वसूल करण्या-साठीं गोव्यावर हल्ला करण्याचा व्यूह रचला. परंतु त्यांच्या अकाल मृत्यूमुळें तें घडून आलें नाहीं.

पुढें धर्मवीर संभाजीमहाराजांनीं १५ एप्रिल १६८३ रोजीं एक हजार घोडे-स्वार व दोन हजार पायदळ बरोबर घेऊन फिरंग्यांच्या ताब्यांतील तारापूर ( जि. ठाणें ) या गांवावर हल्ला करून तो गांव जिंकून घेतला व जाळून पोळून भस्मसात केला. नंतर चौल शहरावर आक्रमण करून हिंदूंचा असह्य छळ करणाऱ्या कित्येक पोर्तुगीज पाद्र्यांना त्यांनीं ठार केलें व अनेकांना पकडून कैदेंत टाकलें.

यानंतर संभाजी महाराजांना मोगलांचें पारिपत्य करण्यासाठीं खानदेशांत जावें लागलें. ती संधि साधून पोर्तुगीजांनीं मराठ्यांच्या ताब्यांतील अंत्रुज ( फोंडा ) महालांत आपलें सैन्य घुसविलें व मर्दनगड किल्ल्यास वेढा घातला

( १ नोव्हेंबर १६८३ ) परंतु ऐनवेळी येसाजी कंक या कसलेल्या सेनापतीसह ५ हजार सैन्य घेऊन संभाजी महाराज वायुवेगानें बांदोडें, उसगांव मार्गानें अंत्रुजेंत उतरलें व त्यांनीं पोर्तुगीजांचा दणदणीत पराभव केला. तेथून ते तसेच झपाट्यानें गोव्याकडे निघाले. गोवा शहराचें धनवान् उपनगर असलेलें कुंभारजुवें हें बेट सर करून त्यांनीं गोवा शहरावर धडक मारण्याची तयारी सुरू केली ( १७ फेब्रुवारी १६८४ ). वस्तुतः याच वेळीं गोमंतकांतील पोर्तुगीज राजवटीचा निकाल लागावयाचा परंतु इतक्यांत मोगल सम्राट औरंगजेब स्वतःच खानदेश जिंकून अहमदनगर जिल्ह्यांत येऊन पोंचल्याचें वृत्त येऊन धडकलें. त्यामुळें संभाजी महाराजांना ‘ जैसे थे ’ या अटीवर पोर्तुगीजांशी तह करणें भाग पडलें. पोर्तुगीजांच्या ताब्यांतील बारदेस, तिसवाडी ( गोवा ) व सासष्टी या तिन्ही तालुक्यांत घुसलेल्या मराठी सैन्यानें त्यावेळीं असा कांहीं भीमपराक्रम केला कीं गोव्याचा व्हाइसरॉय कोन्द द आल्व्होर हा अगदीं गर्भगळित झाला व त्यानें जुनें गोवें येथील सेंट फ्रान्सिस झेवियरच्या शवपेटीवर वैतागानें आपला राजदंड टाकून दिला. ( तेव्हांपासून नव्या गव्हर्नरनें अधिकारसूत्रें घेतांना झेवियरच्या शवपेटीवरून राजदंड घेण्याची प्रथा पडली. ) आणीबाणीची परिस्थिति निर्माण होतांच झेवियरचें शव बाहेर काढून त्याला सांकडे घालण्याची पद्धत होती. त्याप्रमाणें शवपेटींतून झेवियरचें शव बाहेर काढून त्याची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. यावरून त्या परिस्थितीची कल्पना येऊं शकेल.

मराठ्यांजवळ शौर्य होतें परंतु चातुर्य नव्हतें. त्यामुळें लढाई करून ते तलवारीनें जें मिळवीत तें तहाच्या वेळीं लेखणीनें घालवून बसत. इ. स. १७३९ सालीं व्यंकटराव घोरपडे यांनीं सासष्टीवर आणि भोसल्यांनीं बारदेशवर एकाच वेळीं हल्ला करून ते प्रांत जिंकून घेतले. परंतु स्थानिक हिंदु सरदारांची फंदफितुरी व मराठ्यांतील दुही यांमुळें हे विजय मराठ्यांना सांभाळतां आले नाहींत. इ. स. १७८८ पर्यंत मराठ्यांनीं पोर्तुगीजांना जेरीस आणण्याचे अनेकदां प्रयत्न केले. परंतु अंगच्या चिवटपणाच्या जोरावर पोर्तुगीज अखेरपर्यंत या भूमीला चिकटून राहिले.

## धार्मिक छळाला आळा बसला :

मराठ्यांच्या या स्वाऱ्यांचा एक चांगला परिणाम स्थानिक हिंदु जनतेच्या

ती संधि गव्हर्नर व्हिस्कोंद द व्हीत नोव्ह द औरे यांच्या मूर्खपणामुळें लौकरच आली. त्यानें खोट्या माहितीवर विसंबून बरेच सुलतानी हुकूम सोडले. मोकाशे, इनामे, कुटुंबणे इत्यादिकांवर कर बसवून तीं खालसा करणें, 'कात्सोर्यु' नांवाचा जाहीरनामा काढून विजारी न घालणारे पुरुष व चोळ्या न घालणाऱ्या स्त्रिया यांना पकडणें, जंगलांचा कायदा जारी करणें इत्यादि मार्गांनीं प्रजेवर देशी, शिपायांचे व पाखल्यांचे (पोर्तुगीज सोल्जरांचें,) अत्याचार सुरू झाले. चोळ्या नसण्याच्या सबबीवर स्त्रियांवर बलात्कारहि सुरू झाले. त्यांत पुनः सत्तरीची 'पीक चारणी' (पिकाची आणेवारी) चुकीची व भरमसाट केली गेली. त्यामुळें सर्व सामान्य शेतकरीहि खवळून उठला.

अशा साऱ्या असंतुष्टांच्या मदतीने कुंभारखाणींतील दीपाजी राण्यानें पोर्तुगीज सत्तेविरुद्ध बंडाचें शिंग फुंकलें. (२६ जानेवारी १८५१) पहिल्याच धडाक्यांत त्यांनीं माणसाचा किल्ला घेऊन त्यांतील शस्त्रे हस्तगत केलीं. त्यानंतर दीपाजीच्या कुशल नेतृत्वाखालीं संघटित बनलेली शेतकऱ्यांची सेना निर्भयपणें सर्वत्र संचार करूं लागली. पोलीस ठाणीं, पोस्ट ऑफिसें, सरकारी इमारती, लष्करी ठाणीं धडाधड कोसळून आगीच्या भक्ष्यस्थानीं पडूं लागली. सरकारी अधिकारी व लष्करी शिपाई यांचे दिवसाढवळ्या मुडदे पडूं लागले. राण्यांच्या गनिमी काव्यापुढें गोव्यांतील पोर्तुगीज सत्तेचें कांहीं चालेना. म्हणून गव्हर्नरानें बंडाचा मोड करण्यासाठीं सैन्य पाठविण्याची पोर्तुगालच्या सरकारला विनंती केली. त्याप्रमाणें ताज्या दमाची कुमक घेऊन पोर्तुगालहून नवा गव्हर्नर पेस्तान हा आला व स्वतः चारशें सैनिकांची तुकडी बरोबर घेऊन जातीनें सत्तरींत गेला. परंतु राण्यांच्या गनिमी काव्यापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. दीपाजीला पकडून देणाऱ्यास दहा हजार रुपयांचें बक्षीस जाहीर करण्यांत आलें होतें; परंतु दीपाजीवर सामान्य जनतेचें इतकें प्रेम व विश्वास होता कीं त्याला पकडून देण्याची कल्पनाहि कोणाच्या मनाला शिवली नाहीं. एकदां बंडखोर राणे सांटेरगडावर पुढील योजना आखण्यासाठीं जमले असतां पेस्ताननें किल्ल्याला वेढा घातला. हा किल्ला म्हणजे एक निमुळता असा उंच डोंगर आहे. पण पायथ्यालगत चारी बाजूंनीं कळकीच्या कणखर कांटेरी बेटांचा निसर्गनिर्मित तट असल्यामुळें या डोंगरावर चढणें सोपें नव्हतें. बाहेरून डागल्या जाणाऱ्या पोर्तुगीज तोफांचा कांहींच परिणाम होत नव्हता. हा अटीतटीचा सामना सतत सात दिवस चालला.

बाळोबा, तात्या वगैरे रणमर्दांचीं नांवें यापूर्वींच आलेलीं आहेत. त्यांच्याखेरीज इतरहि अनेकांनीं रणक्षेत्रावर मर्दुमकी गाजविली असणार. परंतु त्या सर्वांचीं नांवें आपल्याला माहीत नाहींत.

हे झाले गोव्याबाहेर गेलेले वीरपुरुष. खुद्द गोव्यांतहि कांहीं शूरांनीं पोर्तुगीजांना वेळोवेळीं पाणी पाजलें होतेंच. त्यांच्यापैकीं विशेष उल्लेखनीय म्हणजे बंडखोर राणे. प्रस्थापित राज्यसत्तेविरुद्ध केलेला उठाव जेव्हां यशस्वी होतो, तेव्हां ती राज्यक्रान्ति ठरते, आणि ती क्रांति करणारे पुढारी महामानव ठरून त्यांच्या मूर्तींची व तसबिरींची पूजा केली जाते. परंतु तोच उठाव अयशस्वी झाला तर तें बंड ठरतें आणि तें करणारे बंडखोर उपहासाला पात्र होतात! जगांत यशासारखें यश नाहीं. (Nothing succeds like success) हेंच खरें! अर्थात् आपल्या मातृभूमीला पारतंत्र्याच्या शृंखलांतून मुक्त करण्यासाठीं प्राणांवर उदार झालेले अयशस्वी बंडखोर राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें कितीहि अप्रिय असले तरी ज्या जनतेच्या वतीनें त्यांनीं बंडाचा झेंडा उभारलेला असतो तिच्या अंतःकरणांत त्यांच्याविषयीं आदराची, कौतुकाची, प्रेमाची व आपुलकीचीच भावना असते. त्यामुळें गोव्यांतील राण्यांना बंडखोर म्हणतांनाहि आपल्या मनांत त्यांच्याविषयीं अभिमानच असतो.

१८५७ सालीं भारतांतील ब्रिटिश सत्तेविरुद्ध भारतीय क्रांतिकारकांनीं बंडाचें निशाण उभारलें त्यापूर्वी ६ वर्षें म्हणजे १८५१ सालीं दीपाजी राण्यानें गोमंतकांत पोर्तुगीजांविरुद्ध बंड पुकारलें होतें आणि तें सतत ८ वर्षें चाललें होतें ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

हें बंड केवळ धार्मिक जुलुमाविरुद्ध नव्हतें; पोर्तुगीजांनीं चालविलेल्या आर्थिक पिळणुकीविरुद्धच त्याचा मुख्य रोख होता. परंतु धार्मिक जुलुमामुळें त्याला विशेष धार आली एवढेंच. वस्तुतः नव्या कर्गीबिजादींतील ज्या सत्तरी (सांखळी) महालांतून हें बंड उद्‌भवलें तो अत्यंत डोंगराळ व जंगलांनीं भरलेला असा असा महाल आहे. तेथें हिंदूंची लोकसंख्या सुमारें ९५ टक्के आहे. परंतु धार्मिक सहिष्णुतेचें धोरण जाहीर झाल्यानंतरहि तेथें पोर्तुगीजांनीं देवादिकांच्या मिरवणुकींना सक्तीनें बंदी घातली होती. एवढें नव्हे तर घरासमोर तुळशीवृंदावन ठेवून पूजाअर्चा करण्याचीहि सक्त मनाई केली होती. त्यामुळें आंतल्या आंत धुमसणारा क्रोधाग्नि पेट घेण्यासाठीं योग्य संधीची जणुं वाटच पाहात होता.

ती संधि गव्हर्नर व्हिस्कोंद द व्हीत नोव्ह द औरे याच्या मूर्खपणामुळें लौकरच आली. त्यानें खोट्या माहितीवर विसंबून बरेच सुलतानी हुकूम सोडले. मोकाशे, इनामे, कुटुंबणे इत्यादिकांवर कर बसवून तीं खालसा करणें, 'काल्सोर्यु' नांवाचा जाहीरनामा काढून विजारी न घालणारे पुरुष व चोळ्या न घालणाऱ्या स्त्रिया यांना पकडणें, जंगलाचा कायदा जारी करणें इत्यादि मार्गांनीं प्रजेवर देशी शिपायांचे व पाखल्यांचे ( पोर्तुगीज सोल्जरांचें, ) अत्याचार सुरू झाले. चोळ्या नसण्याच्या सबबीवर स्त्रियांवर बलात्कारहि सुरू झाले. त्यांत पुनः सत्तरीची 'पीक बारणी' ( पिकाची आणेवारी ) चुकीची व भरमसाट केली गेली. त्यामुळें सर्व-सामान्य शेतकरीहि खवळून उठला.

अशा साऱ्या असंतुष्टांच्या मदतीनें कुंभारखाणींतील दीपाजी राण्यानें पोर्तुगीज सत्तेविरुद्ध बंडाचें शिंग फुंकलें. ( २६ जानेवारी १८५१ ) पहिल्याच धडाक्यांत त्यांनीं नाणसाचा किल्ला घेऊन त्यांतील शस्त्रें हस्तगत केलीं. त्यानंतर दीपा-जीच्या कुशल नेतृत्वाखालीं संघटित बनलेली शेतकऱ्यांची सेना निर्भयपणें सर्वत्र संचार करूं लागली. पोलीस ठाणीं, पोस्ट ऑफिसें, सरकारी इमारती, लष्करी ठाणीं धडाधड कोसळून आगीच्या भक्ष्यस्थानीं पडूं लागलीं. सरकारी अधिकारी व लष्करी शिपाई यांचे दिवसाढवळ्या मुडदे पडूं लागले. राण्यांच्या गनिमी काव्यापुढें गोव्यांतील पोर्तुगीज सत्तेचें कांहीं चालेना. म्हणून गव्हर्नरानें बंडाचा मोड करण्यासाठीं सैन्य पाठविण्याची पोर्तुगालच्या सरकारला विनंती केली. त्याप्रमाणें ताज्या दमाची कुमक घेऊन पोर्तुगालहून नवा गव्हर्नर पेस्तान हा आला व स्वतः चारशें सैनिकांची तुकडी बरोबर घेऊन जातीनें सत्तरींत गेला. परंतु राण्यांच्या गनिमी काव्यापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. दीपाजीला पकडून देणाऱ्यास दहा हजार रुपयांचें बक्षीस जाहीर करण्यांत आलें होतें; परंतु दीपाजी-वर सामान्य जनतेचें इतकें प्रेम व विश्वास होता कीं त्याला पकडून देण्याची कल्पनाहि कोणाच्या मनाला शिवली नाहीं. एकदां बंडखोर राणे सांटेरगडावर पुढील योजना आखण्यासाठीं जमले असतां पेस्ताननें किल्ल्याला वेढा घातला. हा किल्ला म्हणजे एक निमुळता असा उंच डोंगर आहे. पण पायथ्यालगत चारी बाजूंनीं कळकीच्या कणखर कांटेरी बेटांचा निसर्गनिर्मित तट असल्यामुळें या डोंगरावर चढणें सोपें नव्हतें. बाहेरून डागल्या जाणाऱ्या पोर्तुगीज तोफांचा कांहींच परिणाम होत नव्हता. हा अटीतटीचा सामना सतत सात दिवस चालला.

राण्यांचा दारूगोळा संपत आला. मोठी समस्या त्यांच्यासमोर उभी राहिली. इतक्यांत एका मराठी सैनिकाला युक्ति सुचली. किल्ल्याच्या एका दरडीला एक आग्या मोहोळ लटकत असलेलें त्याला माहित होतें. त्या मोहोळावर त्यानें दगड मारले. त्याबरोबर त्या क्रुद्ध मधमाशांनीं समोर दिसणाऱ्या पोर्तुगीज सैन्यावर त्वेषानें चल्ला चढविला. आरडत–ओरडत, शंखनाद करीत गोरे सैनिक व अधिकारी वाट फुटेल तिकडे पळत सुटले. आकस्मिकपणें उद्‌भवलेल्या या विचित्र संकटानें गव्हर्नर बहादुर रडकुंडीस आले व त्यांनीं तडजोडीची तयारी दाखविली. त्यांनीं दीपाजीला वाटाघाटींसाठीं बोलावलें. तेव्हां गव्हर्नर पेस्तन याचा मुलगा, चार कर्नल व आणखी कांहीं अधिकारी यांना दीपाजीनें ओलीस ठेवून घेतलें आणि मगच तो गडावरून खालीं उतरला. डिचोली गांवांत तहाच्या वाटाघाटी झाल्या. दीपाजीनें घातलेल्या अटी अशी होत्या :

( १ ) ग्रामसंस्थांचें संरक्षण, ( २ ) धर्माच्या नांवाखालीं चाललेल्या अत्याचारांना आळा, ( ३ ) शेतकऱ्यांना बीं-बियाणांचा पुरवठा, ( ४ ) मग्रूर अधिकारी निदान सत्तरी महालांत नेमूं नयेत, ( ५ ) करनिवारण, ( ६ ) अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या कराव्या, ( ७ ) बंडवाल्यांना बिनशर्त माफी द्यावी.

या अटी गव्हर्नर महाशयांनीं मान्य केल्या असें कांहीं इतिहासकार लिहितात, तर कांहींच्या मतें गव्हर्नरसाहेब या बंडाच्या कटकटीला कंटाळून 'कौंसिल्यु गोव्हेर्नातीव्ह' या कार्यकारी मंडळाच्या हातीं राज्यसूत्रें सोपवून १८५५ सालीं पोर्तुगालला परत गेले, तेव्हां या कौन्सिलनें दीपाजी राण्याच्या अटी मान्य करून त्याच्याशीं तडजोड केली.

दीपाजी राण्याच्या बंडानंतर वळवईचें बंड ( इ. स. १८७० ) व माडोलांतील बंड ( इ. स. १८७१ ) अशीं आणखीं दोन शिपायाचीं बंडें झालीं. परंतु तीं किरकोळ स्वरूपाचीं होतीं. त्यानंतर १८९५ सालीं सत्तरी महालांतील अडवईच्या दादा राण्यांनीं ज्या बंडाचें नेतृत्व केलें तें फार काळ टिकलें नाहीं तरी गाजलें मात्र फार. कारण तें केवळ हिंदूंचें बंड नव्हतें. त्याच्या मागें गोव्यांतील प्रतिष्ठित ख्रिश्चन व मुसलमानहि पाठिंबा देण्यासाठीं उभे होते अशा प्रकारें एकूण गोमंतकीय जनतेने पोर्तुगीजांच्या धार्मिक व आर्थिक अत्याचारांविरुद्ध संयुक्तपणें उभारलेलें असें तें बंड होतें.

या बंडाचा श्रीगणेशाहि पोर्तुगीज लष्करांतील हिंदु शिपायांकडूनच झाला.

मोझांबिक या आफ्रिकेंतील पोर्तुगीज वसाहतींत अस्थिर परिस्थिति निर्माण झाल्यामुळे गोव्यांतील सैनिकांना आफ्रिकेस पाठविण्याची गुप्त बातमी ( विद्युत्-संदेश ) ता. १३ सप्टेंबर १८९५ रोजी फुटली व गोव्यांतील हिंदू सैनिक बिथरले. त्यांनीं शस्त्रास्त्रांसह आपापल्या छावणींतून पोबारा केला. त्यांनीं नाण-साऱ्या किल्ल्यांत आश्रय घेतला. आपल्याला मोझांबिकला पाठवूं नये एवढीच त्यांची मागणी होती. परंतु ती मान्य करणें गव्हर्नराच्या हातांत नव्हतें. त्यानें तारेनें पोर्तुगाल सरकारला विचारलें. तिकडून नकारार्थी उत्तर आलें; त्याबरोबर इकडे बंडानें पेट घेतला.

याच सुमारास गोव्यांतील पोर्तुगीज लोक स्थानिक ख्रिश्चनांना अपमानास्पद रीतीनें वागवीत असल्याबद्दल ख्रिस्ती वृत्तपत्रांतून कडक तक्रारी येत होत्या. त्यामुळें या बंडाला गोमंतकीय विरुद्ध पोर्तुगीज असें स्वरूप आलें. बाळासाहेब राणे व अप्पासाहेब प्रभुदेसाई हे पराक्रमी पुरुष प्रत्यक्ष बंडांत लढूं लागले. बंडाला अधिक संघटित स्वरूप देण्याचें श्रेय यांनाच होतें. मुसलमान सैनिकांनींहि या बंडांत पराक्रमाची शर्थ केली. बाळासाहेब व अप्पासाहेब यांनीं या बंडांतील लुटालूट, बक्षिसें वगैरेंचा जमाखर्चही व्यवस्थित ठेवलेला होता. असा प्रयत्न आजवरच्या कोणत्याच बंडांत झालेला नव्हता. यावरून या बंडाच्या पद्धतशीर-पणाची कल्पना यावी.

कॅप्टन गोमिश द कोस्त व गव्हर्नर माशाद यांनीं दगाफटका, मार्शल लॉ, जुलूम जबरदस्ती वगैरे सर्व वाईट मार्गांचा अवलंब करून बंड शमविण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्यांना अपयश आले. ‘ अलंगाचा गुंडा ’ या प्रचंड शिळेमागून अप्पासाहेब–बाळासाहेबांनीं केलेल्या गोळीबारानें कॅप्टन कशाल व कॅप्टन कोस्त यांचे बळी घेतले. त्यामुळें गव्हर्नरला नाइलाजानें दडपशाहीचें अत्याचारी धोरण बदलणें भाग पडलें. त्यानें शेतकऱ्यांना मागील साऱ्याची सूट दिली, योग्य न्याय मिळण्याची व्यवस्था केली व बंडवाल्यांना सार्वत्रिक माफी केल्याचा जाहीरनामा काढला. आपल्या अधिकाऱ्यांना ओलीस ठेवून त्यानें दादा राण्यांच्या मुलांना पणजीस आणविले आणि त्यांचा सन्मान करून, त्यांच्या मागण्या ऐकून व त्या पूर्ण करण्याचें अभिवचन देऊन त्यांना सुरक्षित पोंचतें केलें.

परंतु पोर्तुगीज सरकारला गव्हर्नर माशादचा हा शहाणपणाचा व तडजोडीचा मार्ग रुचला नाहीं. त्यानें माशादसाहेबांना परत बोलावलें आणि सत्तरी तालुका

पुनः लष्करशाहीच्या ताब्यांत दिला.

पुनः एकदां बंडाचा वणवा पेटला, परंतु त्यांत पूर्वीसारखें तेज उरलें नव्हतें. ज्यांना दादा राण्यांनीं जीवदान दिलें होतें, त्यांनींच विश्वासघातानें दादांना व त्यांच्या दोन मुलांना पकडून सरकारच्या ताब्यांत दिलें. याच सुमारास कॅप्टन बारत नांवाच्या एका लष्करी अंमलदारानें एका गाईला गोळी घालून मारलें, म्हणून दोघां मराठा शिपायांनीं त्याच्यावर गोळ्या झाडून त्याला यमदानाला पाठविलें. त्या खुनाच्या कटांत सामील असल्याच्या आरोपावरून गव्हर्नर गालयार्द यानें दादा राणे, त्यांचीं मुलें व इतर प्रमुख बंडवाले यांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली व मोझांबिक (आफ्रिका) व तिमोर येथें हद्दपार केलें. अशा प्रकारें एका तेजस्वी बंडाचा दुःखद शेवट झाला.

अशा प्रकारें सत्तरीच्या राण्यांनीं पोर्तुगीच सत्तेविरुद्ध वारंवार बंडें केलीं. (इ. स. १७८२ ते १८२२ या चाळीस वर्षांच्या अवधींतच राण्यांनीं १४ वेळां स्वातंत्र्याचे प्रयत्न केले होते!) परंतु योग्य संघटनेच्या अभावीं तीं अयशस्वी झालीं. विसाव्या शतकांतील १९१२ सालचें मोरयाचें बंडहि असेंच अशस्वी झालें; आणि गोमंतकीय जनता पोर्तुगीजांच्या अत्याचाराखालीं मूकपणें भरडत राहिली.

## डॉ. लोहियांचा सत्याग्रह :

१० ऑक्टोबर १९१० रोजीं खुद्द पोर्तुगालमध्यें तेथील जनतेनें राजसत्ता नष्ट करून प्रजासत्ताकाची स्थापना केली, त्यानंतरचीं कांहीं वर्षें गोव्याला कांहींशी समाधानाचीं गेलीं. परंतु लौकरच सालाझारची हुकूमशाही सुरू झाली आणि गोव्याच्या मानेभोंवतीचे गुलामगिरीचे पाश अधिक आवळले गेले. पुढें १० जून १९४६ रोजीं समाजवादी पक्षाचे नेते डॉक्टर राममनोहर लोहिया यांनीं मडगांव येथें सत्याग्रह करून जनतेच्या अंतःकरणांतील विझूं पाहणारी स्वातंत्र्येच्छेची ज्योत पुनः प्रज्वलित केली. (दुर्दैवाची गोष्ट अशी कीं गोव्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉक्टर लोहियांची आठवण मात्र कुणालाच झाली नाहीं!) या सत्याग्रहांत अटक केलेल्यांना ८ ते १५ वर्षें मुदतीच्या जबरदस्त शिक्षा देऊन आफ्रिकेंत व पोर्तुगालमध्यें हद्दपार करण्यांत आलें आणि तुरुंगांतहि त्यांचा अनन्वित छळ करण्यांत आला.

त्यानंतर १५ ऑगस्ट १९५५ रोजीं गोवें-विमोचन समितीनें गोव्यांत शिरून सामुदायिक सत्याग्रह केला. यांत अखिल भारतांतील स्त्री-पुरुष सामील झाले होते. परंतु भारत सरकारच्या निष्क्रिय व डळमळीत धोरणामुळें हा सत्याग्रह अयशस्वी झाला व अनेक सत्याग्रही वीर पोर्तुगीजांच्या गोळीबाराला बळी पडले. वस्तुतः गोव्याचें विमोचन करण्याची ही एक उत्तम सुवर्णसंधि होती. चळवळीचें खापर जनतेच्या माथीं फोडून भारत सरकारला नामानिराळें राहतां आलें असतें आणि पुढें गोव्यांत सैन्य घुसविण्याचा व त्यापायीं जगांत बदनाम होण्याचा प्रसंग टळला असता. परंतु प्रत्येक गोष्ट योग्य वेळ टळून गेल्यानंतरच करावयाची, अशी जणुं शपथच स्वतंत्र भारताच्या सरकारनें घेतलेली आहे. त्यामुळें गोव्याची मुक्तता होईपर्यंत गोमंतकीयांनीं आपल्या शक्तीप्रमाणें गोमंतकीय मुक्तिसेना (गोवा लिब्रेशन आर्मी) या दहशतवादी गुप्त संघटनेच्या द्वारां गोव्यांतील हिंदु-ख्रिश्चनांनीं पोर्तुगीज राजवट उलथून पाडण्याचे अनेक प्रयत्न केले. परंतु पोर्तुगीज सत्तेचें भारताच्या शरीरावरील तें पिकलेलें गळूं शस्त्रक्रियेनेंचें बरें व्हावयाचें होतें. त्यामुळें अखेर नाइलाजानें १७ डिसेंबर १९६१ रोजीं मध्य-रात्रीं भारतीय सेनेनें गोमंतकांत प्रवेश केला आणि दोनच दिवसांत सारा गोमंतक पादाक्रांत करून ता. १९ रोजीं रात्रीं सव्वानऊ वाजतां वास्को डी गामा येथें गोव्याचे पोर्तुगीज गव्हर्नर जनरल व्हात्सालु द सिल्व (Vassalo De Silva) यांनीं भारतील सेनेचे ब्रिग्रेडियर ढिल्लाँ (धिल्लन) यांना शरणचिठ्ठी दिली आणि गोव्याच्या साडेचारशें वर्षांच्या गुलामगिरीचा अंत झाला !

गोव्याच्या मुक्तीसाठीं भारतानें केलेली सैनिक तयारी म्हणजे सशाच्या शिकारीला वाघाच्या शिकारीची तयारी करण्यासारखें होतें. या लढाईत एकहि नागरिक ठार झाला नाहीं आणि मृत सैनिकांची संख्याहि हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच अल्प होती. तें कसेहि असलें तरी गोमंत-भूमि मुक्त झाली, या घटनेच्या आनंदामध्यें त्या योगें कमतरता राहूं नये. गोवा हा भाषिक-सांस्कृतिक–भौतिकदृष्ट्या महाराष्ट्राचा भाग असूनहि तो वेगळा ठेवण्याचीं कारस्थानें आज दिल्लीला शिजत आहेत, तीं हाणून पाडून गोव्याला महाराष्ट्रांत सामील करून घेण्यासाठींहि गोमंतकीय महाराष्ट्र–भक्तांना बलिदान द्यावें लागणार अशीं चिन्हें दिसत आहेत. राज्यकर्त्यांना आतां तरी वेळींच सुबुद्धि सुचो !

...ठाणे. ...
३६६५२ वि: ...
३३२ नों. दि: ...

# सौन्दर्य--भूमि गोमन्तक

कश्मीर, कामरूप ( असम ) व केरळ हीं भारताचीं तीन वैशिष्ट्यपूर्ण सौन्दयक्षेत्रें आहेत. प्रत्येकाचें सौंदर्य एकमेकांपासून अगदीं वेगळें परंतु तितकेंच विलोभनीय. चिनार व बर्फ हे कश्मीरी निसर्गशोभेचे आधारस्तंभ, कामरूपची शोभा फळा-फुलांनीं बहरलेल्या तेथील टेकड्यांमध्यें सामावलेली. तर केरळचें निसर्ग सौंदर्य नारळी–पोफळीच्या बनांनीं व जलविहारास अत्यंत अनुकूल अशा विशिष्ट खाड्यांनीं ( बॅक वॉटर्स ) खुलविलेलें. या खेरीज पश्चिम किनाऱ्यावरील मंगळूर, मल्पे, उडुपी, कारकळ हा दक्षिण कानडाचा प्रदेशहि निसर्गसौंदर्यांत कमी सरस ठरेल असा नाहीं. याला आपण कर्नाटकाचें नंदनवन असें संबोधूं शकतों. या साऱ्या प्रदेशांतील शोभा एकत्र आणून जणूं काय निसर्गानें गोमंतकाला नटविलें आहे, असें कांहीं गोमन्त–भक्तांना वाटलें तर तें स्वाभाविकच आहे. मी स्वतः मात्र अशी अतिशयोक्ति करणार नाहीं. गोमंतकाची निसर्गशोभा अनुपम आहे, तेथील घाटांची वन्य शोभा, सहाहि ऋतूंत हिरव्यागार राहाणाऱ्या वृक्षराजींची चित्तवेधकता आणि काळी नदीनें बनविलेल्या दूधसागर धबधब्याची उन्माद-कारिता हीं अद्‌भुत व रोमहर्षक आहेत हें मान्य करूनहि गोव्याचें सौंदर्य इतरत्र

आढळणाऱ्या निसर्गसौंदर्यापेक्षां वरचढ किंवा सरस आहे, असें मी म्हणूं शकणार नाहीं. हां ! महाराष्ट्रांत गोव्याइतका निसर्गसमृद्धीनें नटलेला दुसरा प्रदेश नाहीं हें मला मान्य आहे. म्हणून गोमंतक हें महाराष्ट्राचें नंदनवन आहे, जसें कश्मीर हें भारताचें नंदनवन आहे, असें मी समजतों. या दृष्टिकोणांतूनच गोव्यांतील सौंदर्यस्थळांचें वर्णन व रसग्रहण मी करणार आहें.

## सौंदर्याचा धबधबा : दूधसागर

भारताच्या पश्चिम किनाऱ्याला समांतर अशी उत्तरेकडून दक्षिणेकडे पसरलेली सह्याद्रीची रांग व या रांगेंतून पूर्वेपासून पश्चिमेकडे जाण्याचे मार्ग असलेले विविध घाट यांची शोभा कांहीं आगळीच आहे; मग तो घाट खंडाळ्याचा असो, फोंड्याचा असो, आंबोलीचा असो, दक्षिण कानडांतील शिराडी, चारमाडी आगुंबेचे घाट असोत कीं केरळमधील घाट असोत. गोव्याला जातांना लोंढा येथें दक्षिणाभिमुखी गाडी जेव्हां पश्चिमाभिमुख होऊन धांवूं लागते तेव्हां आपण अशाच एका घाटाकडे चाललों आहोंत याची जाणीव तेथील घनदाट व हिरव्यागार वनश्रीमुळें आपल्याला होऊं लागते. कॅसलरॉकपर्यंत आपण जंगलांतूनच जातों. परंतु प्रत्यक्ष तिनई घाट कॅसलरॉकनंतर सुरू होतो; आणि आगगाडींतून बाहेर पाहातांच आपलें मन त्या हिरव्या सौंदर्याच्या दर्शनानें हरखून जातें. डोळे थंड होतात. हा घाट पुण्याहून मुंबईला जातांना लागणाऱ्या खंडाळ्याच्या घाटाइतका भव्य–भीषण किंवा रुबाबदार नाहीं, परंतु त्याच्यांत एक वेगळेंच आकर्षण आहे. बाराहि महिने हिरवीगार राहाणारी वनराजी त्याच्याजवळ असल्यामुळें म्हातारपणांतहि काळाभोर केशकलाप मस्तकावर मिरविणाऱ्या गोमन्तकीय रमणीप्रमाणें तो चिरतरुण व मोहक वाटतो. त्याच्या या थंड सौंदर्यामुळेंच आपले डोळे निवतात, आणि घाट संपेपर्यंत खिडकीबाहेर पडलेली दृष्टि आंत वळत नाहीं.

रसिक प्रवाशांना गोव्याला नेणारी आगगाडीहि तितकीच रसिक नसती तरच आश्चर्य ! पूर्वीच्या अमदानींत भारतांतून कांहीं सामान जकात चुकवून गोव्यांत जाऊं नये म्हणून कॅसलरॉकला तपासणी होत असे. प्रत्येक उतारू हा चोरट्या मार्गानें मालाची ने–आण करणारा समाजकंटक गुंड आहे, असें गृहीत धरून त्याच्या सामानाची कसून झडती घेतली जाई. त्याकरितां दोन–तीन तास

गाडीला थोपवून धरणें भागच असे. आतां स्वराज्यांत तें बंधन–निदान गोव्यांत जातांना तरी–उरलेलें नाहीं. तुम्ही कोणताहि माल गोव्यांत नेऊं शकतां परंतु कॅसलरॉक आलें कीं फतकल मांडून बसण्याची पूर्वापार संवय अजून आगगाडीनें सोडलेली नाहीं आणि मोठ्या नाइलाजानें कॅसलरॉकहून तिला निघावें लागलें तरी पूर्वींची चपळाई तिच्यांत राहात नाहीं.

पुणें–सातारा–मिरज भागांतील रुक्ष–वैराण मैदानें पाहून थकलेले तिचे डोळे गोव्यांत प्रवेश करतांना लागणाऱ्या या घाटांतील हिरव्यागार वनश्रीनें शांत होतात, त्या सौंदर्याची मस्ती तिला चढते आणि मग तीहि रमत-गमत, हलतडुलत घाटांतून जाऊं लागते. असली रसिकता किंवा सुस्तपणा पुण्या–मुंबईच्या नोकरी–व्यवसाय–पेशाच्या बिजलीच्या आगगाडीला परवडणारा नसतो. ती आजूबाजूंच्या निसर्ग सौंदर्याकडे न पाहतां सुसाट धांवत असते; जणुं तिलाहि वेळेवर कचेरींत जायचें असतें ! त्यामुळें ती हां हां म्हणतां खंडाळ्याचा घाट पार करते. गोव्याची गाडी मात्र पक्की गोमन्तकीय. असली घाई तिला मुळींच आवडत नाहीं. पुण्याच्या गाडीनें जें अंतर एका तासांत तोडलें असतें तेवढेंच अंतर कापायला ती निदान चार तास तरी घेते.

अर्थात् जिवाचा गोवा करायला निघालेला प्रवासी तिच्या या सुस्त-पणावर चिडत नाहीं, उलट तिला धन्यवादच देतो. कारण त्यामुळेंच त्याला त्या घाटांतलें सौंदर्य डोळे भरून पाहातां येतें.

एकेक बोगदा मागें पडूं लागतो १३४५ फूट लांबीचा १२ नंबरचा बोगदा प्रवाशांचा जीव गुदमरवून ( कारण गाडी लहान असल्यामुळें ती बोगद्यांत शिर-तांच धूर व वाफ यांनीं बोगदा भरून जातो. ) निघून जातो आणि थोड्याच वेळांत अकस्मातपणें शांत उतारूंत हालचाल निर्माण होते. जो-तो खिडकीच्या दिशेनें धावूं किंवा पाहूं लागतो. ‘ तो पहा दूधसागर ! ’ असें प्रत्येकजण दुसऱ्याला सांगूं लागतो; आणि ज्याच्याविषयीं आपण इतकें वाचलें-ऐकलेलें असतें तो दूध-सागर आपल्याला पाहायला मिळणार म्हणून आपण आधींच हरखून जातों.

## दुधासारखा शुभ्र धबधबा

आणि क्षणांत आपलें लक्ष खिळवून घेतो पांढऱ्या शुभ्र दुधासारखा, सुमारें ५५० फूट उंचीवरून खालीं कोसळणारा एक प्रचंड जलप्रपात. त्याचे तुषार

आपल्या अंगार उडणार, असें आपल्याला वाटावें इतक्या जवळून आगगाडी जाते. रसिक प्रवाशांना गाडींत बसल्या बसल्या इतक्या जवळून दूधसागराचें दर्शन घडविणारा तो रेलमार्ग आंखणारा खरोखरी मोठा रसिक व कल्पक असला पाहिजे यांत शंका नाहीं. डोंगरमाथ्यावरून खालीं उडी घेतांना दूधसागर तीन धारांनीं विभागला जातो. हिमशुभ्र हिमालयाच्या, जांवयाच्या, भगवान् शंकराच्या पिकलेल्या जटाच जणुं यांपैकीं डाव्या बाजूच्या दोन धारा कांहींशा क्षीण आहेत. दोन अडीचशें फुटांच्या पहिल्या टप्प्यांवर त्या खालीं पडून एकमेकांत मिसळतात, त्यामुळें त्यांची धारा थोडीशी पुष्ट वाटते. परंतु तीहि गोमंतकीय माणसाप्रमाणें आपल्या वेगळ्या व्यक्तित्वाचा बडेजाव बाळगणारी, कुटीर वृत्तीची असल्यामुळें तिच्याहि वेगवेगळ्या धारा बनतातच. उजव्या बाजूनें खालीं पडणारी पुष्ट धारा पहिल्या टप्प्यानंतर तरी डाव्या बाजूच्या धारांत मिसळेल असें वाटतें, परंतु स्वातंत्र्यानंतहि ख्रिस्ती–मुस्लिम समाजापासून फटकून वागणाऱ्या हिन्दु समाजाप्रमाणें ती आपला सवता सुभा कायम ठेवते. चिनी किंवा पाकिस्तानी यांसारख्या परचक्राच्या संकटप्रसंगीं भारतीय जनतेनें आपसांतील मतभेद विसरून एक व्हावें, त्याप्रमाणें मानवनिर्मित रेल्वेच्या पुलाचें बंधनात्मक संकट पुढें दिसतांच या दोन्ही धारा एक होतात आणि त्यांचें सामर्थ्य व सौंदर्य वृद्धिंगत होतें. परंतु तें फार काळ टिकत नाहीं. पुलाविषयींची भीति नाहींशी झाल्यानंतर त्या धारा पुनः वाट फुटेल तशा सैरावैरा धावूं लागतात. बन्धनांत, शिस्तींत राहाणें त्यांना जणुं आवडतच नाहीं.

दूधसागराची एकूण उंची पुष्कळ असली तरी तो टप्प्याटप्प्यांनीं खालीं पडतो. त्यामुळें शरावती नदीवरील जोग ( गिरसप्पा )च्या धबधब्यासारखा तो मनांत ठसत नाहीं. अर्थात् जोगची उंची ( ८३० फूट ) दूधसागरहून कितीतरी अधिक आहे. जगांतला सर्वांत मोठा धबधबा तो. त्याच्याशीं दूधसागराची काय तुलना ? कुठें इंद्राचा ऐरावत नि कुठें शामभटाची तट्टाणी ! परंतु दूधसागर टप्प्या–टप्प्यांनीं खालीं न पडतां सरळसोटपणें कोसळला असता तर त्याची भव्यता वाढली असती, हा विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं.

त्याच्यांतील या वैगुण्यामुळें त्याची उपयुक्तताहि कमी झाली आहे, हेंहि लक्षांत येतें. धबधबा दिसला की त्याच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याची कल्पना आधुनिक माणसाच्या मनांत आल्याशिवाय राहात नाहीं. जोगवरहि फार मोठ्या

प्रमाणावर वीज निर्माण करण्यांत आलेली आहे. आणि त्यामुळें त्याच्या मुक्त सौंदर्याला कांहींशा मर्यादा पडल्या आहेत. तेथील धारा मध्यें न अडखळतां सरळ खालीं पडत असल्यामुळें तें शक्य झालें आहे. दूधसागरावरहि वीज उत्पन्न करण्याची कल्पना अनेकांच्या बोलण्यांत आली; परंतु ती कितपत शक्य कोटींतील आहे याविषयीं प्रेक्षकाच्या मनांत शंका निर्माण होते.

## लडिवाळ व खेळकर धबधबा

असे कांहीं तांत्रिक दोष असले तरी त्यामुळें दूधसागराचें मोहकत्व व आकर्षण कांहीं कमी होत नाहीं. आचार्य काकासाहेब कालेलकरांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, " दूधसागराचा धबधबा तर नुसता उन्मादकारी आहे. गिरसप्याचा धबधबा कदाचित् जगांत सगळ्यांत मोठा असेल, नायगाराचा अधिक भीषण असेल, पण हा दूधसागर सर्वांपेक्षां जास्त मोहक आणि सौंदर्यमूर्ति आहे. " कांहीं रसिकांना " शरदृतूंत सिंहगर्जना करीत त्रिधारांनी स्वर्गातून पृथ्वीवर उडी घेणाऱ्या दूधसागराचें रुद्रोदात्त सौंदर्य त्याच्या तुषारांनीं अंग भिजवीत पाहाणें हा आयुष्यांतील एक उत्कट सुखक्षण आहे. " असें वाटतें, तेंहि स्वाभाविक आहे.

मला स्वतःला दूधसागराचा धबधबा पाहिला कीं डोंगरकड्यांवरून उड्या मारीत बागडणाऱ्या पांढऱ्याशुभ्र कोंकराचें स्मरण होतें. जग काय म्हणतें, आपल्याविषयीं कोणाला काय वाटतें याची त्याला मुळींच पर्वा नसते. तें स्वतःच्या मस्तींतच असतें. दूधसागरहि तसाच लडिवाळपणें खेळत–बागडत अस्मानांतून धरतीवर येत असतो.

## दूधसागराची जन्मकथा :

दूधसागर हें नांव ऐकलें कीं आपल्या डोळ्यांसमोर एखाद्या प्रचंड तलावाचें किंवा उसळत्या लाटांच्या सरोवराचें चित्र उभें राहातें. त्यामुळें प्रत्यक्ष धबधबा पाहिल्यानंतर त्याचें नांव थोडें विसंगत वाटतें. परंतु लोकमानसानें या धबधब्याचा संबंध प्रत्यक्ष दुधाशीं जोडलेला पाहून मात्र गंमत व कौतुक वाटतें.

असें सांगतात कीं आजच्या दूधसागर डोंगराचें पौराणिक नांव गोमंत पर्वत असें होतें. या पर्वताच्या एका गुहेंत मुचकुंद ऋषि तपश्चर्या करीत बसले होते.

तें श्रीकृष्णाला माहीत होतें. म्हणून कालयवन राक्षस पाठलाग करीत असतां तो त्या गुहेंत शिरला आणि आपला शेला तपस्येंत मग्न असणाऱ्या मुचकुन्द ऋर्षींच्या अंगावर टाकून आपण स्वतः बाजूला अंधारांत उभा राहिला. मागून आलेल्या कालयवनाला वाटलें कीं, हाच श्रीकृष्ण असावा, म्हणून त्यानें मुचकुन्दांना उन्मत्तपणें लाथ मारली. मुचकुन्दांनीं आपला तपोभंग करणाऱ्या त्या उन्मत्त राक्षसाकडे आपला जळजळीत नेत्रकटाक्ष फेंकला त्याबरोबर कालयवन जागच्या जागीं भस्मसात झाला.

शत्रुनाशाच्या या आनंदानें बेहोश होऊन श्रीकृष्णानें आपल्या संजीवनी बांसरींतून मधुर स्वर काढण्यास सुरुवात केली. पुत्रवियोगानें व्याकुळ झालेल्या देवकीच्या कानीं ते स्वर पडतांच तिचें हृदय वात्सल्यानें भरून आलें आणि तिला पान्हा फुटला. तिच्या स्तनांतून उडालेली दुग्धधारा थेट गोमंत पर्वतावरील श्रीकृष्णाच्या अंगावर पडली. या धारेचाच पुढें दूधसागर बनला !

भूमातेचें ऊर वात्सल्यानें भरून आलें आणि तिचें स्तन्य दूधसागराच्या रूपानें धो धो वाहूं लागलें, ही कल्पनाहि कोणाला सुचल्यास नवल नाहीं. धबधब्यामध्यें जी एक गति आहे, जी उत्कटता आहे, जी त्वरा आहे ती या वात्सल्यभावनेशीं निगडित करण्यांत अधिक औचित्य आहे, असेंच कोणीहि म्हणेल.

## वारंवार डोकावणारा लाजाळू मुलगा :

आपल्या घरीं आलेल्या नवख्या पाहुण्याकडे घरांतला लाजाळू मुलगा दाराच्या फटींतून, दाराआडून, आईच्या मागें लपून जसा पुनःपुनः पाहात असतो, तसा हा लाजरा दूधसागर आपल्या घरीं आलेल्या आगगाडीकडे वारंवार डोकावून पाहातो, मध्येंच लाजून डोंगराआड गडप होतो आणि हळूहळू दूर-दूर जातो. अर्थात् गोव्याहून कॅसलरॉककडे येतांना याच्या उलट प्रक्रिया होत असते, आणि ती मला विशेष रम्य वाटते. दूधसागर स्टेशनवर थोडा वेळ विश्रांति घेऊन दमलेली—भागलेली आगगाडी पांच नंबरच्या बोगद्यांत प्रवेश करते आणि बोगद्यांतून बाहेर पडतांच आपले डोळे डावीकडे दूर अंतरावर दिसणाऱ्या दूधसागराकडे वळतात. आगगाडी दिसतांच दूधसागर लपंडाव खेळूं लागतो, परंतु तो लौकरच सरावतो आणि पुलावर तर अगदीं समोरासमोर दृष्टिभेट घेऊन मगच तो अंतर्धान पावतो.

## सान्निध्याचा आनंद :

अर्थात् दूधसागराच्या सौंदर्याचा आनंद असा धांवत्या आगगाडींतून लुट-ण्यांत कांहीं विशेष स्वारस्य नाहीं, हेंहि खरेंच. दूधसागर स्टेशनवर उतरून पायवाटेनें डोंगर चढायचा आणि दूधसागराचे दुधासारखे शुभ्र तुषार अंगावर घेत त्याचें तांडवनृत्य पाहावयाचें व वेदघोष ऐकावयाचा, यांत कांहीं आगळाच आनंद असणार, हें उघड आहे. सूर्यकिरणांमुळें निर्माण होणारीं रंगीबेरंगी इंद्र-धनुष्यें तर धबधब्याजवळ गेल्याशिवाय पाहायला मिळणारच नाहींत. म्हणून थोडी सवड काढूं शकणाऱ्या रसिकानें दूधसागराच्या सान्निध्याचा हा आनंद अवश्य लुटला पाहिजे.

## आणखी दोन धबधबे :

दूधसागराखेरीज आणखी दोन प्रेक्षणीय धबधबे गोव्यांत आहेत. सांखळी तालुक्यांतील हरवळेंचा ( उंची ६० फूट ) व बारदेश तालुक्यांतील पिर्णाचा ( उंची ४५ फूट ). हे धबधबे छोटे असले तरी सभोंवतालच्या रम्य परिसरामुळें तेहि मोहक वाटतात. आजवर या सर्वच धबधब्यांची एक प्रकारें उपेक्षा झाली आहे. यापुढें त्यांच्याकडे अधिक लक्ष पुरविलें गेलें पाहिजे. हौशी प्रवाशांना तेथपर्यंत विना आयास पोंचता येईल, तेथें एखादा दिवस सुखानें मुक्काम करितां येईल, अशी व्यवस्था होऊं शकल्यास मोठ्या संख्येनें प्रवासी तेथें जाऊं लाग-तील आणि त्याचा फायदा आसपासच्या शेतकरी–आदिवासी जनतेलाहि होऊं शकेल.

# गोवा-प्रवासांतील मौजा

२९ मे १९४५ रोजीं मी पहिल्यांदां गोव्याला गेलों. ४२ चे कर्नाटकीय क्रांतिकारक श्री. बाबू कामत, माझे तुरुंगांतील मित्र (आतां डॉक्टर असलेले) श्री. विवेकचंद्र थेरे व मी असे आम्ही तिघेजण धारवाड जिल्ह्यांत हिंडत होतों. संसाराची जबाबदारी कुणाच्या शिरावर अद्यापि आलेली नव्हती. यामुळें सगळेच बेफिकीर व मुक्त होतों. वेळेचें बंधन नव्हतें. मनसोक्त भटकणें एवढाच उद्देश होता. रेल्वे, मोटार, बैलगाडी, सायकल व स्वतःचे पाय, अशा सर्व प्रकारच्या वाहनांचा उपयोग आम्हीं त्या प्रवासांत केला. जांभळें – करवंदें भरपूर खाल्लीं. कामतांनीं झाडावर चढून फांद्या हलवायच्या आणि आम्हीं दोघांनीं कपड्यांतच वरच्यावर जांभळें झेलायचीं असें श्रमविभाजन होतें. त्या प्रवासांत एक वधूपरीक्षेचा कार्यक्रमहि उरकून घेतला. पण कोणतीहि बऱ्यापैकीं तरुणी मला पसंत करील अशा बाह्य स्वरूपांत किंवा आर्थिक स्थितींत मी नव्हतों. त्यामुळें तो संबंध जमला नाहीं, याबद्दल मला आश्चर्यहि वाटलें नाहीं किंवा वाईटहि वाटलें नाहीं.

आम्हांला लोंढ्यावरूनच बेळगांवकडे परत यावयाचें होतें. म्हणून सहज जातांजातां गोव्यांत एक चक्कर टाकावी असा बेत आम्हीं ठरवला. एव्हांना

गोव्यांत गेलेले लोक प्रचंड संख्येनें परतूं लागलेले होते. कारण मे महिना संपत आलेला होता. त्यामुळें लोंढ्याहून गोव्याला जातांना आमच्या गाडींत मुळींच गर्दी नव्हती. अगदीं व्यवस्थित ताणून देतां येण्याइतकी मुबलक जागा होती. पण सकाळची वेळ आणि सुंदर वनश्री पहाण्याचा मोह, यामुळें आम्हीं खिडक्यां-जवळ बसूनच प्रवास केला.

## कॅसलरॉकची झडती :

दोन तासांत आम्ही कॅसलरॉकला पोंचलों. गाडी स्टेशनांत शिरतांच तिला लाठीधारी पोलिसांनीं गराडा घातला. सगळीकडे शांतता पसरली. नवख्या माणसाला वाटलें असतें, ही गाडीवरील लाठीहल्ल्याची पूर्वतयारीच आहे ! गाडी थांबतांच डब्यांच्या दाराला कुलूपें लावण्यांत आलीं, आणि गाडीच्या बाहेर कोणी जाणार नाहीं अशी व्यवस्था करण्यांत आली. पोलिसांनीं आपल्या लाठ्यांच्या साह्यानें गाडीच्या कोना-कोपऱ्यांची, फटींची तपासणी करून कांहीं माल चोरून गोव्यांत नेला जात नाहीं, याची खात्री करून घेतली. त्यांच्या हातांतील लाठ्या या कामासाठींच आहेत हें पाहून आम्हाला हायसें वाटलें. मुंबई राज्यांतून मुख्यतः साखर व तांदूळ गोव्यांत जाऊं नये ( कारण त्यावेळीं त्याचें रेशनिंग चालू होतें ) म्हणूनच ही तपासणी होती. अर्थात त्या तपासणींत फारसा अर्थ नाहीं, ती एक प्रकारची धूळफेंक आहे हें लवकरच आमच्या लक्षांत आलें. साखरेची व तांदुळाची चोरटी निर्यात करणाऱ्या लोकांशीं पोलिसांचें जें हितगुज चाललें होतें तें कोणाच्याहि लक्षांत येईल इतकें उघड होतें. एखादा गरीब, साधाभोळा उतारू अजाणतेपणानें या वस्तू बरोबर घेऊन चाललेला सांपडला तर त्याच्या त्या वस्तू मात्र तत्परतेनें, धमकीपूर्वक जप्त करण्यांत येत होत्या. अर्थात् परकीयांच्या राज्यांत याहून अधिक न्यायाची अपेक्षा करण्यांत कांहीं अर्थच नव्हता. ( परंतु स्वराज्य आल्यानंतर हा अन्याय कमी होण्या-एवजीं त्याला अगदीं ऊत आला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे ! ) डब्याची एकुण तपासणी झाल्यावर प्रत्येकाच्या वैयक्तिक सामानाची तपासणी होऊन तपासलेल्या सामानावर खडूनें फुल्या मारण्यांत आल्या आणि दोन तास चाल-लेला हा तमाशा संपून आम्ही गोव्याच्या हद्दींत प्रवेश केला; आणि त्याच वेळीं टवटवीत हिरव्या माडांनीं आमचें स्वागत केलें.

## कुळ्याची जुजबी तपासणी :

दुपारीं बाराच्या सुमारास कुळें ( कोलेम ) स्टेशनवर पोंचलों. येथें पोर्तुगीजांकडून सामानाची तपासणी होत असे. पण ती अगदींच जुजबी असे. येथला मुख्य सोपस्कार म्हणजे कपड्यांना धुरी देण्याचा. गोव्यांत रोगराई होऊं नये म्हणून तिथलें सरकार भयंकर जपत असे. त्याचा परिणामहि चांगलाच दिसून येई. प्लेग, कॉलरा, देवी वगैरे सांसर्गिक रोगांचें प्रमाण तेथें फारच थोडें असे. रोग उत्पन्न झाल्याचें कळतांच सरकार सारी शक्ति एकवटून त्या रोगाचें निर्मूलन करी. त्यामुळें बाहेरून येणाऱ्या लोकांचे कपडे व इतर सामान निर्जंतुक ( disinfect ) करून घेण्यावर येथें कटाक्ष असे. एखादा उतारू आजारी असल्यास त्याला गोव्यांत सोडीत नसत. त्याला बरा होईपर्यंत तेथेंच रहावें लागे. अर्थात् तपासणी–अधिकाऱ्याला चिरीमिरी दिली कीं येथेंहि फार लौकर सुटका होई हें उघड आहे.

## कोंकणीचें राज्य सुरू झालें :

आतांपर्यंत आम्ही मराठी वातावरणांत होतों. यामुळें महाराष्ट्र सोडून कुठें दूर आलों आहोंत असें वाटत नव्हतें, पण कुळ्यापासून कोंकणीचें राज्य सुरू झालें. स्टेशनमास्तर, हमाल, उतारू, तिकिट–चेकर्स सगळे कोंकणींत बोलत होते. यामुळें आपण कोणीतरी वेगळे, पाहुणे आहोंत असें वाटत होतें. कोंकण ही मराठीचीच बोली, त्यामुळें ती जरी आपल्याला बोलतां आली नाहीं तरी ती समजण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं, अशी आमची कल्पना होती. मालवणी–कोंकणी ऐकल्यामुळें आपली कल्पना बरोबर असली पाहिजे असें वाटत होतें. शिवाय बाबुराव कामतांना कोंकणी येते अशी आमचीच नव्हे, तर त्यांचीहि समजूत होती. ( जणुं प्रत्येक सारस्वताची मातृभाषा कोंकणीच असते ! ) पण हळूहळू याहि भ्रमाचा निरास होऊं लागला. गोव्याची कोंकणी आमच्याइतकीच त्यांनाहि अपरिचित व दुर्बोध असल्याचें दिसून येऊं लागलें. आणि ख्रिस्चनांची पोर्तुगीजमिश्रित कोंकणी ? मला वाटतें, ती तर गोव्याच्या अशिक्षित हिंदूंनाहि कळत नसावी !

## ब्राह्मणाच्या खाणावळींत मासळीचें कोरड्यास :

अखेर पहांटे पांच वाजतां लोंढ्याहून निघालेले आम्ही तीन शिलेदार (Three Musketeers) तिसऱ्या प्रहरीं तीन वाजतां मडगांवाला पोंचलों. सबंध गोव्यांत आम्हांला ओळखणारे फक्त एकच गृहस्थ होते. ते म्हणजे श्री. पुरुषोत्तम काकोडकर. ते वर्ध्याला राहिले होते, म्हणून त्यांच्याशीं ओळख. त्यांचें घर आम्हांला शोधावयाचें होतें. पण तेवढेंहि आम्हांला कोंकणींतून विचारतां येईना. अखेर मोठ्या मुष्किलीनें त्यांचें घर सांपडलें; पण आमचें दुर्दैव तेथें आडवें आलें. श्री. काकोडकर त्यावेळीं मुंबईला गेले होते आणि त्यांच्या घरची मंडळी आम्हांला ओळखत नव्हती. त्यामुळें आमच्या जेवण्या-खाण्याची किंवा रहाण्याची त्यांनीं चौकशी केली नाहीं. गोमंतकीय लोकांच्या आतिथ्यशीलतेसंबंधींचा आमचा गैरसमज त्यांनीं अशा प्रकारें दूर केला. तरी पण आम्ही सामान तिथेंच ठेवलें आणि निदान स्नान तरी उरकून घ्यावयाचेंच असें ठरविलें. त्याप्रमाणें एका आडावर जाऊन भरपूर पाणी ओढलें आणि स्नान केलें. उकाडा मी म्हणत होता. त्यामुळें स्नान करतांच अंगांत हुषारी आली. मग आपलें सामान उचलून क्षुधाशमनार्थ काय करतां येईल याचा तपास करूं लागलों. ( विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर, या म्हणींतल्याप्रमाणें सहज वाहून नेतां येईल इतकें थोडेंच सामान आम्ही बरोबर ठेवलें होतें. ) 'ब्राह्मणाची खाणा-वळ' अशी पाटी वाचून एका खाणावळींत शिरलों आणि जेवायला काय मिळेल याची चौकशी करणार, इतक्यांत मासळींच्या घाणीनें आमचीं नाकें भरून गेलीं आणि डोकें गरगरायला लागलें. आम्हांला वाटलें, पाटी वाचण्यांत आपली कांहीतरी गफलत झाली असावी. आम्ही त्या खाणावळीच्या मालकाला आमची अडचण सांगितली आणि दिलगिरी प्रदर्शित केली. तो हंसून म्हणाला, "तुमची यांत कांहीं चूक नाहीं. तुम्हांला ब्राह्मणाची खाणावळ चालायची नाहीं. इथले ब्राह्मण मासळी खातात. तुम्ही आपली भटाची खाणावळ बघा !" असें म्हणून त्यानें दुरूनच एक भटाची खाणावळ दाखविली. आमच्याकडे भिक्षुकी करणाऱ्या ब्राह्मणांना भट व इतरांना गृहस्थ किंवा ब्राह्मण म्हणतात. गोव्यांत सारस्वत हे ब्राह्मण आणि देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे हे भट ( व एका परीनें हलक्या दर्जाचे ) समजले जातात. भटाच्या खाणावळींत आम्ही जेवण घेतलें खरें; पण खोबरेल तेलाच्या वासानें त्या जेवणाची सारी मजा नाहींशीं करून टाकली होती.

## कुळ्याची जुजबी तपासणी :

दुपारीं बाराच्या सुमारास कुळें ( कोलेम ) स्टेशनवर पोंचलों. येथें पोर्तुगीजां-कडून सामानाची तपासणी होत असे. पण ती अगदींच जुजबी असे. येथला मुख्य सोपस्कार म्हणजे कपड्यांना धुरी देण्याचा. गोव्यांत रोगराई होऊं नये म्हणून तिथलें सरकार भयंकर जपत असे. त्याचा परिणामहि चांगलाच दिसून येई. प्लेग, कॉलरा, देवी वगैरे सांसर्गिक रोगांचें प्रमाण तेथें फारच थोडें असे. रोग उत्पन्न झाल्याचें कळतांच सरकार सारी शक्ति एकवटून त्या रोगाचें निर्मूलन करी. त्यामुळें बाहेरून येणाऱ्या लोकांचे कपडे व इतर सामान निर्जंतुक ( disinfect ) करून घेण्यावर येथें कटाक्ष असे. एखादा उतारू आजारी असल्यास त्याला गोव्यांत सोडीत नसत. त्याला बरा होईपर्यंत तेथेंच रहावें लागे. अर्थात् तपासणी–अधिकाऱ्याला चिरीमिरी दिली कीं येथेंहि फार लौकर सुटका होई हें उघड आहे.

## कोंकणीचें राज्य सुरू झालें :

आतांपर्यंत आम्ही मराठी वातावरणांत होतों. यामुळें महाराष्ट्र सोडून कुठें दूर आलों आहोंत असें वाटत नव्हतें, पण कुळ्यापासून कोंकणीचें राज्य सुरू झालें. स्टेशनमास्तर, हमाल, उतारू, तिकिट–चेकर्स सगळे कोंकणींत बोलत होते. यामुळें आपण कोणीतरी वेगळे, पाहुणे आहोंत असें वाटत होतें. कोंकणी ही मराठीचीच बोली, त्यामुळें ती जरी आपल्याला बोलतां आली नाहीं तरी ती समजण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं, अशी आमची कल्पना होती. मालवणी–कोंकणी ऐकल्यामुळें आपली कल्पना बरोबर असली पाहिजे असें वाटत होतें. शिवाय बाबुराव कामतांना कोंकणी येते अशी आमचीच नव्हे, तर त्यांचीहि समजूत होती. ( जणुं प्रत्येक सारस्वताची मातृभाषा कोंकणीच असते ! ) पण हळूहळू याहि भ्रमाचा निरास होऊं लागला. गोव्याची कोंकणी आमच्याइतकीच त्यांनाहि अपरिचित व दुर्बोध असल्याचें दिसून येऊं लागलें. आणि ख्रिश्चनांची पोर्तुगीजमिश्रित कोंकणी ? मला वाटतें, ती तर गोव्याच्या अशिक्षित हिंदूंनाहि कळत नसावी !

## ब्राह्मणाच्या खाणावळींत मासळीचें कोरड्यास :

अखेर पहांटे पांच वाजतां लोंढ्याहून निघालेले आम्ही तीन शिलेदार ( Three Musketeers ) तिसऱ्या प्रहरीं तीन वाजतां मडगांवाला पोंचलों. सबंध गोव्यांत आम्हांला ओळखणारे फक्त एकच गृहस्थ होते. ते म्हणजे श्री. पुरुषोत्तम काकोडकर. ते वर्ध्याला राहिले होते, म्हणून त्यांच्याशीं ओळख. त्यांचें घर आम्हांला शोधावयाचें होतें. पण तेवढेंहि आम्हांला कोंकणींतून विचारतां येईना. अखेर मोठ्या मुष्किलीनें त्यांचें घर सांपडलें; पण आमचें दुर्दैव तेथें आडवें आलें. श्री. काकोडकर त्यावेळीं मुंबईला गेले होते आणि त्यांच्या घरची मंडळी आम्हांला ओळखत नव्हती. त्यामुळें आमच्या जेवण्या-खाण्याची किंवा रहाण्याची त्यांनीं चौकशी केली नाहीं. गोमंतकीय लोकांच्या आतिथ्यशीलतेसंबंधींचा आमचा गैरसमज त्यांनीं अशा प्रकारें दूर केला. तरी पण आम्ही सामान तिथेंच ठेवलें आणि निदान स्नान तरी उरकून घ्यावयाचेंच असें ठरविलें. त्याप्रमाणें एका आडावर जाऊन भरपूर पाणी ओढलें आणि स्नान केलें. उकाडा मी म्हणत होता. त्यामुळें स्नान करतांच अंगांत हुषारी आली. मग आपलें सामान उचलून क्षुधाशमनार्थ काय करतां येईल याचा तपास करूं लागलों. ( विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर, या म्हणींतल्याप्रमाणें सहज वाहून नेतां येईल इतकें थोडेंच सामान आम्ही बरोबर ठेवलें होतें. ) ‘ ब्राह्मणाची खाणा-वळ ’ अशी पाटी वाचून एका खाणावळींत शिरलों आणि जेवायला काय मिळेल याची चौकशी करणार, इतक्यांत मासळींच्या घाणीनें आमचीं नाकें भरून गेलीं आणि डोकें गरगरायला लागलें. आम्हांला वाटलें, पाटी वाचण्यांत आपली कांहीतरी गफलत झाली असावी. आम्ही त्या खाणावळीच्या मालकाला आमची अडचण सांगितली आणि दिलगिरी प्रदर्शित केली. तो हंसून म्हणाला, “ तुमची यांत कांहीं चूक नाहीं. तुम्हांला ब्राह्मणाची खाणावळ चालायची नाहीं. इथले ब्राह्मण मासळी खातात. तुम्ही आपली भटाची खाणावळ बघा ! ” असें म्हणून त्यानें दुरूनच एक भटाची खाणावळ दाखविली. आमच्याकडे भिक्षुकी करणाऱ्या ब्राह्मणांना भट व इतरांना गृहस्थ किंवा ब्राह्मण म्हणतात. गोव्यांत सारस्वत हे ब्राह्मण आणि देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे हे भट ( व एका परीनें हलक्या दर्जाचे ) समजले जातात. भटाच्या खाणावळींत आम्ही जेवण घेतलें खरें; पण खोबरेल तेलाच्या वासानें त्या जेवणाची सारी मजा नाहींशीं करून टाकली होती.

नंतर कळलें कीं गोव्यांत गोडें तेल ( भुईमूग, करडई, तीळ वगैरेंचें ) मिळतच नाहीं. दूध–तूपहि नाममात्र. सारे पदार्थ खोबरेल तेलांतले. लाडूसुद्धा !

## ' डुकराची चरबी चालेल का ? '

पोटाची विवंचना अशा प्रकारें दूर झाली. पण निवाऱ्याची काय सोय ? रात्र कुठें काढायची ? हॉटेलांत रहावें तर तितके पैसे आमच्याजवळ नव्हते. इतक्यांत कामतांना आठवलें, आपला एक ख्रिस्चन मित्र मडगांवला असतो. डॉनी रुबेरो ! त्याबरोबर सामान खांद्यावर टाकून आम्ही रुबेरोचें शोधांत निघालों. पुन्हां भाषेची अडचण उभी राहिली. कसेंबसें रुबेरोचें घर सांपडलें. पण घरांत पुरुषमंडळी कुणी नव्हती. म्हणून बाहेरच्या ओट्यावरच थांबावें लागलें. वाट पाहून कंटाळा आल्यावर पुन्हां एकदां गुळगुळीत डांबरी सडकांवरून गांवांत चक्कर मारून आलों. आतां अंधार पडूं लागला होता. अखेर पुरुषमंडळी आलीं. पण त्यांत बाबुरावांचा मित्र डॉनी रुबेरो नव्हताच. चौकशी केल्यावर कळलें कीं, हें डॉनी रुबेरोचें नसून दुसऱ्याच रुबेरोचें घर आहे. पण त्या लोकांना इंग्रजी येत होतें. त्यांनीं जवळच असलेलें डॉनी रुबेरोचें घर दाखविलें. डॉनी हा धारवाडला कॉलेज-विद्यार्थ्यांचें संघटन करीत होता. त्याला पोर्तुगीज सरकारनें स्थानबद्ध करून ठेवलें होतें. दिवसांतून दोनदां पोलिसचौकीवर जाऊन त्याला हजेरी द्यावी लागत होती. ( हाच रुबेरो पुढें गोवा हा कर्नाटकांत सामील झाला पाहिजे असा प्रचार करूं लागला. ) त्यामुळें त्याचा आम्हाला गोवा पहाण्याच्या बाबतींत कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता. तरी पण ती रात्र आम्ही त्याच्याकडे सुखानें काढूं शकलों.

त्याच्या घरीं शाकाहारी जेवण मिळणें शक्यच नव्हतें. म्हणून आम्हीं उत्कृष्ट माणकूर ( मानकुराद ) आंबे खाऊन रात्रीची वेळ भागविली. परंतु आम्हीं उपाशीं रहावें हे डॉनीच्या वडिलांना आवडलें नाहीं. म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांनीं आम्हांला तांदूळ, भाजी व ॲल्युमिनियमचीं कोरीं भांडीं दिलीं. तो स्वयंपाक करण्यासाठीं आम्हीं त्यांच्या स्वयंपाकघरांत पाय ठेवला मात्र तोंच तेथील घाणीनें आणि दुर्गंधीनें आम्हांला मळमळूं लागलें. पण हिंदींत म्हण आहे ना, ' मरता क्या न करता ? ' भूक लागली असतांना वासाची फिकीर कोण करतोय् ? आम्ही तेथें पडलेल्या मासळीच्या व डुकराच्या कचऱ्याकडे दुर्लक्ष

केलें आणि चुलीवर भात शिजत ठेवला. भाजीच्या फोडणीसाठीं खोबरेल वापरावें कीं नाहीं याची चर्चा आमच्यांत सुरू झाली. कामतांना खोबरेलचा वास आवडत होता, मला तो चालूं शकत होता, पण मोहरीच्या तेलाची संवय असलेल्या विवेकचंद्रांना मात्र तो मुळींच सहन होत नव्हता. आमचें संभाषण मराठींत चाललें होतें. तें न कळल्यामुळें रुवेरोच्या बबर्जीनें आम्हांला आस्थेनें त्यासंबंधीं विचारलें आणि आमच्या वादविवादाची कल्पना येतांच तो सहजतेनें उद्गारला, " हात्तिच्या ! त्यात एवढं काय आहे विचार करण्यासारखं ? तुम्हाला खोबरेल आवडत नसलं तर तुम्ही डुकराचं तेल ( चरबी ) वापरा. त्याला अजीबात घाण येत नाहीं. बघा कसं खमंग असतं तें ! " असें म्हणून त्यानें तें तेल आणूनहि दिलें. आम्ही कपाळावर हात मारून घेतला.

**नारळी-पोफळींच्या बागांतून सहल :**

त्या परिसरांत हिंडत असतांना उन्हाचा त्रास आम्हांला मुळींच जाणवला नाहीं. जणूं आम्ही नारळी-पोफळींच्या दाट बागांतूनच सहल करीत होतों. त्या बागांतून येणारें ' गार वारें ' शरीराला व मनाला विलक्षण सुखवीत होते.

जेवण उरकून आम्ही मोटारीनें फोंड्याला आलों. सारस्वतांचीं प्रसिद्ध मंदिरें —शांतादुर्गा, मंगेशी, महालक्ष्मी, रामनाथी—इथून जवळच आहेत. आम्ही तीं पायींच हिंडून पाहिलीं. स्वच्छता व टापटीप हें या मंदिरांचें वैशिष्ट्य. त्यांच्याजवळ संपत्तीहि भरपूर असली पाहिजे. त्यावरून या देवांचे भक्त विशेष भाविक व श्रीमंत असले पाहिजेत हें सहज लक्षांत येतें. प्रत्येक मंदिरासमोर एक छोटेंसें तळें, पायऱ्यांनीं बांधून काढलेलें असावयाचेंच. गोवा हें फुलांचें आगरच. गोवेकर फुलांचे षौकीन. मग त्यांचा देव तरी फुलांच्या बाबतींत कसा अरसिक असेल ? नाना प्रकारच्या रंगी-बेरंगी, सुगंधी, शोभिवंत फुलांचे हार-गजरे मंदिरांत प्रवेश करण्यापूर्वींच आपल्याला विकत मिळतात. सर्वांत महत्त्वाची व स्पृहणीय गोष्ट म्हणजे येथील पुजारी पंढरपूरच्या बडव्यांप्रमाणें किंवा काशी-प्रयागच्या पंड्यांप्रमाणें भक्तांचा अंत पहात नाहींत. ज्याला जें द्यायचें असेल तें त्यानें खुषीनें द्यावें. एखाद्यानें कांहींहि दिलें नाहीं, तरी त्याला ते झिडकारीत नाहींत. त्यामुळें येथील मंदिरामध्यें एक प्रकारची प्रसन्न शांतता नेहमीं भरलेली असते.

## ‘ तिसरं ऽ ऽ ! ’

मंदिरें पाहून आम्ही फोंड्याला परतलों आणि बाजारासाठीं बांधलेल्या एका कट्ट्यावरच मुक्काम ठोकला. खोबरेल तेलांत केलेले काजूचे लाडू नाक दाबून खाल्ले आणि उत्कृष्ट आंब्यांचा आस्वाद मिटक्या मारीत घेतला. इतक्यांत एक बाई डोकीवरून कांहींतरी विक्रीची वस्तु घेऊन आली. ती तोंडानें ‘ तिसरं ऽ ऽ ! ’ म्हणून ओरडत होती. आम्हाला वाटलें, हा कांहींतरी विक्रीची खाद्यपदार्थ असावा. म्हणून आम्ही तिला बोलावून पाटींतील पदार्थ दाखविण्यास सांगितलें. तिला आमची भाषा कळत नव्हती. तरी पण हातांच्या खुणांनीं आमचें काम व्यवस्थित चाललें होतें. तिनें पाटी उतरून आमच्यासमोर ठेवली. विवेकचंद्रांना वाटलें, हे ओले, सोललेले काजू असावेत. म्हणून ते भाव विचारूं लागले. मी तर त्यांना हातहि लावून पाहिला. मला जरा संशय आला. काजू इतकें गिळगिळीत कसे असतील ? म्हणून बाबुरावांना जवळ बोलावलें. त्यांनीं ते ‘ काजू ’ पाहिले आणि ते खो खो हंसूं लागले. आम्हांला कांहींच कळेना. तेव्हां ते म्हणाले, “ अहो, हे काजू नव्हेत. हीं कालवं आहेत. दोन शिंपल्या-मध्यें असणारी तिसरी वस्तू म्हणून याला ‘ तिसरं ’ म्हणतात. ”

## विनतिकिटाचा प्रवास :

त्या उघड्या कट्ट्यावर झोंप मात्र अगदीं गाढ लागली. बहुधा त्या दिवशींच्या पायपिटीचा तो परिणाम असावा. सकाळीं उठून आम्ही मडगांवला जाण्याऐवजीं कुळ्याला पोंचलों. कुळें ( कोलेम ) स्टेशनवरली गर्दी पाहून आमची छातीच दडपून गेली. येतांना प्रवासाचा जो आराम मिळाला होता, त्याचें जणूं आतां उट्टे निघणार होतें. गाडींत माणसें ठांसून भरली होतीं आणि जागा न मिळाल्या-मुळें कित्येक लोक प्लॅटफॉर्मवरच पडून होते. अर्थात् आम्ही सडेफटिंग होतों आणि जवळ सामानहि नव्हतें. त्यामुळें आम्ही कसेहि डब्यांत शिरलों असतों. पण आमच्यासमोर दुसरेंच संकट उभें राहिलें. अतिशय गर्दीमुळें स्टेशनमास्तरनें तिकिटें देणेंच बंद करून टाकलें होतें. आतां कसें करावयाचें ?

पण ’४२चे क्रांतिकारक आम्ही असल्या संकटाला थोडेच डरणार ! आम्ही तिकिटाशिवाय प्रवास करण्याचें ठरविलें आणि घुसलों गाडींत. तिकिट-

चेकर आला कीं खालीं उतरावयाचें आणि तो दुसऱ्या डब्यांत गेला कीं पुनः चढावयाचें असा आम्ही क्रम सुरू ठेवला. कॅसल रॉकला तिकिटचेकरला सांगितलें कीं, आमचीं तिकिटें दुसऱ्या डब्यांतल्या एका माणसाकडे आहेत. असें करीत आम्ही लोंढयापर्यंत पोंचलों. तेथून बाबुराव कामत तिकिटाशिवायच धारवाडला गेले आणि आम्ही त्यांच्या इतके धीट नसल्यामुळें लोंढयापासून पुढचें तिकिट काढलें.

## उवांच्या सहवासांत :

गोव्याचा हा प्रवास आणखी एका कारणामुळें आमच्या विशेष स्मरणांत राहिला. कुळ्याला गाडींत शिरल्यावर जेथें आम्ही बसलों तेथें बरींच ख्रिश्चन मंडळी भरलेली होती. त्यांच्यापैकीं कांहीं तरुणी आम्हांला खेटून बसल्या होत्या.

क्षणभर वाटलें, किती भाग्यवान् आपण ! पण दुसऱ्याच क्षणीं त्या भाग्याची किंमत भयंकर जबरदस्त असल्याचें आमच्या प्रत्ययास आलें. त्या तरुणींच्या अंगाला इतकी भयंकर घाण येत होती कीं त्यांनीं निदान गेल्या दोन महिन्यांत तरी अंघोळ केली नसावी असें वाटत होतें. त्या घामाच्या घाणींत सुक्या बोंबिलाचा दुर्गंध मिसळल्यामुळें पुनः पुन्हां ओकारी येत होती.

आमची ही दुर्दशा जणुं अजून पूर्ण झाली नव्हती. त्या तरुणींच्या स्नेहहीन केंसाखालीं दडलेल्या उवा गुदमरून बाहेर पडूं लागल्या आणि त्यांनीं सरळ आमच्या शरिरावर हल्ला चढविला. हाय रे देवा ! आतां या उवा आमच्या डोक्यांत जाणार, या विचारानें आम्ही अत्यंत बेचैन झालों. आमचा सगळा रोमान्स (अर्थात् मनांतला ) कुठल्या कुठें जिरून गेला आणि उवांचीच चिंता आम्हांला सतावूं लागली. नशीब आमचें कीं, आम्ही तिघेहि अविवाहित होतों नाहीं तर आमच्या अंगावरच्या उवा पाहून आमच्या बायकांनीं आकाशपातळ एक करून सोडलें असतें !

तसें पाहिलें तर केरळची हवा आणि गोव्याची हवा सारखीच. तेथेंहि किरिस्तांव लोक खूप आहेत. पण तेथील लोकांच्या स्वच्छतेचा एक शतांशहि गोव्याच्या लोकांत आढळला नाहीं. याचें कारण पोर्तुगीजांची गुलामगिरी हें असूं शकेल काय ? युरोपीय लोकांना स्नानाचें वावडें असतें. त्यांचें अंधानुकरण करण्याकरितां गोव्याचे ख्रिश्चन स्नान करण्याचें टाळीत असतील काय ?

तें कसेंहि असो. लोंढ्याला जेव्हां आम्ही गोव्याच्या गाडींतून उतरलों तेव्हां निःश्वास टाकला, आणि आतां यापुढें हिंदुस्थानचें नंदनवन समजल्या गेलेल्या गोव्याला पुन्हा कांहीं आपण यावयाचें नाहीं असा आम्हीं निश्चय केला. जेवढें पाहिलें, लोकाचा जो अनुभव घेतला, त्यापेक्षां अधिक चांगलें काहीं पहायला मिळेल असें आम्हांला वाटलें नाहीं. निसर्गानें गोव्यावर वरदहस्त ठेवलेला आहे. नारळी, पोफळी, आंबे, काजू, कोकम, यांच्या रेलचेलीनें त्याला भूवरचें नंदनवन बनविलें आहे, हें सगळें खरें. पण माणसें ? अशा 'माणसां' पासून चार हात दूर राहिलेलेंच बरें !

## नाण्याची दुसरी बाजू :

पण ही झाली नाण्याची एक बाजू. तेवढ्या एका बाजूवरून मीं सबंध गोव्याविषयीं मत बनवावें हें नियतीला आवडलें नाहीं. नाण्याची दुसरी बाजूहि मला दिसावी, यासाठीं तिनें गोव्याशीं माझा रक्ताचा सबंध आणून मला त्याच्याशीं कायमचें निगडित करून टाकलें.—बरोबर ७ महिन्यांनीं, म्हणजे ३१ डिसेंबर १९४५ रोजीं मी गोमंतकाचा जांवई बनलों, आणि गोव्याच्या लोकांचा खरा स्वभाव मला कळला. त्यांच्या स्वच्छतेचें, त्यांच्या अतिथ्य-शीलतेचें, त्यांच्या रसिकतेचें मला दर्शन घडलें. गोव्याच्या आत्म्याशीं माझी ओळख झाली. मॅस्कारेनसारख्या खानदानी ख्रिश्चनांच्या भेटीनें गोमंतकीय ख्रिश्चनांसंबंधीं आदराची भावना निर्माण झाली, आणि हिंदु-ख्रिश्चन देश-भक्तांच्या परिचयानें गोमंतकीयांच्या निधड्या छातीचेंहि दर्शन मला घडलें.

## 'इथें समोरच मी उतरलों होतों !'

या खेपेला मी २० एप्रिल १९४६ ला मडगांवला गेलों आणि एकवीस दिवस गोव्यांत राहून ११ मेला साहित्य-संमेलनास हजर रहाण्याकरितां बेळगांवला परत आलों. या मुदतींत बऱ्याच लोकांना भेटतां आलें, गोव्याची परिस्थिति समजावून घेतां आली, आणि गोव्याच्या सांस्कृतिक जीवनाचा कणा असलेल्या सारस्वत समाजाचा जवळून परिचय करून घेतां आला.

मडगांवच्या स्टेशनवर उतरल्यानंतर तेथील स्त्री-हमालाला ( तेथें हमालीचें काम मुख्यतः ख्रिश्चन बायकाच करतात ! ) पत्ता समजावून देण्याच्या वेळीं

माझ्या जुजबी कोंकणी ज्ञानाचा ( जें मला 'घरच्या माणसा'कडून सहजासहजीं मिळालें होतें ) कांहीच उपयोग झाला नाहीं. मी हताश होऊन मदतीसाठीं इकडे–तिकडे पाहूं लागलों. कारण त्या बाईला कोंकणीशिवाय कोणतीच भाषा कळत नव्हती. अखेर स्टेशनमास्तर मदतीला धांवले आणि त्यांनीं त्या बाईला पत्ता समजावून सांगितला.

मी जेव्हां त्या हमालीण बाईबरोबर इष्ट घरीं जाण्यासाठीं एका प्रशस्त गल्लीत शिरलों तेव्हां ती गल्ली मला चांगलीच परिचित वाटूं लागली; आणि थोडें पुढें गेल्यावर तर मी रुब्रेरोंचें घर चटकन् ओळखलें; त्याच्या समोरच्या घरांतच ओझेवालीनें माझें सामान नेलें. ती माझी सासुरवाडी. मला त्या योगायोगाची मोठी गंमत वाटली. एक वर्षापूर्वीं मी त्या घराकडे ढुंकूनहि पाहिलें नव्हतें. आणि पाहिलें असतें तरी काय उपयोग होता ? त्या फिरस्त्याच्या वेषांतील मला 'तिनें' कधींहि पसंत केलें नसतें ! आतां जेव्हां मी 'तिला' गतवर्षींच्या आमच्या हैराणगतीची हकीकत सांगितली तेव्हां आम्हा दोघांनाहि मजा वाटली.

## कपड्यांची गुलामगिरी :

या खेपेला गोमंतकीय सारस्वतांतील खानदानी रसिकता, आतिथ्यशीलता, प्रेमळपणा याचा चांगला अनुभव मला आला. पण त्यांची एक गोष्ट मला चांगलीच खटकली. ती म्हणजे कपड्यांची गुलामगिरी. 'एक नूर आदमी, दस-नूर कपडा' ही म्हण मलाहि मान्य आहे. पण म्हणून माणसानें पोषाखाचें गुलाम बनावें हें मात्र मला मुळींच मान्य नाहीं. गांधीजींनीं या गुलामगिरींतून सुशिक्षित भारतीयांची फार मोठ्या प्रमाणावर मुक्तता केली होती. विशिष्ट विदेशी पोषाख अंगावर चढविल्यानेंच माणूस सुसभ्य किंवा सुसंस्कृत ठरतो ही गोष्ट त्यांनीं साफ नाकारली आणि साध्या कपड्यांचें महत्त्व आम्हांला पटवून दिलें. शिवाय पाश्चात्य पद्धतीचा सुटा–बुटाचा पोषाख सर्वांनाच शोभून दिसतो असेंहि नाहीं. कांहीं लोकांना साधे शुभ्र खादीचे कपडेच अधिक चांगले दिसतात. अशा लोकांपैकीं मी एक आहें, अशी माझी पूर्वींपासून कल्पना आहे. म्हणून मी साध्या कपड्यांतच गोव्याला गेलों. पण तेथील मंडळींना माझा हा साधेपणा आवडला नाहीं. त्यांच्यावर सुटाबुटाची पकड फार जबरदस्त अस-

त्याचें मला दिसून आलें. कोट घातल्याशिवाय सभ्य पुरुषानें घराबाहेर पडतां कामा नये, अशी तेथें रूढ समजूत दिसली. त्यामुळें पुष्कळसे ख्रिस्चन लोक खालीं फक्त लंगोटी लावून अंगांत कोट व डोकीला हॅट घातलेले आपल्याला दिसतात, आणि त्या 'ध्याना'चें आपल्याला हंसूहि येतें. पोर्तुगीजाच्या अंमलामुळें ही मानसिक गुलामगिरी किरिस्तांवांमध्यें आली असेल हें आपण समजूं शकतों; पण गोमंतकाचें सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या सारस्वतांतहि त्या गुलामगिरीचीं पाळेंमुळें इतकीं खोलवर गेलेलीं असावींत हें पाहून मला वाईट वाटलें. गोव्यासारख्या उकाड्याच्या प्रदेशात सूट–नेकटॉय वगैरेंचें काय प्रयोजन हेंच मला कळलें नाहीं. वस्तुतः केरळच्या लोकांप्रमाणें एक लुंगी व एक उपरणें किंवा हाफ्शर्ट एवढे कपडे गोव्यांत राहाणाऱ्यांना पुरेसे आहेत. त्यांतहि वाटेल तितकी रसिकता व विविधता आणतां येईल. कदाचित् गोवा स्वतंत्र झाल्यावर साधेपणांतील सौंदर्य गोमंतकीयांना कळेल, तेथील किरिस्तावांवरील पाश्चात्य संस्कृतीचा पगडा थोडा कमी होईल, आणि पोषाखाच्या बाबतींत केरळीय किरिस्तांवांप्रमाणें तेहि संपूर्ण भारतीय बनतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

## स्वयंपाकघरांतील अस्वच्छता :

आणखी एका बाबतींत गोमंतकीय सारस्वतांवर ख्रिस्चन संस्कृतीच प्रभाव पडलेला मला दिसून आला. ती म्हणजे स्वयंपाकघरांतील अस्वच्छता. ही अस्वच्छता मुख्यतः मत्स्याहारामुळें आलेली असावी असें मला वाटतें. शाकाहारी लोकांना आपलें स्वयंपाकघर स्वच्छ ठेवणें जितकें सोपें असतें तितकें तें मांसाहारी लोकांना सोपें जात नसलें पाहिजे. यामुळें बहुतेक मांसाहारी जमातींचीं स्वयंपाकघरें अस्वच्छ व गलिच्छ असतात. जेवण टेबलावर आणि टेबल दुसऱ्या खोलींत असल्यामुळें ही अस्वच्छता जेवणाऱ्याला जाणवत नाहीं, एवढेंच काय तें. परंतु सारस्वत, प्रभु, सोनार वगैरे जातींतील रूपसंपन्न स्त्री–पुरुषांना घराबाहेर पाहिल्यानंतर त्यांच्याविषयीं ज्या भावना आपल्या मनांत निर्माण होतात त्या त्यांचीं स्वयंपाकघरें पाहिल्यानंतर कायम रहात नाहींत हा पुष्कळांचा अनुभव आहे. या बाबतींत कोंकणस्थ, कऱ्हाडे, जैन, लिंगायत वगैरे कांहीं जातींचीं स्वयंपाकघरें पहाण्यासारखीं आदर्श असतात.

१५६ : १५७

या अस्वच्छतेच्या मुळाशी कदाचित् आळसहि असेल. आळशीपणाच्या बाबतींत सारस्वत लोक देशस्थांना हार जातील असें वाटत नाहीं. पण नैसर्गिक बुद्धिमत्तेमुळें त्यांचा आळशीपणा त्यांना नडत नाहीं. उलट चंद्रावरील कलंकाप्रमाणें पुष्कळ वेळां तो त्यांना शोभूनच दिसतो.

# उपसंहार

१९६१ च्या डिसेंबरांत गोवा मुक्त झाला. १९६२ च्या ऑक्टोबरांत मी गोव्याला भेट दिली; आणि १९६३ च्या फेब्रुवारीपर्यंत 'तांबडी माती हिरवे माड' हें पुस्तक लिहून पुरें केलें. त्यानंतर १९६३ च्या डिसेंबरांत गोव्यामध्यें सार्वत्रिक निवडणुका होऊन केंद्रशासित गोमंतकाचें पहिलें लोकनियुक्त मंत्रिमंडळ अधिकारावर आलें. त्यामुळें गेल्या सहा महिन्यांतील गोमंतकाशीं संबंधित घटनांचा परामर्श घेतल्याखेरीज या पुस्तकांतील विवेचनाला पूर्णता येणार नाहीं, हें उघड आहे.

आज गोवा, दीव व दमण या तीन गंगाजमनी प्रदेशांचें एक केंद्रशासित राज्य अस्तित्वांत आलें आहे. एकमेकांपासून शेंकडों मैल दूर असलेल्या या प्रदेशांची एकत्र सांगड घालण्यांत काय औचित्य आहे तें आमचे विद्वान् राज्यकर्तेंच जाणोत. वस्तुतः भौगोलिक सलगता, भाषिक एकता किंवा सांस्कृतिक समानता यांपैकीं या तीन प्रदेशांत कसलेंच साम्य नाहीं. साम्य एकच, आणि तें म्हणजे हे तीन प्रदेश शतकानुशतकें पोर्तुगीजांच्या अमलाखालीं होते. पोर्तुगीजांच्या अमलाखालील जर कांहीं टापू कलकत्याकडे व मद्रासकडे असते तर त्यांचीहि सांगड आमच्या शहाण्या शासकांनीं गोव्याशीं घातली असती, यांत शंका नाहीं. गोव्याच्या विधिमंडळांत बसणाऱ्या दीव-दमणच्या प्रतिनिधींची जी मानसिक कुचंबणा होत आहे, ती पाहिली कीं त्यांना त्या विधिमंडळांत बसविणाऱ्यांच्या निर्बुद्धपणाबद्दल हंसावें कीं रडावें तेंच कळत नाहीं.

अर्थात् आपल्याला फक्त गोव्यासंबंधींच विचार करावयाचा आहे. म्हणून जरी गोवा-दीव-दमणचे एकूण मतदार सुमारें साडेतीन लाख असले तरी त्यांतील

सुमारें वीस हजार मतदारांचा विचार आपण मनांतून काढून टाकला पाहिजे या सव्वातीन लाख मतदारांतील सुमारें अडीच लाख मतदारांनीं मतदानाचा हक्क बजावला. याचा अर्थ असा कीं सुमारें ७७ टक्के मतदान झालें. गोमंतकीय जनतेला प्रथमच मिळालेल्या मतदाच्या हक्काचे महत्त्व किती वाटत होते तें यावरून दिसून येईल.

## तिरंगी लढत :

गोव्याच्या या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत कॉंग्रेस, महाराष्ट्रवादी गोमंतक व युनायटेड गोवन्स हे तीन मुख्य पक्ष आपल्या सर्व सामर्थ्यानिशीं सुसज्जित होऊन उतरले होते. गोव्याचें विलीनीकरण ताबडतोब महाराष्ट्रांत झालें पाहिजे या मुद्यावर महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षानें निवडणुकी लढवल्या. या पक्षांत श्री टोनी फर्नांडीस, श्री पीटर अल्वारिस, श्री रोड्रीगिश मिंगेल आनासीतु, श्री आगा अश्रफ दाऊद, यांच्यासारखे अहिंदू उमेदवार व कार्यकर्ते असले तरी बहुसंख्य कार्यकर्ते हिंदू, व विशेषतः बहुजन समाजाचे प्रतिनिधीच होते. युनायटेड गोवन्स हा मुख्यतः गोव्यांतील खिस्ती व कोंकणीवादी आणि स्वतंत्र गोवावादी हिंदू यांचा पक्ष आहे. गोव्याचें वेगळें राज्य असावें या मुद्यावर या पक्षानें जनतेकडे मतें मागितलीं. कॉंग्रेस–पक्षाचें ध्येय गोवा केंद्रशासित ठेवणें हें आहे अर्थात् हें मत गोव्यांतील सर्वसामान्य कॉंग्रेस कार्यकर्त्यांचें किंवा सर्वच कॉंग्रेसी नेत्यांचें आहे, असें नाहीं. सर्वश्री हेडगे, भेंब्रे, माधव बीर, गोपाळ आपा कामत, ल्यूसीओ रॉड्रिक्स वगैरे अनेक महाराष्ट्रवादी कॉंग्रेसी कार्यकर्ते निवडणुकीस उभे होते. त्यावरून कॉंग्रेसचें निवडणुकींतील ध्येय धोरण हें स्थानिक कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार न ठरतां दिल्लीहून त्यांच्यावर लादलें गेलें असलें पाहिजे, हें उघड होतें. अर्थात् याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला आणि गोव्यांतून कॉंग्रेसचा एकहि उमेदवार निवडून आला नाहीं. इतकेंच नव्हे तर बहुसंख्य कॉंग्रेस उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या.

गोव्याच्या २८ जागांसाठीं कॉंग्रेसनें २८, महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षानें २७ व युनायटेड गोवन्स पक्षानें २४ जागा लढविल्या. स्वतंत्र उमेदवार ५७ होते. त्यांपैकीं महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षानें १६–त्यांत प्रजा समाजवादी पक्षाच्या दोन उमेदवारांचा समावेश आहे–व युनायटेड गोवन्स पक्षानें १२

जागा जिंकल्या. सर्वच्या सर्व स्वतंत्र उमेदवार पराभूत झाले, इतकेंच नव्हे तर बहुतेकांच्या अनामत रकमाहि जप्त झाल्या. यावरून गोमंतकीय मतदार किती जागरूक होते, याची कल्पना येते.

विधान सभेच्या या निकालाचा दोन प्रकारें अर्थ लावतां येईल. २८ पैकीं १६ जागा महाराष्ट्रवादी उमेदवारांना मिळाल्या. याचा अर्थ ५७ टक्के प्रतिनिधित्व विलीनीकरणवाद्यांनीं मिळविलें आणि ४३ टक्के प्रतिनिधित्व स्वतंत्र राज्याच्या पुरस्कर्त्यांना मिळालें. मतदानाचा विचार केल्यास सुमारें २ लाख ४० हजार मतदारांपैकीं १ लाख २० हजार मतदारांनीं म्हणजे ५० टक्के लोकांनीं महाराष्ट्रवाद्यांना मतें दिलीं, तर ७४ हजार म्हणजे सुमारें ३० टक्के मतदारांनीं स्वतंत्र गोमंतकाच्या बाजूनें कौल दिला. २० टक्के मतें या दोहोंच्या मध्यें कोठेंतरी पडलीं.

लोकसभेच्या दोन्ही जागा महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला मिळाल्या; म्हणजे लोकसभेच्या दृष्टीनें गोमंतक हा शंभर टक्के महाराष्ट्रवादी ठरला. अर्थात् मतांचा विचार केल्यास गोव्याचें महाराष्ट्रांत तावडतोब विलीनीकरण व्हावें या बाजूनें सुमारें १ लाख १६ हजार मतदारांनीं कौल दिला तर गोवें स्वतंत्र ठेवण्याची इच्छा सुमारें ८२ हजार मतदारांनीं व्यक्त केली. लोकसभेच्या या निकालाच्या बाबतींत एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखीं गोष्ट घडली. ती अशी कीं, ज्या पणजी मतदारसंघांत हिंदू मतदार बहुसंख्य होते तेथून डॉ. गायतोंडे व उमाकांत सुलेंकर या मातबर हिंदू प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून श्री. पीटर अल्वारिस हे खिस्ती उमेदवार निवडून आले आणि बहुसंख्य मतदार खिस्ती असलेल्या मुरगांव मतदार संघांतून श्रीमती लावूरा डीसूझा व इतर तीन खिश्चन उमेदवारांचा पराभव करून ॲडव्होकेट मुकुंदराव शिंक्रे हे निवडून आले.

## कॉंग्रेसचें मत :

अर्थात् हें विश्लेषण कॉंग्रेसच्या नेत्यांना मान्य नाहीं. त्यांचें म्हणणें असें कीं, "महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला ४४ टक्के मतें मिळालीं असून उरलेलीं सारीं म्हणजे ५६ टक्के मतें हीं विलिनीकरणाच्या विरुद्ध पडलीं आहेत. शिवाय महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला मिळालेलीं मतें महाराष्ट्राचें गोव्यामध्यें विलिनीकरण व्हावें म्हणून मिळालेलीं नसून जातीय द्वेष, वर्गसंघर्ष, खोटीं आश्वासनें,

खोटी माहिती व पैशाची खैरात या मार्गांचा अवलंब करून तीं मिळविण्यांत आलेलीं आहेत. कारण गोव्याच्या गावड्यांना महाराष्ट्र म्हणजे काय हेंच मुळांत माहीत नाहीं. तेव्हां विलिनीकरणाचा प्रश्न त्यांना कळलेला असणें सुतराम् शक्य नाहीं. ''

पराभूत पक्ष आपली चूक कधींच कबूल करीत नसतात, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास कॉंग्रेसवाद्यांचीं हीं कारणें स्वाभाविकच वाटतात. प्रत्यक्ष निकाल लागे-पर्यंत विरोधी पक्षांकडून कॉंग्रेस पक्षाविरुद्ध याच सर्व तक्रारी करण्यांत येत होत्या. कॉंग्रेस पक्षाजवळ पैसा आणि सत्ता याचें सामर्थ्य एकवटलें असल्यामुळें त्याचा वापर तो किती बेगुमानपणें करीत आला आहे याची माहिती ज्यांना आहे त्यांना गोमंतकीय निवडणुकींतच कॉंग्रेस पक्ष सोज्वळ राहिला असेल ही गोष्ट पटणें कठीण आहे. या निवडणुकींत कॉंग्रेसनें पाण्यासारखा पैसा खर्च केला आणि सर्वश्री लालबहादुर शास्त्री, स. का. पाटील, यशवंतराव चव्हाण, के. के. शहा, जगजीवनराम, संजीवय्या वगैरे अखिल भारतीय कीर्तीच्या नेत्यांना कॉंग्रेसनें इरेस घातलें. गोव्यांतील सारे प्रमुख भांडवलदार व खाण मालक यांचा पैसा व विलासी गाड्या आणि त्यांचीं तीन प्रमुख वृत्तपत्रें कॉंग्रेसच्या दिमतीस होतीं. जातीयवादाचा उपयोग करून घेण्यांत व खोटीं आश्वासनें देण्यात कॉंग्रेस पुढारी किती निष्णात आहेत, याची कल्पना मराठी वाचकांना तरी चांगलीच आहे. तेव्हां विजयी पक्षाविरुद्ध कॉंग्रेसवाल्यांनीं केलेले हे आरोप फारसे टिकणारे नाहींत, हें उघड आहे.

युनायटेड गोवन्स हा तर उघड उघड पोर्तुगीजधार्जिण्या ख्रिश्चनांचा पक्ष. या पक्षाची खूण हात ही होती. ' हा हात सेंट झेवियरचा आहे, त्याला मत देऊन निवडून द्या, म्हणजे तुम्हांला पूर्वीचं वैभव प्राप्त होईल, ' असा प्रचार पाद्र्यांनीं केला. त्याचा धर्मभोळ्या ख्रिश्चन मतदारांवर विलक्षण परिणाम झाला आणि त्यांचीं सारीं मतें एकगठ्ठा त्या पक्षाला मिळालीं. शिवाय गोव्याचें वेगळें राज्य राहाणें ज्यांच्या फायद्याचें आहे असे हिंदू कोंकणीवादी व उच्चवर्णीय जमीनदार–कारखानदार यांचींहि मतें या पक्षाला मिळालीं.

**कोंकणीवाद्यांचा अधःपात :**

या निवडणुकींत कोंकणीवाद्यांनीं महाराष्ट्र व मराठी माणसें यांच्याविरुद्ध केलेला जहरी प्रचार पाहून मी तर थक्कच झालें. ' गोमंतक ' दैनिकांत

एक लेख लिहून मी गोमंतकीय मतदारांना असें आवहान केलें होतें कीं त्यांनीं महाराष्ट्रांत सामील होण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या उमेद-वारांनाच प्रचंड बहुमतानें निवडून द्यावें. यावर 'कोंकणी' नामक पाक्षिकानें माझ्या-वर जी आग पाखडली ती कोंकणीवाद्यांच्या एकूण वृत्तीची द्योतक होती. सदर पाक्षिकानें लिहिलें होतें, " गोंयांत रावून एक बडबडप, आनि पुण्यांक पावतकच तिसरेंच उलवप, हाचो अणभव गोंयकरांक मराठी साहित्य संमेलन जायत मेरेन खूप आयला. पुण्याचे मातयेचो गुणूच तो. थंय रावतकच मती भ्रष्ट जांवकूच जाय. त्या मनशांतलो हो श्रीपाद जोशी. आदींच तो भट आणि तांतल्यात पुण्यांत रावपी. थंयसल्या निजांच्या भटांपरस कडवो. ... फाटीं हो सभागी गोंयात आयलो. फुकट्या मुसां गिळप, आणि 'गोमंतकां'त किदेंय छापून येता तें पळोवन, तांतून गोयांविषयीं ताळतंत्र नासलेलें लिखाण बरवप. तें बरयतनां ह्या मनशान कमराचें सोडून कपलाक बांधला काय असें दिस. किद्याक, ज्या काय लोकांनीं हाका फुकट गिळपाक घालां, तांचेच तोंडात हाणें कायच्या काय उतरां घाली......ताच्या मतपरिवर्तनातली काय मतां तपाशीत तर असें दिसतां, कीं तो R. S. S. कींवा जनसंघ ह्या पगडाचो आंसूक जाय. गोयंचे वेगवेगळ्या जातींतले आणि धर्मांतले लोक एकमेकांकडे भावा-भावां-झेन चलतात, हें पळोवन, तो मत्सरान जळता जांवये. किद्याक, महाराष्ट्रान स्वयं चल, हिंदून मयराकं माह्ले, भटांनीं म्हारांक जाळले, मराठ्यांनीं गुजरा-त्यांचे बायलांचेर अत्याचार केले, अशोज बातम्यो आयकूंक येतल्यो. आणि हे मत्सराचे भावनेन पेटून वचून, ताणें जाती-जातींत आणि धर्मां-धर्मां भीतर केस्तांवा पेटोवची ह्या तजवीजेन व्हो मनीस गोयांत आयलो जांवये !...... "

आजच्या राज्यकर्त्यांच्या कोशांत संघीय किंवा जनसंघीय ही एक भयंकर शिवी बनली आहे, हें ओळखूनच 'कोंकणी'कारांनीं मला जनसंघीय ठरविलें. नाहीं तर गांधीवाद व गांधीवादी यांच्याशीं असलेला माझा घनिष्ठ संबंध त्यांनीं असा सहजासहजीं नजरेआड केला नसता. या एका उदाहरणावरूनच कोंकणी-वाद्यांच्या प्रचाराची पातळी लक्षांत यावी.

परंतु सुदैवानें गोव्याचा बहुजनसमाज या प्रचाराला बळी पडला नाहीं आणि त्यानें महाराष्ट्राविषयीं आपल्याला वाटणारी आपुलकी मतदानाच्या द्वारें व्यक्त केली. श्री. दयानंदराव बांदोडकर यांच्यासारखे निःस्वार्थी व कळकळीचे पुढारी

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला लाभल्यामुळें त्याला हें अनपेक्षित यश लाभलें हेंहि तितकेंच खरें. श्री. बांदोडकर यांच्याबद्दल गोव्यांतील सर्वच जनतेंत एकप्रकारचा आदर व जिव्हाळा दिसून येतो. पक्षाच्या यशांत त्यांचा फार मोठा वांटा आहे.

## पुढें काय ?

श्री दयानंदराव बांदोडकर यांच्या नेतृत्वानें गोव्याचें मंत्रिमंडळ अधिकारावर आलें व त्याला सर्वतोपरी सहकार्य देण्याचें केंद्र सरकारनें आश्वासनहि दिलें. परंतु प्रत्यक्षांत मात्र मुख्यमंत्री व त्यांचें सरकार यांना पदोपदीं अडविण्याचेंच धोरण केंद्रीय सरकारनें आपल्या नोकरशहांच्या मार्फत अवलंबिलें असावें असें वाटतें. सरकारनियुक्त सभासदांची नेमणूक करण्याच्या बाबतींत केंद्रसरकारकडून जी खळखळ अजून चालू आहे तिच्यावरून सरकारचें मन स्वच्छ नाहीं, हें उघड दिसतें. त्यामुळें निवडणुकीची लढाई जिंकूनहि महाराष्ट्रवादी पक्षाला जय मिळालेला नाहीं. गोव्याचें महाराष्ट्रांत विलीनीकरण करण्यासंबंधींचा ठराव गोवा विधिमंडळांत अद्यापि मांडतां आलेला नाहीं. साहजिकच या घटनांमुळें महाराष्ट्रावादी गोमंतकीय जनता अस्वस्थ झालेली आहे. महाराष्ट्राचें नशीबच खडतर. त्याला कोणतीहि न्याय्य गोष्ट सहजासहजीं मिळत नाहीं. त्यासाठीं त्याला चळवळ करावी लागते, आपलें रक्त सांडावें लागतें. हा इतिहास गोव्याच्या बाबतींतच कसा खोटा ठरणार ? गोव्यालाहि आपला लढा दीर्घकाळपर्यंत नेटानें चालवावा लागणार अशीं लक्षणें दिसत आहेत.

गोव्याला आपल्या या लढ्यांत एकीकडे कचखाऊ महाराष्ट्रीय कॉंग्रेस पुढारी व दुसरीकडे आक्रमक कर्नाटकीय नेते यांना तोंड द्यावें लागेल. वस्तुतः गोव्याचा कर्नाटकाशी कांहींच संबंध नाहीं; परंतु भारतद्वेषानें अंध झालेल्या पाकिस्ताननें ज्या वृत्तीनें चिनी अजगराच्या विळख्यांत स्वतःला स्वेच्छेनें गुरफटून घेतलें आहे, त्याच वृत्तीनें महाराष्ट्रद्वेष्ट्या कोंकणीवाद्यांनीं व किरिस्तांवांनीं कर्नाटकीय नेत्यांशीं संधानें बांधलीं असावींत असें दिसतें. ना मला ना तुला, घाल कुत्र्याला, या म्हणीप्रमाणें गोवा आपल्याला मिळत नाहीं, तर निदान तो महाराष्ट्राला तरी मिळूं नये, अशी खटपट कर्नाटकीय पुढाऱ्यांनीं चालविली आहे. दिल्लींतील दुबळें मराठी नेतृत्व व कर्नाटकीय पुढाऱ्यांची दिल्लीश्वरावरील पक्कड यांचा

विचार करतां त्यांना कांहीं काळ कां होईना त्यांच्या प्रयत्नांत यश येणार हें उघड आहे. यांत कर्नाटकीय पुढाऱ्यांचा आणखी एक मोठा स्वार्थ आहे. पाण्याचा थेंब खालीं पडण्यासाठीं तो पुरेसा मोठा व्हावा लागतो. त्याप्रमाणें बेळगांव-कारवारचा थेंब महाराष्ट्राच्या सागरांत पडूं नये यासाठीं धडपडणाऱ्या कर्नाटकस्थांना गोमंतकाचा छोटा थेंब त्या मोठ्या थेंबांत मिसळून जड होणार नाहीं, याची खबरदारी घेणें भागच आहे. गोवा महाराष्ट्रांत गेला तर बेळगांव-कारवारला कर्नाटकांत डांबून ठेवणें केंद्रसरकारलाहि जड जाईल. म्हणून गोव्याचें वेगळें अस्तित्व टिकविण्याची धडपड दोन्ही बाजूंनीं शेवटपर्यंत होत राहील हें उघड आहे.

सुदैवानें श्री. दयानंदराव बांदोडकर यांना या साऱ्या परिस्थितीची नीट कल्पना असावी असें दिसतें. ते बोलतात कमी, परंतु मनांत योजिलेलें करून दाखवितात. त्यांच्या शांत, घिम्या व सर्वसंग्राहक वृत्तीमुळें गोव्याचा प्रश्न विशेष कटुता येऊं न देतां ते सोडवून दाखवितील असा विश्वास वाटतो. अर्थात् तशी वेळ आलीच तर दिल्लीश्वराशीं दोन हात करायलाहि ते मागेंपुढें पाहाणार नाहींत, असेंहि वाटतें. गोव्याची आम जनता आतां जागी झाली आहे. तिला आपल्या रक्तामांसाच्या व संस्कृतीच्या मराठी जनतेशीं एकरूप होण्याची उत्कंठा लागलेली आहे. तिचा तो हक्कहि आहे. आपला हा हक्क शक्यतर मतपेटीच्या द्वारें आणि जरूर पडल्यास आंदोलनाच्या साह्यानें अमलांत आणल्याखेरीज ती राहाणार नाहीं, हें दैवच बोलून चुकला आहे.

३६६५३ ... भुप्रागास...
प्र ... ३३ ... नों ... २१.५.६४
दा. क्र. ९८२५४

REFBK-0014255

REFBK-0014255